श्रीसमर्थकृत

# करुणाष्टकें, घाट्या, सवाया

## प्रास्ताविक श्लोक

वगैरे

संसार हा दुर्लभ लाभला रे। विवेकयोगें बहु शोभला रे।
ज्ञेणे तया ईश्वर क्षोभला रे। भक्तीभरें जाइल तो भला रे॥ ५१८७

१८१४ मार्गशीर्ष शुद्ध १०

REFBK-0004716

अनुक्रम ३३४२३ दि: ३-६-३१
क्रमांक ..... दि: .......
सत्कार्योत्तेजक सभा–धुळे

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग दहावा

सर पहिला ] [ मणि दहावा

श्रीसमर्थकृत

# करुणाष्टकें, घाट्या, सवाया

## प्रास्ताविक श्लोक

वगैरे

REFBK-0004716

संसार हा दुर्लभ लाभला रे। विवेकयोगें बहु शोभला रे।
नेणे तया ईश्वर क्षोभला रे। भक्तीभरें जाइल तो भला रे॥ ५१–७

आवृत्ति दुसरी

सर्व हक्क राखून ठेविले आहेत

१८५४ मार्गशीर्ष शुद्ध १५

21-9-32

किंमत दीड रुपया

संपादक—शंकर श्रीकृष्ण देव, चिटणीस–सत्कार्योत्तेजक सभा–धुळें

मुद्रक—एस्. व्ही. परुळेकर, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँडहर्स्टरोड, गिरगांव–मुंबई

प्रकाशक—केशव भिकाजी ढवळे, रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव–मुंबई

पहिली आवृत्ति–प्रती २०००—१८४१ माघ शुद्ध १५
दुसरी आवृत्ति–प्रती २०००—१८५४ मार्गशीर्ष शुद्ध १५

॥ श्रीराम ॥ 

१५८४

# श्रीसमर्थकृत करुणाष्टकें वगैरे

## अनुक्रमणिका


**प्रस्तावना** पृष्ठांक

१ करुणाष्टकें म्हणजे काय ? १
२ श्रीसमर्थांच्या संगतींत आणखी कांहीं काळ १४
३ उपसंहार ... ... ३६

**करुणाष्टकें वगैरे**

१ नमन ... ... १
२ प्रार्थना ... ... १
३ श्रीरामाचे उपकार ... २
४ प्रभुदर्शन ... ... २
५ जगज्जोति ... ... ३
६ परमार्थाचें भोजन ... ३
७ खरा देव ... ... ४
८ प्रपंचाचें वेड ... ... ४
९ देहकर्म ... ... ५
१० विषमता ... ... ५
११ विरोध ... ... ६
१२ विश्वमाता भवानी ... ६
१३ देह आणि कर्म ... ७
१४ दीनवत्सल देव ... ... ७
१५ श्रीसमर्थांची इच्छा ... ८
१६ श्रीसमर्थांची निष्ठा ... ८
१७ चाफळीं श्रीरामाचें आगमन ... ९

पृष्ठांक

१८ श्रीरामाचें ब्रीद ... ९
१९ भयानक भीम ... ... १०
२० परशुरामाची प्रार्थना ... १०
२१ रडका संसार ... ... ११
२२ देहावस्था ... ... ११
२३ देहभूत ... ... १२
२४ संचित ... ... १२
२५ महात्मा ... ... १२
२६ निराकार ... ... १३
२७ अनादि अनंत काळ ... १३
२८ गेलेली घडी ... ... १४
२९ पडलेलें कोडें ... ... १४
३० सुरलोकपाळ ... ... १५
३१ संकटविमोचक राम ... १५
३२ वर्षाकालीन वनश्री ... १६
३३ नाना गुणाचे लोक ... १६
३४ दुर्जन व सज्जन ... १७
३५ संगीत भजन ... ... १७
३६ राम ... ... १८
३७ शंकर ... ... १८
३८ भेद ... ... १८
३९ प्रत्यय आणि अनुमान ... १९
४० गर्व ... ... १९
४१ देव कर्ता ... ... २०

संपादक—शंकर श्रीकृष्ण देव, चिटणीस-सत्कार्योत्तेजक सभा-धुळें

मुद्रक—एस्. व्ही. परुळेकर, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँडहर्स्टरोड, गिरगांव-मुंबई

प्रकाशक—केशव भिकाजी ढवळे, रामचंद्र बिल्डिंग, गिरगांव-मुंबई

**पहिली आवृत्ति-प्रती २०००—१८४१ माघ शुद्ध १५**
**दुसरी आवृत्ति-प्रती २०००—१८५४ मार्गशीर्ष शुद्ध १५**

॥ श्रीराम ॥

# श्रीसमर्थकृत करुणाष्टकें वगैरे

## अनुक्रमणिका


| प्रस्तावना | | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ करुणाष्टकें म्हणजे काय ? | | १ |
| २ श्रीसमर्थांच्या संगतींत आणखी कांहीं काळ | | १४ |
| ३ उपसंहार | ... ... | ३६ |

**करुणाष्टकें वगैरे**

| | | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ नमन | ... ... | १ |
| २ प्रार्थना | ... ... | १ |
| ३ श्रीरामाचे उपकार | ... | २ |
| ४ प्रभुदर्शन | ... ... | २ |
| ५ जगज्जोति | ... ... | ३ |
| ६ परमार्थाचें भोजन | ... | ३ |
| ७ खरा देव | ... ... | ४ |
| ८ प्रपंचाचें वेड | ... ... | ४ |
| ९ देहकर्म | ... ... | ५ |
| १० विषमता | ... ... | ५ |
| ११ विरोध | ... ... | ६ |
| १२ विश्वमाता भवानी | ... | ६ |
| १३ देह आणि कर्म | ... | ७ |
| १४ दीनवत्सल देव ... | ... | ७ |
| १५ श्रीसमर्थांची इच्छा | ... | ८ |
| १६ श्रीसमर्थांची निष्ठा | ... | ८ |
| १७ चाफळीं श्रीरामाचें आगमन | ... | ९ |
| १८ श्रीरामाचें ब्रीद | ... | ९ |
| १९ भयानक भीम ... | ... | १० |
| २० परशुरामाची प्रार्थना | ... | १० |
| २१ रडका संसार ... | ... | ११ |
| २२ देहावस्था | ... ... | ११ |
| २३ देहभूत | ... ... | १२ |
| २४ संचित | ... ... | १२ |
| २५ महात्मा | ... ... | १२ |
| २६ निराकार | ... ... | १३ |
| २७ अनादि अनंत काळ | ... | १३ |
| २८ गेलेली घडी ... | ... | १४ |
| २९ पडलेलें कोडें ... | ... | १४ |
| ३० सुरलोकपाळ ... | ... | १५ |
| ३१ संकटविमोचक राम | ... | १५ |
| ३२ वर्षाकालीन वनश्री | ... | १६ |
| ३३ नाना गुणाचे लोक | ... | १६ |
| ३४ दुर्जन व सज्जन | ... | १७ |
| ३५ संगीत भजन ... | ... | १७ |
| ३६ राम | ... ... | १८ |
| ३७ शंकर | ... ... | १८ |
| ३८ भेद | ... ... | १८ |
| ३९ प्रत्यय आणि अनुमान | ... | १९ |
| ४० गर्व | ... ... | १९ |
| ४१ देव कर्ता | ... ... | २० |

४२ रंगमंडळ ... ... २०
४३ कविप्रबंद ... ... २१
४४ हरिभजन ... ... २१
४५ हरिरस ... ... २१
४६ परिसाचा गुण ... ... २२
४७ पुष्पयाती ... ... २२
४८ गोपाळकाला ... ... २३
४९ ग्रंथिचा अर्थ काढा ... २३
५० देवधर्म ... ... २४
५१ जन्मसफलता ... ... २५
५२ उमज ... ... २५
५३ बाहेगांवचा मारुती ... २६
५४ मुलांना शिकवण ... २७
५५ आत्मनिवेदन भक्ति ... २८
५६ उदासीन हा काळ कोठें न कंठे । अथवा श्रीसमर्थांच्या जीवींचें आर्त ... २९
५७ तुजवीण रामा मज कंठवेना । ... ३०
५८ म्हणा रे म्हणा राम लीळावतारी ... ... ३१
५९ कर्ता कोण ? ... ... ३२
६० सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें । ... ३३
६१ जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ... ... ३३
६२ अद्वैत चर्चा ... ... ३४
६३ परनिंदा ... ... ३५
६४ निरूपणें मानस आवरावें । ... ३६
६५ परम सुंदर तें पद पावसी । ... ३७
६६ सगुण ध्यान ... ... ३८
६७ रघुनायका मागणें हें चि आतां । ३९
६८ वीतरागी राम ... ... ३९
६९ राघव नीरवीला ... ४०
७० वनवासी राम ... ... ४१
७१ अभिमान ... ... ४२
७२ हास्य ... ... ४२
७३ राम-कृष्ण ... ... ४३
७४ अहल्योद्धार ... ... ४६
७५ हरिपद ... ... ४८
७६ निंदक ... ... ४९
७७ गुरुगम्य गोप्य ... ५१
७८ उदासीन हे वृत्ति कोठें न लागे । ५३
७९ भवाचा वीट ... ... ५४
८० परी अंतरात्मा चि नाना विकारी । ५६
८१ नित्यानित्य ... ... ५७
८२ मोठा चितारी ... ५८
८३ लोकांच्या तऱ्हा ... ५९
८४ लंकेंतील हरिलीला ... ६१
८५ धाव्या २५ ... ... ६३
८६ उभी सुंदरी सांग पां कोण आहे । ६६
८७ तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों। ६६
८८ शहाणें ... ... ६७
८९ कृष्णपर ... ... ६८
९० सुखसागर ... ... ६८
९१ उन्मनी पद ... ... ६९
९२ तुळजा माता ... ... ७०
९३ वैराग्य ... ... ७१

९४ निस्पृह ... ... ७१
९५ सार्थकता ... ... ७२
९६ अहिल्या शिळा ... ७३
९७ रामराज ... ... ७३
९८ समुद्रेश्वर ... ... ७४
९९ दृश्य नानापरीचें ... ७४
१०० शिका रे शिका रे ... ७५
१०१ रामावर भार ... ७५
१०२ स्फूर्ति . ... ७६
१०३ काम ... ... ७७
१०४ शाश्वताचा निश्चयो ... ७७
१०५ हनुमंत ... ... ७८
१०६ राम कोदंडधारी ... ७८
१०७ आशा प्रपंचीं ... ७९
१०८ ग्रन्थ कोट्यानकोटी ... ७९
१०९ सावध होईं ... ... ८०
११० सर्वोत्तमा कै मज भेटि देसी । ८०
१११ जबर्दस्त ... ... ८१
११२ जिणें दैन्यवाणें ... ८१
११३ अद्वैतचर्चा ... ... ८१
११४ दुनिया ... ... ८२
११५ फुलांचा हार ... ... ८२
११६ प्रसंग बरा वाईट ... ८२
११७ ज्ञानमार्ग ... ... ८३
११८ सुपुत्र ... ... ८३
११९ रामनवमी ... ... ८३
१२० गय—अनास्था ... ८४
१२१ दीक्षा ... ... ८४
१२२ अलक्ष ... ... ८४
१२३ हरिकीर्तन ... ... ८४
१२४ बाळका चाळवावें ... ८५
१२५ इति श्री ... ... ८५
१२६ धान्य वगैरे ... ... ८५
१२७ ब्रह्माण्डमाळा ... ८५
१२८ नामाभिधानें ... ८५
१२९ सायोज्यतेची वाट ... ८६
१३० मुक्तता आणि बद्धता ... ८६
१३१ गुहा ... ... ८६
१३२ मिथ्या भास ... ८६
१३३ नवांकित ... ... ८७
१३४ स्फुट श्लोक ... ... ८७
१३५ गणराज ... ... १००
१३६ गणेशशारदासद्गुरु ... १००
१३७ विमळ विवेक ... १०१
१३८ धांव रे रामराया ... १०२
१३९ श्री देव ... ... १०३
१४० गूज हें सज्जनाचें ... १०३
१४१ शीतल छाया ... १०४
१४२ वृद्धापकाळ ... ... १०५
१४३ भीम रुद्रावतारी ... १०६
१४४ फणिवर उठवीला ... १०७
१४५ रामपंचायतन ... १०८
१४६ रविकुळ टिळक ... १०९
१४७ अनुदिन अनुतापें तापलों १११
१४८ सीतेनें केलेला धांवा ... ११३
१४९ नृसिंह ... ... ११४
१५० झडकरि मज रामा सोडवीं ११५
१५१ कांत वन्हीसुतेचा ... ११६
१५२ नाथ लोकत्रयाचा ... ११६
१५३ सुख दुःख मज माझें ... ११६
१५४ स्वतंत्र श्लोक... ... ११७
१५५ गुप्त पंथ ... ... १२३
१५६ धन्य धन्य ते चि धन्य ... १२४
१५७ शब्दार्थभेद ... ... १२५
१५८ लंकेंत मारुती ... १२६
१५९ विचारवंत ... ... १२९

१६० पांडुरंग ... ... १२९
१६१ जटाधरु ... ... १३०
१६२ हरिदास्य ... ... १३०
१६३ पंचवटींत कपटी रावण ... १३०
१६४ स्तवन ... ... १३०
१६५ शारदा ... ... १३१
१६६ कथा ५ ... ... १३२
१६७ गायन ५ ... ... १३३
१६८ विष्णु ५ ... ... १३४
१६९ शंकर ५ ... ... १३५
१७० भवानी ५ ... ... १३५
१७१ रघुनाथ ५ ... ... १३६
१७२ रवि ५ ... ... १३७
१७३ पृथ्वी ५ ... ... १३८
१७४ आप ५ ... ... १३९
१७५ तेज ५ ... ... १४०
१७६ वायो ५ ... ... १४०
१७७ आकाश ५ ... ... १४१
१७८ प्रवृत्ति ५ ... ... १४२
१७९ वैराग्य ५ ... ... १४३
१८० विमळपंचक ... ... १४४
१८१ निश्चळ ५ ... ... १४५
१८२ संव्हार पं॥ ... ... १४५
१८३ निराकार पं॥ ... १४६
१८४ गजमस्तक ... ... १४७
१८५ सार विचार ... ... १४८
१८६ ज्ञानरहित ... ... १४८
१८७ निजसार ... ... १४९
१८८ राम रणीं रजनीचर मारी। १४९
१८९ वैभवाची चंचलता ... १५०
१९० नरदेह ... ... १५०
१९१ सुखसारविचार ... १५१
१९२ काय काय नको ... १५१
१९३ मूढ ... ... १५१
१९४ अभिमान गळे ... १५१
१९५ जड चंचळ निश्चळ ... १५१
१९६ खाणी चारी ... १५२
१९७ सार आणि असार ... १५२
१९८ महंत भला ... ... १५२
१९९ रघोत्तम ... ... १५२
२०० नाम जनपावन ... १५२
२०१ प्रभु राम ... ... १५३
२०२ प्रपंच ... ... १५३
२०३ गुणी ... ... १५३
२०४ रघुनाथकृपा ... ... १५३
२०५ दशा ... ... १५३
२०६ घड कांहीं नाहीं ... १५३
२०७ दासतारक पाविजे ... १५३
२०८ मागणें ... ... १५४
२०९ महंत उदास ... ... १५४
२१० देव पुरंधर ... ... १५४
२११ पद सुंदर ... ... १५५
२१२ नश्वर ... ... १५५
२१३ कुड पंथ ... ... १५५
२१४ राम राम राम जन-सज्जनाविश्राम। १५५
२१५ भजन ... ... १६०
२१६ द्रोणागिरी उत्पाटिला ... १६३
२१७ ब्रह्म ... ... १६५
२१८ देवाधिदेव राम आनंद-सुखधाम १६५
२१९ स्वप्नसुख ... ... १६७
२२० दैवहत ... ... १६७
२२१ वेणु ... ... १६८
२२२ आळसु न करावा ... १६८
२२३ निजध्यास ... ... १६८

२२४ श्रम ... ... १६८
२२५ जातक ... ... १६८
२२६ रावण भीक मागत हिंडतसे १६९
२२७ उत्तम हें वय नास चि केला १६९
२२८ मनास उपदेश ... १६९
२२९ कुटील ... ... १७१
२३० गोप गोविंद गोपाळ ... १७२
२३१ गणेशशारदा ... १७२
२३२ मी मी मी ... ... १७३
२३३ दे दे दे ... ... १७३
२३४ रामरूप ... ... १७४
२३५ रामगुण ... ... १७५
२३६ राममहिमा ... ... १७५
२३७ नरजन्मसफलता ... १७६
२३८ रामप्रताप ... ... १७७
२३९ रामबाण ... ... १७८
२४० अंतीं सोडविता .. १७८
२४१ देवी ... ... १७८
२४२ आनंत जीवीं धरा ... १७९
२४३ साहित्यसंपादना ... १८०
२४४ विवेकवैराग्य ... १८०
२४५ साधव भला ... १८१
२४६ जैशासि तैसा बरा ... १८१
२४७ सीतामाईनें केलेलें दिव्य ... १८२
२४८ सीतास्वयंवराचा पण ... १८३
२४९ बल्लव ... ... १८३
२५० रामदास्य ... ... १८३
२५१ वाद्यें ... ... १८४
२५२ भोगें रोग जडे ... १८४
२५३ लिंग मरतां ... १८४
२५४ ज्ञानगंगा ... ... १८४
२५५ विधाता ... ... १८५
२५६ रामानुज ... ... १८५
२५७ प्रत्यावृत्ति ... ... १८५
२५८ स्वरूपस्थिति ... ... १८५
२५९ देह ... ... १८५

श्रीसमर्थकृत करुणाष्टकें वगैरे

## प्रस्तावना

॥ श्रीराम ॥

( १ )

# करुणाष्टकें म्हणजे काय ?

श्रीरामचंद्रा करुणासमुद्रा ।
ध्यातों तुझी राजस योगमुद्रा ।
नेत्रीं नये रे तुजवीण निद्रा ।
कै भेटसी बा मजला समुद्रा ॥ १३४–१३६

( १ ) **श्रीसमर्थ**कृत कांहीं श्लोकांना **करुणाष्टकें** हें नांव केव्हां मिळालें तें मला पटकन सांगतां येत नाहीं, तरी इतकें खरें कीं, श्रीसमर्थांनीं कांहीं हें नांव योजिलेलें नव्हतें. त्यांनीं हें नांव ठेवल्याचें माझ्या आढळण्यांत तरी नाहीं. गिरिधरकृत **समर्थप्रतापांत**, महीपतिकृत **संतविजयांत**, उद्धवसुतकृत **चरित्रांत**, हनुमंतस्वामिकृत **बखरींत**, म्हणजे शके १७४० च्या पूर्वींच्या कोणत्या हि श्रीसमर्थचरित्रग्रंथांत हें नांव योजिल्याचें दिसत नाहीं. नांव केव्हांचें हि असो व तें कोणी हि प्रचारांत आणलेलें असो, तें अन्वर्थक आहे, यांत शंका नाहीं. **या एकंदर कवितेंत करुणरस ओतप्रोत भरलेला आहे.**

( २ ) करुणाष्टकें म्हणजे करुणाघन परमेश्वरास, आपल्या इष्ट उपास्य दैवतास, दीनदयाळ सद्गुरूस परोपरीनें प्रेमभरानें आळविणारी कविता. आपल्या अवगुणांची आठवण होऊन अनुतापयुक्त जे छंदोबद्ध उद्गार मुखावाटें बाहेर पडतात, तीं करुणाष्टकें होत. ज्या कवितेंत पश्चात्ताप आहे, संसाराची असारता आहे, विवेकयुक्त वैराग्य आहे, मोक्षाची अपेक्षा आहे, सद्गुरुचा धांवा आहे, तिला करुणाष्टक म्हणावें.

**जन्मासि येतां उघडें चि यावें ।**
**सेखीं चिवें सांडुनि सर्व जावें ॥ ६०–२**

अशा रीतीनें प्रपंचाची नश्वरता दर्शविणारी,

**शुभाशूभ होणार कांहीं कळेना ।**
**पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ॥ २४ ॥**

अशी मनुष्याची पराधीनता प्रकट करणारी,

**चंचळ वैभव हें बहुतांचें । देखत देखत जात जनाचें ॥ १८९–५**

असें समजावून सांगून व

**वृथा सीण संसार करती रडाया ॥ २१ ॥**

अशी संसाराची रडकथा प्रत्ययास आणून हि

**सुखें संसार करावा परलोक हि साधावा ।**
**काळ सार्थक करावा जन्म धन्य होतसे ॥ २१४×१५**

अशा रीतीनें प्रपंच आणि परमार्थ दोन्ही हि करावयास सांगणारी,

**बहुत काय वदों गुण आपुले ।**
**पतित ते मजहूनि भले भले ॥ २×४**

अशी स्वतःच्या अवगुणांची आठवण होऊन व

**तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों ॥ ८७**

असें वाटावयास लावून

**नव्हे धीर नयनीं सदा नीर लोटे ॥ ५६×३**

अशा रीतीनें मनाला कष्टी करणारी,

**उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ५६**

किंवा

**उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ ७८**

अशी मनाला उद्विग्नता आणून, काय करावें म्हणून

**रघुनायका काय कैसें करावें ॥ २९**

असें रामाला च विचारणारी,

**काय करूं रे क्रीया घडेना ।**
**तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ५७×७**

अशा रीतीनें हातून कांहीं होत नाहीं म्हणून दुःख करणारी व रामभेटीसाठीं तळमळावयास लावणारी,

**गजबज मज आतां सर्वथा आवडेना ।**
**बहुत बडबडीतो त्यास आम्हा पडेना ॥ १५४–३**

अशा रीतीनें जनसंसर्गाचा वीट आणणारी,

**बहु वीट आला भवाचा न सावे ।**
**अटव्यांत देऊनियां हाक जावें ॥ ७९×९**

अशा रीतीनें संसर्ग सोडावयास सांगणारी व

**स्वजन जन तजावें देश लंघूनि जावें ॥ १५४×२६**

म्हणून लांब कोठें तरी एकांतांत जाऊन बसण्याचा उपदेश करणारी व तेथें जाऊन

**सर्वोत्तमा कै मज भेटि देसी ॥ ११०**

असें रामाला विचारणारी,

**अनुदिन अनुतापें तापलों देवराया ॥ १४७–१**

असें रामाला सांगणारी,

**तुजविण सिण जाला धांव रे रामराया ॥ १३८–४**

असा रामाचा धांवा करणारी,

**न पवसि मज कां रे म्यां तुझें काय केलें ॥ १४४–९**

असा रामाला च बोल लावणारी,

**नव्हे योगें यागें जपतपव्रतें प्राप्त कवणा ॥ १८३–३**

हें जाणून

**म्हणा रे म्हणा राम लीळावतारी ॥ ५८**

असें लोकांस शिकविणारी व

**राम राम राम जनसज्जनविश्राम ॥ २१४–१**

असा स्वतःला घोष करावयास लावणारी,

**असा दीन अज्ञान मी दास तूझा ।**
**समर्था जनीं घेतला भार माझा ॥ १०१–१**

म्हणून रामाचे उपकार स्मरणारी व त्या उपकाराची फेड आपण काय करणार म्हणून

**समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥ ३ ॥**

**जन्मासि येतां उघडें चि यावें ।**
**सेखीं चिवें सांडुनि सर्व जावें ॥ ६०-२**

अशा रीतीनें प्रपंचाची नश्वरता दर्शविणारी,

**शुभाशूभ होणार कांहीं कळेना ।**
**पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ॥ २४ ॥**

अशी मनुष्याची पराधीनता प्रकट करणारी,

**चंचळ वैभव हें बहुतांचें । देखत देखत जात जनाचें ॥ १८९-५**

असें समजावून सांगून व

**वृथा सीण संसार करती रडाया ॥ २१ ॥**

अशी संसाराची रडकथा प्रत्ययास आणून हि

**सुखें संसार करावा परलोक हि साधावा ।**
**काळ सार्थक करावा जन्म धन्य होतसे ॥ २१४×१५**

अशा रीतीनें प्रपंच आणि परमार्थ दोन्ही हि करावयास सांगणारी,

**बहुत काय वदों गुण आपुले ।**
**पतित ते मजहूनि भले भले ॥ २×४**

अशी स्वतःच्या अवगुणांची आठवण होऊन व

**तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों ॥ ८७**

असें वाटावयास लावून

**नव्हे धीर नयनीं सदा नीर लोटे ॥ ५६×३**

अशा रीतीनें मनाला कष्टी करणारी,

**उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ५६**

किंवा

**उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ ७८**

अशी मनाला उद्विग्नता आणून, काय करावें म्हणून

**रघुनायका काय कैसें करावें ॥ २९**

असें रामाला च विचारणारी,

**काय करूं रे क्रीया घडेना ।**
**तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ५७×७**

अशा रीतीनें हातून कांहीं होत नाहीं म्हणून दुःख करणारी व रामभेटीसाठीं तळमळावयास लावणारी,

**गजबज मज आतां सर्वथा आवडेना ।**
**बहुत बडबडीतो त्यास आम्हा पडेना ॥ १५४-३**

अशा रीतीनें जनसंसर्गाचा वीट आणणारी,

**बहु वीट आला भवाचा न सावे ।**
**अटव्यांत देऊनियां हाक जावें ॥ ७९×९**

अशा रीतीनें संसर्ग सोडावयास सांगणारी व

**स्वजन जन तजावें देश लंघूनि जावें ॥ १५४×२६**

म्हणून लांब कोठें तरी एकांतांत जाऊन बसण्याचा उपदेश करणारी व तेथें जाऊन

**सर्वोत्तमा कै मज भेटि देसी ॥ ११०**

असें रामाला विचारणारी,

**अनुदिन अनुतापें तापलों देवराया ॥ १४७-१**

असें रामाला सांगणारी,

**तुजविण सिण जाला धांव रे रामराया ॥ १३८-४**

असा रामाचा धांवा करणारी,

**न पवसि मज कां रे म्यां तुझें काय केलें ॥ १४४-९**

असा रामाला च बोल लावणारी,

**नव्हे योगें यागें जपतपव्रतें प्राप्त कवणा ॥ १८३-३**

हें जाणून

**म्हणा रे म्हणा राम लीळावतारी ॥ ५८**

असें लोकांस शिकविणारी व

**राम राम राम जनसज्जनविश्राम ॥ २१४-१**

असा स्वतःला घोष करावयास लावणारी,

**असा दीन अज्ञान मी दास तूझा ।**
**समर्था जनीं घेतला भार माझा ॥ १०१-१**

म्हणून रामाचे उपकार स्मरणारी व त्या उपकाराची फेड आपण काय करणार म्हणून

**समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥ ३ ॥**

अशी कबुली देणारी, इत्यादि जी कविता ती सारी करुणाष्टकें या सदरांत येते.

( ३ ) करुणाष्टकें म्हणजे काय, हें एका शब्दांत सांगावयाचें झाल्यास **रडविणारी कविता** तीं करुणाष्टकें होत, असें म्हणतां येईल. हे रामा, त्रिविध तापानें पुरा पोळून निघालों, कांहीं बाकी उरली नाहीं, आतां परीक्षा पुरे झाली, किती अंत पाहाणार, दया करा, आतां करुणा येऊं द्या, हे सद्गुरो, मनाला नुसत्या आशेवर कोठपर्यंत ताठकळत ठेवूं, कांहीं तरी आतां प्रचीति येऊं द्या, यापुढें धीर धरवत नाहीं, धैर्य खचत चाललें, जीव नकोसा झाला,

**परस्तावलों कावलों तप्त जालों ॥ ८७–८**

आतां अंत पाहूं नका, महाराज, दर्शन द्या, काय करूं तें सांगा, सेवेला लावा, जगताचें यथार्थस्वरूप प्रत्ययास आणून द्या, ब्रह्मसुखाची अंधुक तरी कल्पना येऊं द्या, सद्गुरो, धांवा, आतां न धांवाल, अजून उपेक्षा कराल तर वृथा विश्वासलों असें म्हणावें लागेल असा प्रसंग, गुरुराजा, या दीन किंकरावर आणूं नका.

**बहुत सेवक त्याहुनि हीण मी ।**
**बहुत सेवक त्याहुनि दीन मी ॥ २–४**

असा मी हीनाहून हीन आणि दीनाहून दीन आहे, पतितांतला पतित आहे, पण आपण पतितपावन आहांत ना, माझी उपेक्षा कराल तर पतितपावन हें नाम यापुढें कसें मिरवाल, आपणांस दीनानाथ कोण म्हणेल, इत्यादि इत्यादि असंख्य प्रकारांनीं धांवा करून सर्वोत्तमाला आळविणारी कविता तिचें नांव करुणाष्टक होय! चित्त होरपळलेलें असावें, अंतःकरण भक्तिप्रेमानें उचंबळून आलेलें असावें, मन निमित्तावर टेकलेलें असावें, एकांत असावा, सन्मुख राम असावेत आणि हीं अष्टकें म्हणावींत,

**दुःखानळें मी संतप्त देहीं ।**
**तुजवीण रामा विश्रांति नाहीं ।**
**आधार तूझा मज मी विदेसी ।**
**सर्वोत्तमा कै मज भेटि देसी ॥ ११०–१**

प्रालब्ध खोटें अभिमान आला ।
स्वामी समर्थां वियोग जाला ।
तेणें बहू क्षीति वाटे मनासी ।
सर्वोत्तमा कै मज भेटि देसी ॥ २ ॥

तुझिया वियोगें बहु वेदना रे ।
विवेक नाहीं आम्हा दिना रे ।
पडिला समंधु या दुर्जनेसीं ।
सर्वोत्तमा कै मज भेटि देसी ॥ ३ ॥

संसारचिंता मज वाटते रे ।
रामा प्रपंचीं मन जातसे रे ।
संसर्ग आहे इतरां जनासीं ।
सर्वोत्तमा कै मज भेटि देसी ॥ ४ ॥

असलें त्यांतलें एकादें च अष्टक कां होईना, तें म्हणावें आणि सात्विक मनोभाव उत्पन्न होऊन ज्याचें शरीर रोमांचित होणार नाहीं, ज्याला रडें कोसळणार नाहीं, त्याच्यासाठीं मात्र हीं अष्टकें नाहींत, असें त्यानें खुशाल समजावें !

( ४ ) या आळविण्यांत, स्वतःचे अवगुण आठवून धांवा करण्यांत, या रडण्यांत काय आनंद असतो, त्याचा अनुभव अशा रडणाराला असेल ! आमच्या वाचकांना या रडण्याचा अनुभव आहे ना ? निदान नित्याच्या रडण्याचा तर अनुभव आहे ना ? मला वाटतें, रडतां सर्वांना येतें. त्यांतलें च हें हि रडणें आहे. रडण्याची तऱ्हा एक च, फक्त कारण वेगळालें. आई बाप, बहिण भाऊ, कन्या पुत्र, जामाता स्नुषा, स्त्री पति, इत्यादिकांसाठीं सर्व जण रडतात, पण देहभान विसरून विव्हल अंतःकरणानें ‘ रामा धांव ’ म्हणून एक च आरोळी ठोकून रामासाठीं रडणारे थोडे ! जन्माला आल्यापासून मरेपर्यंत रडणें सर्वांच्या च पाठीमागें लागलें आहे, पण हें रामासाठीं रडणें जरा निराळें असतें. माणसाच्या मागचें रडणें जर टळत नाहीं, तर मग केवळ ऐहिक वस्तूसाठीं च तेवढें कां रडावें, हें समजत नाहीं. रडावयाचें च, तर मग अशासाठीं रडावें कीं, ज्याची प्राप्ति झाली असतां रडणें कायमचें सुटावें ! जी वस्तु, आज ना उद्यां, केव्हां तरी जावयाची च, ती उद्यांची आज गेली म्हणून त्यांत रडण्यासारखें काय आहे ? फार काय, पण उद्यां ठेवावयाचा तो देह आज ठेवावा लागला, म्हणून तरी त्यांत काय बिघडलें ?

**अहा रे मना हें तुला कां कळेना ।**
**वृथा सीणसी लोभ तूझा ढळेना ।**
**जिणें सर्व जाईजणें दों दिसांचें ।**
**विचारीं जनीं आपुलें काय कैचें ॥ २७-४**

होणें आणि जाणें हा च ज्या वस्तूचा स्वभाव अशा नश्वर पदार्थासाठीं रडण्याचें सोडून देऊन

**अखंड रामार्पण वासना हे ॥ ९४-२**

करून शहाण्यानें केवळ एका रामासाठीं रडावें. इतर सर्व आशा सोडून फक्त श्रीरामचरणाची च तेवढी आशा न केली तर रामभेटीची आशा नको.

**आशा प्रपंचीं जंवं दृढ आहे ।**
**तंव राम चित्तीं कदा न राहे ॥ १०७-१**

( ५ ) हें जें रामासाठीं रडावयाचें तें एकांतांत रडावें, असें आहे. हें रडणें दुसऱ्या कोणाच्या नजरेस पडलें म्हणजे त्याची किंमत गेली, असें समजावें. हें रडणें दुसऱ्या कोणीं पाहिल्याचें आपणांस कळलें, म्हणजे सन्मुख असलेला राम विन्मुख, पाठमोरा होतो, भेटण्यासाठीं दोन पाउलें चालून जवळ आलेला राम चार पाउलें दूर जातो. अशी कांहीं या रडण्याची विलक्षण तऱ्हा आहे. तें रडणें कसें रडावें, हें हीं करुणाष्टकें शिकवितात. असें हें रडणें आपल्या कल्याणाचें एक मोठें पण सोपें साधन आहे. रडण्यापरीस आणखी सोपें साधन कोणतें असणार ? जो असा कधीं रडला नाहीं, त्याचें कधीं कल्याण झालें नाहीं ! जो रडत नाहीं त्याचें कल्याण होत नाहीं व जो रडणार नाहीं त्याचें कल्याण होणार नाहीं ! म्हणून हीं करुणाष्टकें वाचून वाचकांनीं रामासाठीं रडावयास शिकावें !

( ६ ) आजपर्यंत पुष्कळांनीं पुष्कळ साधनें सांगितलीं, पण इतकें सुलभ, लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना सहज साधणारें, जन्मतः सर्वांच्या आंगवळणीं पडलेलें, इतकें सोपें साधन क्वचित् च कोणीं सांगितलें असेल ! पण म्हणून च या साधनाची उपेक्षा करण्याची कित्येकांना बुद्धि होईल, अशी भीति वाटते. तसें होऊं नये, म्हणून स्पष्ट सांगितलें पाहिजे कीं, यांत माझ्या पदरचें कांहीं नाहीं. असें श्रीसमर्थांचें सांगणें आहे. अनुभवल्यावांचून समर्थांनीं कांहीं च सांगितलें नाहीं. आधीं केलें मग सांगितलें, अशी त्यांची प्रतिज्ञा आहे.

**हुर हुर हुर वाटे अंतरीं बाष्प दाटे।**
**तुजविण रघुराजा लोचनीं नीर लोटे ॥ १५४-१७**

ही श्रीसमर्थांची अवस्था ! तेथें, वाचक हो, तुमची आमची कथा काय ? हें रडणें म्हणजे तुम्ही काय समजता ? हें रडणें निरुत्साह, हताश करणारें नव्हे, तें धीर देणारें, रडणाराची चित्तवृत्ति प्रसन्न करणारें, त्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न करणारें, त्याला परमार्थाच्या वाटेवर आणून सोडणारें असतें. होय, श्रीसमर्थ हि एकांतांत रामासाठीं रडत, धाय मोकलीत. त्यांच्या एका रडण्याची आमच्या जन्मभर रडण्याला सर यावयाची नाहीं. आमची सारी धडपड ऐहिक वैभवासाठीं !

**येक चढे दुसरा पडताहे। येक पडे दुसरा रडताहे ॥ १८९-५**

हें आम्ही जगांत पाहतों, आम्हांस तें कळतें, फार काय पण ते चढण्या-पडण्यारडण्याचे प्रसंग आम्हांवर हि येतात, तरी पण खरें हित कशांत आहे तें न समजून आम्ही घसरत च असतों. प्रपंचांतलीं दुःखें वारंवार सोसून आमचीं मनें अगदीं निगरगट्ट बनलेलीं असतात.

**लोकीकीं घात होतां जिवलग मरतां दुखशोकीं पडावें।**
**संसारीं चर्फडावें तडफड करितां बोंबलावें रडावें।**
**हा हा हा हा म्हणावें द्वयकरकमळीं तोंड हाणोनि घ्यावें।**
**मेलें तें वेर्थ गेलें तदुपरि पुढती चालवावें चलावें ॥ २५३**

हा आमचा मामला ! प्रपंचांतलीं केवढालीं हि संकटें येवोत, आम्ही तीं सारीं गट्ट करून पुन्हां मनोभावें प्रपंच करण्यास तयार असतों. आम्हांस रामाची मुळीं च आठवण होत नाहीं, असें नाहीं, पण राम आठवण्याची आमची वेळ म्हणजे प्रपंचांतला संकटकाळ, एरव्हीं आम्ही रामाचें कांहीं लागत नाहीं, रामासाठीं राम आम्हांस कधीं आठवावयाचा नाहीं. प्रपंचांतल्या दुःखानें आम्ही उदासीन होतों, तर श्रीरामाच्या भेटीसाठीं श्रीसमर्थ आतुर होत, भेट न झाली तर उदासीन होत. श्रीरामासाठीं त्यांचा जीव किती तुटे, त्यांच्या अंतःकरणाची काय अवस्था होई, हें जाणावयाचें असेल तर ५६ वें अष्टक पहा, ५७ वें अष्टक वाचा.

**बळें लावितां चित्त कोठें जडेना।**
**समाधान तें कांहिं केल्यां घडेना।**

नव्हे धीर नैनीं सदा नीर लोटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ५६–३
अवस्था मनीं लागली काय सांगों ।
गुणीं गुंतला हेत कोण्हासि मागों ।
बहूसाल भेटावया प्राण फूटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ४ ॥
कृपाळूपणें भेट रे रामराया ।
वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया ।
जनामाजि लोकीक हा ही न सूटे ।
उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ५ ॥

इत्यादि.

( ७ ) नुसत्या रडण्यावर जाऊं नका. हें सद्गुरुभेटीसाठीं रडणें वाटतें तितकें सोपें नाहीं. तें कोणाला हि सहज साधेल असें समजूं नका. त्याचा अभ्यास च केला पाहिजे. तें कदाचित् अभ्यास करूं म्हटल्यानें हि साधावयाचें नाहीं. त्याला पूर्वपुण्याई पाहिजे, पूर्वजन्मींचा अभ्यास पाहिजे, तो अभ्यास वाडवडिलांपासून चालत आलेला पाहिजे. त्या अभ्यासाला प्रत्येकानें केव्हां तरी आरंभ केला पाहिजे. जिवलग नातलग गेला म्हणजे कसें रडावें याचा आपणांस चांगला अभ्यास झालेला असतो, पण त्रेतायुगीं होऊन गेलेल्या रामासाठीं कसें रडावें याचा अगदीं पहिला धडा म्हणून ६८, ६९ आणि ७० अशीं तीन अष्टकें वाचा. तीं वाचा आणि पहा, रामासाठीं रडतां येणें तुम्हांस साधेल कां नाहीं ! तीं तीन अष्टकें अगदीं सोपीं आहेत. त्यांत हनुमंताच्या भेटीपर्यंतचें श्रीरामाचें सगुणचरित्र आहे. ६८ व्या अष्टकांत गणेशशारदा यांना नमन करून

गितीं गाऊं या रामचंद्रासि आतां ।

असा संकल्प केला आहे, पण नवल असें कीं, हनुमंतभेटीपर्यंतचा च तेवढा कथाभाग या तीन अष्टकांत थोडक्यांत आणला आहे, पुढचा नाहीं. ही कथा समर्थांनीं अशी मधें च कां सोडली बरें ? पुढील कथाभागाचीं अष्टकें असून तीं कल्याणांनीं उतरलीं नाहींत, कां सुंदरकांड आणि युद्धकांड अशीं दोन कांडें स्वतंत्रपणें 'गायिलीं असल्यामुळें येथें फक्त तत्पूर्वींचा च तेवढा भाग वर्णिला आहे ? असो, तें कांहीं असो, आज आपणांस या तीन अष्टकांचा निराळ्या दृष्टीनें विचार करावयाचा आहे. त्यांत सगुणचरित्राचें च वर्णन

आहे, पण तें किती मनोहर आहे ! पहिल्या अष्टकांत श्रीरामाला वैराग्य प्राप्त झाल्याचें वर्णन आहे, दुसऱ्यांत राम, सीता, लक्ष्मण यांना पंचभूतादिकांच्या हवालीं करतांना त्यांची मातेनें केलेली प्रार्थना आहे, ती किती हृदयंगम आहे !

**हे धाकुटी योगिणी कुंजवासी ।**
**तुम्ही च तेथें सखिया वयेसी ॥**

असें म्हणून सीतेला कोकिलांच्या स्वाधीन करतांना कौसल्येची जी स्थिति झाली

**सगद्गदें बोलतसे सुशब्दें । स्रवताति नीरें नयनारविंदें ॥**

तिचा अनुभव वाचकांना हि येत नाहीं काय ? तिसऱ्या अष्टकांत तर

**पहा हो पहा राम आरण्यवासी ।**
**पुरी त्यागिली सर्व येका जिवेसीं ।**
**मऊ सूमनें सेज खूपे जयाला ।**
**असा राम तो सीघ्र पाईं निघाला ॥**

त्या रामाला आणि ब्रह्मचारी लक्ष्मणाला व दिव्य जानकीला पायीं जातांना पाहून ऋषिनायकांच्या प्रमाणें वाचकांचा हि कंठ दाटून आला पाहिजे !

( ८ ) आमच्या वाचकांपैकीं जे कांहीं मोठ्या धीराचे वाचक असतील, जे रडण्याच्या पलिकडे गेले असतील, सत्य काय आहे आणि मिथ्या काय आहे याचा निवाडा होऊन तद्नुरूप ज्यांचें वर्तन घडत असेल, अशा वाचकांना वाटेल कीं, रडण्यापलिकडे जर या अष्टकांत कांहीं नसेल तर तीं वाचून आम्हांस काय करावयाचें आहे ? इतक्या वरच्या पायरीवरचे वाचक फार थोडे अशी माझी समजूत आहे, पण ते थोडे असोत कीं पुष्कळ असोत, त्यांच्या हि साठीं या अष्टकांत कांहीं च नाहीं, असें नाहीं. हें खरें कीं, अष्टकांतील मुख्य रस करुण, पण कांहीं कांहीं अष्टकें अध्यात्मपर आहेत, कांहीं कर्मपर हि आहेत, फार काय पण, कर्म, उपासना, ज्ञान, तसें च त्यांना पोषक वैराग्य, अनुताप, इत्यादि सर्व भाग या अष्टकांत आले आहेत. ही अशी निरनिराळी संपूर्ण निवड मी केलेली नाहीं, पण

२, ३, ४, ८, १५, १६, १७, १८, २०, २१, २२, २४,
२७, २८, २९, ३१, ३६, ४०, ५३, ५६, ५७, ६०, ६५,
६७, ६८, ६९, ७०, ७८, ७९, ८१, ८७, ९२, ९३,
१०१, १०५, ११०, १३८, १४१, १४४, १४५, १४७,

१४८, १५३, २०७, २०८, २१४, २१५, २१६, २१८, २२४, २३५, २३६, २३९–२, २४०–१, २४२, २५०, २५३, २५८, २५९

हीं अष्टकें **प्रास्ताविक** आहेत, त्यांत उपदेश आहे, अनुताप आहे, उपासना आहे, वैराग्य आहे व मी तीं पाठ करण्यासाठीं निवडलीं आहेत. ही माझी निवड आहे, प्रत्येकानें आपआपली निवड स्वतंत्रपणें करावी.

५, ६, ७, ९, १३, २३, २५, २६, ५५, ५९, ६२, ७७, ८०, ८६, ९०, ११३, १२५, १२९, १३१, १७१, १७८, १७९, १८१, १८३, १९५, २१७

इत्यादि अष्टकें **अध्यात्मपर** आहेत. त्यांत पाठ करण्यासाठीं मी तूर्त तीन च योजिलीं आहेत, तीं २३, ५५, व ७७ हीं होत. तीं अध्यात्मपर आहेत खरीं, पण त्यांची कोणाला हि भीति वाटूं नये इतकीं तीं सोपीं आणि गोड आहेत. ही च तर सद्गुरूची कृपा कीं, शिष्याचा अधिकार किती कमी आहे हें पाहून ते कठिण विषय हि अगदीं सोपा करून सांगत असतात.

अष्टकें १३४ व १५४ यांत स्फुट श्लोक आहेत. १३४ पकीं

५, ७, १६, १९, २०, २४, ३०, ३७, ३८, ३९, ४०, ४२, ४४, ४५, ४६, ४७, ४९, ५८, ५६, ६०, ६४, ६८, ६९, ७१, ७२, ७४, ७५, ७७, ७८, ८७, ८८, ८९, ९४, ९७, ९९, १००, १०१, १०४, १०८, ११४, ११५, ११६, ११८, ११९, १२४, १२६, १२८, १३०, १३१, १३३, १३६, १३८, १४६

व १५४ व्या अष्टकापैकीं

३, १२, १४, १७, २६, ३५, ४०

हे श्लोक **सुभाषितवजा** असून प्रत्येकाला मुखोद्गत असावेत.

श्रीसमर्थांचें जगाचें **निरीक्षण** फार दांडगें होतें, हें सांगावयास नको. समाजाला सोडून कोठें तरी डोळे मिटून बसावें, असा त्यांचा संप्रदाय च नव्हे. डोळे उघडे ठेवून सर्व कांहीं पहावें व त्यांतील सार तेवढें च नेमकें घ्यावें, असा त्यांचा दंडक होता. याची साक्ष अष्टकें

८, १०, ११, ३२, ३३, ८३, ९८, ९९, १२४, १४२, २४६,

२२५२३ दि: ३।१२

इत्यादिकांवरून चांगली पटते.

५१, ५४, ६४, १००, १०९, ११८, १२०, १८५, १८७, १८९, १९०, १९५, २१२, २२२, २२७, २२८, २३७

इत्यादि अष्टकांत **शिकवण** आहे. पण मी हें वर्गीकरण येथें च थांबवितों, नाहीं पेक्षां १ ते २५९ म्हणजे सर्व च अष्टकांचा कोणत्या ना कोणत्या सदराखालीं समावेश करण्याचा मोह अनावर व्हावयाचा !

( ९ ) हीं अष्टकें केवळ तुमच्या आमच्यासाठीं आहेत, हें उघड आहे. नाहीं पेक्षां

**भजनरहित रामा सर्व ही जन्म गेला ।**

तो काय समर्थांचा कां तुमचा आमचा ?

**स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला ।**

तो काय समर्थांनीं कां तुम्ही आम्ही ?

**रघुपति मति माझी आपुलीसी करावी ।**

राममय मति समर्थांची व्हावयाची राहिली होती, कां तुमची आमची व्हावयाला पाहिजे आहे ?

**सकळ तजूनि भावें कास तूझी धरावी ॥ १४७–२**

रामासाठीं घरादाराचा त्याग समर्थांनीं केला होता कां तुम्ही आम्ही ? हा च न्याय सर्व अष्टकांना लागू. तुमची आमची करुणा येऊन तुमच्या आमच्या कल्याणासाठीं दयाघन समर्थांनीं हा करुणाष्टकांचा वर्षाव केला आहे ! त्या वर्षावांत वाचकांनीं आपलीं स्नानें सारून व मनें निर्मल करून मग श्रीसमर्थांच्या दर्शनाला चलावें ! प्रत्यक्ष श्रीसमर्थांच्या दर्शनाला ? एवढें आपलें भाग्य कोठें आहे ! श्रीसमर्थस्वरूप ग्रन्थांच्या दर्शनास चलावें, असें म्हणावयास पाहिजे होतें. करुणाष्टकांच्या श्रवणमननानें मनोभूमि तयार झाल्यावर मग

**आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ॥**

अशा दासबोधादि समर्थस्वरूपग्रन्थांतील गहन तत्त्वज्ञानाची पेरणी त्या मनोभूमींत केल्यास समाधानाचें पीक उत्कृष्ट व मुबलक येईल, असा माझ्या म्हणण्याचा भावार्थ होय. पीक काढल्यावर हि जमीन तयार करावी च लागते. नित्यक्रमांत दासबोधादि अध्यात्मग्रन्थ वाचण्यापूर्वी व वाचल्यानंतर करुणाष्टकें म्हणावीं, एवढें च मला सांगावयाचें आहे. दिवसा पोटापाण्याचा उद्योग करून रात्रीं कांहीं एक व्यत्यय न येतां जो कांहीं काळ लाभेल त्यांत

आधीं ( १ ) कांहीं करुणाष्टकें म्हणावीं, मग ( २ ) निदान अकरा श्री श्लोक मनाचे, ( ३ ) श्रीमत् दासबोधाचे निदान दोन समास व ( ४ ) आपल्या व दुसऱ्या संप्रदायांचे इतर अध्यात्मग्रन्थ वाचावे आणि शेवटीं पुन्हां ( ५ ) कांहीं करुणाष्टकें म्हणून ( ६ ) श्रीसद्गुरुस्वरूपचिंतनांत नित्यक्रम सारावा. असा नित्यक्रम आचरीत असतां श्रीसमर्थांना करुणा येईल तेव्हां येईल, आपण त्याची चिंता करून काय होणार ?

( १० ) सरते शेवटीं आणखी एक सूचना करावीशी वाटते. बोलावें कां न बोलावें, या घोटाळ्यांत च मन आहे. क्षमा मागून बोलतों. ठिकठिकाणीं मठांत आणि मठाबाहेर अष्टकें, सवाया वगैरे नित्य नियमानें म्हणण्याचा प्रघात आहे. पण म्हणतांना म्हणणाराचें चित्त त्या अष्टकसवायांच्या अर्थाकडे असलेलें क्वचित् च मला पहावयास सांपडलें. हें काय म्हणणें ? ही कां बिगार आहे म्हणून ती कशी तरी पुरी करून मोकळे व्हावयाकडे सारें लक्ष असावें ? बिगार समजून नित्य नियम पाळण्यापासून जन्मांत फायदा व्हावयाचा नसतो. मसूरहून चाफळला जाण्यासाठीं केलेल्या गाडीनें गाडीवाला हि चाफळाकडे जात असतो व आंत बसलेला श्रीरामदर्शनोत्सुक भक्त हि जात असतो. पण दोघांच्या चित्तवृत्तींत केवढें अंतर असतें ! एकाचें लक्ष बिगार संपवून परतण्याकडे असतें तर दुसऱ्याचे डोळे प्रभुचरणाकडे लागलेले असतात ! त्या गाडीवाल्याच्या वृत्तीनें नित्य नियम पाळणाराचें फार तर पाठांतर छान होऊन त्यास श्लोक अष्टकें, सवाया घडघडाट म्हणून दाखवितां येतील, पण ओठाच्या खालीं त्यांतला एक शब्द उतरेल तर शपथ ! एकादें अष्टक म्हणावयाचें म्हणजे काय करावयाचें असतें ? नुसते शब्द उच्चारावयाचे असतात कां अर्थासवें मनानें जाऊन अर्थरूप व्हावयाचें असतें ?

**उदासीन हा काळ जातो गमेना ।**
**सदा सर्वदा थोर चिंता शमेना ।**
**उठे मानसीं सर्व सांडूनि जावें ।**
**रघूनायका काय कैसें करावें ॥ २९–१**

**जनीं बोलतां चालतां वीट वाटे ।**
**नसे अंतरीं स्वस्त कोठें न कंठे ।**
**घडीनें घडी चित्त कीती धरावें ।**
**रघूनायका काय कैसें करावें ॥ २ ॥**

**अवस्था मनीं होय नानापरीची ।**
**किती काय सांगों गती अंतरींची ।**
**विवेकें चि या मानसा आवरावें ।**
**रघूनायका काय कैसें करावें ॥ ३ ॥**
**विचारें तऱ्हीं अंतरीं कोड होतो ।**
**शरीरासि तो हेत सांडूनि जातो ।**
**उपाधीस देखोनि वाटे सरावें ।**
**रघूनायका काय कैसें करावें ॥ ४ ॥**
**म्हणे दास ऊदास जालों दयाळा ।**
**जनीं वेर्थ संसार हा वायचाळा ।**
**तुझा मी तुला पूसतों सर्व भावें ।**
**रघूनायका काय कैसें करावें ॥ ५ ॥**

किती प्रेमळ अष्टक आहे ! पण तें च म्हणतांना जर यत्किंचित् हि अंतःकरण न द्रवेल तर तें म्हणण्याचें फल काय ? तें म्हणतांना आपणांस हि जर उदास न वाटेल, संसाराचा कंटाळा न येईल, इतरांशीं वायफळ बोलण्या-चालण्याचा वीट न येईल, रामदर्शनाविषयीं आतुरता न वाटेल, विचारांची गर्दी होऊन मनाची तारांबळ न उडेल, उपाधींची भीति न वाटेल, तर हें अष्टक म्हटलें काय आणि न म्हटलें काय सारखें च होय !

**घरें सुंदरें सौख्य नाना परीचें ।**
**परी कोण जाणेल तें अंतरीचें ।**

आणि याच्या अंतरीं तर घरादाराशिवाय कशाचें च चिंतन नसावयाचें !

**मनीं आठवीतां चि तो कंठ दाटे ।**

आणि याला तर आठवण हि नसावयाची, मग कंठ कोठून दाटणार !

**उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ ५६–२**

आणि याला तर साडे नवाला नाटकाला जावयाचें असतें म्हणून नित्य नियमाप्रमाणें अष्टकें म्हणण्याची घाई झालेली असते ! मग हीं अष्टकें, म्हणावयाचीं तरी कशासाठीं ? कोणाचा जुलूम कां असतो ? अशासाठीं हीं अष्टकें नाहींत व नित्यनियमाचें हें पालन हि नव्हे. शपथ च घेतली असेल तर तींतून कदाचित् अशानें सुटतां येईल, पण ज्या हेतूनें नित्यनियम पाळावयाचे तो हेतु सफल व्हावयाचा नाहीं. नित्यनियमाची ती नुसती तालीम होय ! तात्पर्य, अष्टकें काय, मनाचे श्लोक काय, दासबोध काय किंवा कोणता हि पारमार्थिक ग्रन्थ काय, म्हणतांना किंवा वाचतांना बाह्य सृष्टि विसरून जाऊन अर्थाबरोबर मनानें रमावें !

॥ श्रीराम ॥

( २ )

# श्रीसमर्थांच्या संगतींत आणखी कांहीं काळ

**समर्था मी तूझा तुजविण मला कोण पाहातां ।**
**सदा सांभाळावें जवळि च जिवामाजि राहातां ।**
**सुखानंदें छंदें तव गुणकथा गात वदनीं ।**
**विवेकाचे वाटें अघटित घडे मार्ग सदनीं ॥ १६८–४**

करुणाष्टकें म्हणजे काय याचा किंचित् विचार मागील प्रकरणांत केला, पण तेवढ्यानें समाधान होत नाहीं व हातीं असलेलें पुस्तक दूर करवत नाहीं. आणखी कांहीं काळ श्रीसमर्थांच्या संगतींत जावा, असें वाटतें. त्यांचे ग्रन्थ ही च त्यांची संगति. आणि यांत खोटें काय आहे ? हीं सर्व त्यांच्या मुखींचीं वचनें होत ! त्या वेळच्या लोकांपेक्षां आम्ही जास्त भाग्यवान्. त्या वेळीं श्रीसमर्थांच्या मनांत येत असेल तेव्हां ते शिष्यांशीं बोलत असतील, पण आज आमच्या मनांत येईल तेव्हां व इच्छा असेल तितका वेळ आम्हांस त्यांचा सदुपदेश ऐकावयास मिळत आहे ! ग्रन्थरूपानें आज हि ते आपणांशीं बोलत आहेत, तेव्हां त्या बोलण्यांतलें जेवढें कांहीं आपणांस समजेल तेवढें टिपून काढून वाचकांस सादर करावें, एवढें च आपलें काम होय.

## ( १ ) श्रीसमर्थांच्या कांहीं इच्छा

दासबोध, मनाचे श्लोक, श्रीसमर्थांची कविता–मालेंतील तिसरा भाग, हीं करुणाष्टकें, आत्मारामादि स्फुट प्रकरणें, असंख्य पदें, पदांतरें, इत्यादि श्रीसमर्थवाङ्मयांतून समर्थांच्या इच्छा काय काय होत्या त्या निवडून काढून त्यांचा कोणी एकाद्यानें सुंदर हार गुंफला तर तो निःसंशय फार मनोहर होईल. असा हार कोणी तरी केव्हां तरी गुंफून श्रीसमर्थांच्या कंठीं घालावा ! त्याचा सुगंध सांप्रदायिकांना प्रसन्न करील, तो नुसता पाहून हि त्यांच्या नेत्रांना आल्हाद वाटेल ! त्या मालाकाराला उपयोगीं पडावा म्हणून करुणाष्टकांतील कांहीं निवडक पुष्पें मी येथें खुडून ठेवतों. वेळेवर न खुडतां आज च खुडल्यास तीं कोमेजतील अशी मुळीं च भीति नको. देवादिकांचे

गुण या पुष्पांत आहेत, तीं अमर, अजर, निर्जर आहेत. या पुष्पांची मी अशी कांहीं तऱ्हा पाहिली आहे कीं, तीं झाडावर असतांना जितकीं खुललेलीं दिसतात, त्यापेक्षां हि तीं खुडल्यावर जास्त खुलतात आणि दिवसगतीनें त्यांचा सुगंध कमी न होतां उलट वाढत जातो. करुणाष्टकांतील अशीं दहा-वीस पुष्पें मी खुडलीं आहेत, पण प्रस्तावनेची ही परडी फार लहान असल्यामुळें तिच्यांत फक्त तीन च पण अत्यंत सुवासिक पुष्पें घालून ती वाचकांपुढें करतों.

पुष्प पहिलें

रघुनाथदासा कल्याण व्हावें । अती सौख्य व्हावें आनंदवावें ।
उदेगें[1] नासो वर शत्रु नासो । नाना विळासें मग तो विळासो ॥ १५–३
कोडें[2] नको रे कळहो नको रे । कापट्य कर्मीं सहसा नको रे ।
निर्वाणचिंता निरसीं अनंता । शरणागतां दे बहु धातमाता ॥ ४ ॥
अजयो न हो रे जयवंत हो रे । आपदा नको रे बहु भाग्य हो रे ।
श्रीमंतकारी जनहीतकारी । परऊपकारी हरि दास तारीं ॥ ५ ॥

पुष्प दुसरें

तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा । सदा स्वस्त चिंतीतसे गा महींद्रा ।
राजाधीश देशा उरपूर्ण[3] द्यावें । भवदैन्य हें देशधाडी करावें ॥ १६–२

पुष्प तिसरें

महां कोप आग्नी ऋषी जामदाग्नी ।
समर्था तया जाणिजे सर्व सूज्ञी ।
सदा सर्वदा घेतसे नाम तूझें ।
वरिष्ठा स्वभावें चि हें गोत्र मांझें ॥ २०–१
वसे सागराचे तिरीं सूंत तूझा ।
समाचार तो घेत नाहीं च माझा ।
तयाला बहूतांपरी सीकवावें ।
स्वभावें चि वोढेल ऐसें करावें ॥ २ ॥
किती येक मागें बहू युध्य केलें ।
किती वेळ या ब्राह्मणा राज्य दिल्हें ।
अकस्मात सामर्थ्य तें काय जालें ।
युगासारिखें काय नेणां विझालें ॥ ३ ॥

---

१ उद्वेग. २ संकट. ३ सुभिक्ष. ४ समर्थांचें गोत्र जमदग्नि. ५ परशुराम.

**चिरंजीव आहेसि ऐसी वदंती ।**
**समर्था तुझें चित्तकाठिण्य कीती ।**
**तुझे नामधारी तुला हें कळेना ।**
**कृपाळूपणें चित्त कैसें वळेना ॥ ४ ॥**
**नको रे उदासीन हें वाक्य मानी ।**
**समर्था असावें बहू साभिमानी ।**
**करावी दिनानाथ हे सत्य वाचा ।**
**तुला चिंतितों दास मी राघवाचा ॥ ५ ॥**

किती आल्हादकारक हीं पुष्पें आहेत! वाचकांनीं तीं मुखोद्गत करावीं. केव्हां हि आणि कोठें हि देवदर्शनास गेल्यावर बरोबर फुलें आणलीं नाहींत असें वाटावयास नको! प्रभुरामचरणीं अर्पण करण्यास तीं नेहमीं जवळ असलेलीं बरीं.

## ( २ ) श्रीसमर्थांचें आत्मचरित्र

तद्वत् च, श्रीसमर्थवाङ्मयांतील श्रीसमर्थचरित्रपर उल्लेख एकत्र करून कोणी तरी श्रीसमर्थांचें विस्तृत चरित्र त्यांच्या च शब्दांत सांगितलें पाहिजे. इतर चरित्रग्रन्थांपेक्षां अशा आत्मचरित्राची महती विशेष होय. या दिशेनें अल्प प्रयत्न दासबोधाच्या आधारें दासबोधाच्या प्रस्तावनेंत करण्यांत आलेला आहे, पण तो च प्रयत्न विशेष प्रमाणावर सर्व ग्रन्थांच्या आधारें केला पाहिजे. करुणाष्टकांत असे जे कांहीं उल्लेख आहेत त्यांत दोन तीन च प्रत्यक्ष श्रीसमर्थचरित्राला अनुलक्षून आहेत, बाकी सर्व उल्लेख अप्रत्यक्षपणें श्रीचरित्राला लागतात.

( श्री ) **बहुविध भजनाचीं दैवतें पाहिलीं हो ।**
**सकळ तजुनि रामीं वृत्ति हे राहिली हो ॥ १४६–३**

त्या श्रीरामाची चाफळास स्थापना झाली त्या वेळचा प्रसंग सतराव्या अष्टकांत वर्णिला आहे, असें मला वाटतें. त्या अष्टकाचा पहिला च श्लोक असा आहे:—

**लवे नेत्रपातें स्फुरे आजि बाहे ।**
**दिनानाथ हा राम येणार आहे ।**
**जयाचेनि योगें सुखानंद लोटे ।**
**तया देखतां अंतरीं बाष्प दाटे ॥**

( रा ) दुसरा प्रत्यक्ष प्रसंग म्हणजे बाहेगांवीं श्रीसमर्थ गेले होते, त्या वेळचा त्रेपन्नाव्या अष्टकांत आला आहे. आणि

( म ) तिसरा प्रसंग श्रीसमर्थांना कफाची व्यथा झाली होती त्या वेळचा १४४ व्या अष्टकांत आला आहे. समर्थ मारुतीची प्रार्थना करितांना म्हणतात

बहु प्रिय रघुनाथा मुख्य तूं प्राणनाथा ।
उठवि मज अनाथा दूरि सारूनि वेथा ।
झडकरि भिमराया तूं करीं दृढ काया ।
रघुविरभजना या लागवेगें चि जाया ॥ ४ ॥

याच्या पुढचा श्लोक श्रीसमर्थचरित्रांत फार महत्त्वाचा आहे. श्रीचरित्रांत असें वर्णिलेलें आढळतें कीं, समर्थांचा सांभाळ करण्याविषयीं श्रीरामानें मारुतीस आज्ञा केली होती. याचें प्रत्यंतर पुढील श्लोकांत प्रत्यक्ष श्रीसमर्थांच्या तोंडून मिळत आहे.

तुजविण मज पाहे पाहतां कोण आहे ।
म्हणउनि मन माझ्ञ रे तुझी वास पाहे ।
मज तुज निरवीलें पाहिजे आठवीलें ।
सकळिक निजदासांलागि सांभाळवीलें ॥ ५ ॥

अप्रत्यक्ष असे जे उल्लेख आहेत त्यांपैकीं बरेचसे श्रीसमर्थांच्या अरण्य-प्रियतेबद्दल आहेत.

निघोनि जावें कठिणा वनाला ।
अखंड गावें मग पावनाला ।
ऋणी करावें जगजीवनाला ।
प्रीती धरावी पदसेवनाला ॥ ५१/१०

---

मना चाल ऊठीं वना दुर्गमातें ।
न गुंते भवागारदारादिकातें ।
विवेकें विचारें विवंचूनि पाहीं ।
जनीं पाहतां सर्वथा ऊरि नाहीं ॥ ७९-१
बहू वीट आला भवाचा न सावे ।
अटव्यांत देऊनियां हाक जावें ।
मनातें दमावें श्रीरामीं रमावें ।
दिगांतीं फिरावें जना न स्मरावें ॥ ९ ॥

सुषुप्तीअवस्थेसि भूमीं निजावें ।
उसें रामपाद स्मरोनी धरावें ।
दिशांचा माहां पट्ट तो पांघरावा ।
सिताकारणें साह्य वन्ही करावा ॥ १४ ॥
यथावींध देहो वनामाजि जावा ।
तथागारदारादिकींही पिडावा ।
श्रीरामोस्मि बोधें स्मरावा स्मरावा ।
रामी रामदास्यें स्वशांती निवावा ॥ १५ ॥

---

स्वजन जन तजावे देश लंघूनि जावें ।
कठिण मन करावें झाडखंडीं भरावें ।
अनुदिन विवरावें दूरि देशीं भरावें ।
निरूपण विवरावें तर्कपंथें चि जावें ॥ १५४/२६

इत्यादि. श्रीसमर्थांनीं कांहीं काळ पिशाचवृत्ति धारण केली होती, असें चरित्रांत आहे. त्या वृत्तीला अनुसरून श्रीसमर्थ म्हणतात

उघडा फिरे जो पिशाच्य जैसा । कितेक प्राणी पाहाती तमासा ।
आशापाशीं पाडितां हि पडेना । धुंडूं जातां सर्वथा सांपडेना ॥ ९४-५

## ( ३ ) सद्गुरु केव्हां भेटतात

मनीं प्रीति हे लागली राघवाची ।
सदानंद हे राम मूर्ती सुखाची ।
पदार्थीं बळें लाविता चित्त भंगे ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ ७८-३ ॥
मनीं तंत आनंत या राघवाचा ।
तुटे किंत तो नावडे या भवाचा ।
सदा सर्वदा अंतरीं राम जागे ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ ५ ॥
मनीं नावडे द्रव्य दारा पसारा ।
मनीं नावडे माइकाचा उबारा ।
मनीं नावडे भोग हा राजयोगें ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ ६ ॥

जनीं पाहतां भेदबुद्धी अनेका ।
मदमछरें निंदिती येकमेकां ।
घडे त्याग याकारणें लागवेगें ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ ७ ॥
मनीं सांडितां संगव्याधी उपाधी ।
पुढें सांपडे राम कारुण्यनीधी ।
विवेकें मनींचा अहंभाव भंगे ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ १४ ॥

अशी मनाची स्थिति झाली म्हणजे सद्गुरु क्षणभर हि विसंभत नाहींत !

## ( ४ ) रामदासी कसा असतो

पराधेनता रामदासीं घडेना ।
देहे चालतां रामभक्ति उडेना ।
उभा राम सांभाळितो पुष्टिभागें ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ ७८–१५

असा रामदासी असावा. तो कधीं परतंत्र होत नाहीं व देह आहे तोंवर उपासना सोडीत नाहीं. अशा रामदासियाचें रक्षण करण्यास श्रीराम नेहमीं पाठीशीं तत्पर असतात. याला प्रतापांत प्रत्यंतर मिळतें.

समर्थासी रक्षित दोनी धनुर्धारी ।
समागमें गुप्त असती विपिनविहारीं ।
कोठें न विसंबती येक क्षणभरी ।
आत्माराम समर्थस्वामी ॥ स. प्रताप ३–२६

## ( ५ ) राम आणि समर्थ

जटा पिंगटा मस्तकीं शोभताती ।
विभूतीरजें साजिरी दिव्यकांती ।
अयोध्यापुरीनायका त्या नरेंद्रा ।
बरी साजिरी बाणली योगमुद्रा ॥ ६८–८
वयें नूतनू साजिरा राम योगी ।
वना जातुसे तापसी वीतरागी ।

येथपर्यंत उभयतांत पूर्ण साम्य आहे. ‘अयोध्यापुरीनायका’ ऐवजीं ‘जंबु-ग्रामिच्या नायका’ व ‘राम’ तेथें ‘दास’ वाचलें म्हणजे हें च श्रीसम-

थांचें वर्णन होतें. पण पुढें श्रीसमर्थ म्हणतात–समर्थ म्हणत नाहींत, किंवा मनांत म्हणाले असतील हि, पण ते म्हणतात, असें मी म्हणतों–कीं, रामांत आणि आमच्यांत फरक इतका च कीं त्यांच्यावर अक्षता पडल्यावर त्यांना आणि आमच्यावर अक्षता पडण्यापूर्वीं आम्हांला वैराग्य प्राप्त झालें !

**विदेहीसुता नोवरी लग्न जालें ।**
**तया राघवा तीव्र वैराग्य आलें ॥ ९ ॥**

आणि समर्थयोगी

**पळाला पहा नोवरी टाकुनीयां ।**
**दिनोद्धार व्हावा म्हणोनी जगीं या ॥**

## ( ६ ) राम आणि कृष्ण

राम आणि कृष्ण दोघे हि समर्थांना सारखे च होते. रामचरणीं त्यांची वृत्ति जडली म्हणून इतर दैवतांची त्यांनीं अवहेलना केली नाहीं. असें होईल च कसें ?

**जाखमाता मायराणी । बाळा बगुळा मानविणी ।**
**पूजा मांगिणी जोगिणी । कुळधर्में करावीं ॥ ४-५-१६**

हा उपदेश करणारे श्रीसमर्थ कृष्णपरमात्म्याला कसे विसरतील ? अष्टकें ८९ व २३० हीं निवळ कृष्णस्तवनपर आहेत. १६० व्या अष्टकांत सुखदुःख साहावें पण पंढरीस पांडुरंगाच्या दर्शनास जावें, असें म्हटलें आहे. अष्टक ७३ वें तर फार च बहारीचें आहे. त्याचे ३४ श्लोक आहेत. एक श्लोक रामस्तवनपर तर दुसरा कृष्णस्तवनपर, असे आळीपाळीनें रामकृष्णगुणवर्णनपर ३३ श्लोक असून शेवटच्या श्लोकांत, ऐक्याचा उपदेश केला आहे.

**क्षमा सर्वदा ऐक्यरूपें करावी ।**
**पथी आदरें सार्थकाची धरावी ।**
**म्हणे दास द्वैतास हो नातळावें ।**
**जळाचे परी सर्व भूतीं मिळावें ॥ ३४ ॥**

## ( ७ ) रामावताराचें प्रयोजन

**मदें मातला रावणु क्रूरबुद्धी ।**
**तेणें घातले सर्व ही देव बंदीं ।**

**स्वधर्मु बुडाला भुमीभार जाला ।**
**अनाथां दिनां धांवण्या राम आला ॥ ६८–३**

राक्षस मातले, रावणानें देवांना बंदींत टाकले, स्वधर्माचा लोप झाला, अनाचार वाढला, म्हणून अनाथांच्या हांकेसरसी राम धांवत आले !

**आला राजा महीचा दिनकरकुळिचा ख्यात वौंशावळीचा ।**
**आला आत्मा जगाचा मुनिजनऋषिचा प्राण त्या साधकांचा ।**
**आला दाता दिनाचा जप पशुपतिचा ध्यास त्या वाल्मिकाचा ।**
**आला सिंधु सुखाचा सुरवर म्हणती काळ हा राक्षसांचा ॥ २३६-१**

## ( ८ ) हें समर्थांना ठाऊक होतें

आपल्या मागें लोक आपलीं चरित्रें गातील, लिहिणारे लिहितील आणि वाचणारे वाचतील, घरीं दारीं लोक आपल्या गोष्टी बोलतील, कथाकीर्तनांत आपल्या गोष्टी सांगतील, आपलीं काव्यें पाहतील, छापणारे छापतील व घेणारे घेतील, व्याख्याते, कीर्तनकार, उपदेशक आपलीं वचनें आधारास घेऊन महाराष्ट्रधर्मजागृति करतील, फार काय, पण आपल्या आयुष्यांतील प्रत्येक क्षणीं आपण काय केलें याचा प्रेमादरानें शोध करतील, आपली दिनचर्या कशी होती याची चौकशी करतील, जीर्णोद्धाराचा उपक्रम करतील, हें सर्व कांहीं समर्थांना ठाऊक होतें. कारण त्यांनीं तरी हें च केलें. चांगदेव वाघावर बसून कसे आले, ज्ञानेश्वरांनीं भिंत कशी चालविली, एकानें प्रेतें कशीं उठविलीं, दुसरे वैकुंठास सदेह कसे गेले, या च गोष्टी ते बोलत, तेव्हां आपण जसें गेलेल्यांच्या गोष्टी बोलतों तसें लोक पुढें आपल्या बोलणार च, हें त्यांना कळून चुकलें होतें.

**पहातों जनाला किती येक जाती ।**
**तनू टाकिताहे पुढें ते पहाती ।**
**गताच्या कथा काढितों अल्प कांहीं ।**
**पुढें लोक ते काढिती आमुच्या ही ॥ २७–२ ॥**

## ( ९ ) समर्थ आणि तुळजा माता

**भूमंडळीं तां मज धन्य केलें ॥ ९२–५**

असें श्रीसमर्थ तुळजामातेला म्हणत आहेत. मातेचे हे उपकार कसे फेडावे असा श्रीसमर्थांना प्रश्न पडला. उपकार फेडायाला समर्थांच्या जवळ त्यांचें असें काय होतें ?

**मी काय फेडूं उपकार तूझा । तुझिये दयेचा संसार माझा ।**
**तुजवीण माझें कांहीं च नाहीं । येथार्थ आहे समजोन पाहीं ॥ ६ ॥**
**जगदांतरीं तूं मदांतरीं तूं । जगत्रई तूं तूं तूं चि मी तूं ।**
**येहलोक तूं तूं परत्र तूं तूं । अगणीत तूं तूं सायोज्यता तूं ॥ ७ ॥**

अशी तद्रूपता झाल्यावर कोणी कोणाचे उपकार फेडावयाचे व कोणी कोणाचे उपकार तरी मानावयाचे !

## ( १० ) एक चमत्कारिक प्रसंग

एकशें सोळाव्या अष्टकांत जो प्रसंग वर्णिला आहे त्याची मला कल्पना होत नाहीं व जी कांहीं होते ती लिहितां येत नाहीं. समर्थ म्हणतात

**न जावें चि तेथें चि लागेल जावें ।**
**न खावें चि जें तें चि लागेल खावें ।**
**वदावें चि ना तें चि लागे वदावें ।**
**स्वभावें चि निर्माण केलें चि देवें ॥ ११६-१**
**प्रसंगें घडे तें चि मानून घ्यावें ।**
**अहंतागुणें दुखशोका न घ्यावें ।**
**पुढें काय होईल तें तें पाहावें ।**
**विवेकें चि ज्ञानें चि सुखें राहावें ॥ २ ॥**
**देहेभोग होणार कांहीं सुटेना ।**
**जनाच्या मना सांगतां ही तुटेना ।**
**म्हणे दास उदास कांहीं न व्हावें ।**
**बरें वोखटें सर्व साहोनि न्यावें ॥ ३ ॥**

जेथें जाऊं नये तेथें जावें लागेल, जें खाऊं नये तें खावें लागेल व जें बोलूं नये तें बोलावें लागेल, असे उद्गार काढण्याला श्रीसमर्थांना कोणतें निमित्य झालें असावें याची कल्पना करवत नाहीं. त्यांच्या वाट्याला असला पराधीनपणा आल्याचें कोणत्याही चरित्रग्रन्थांत वर्णिलेलें नाहीं. मग अजून आपणांस त्यांचें सारें चरित्र कळलें नसल्यास कोण जाणे ! शिवराजावर, इतर राजकारणी पुरुषांवर, समर्थांच्या कांहीं कांहीं शिष्यांवर असले प्रसंग आल्याचें संभवतें; असो. हें अष्टक अपूर्व आहे, इतकें खरें.

## ( ११ ) समर्थांच्या कवितेंत काव्य

काव्याची व्याख्या पुष्कळांनीं पुष्कळ प्रकारची केली आहे, परंतु

चवदाव्या दशकाच्या तिसऱ्या समासांत 'अनुतापयुक्त अंतःकरणानें देव प्रसन्न करून घेऊन भक्तिज्ञानवैराग्यपर जें बोलणें त्याचें नांव कवित्व होय' अशी जी समर्थांनीं व्याख्या केली आहे ती च आपली व्याख्या होय. आमच्या सर्व साधुसंतांचे ग्रन्थ या व्याख्येंत येतात, परंतु आधुनिक बहुतेक कवींची बहुतेक कविता या व्याख्येच्या बाहेर पडते. स्त्रियादिकांचें लावण्य वर्णन करणाऱ्या अधम कवींशीं आज आपणांस कांहीं च कर्तव्य नाहीं. पण त्यांच्या पेक्षां श्रेष्ठ दर्जाचे जे आधुनिक रसिक आहेत, त्यांना कसली अपेक्षा असते तें जाणून श्रीसमर्थांच्या करुणाष्टकांतील दोन उतारे मी येथें देतों, त्या उताऱ्यांत त्यांच्या आवडीचें काव्य त्यांना आढळेल, अशी माझी कल्पना आहे.

सतीला पती दूसरा शोधवेना ।
दुजा जन्नकू बोलणें हें घडेना ।
जनीं सद्गुरुसारिखा कोण आहे ।
मनीं मानवा तूं चि शोधूनि पाहे ॥ २८–१

पहा तूटला तंत तो मंद वाजे ।
मनीं शोधितां चोरटें चित्त लाजे ।
पुन्हां सांदितां वेगळा सर्व सांदा ।
मुखें बोलणें वेर्थ वादा वेवादा ॥ २ ॥

स्नेहे तूटला तो कदा ही जडेना ।
पुढें भेटि कल्पांतकाळीं घडेना ।
मनीं तूटला तंत कैसा जडावा ।
पुन्हां मागुता योग कैसा घडावा ॥ ३ ॥

यांत आधुनिकांच्या दृष्टीला काव्य दिसेल असें मला वाटतें. न दिसेल तर त्यांच्या विषयींची माझी कल्पना चुकली, असें म्हणावें लागेल. तसें च १०२ व्या अष्टकांत आपणांस स्फूर्ति दे म्हणून जी समर्थांनीं रामरायाची प्रार्थना केली आहे तींत काव्य आहे, असें आधुनिकांना निश्चित वाटेल, असें वाटतें. समर्थ म्हणतात

हवाया नळें बाण भांडीं अनंतें ।
वळें सोडितां जाति आकाशपंथें ।
वत्ती लागतां वेळ नाहीं उठाया ।
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ १०२–१

---

१ तोफा.

वरी पाहतां दृष्टि हे दूर धांवे ।
तयाच्या सवें कल्पना हे उठावे ।
उठे मारुती वेळ नाहीं उडाया ।
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ २ ॥
फिरे वावरे वात सर्वांत जैसा ।
चळे नीवळे ही कळे पष्ट तैसा ।
धरीतां बळें संधि नाहीं धराया ।
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ ३ ॥
विवेकी विवंचूनियां लागवेगें ।
पळ सर्व ही दृश्य सांडूनि मागें ।
उपायें चि तो जाय लंघून माया ।
तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ ४ ॥

इत्यादि. समर्थांच्या व्याख्येचें व आधुनिकांच्या कल्पनेचें या दोन उताऱ्यांत संमेलन झालें आहे, असें मला वाटतें.

## ( १२ ) रणशूर आणि तापसी

किती येक ते लोक जन्मासि आले ।
बरें वोखटें सर्व पाहोनि गेले ।
नवे लोक येती जुने लोक जाती ।
मिळे सेवटीं सर्व मातीस माती ॥ ९३-१
किती बाळ गेले किती वृद्ध गेले ।
किती येक तारुण्यमध्यें चि मेले ।
किती काय कोणास हो आठवावें ।
उगें वाउगें वेर्थ पोटीं सिणावें ॥ २ ॥
घडे धन्य वैराग्य तें भाग्य मोठें ।
घडेना तयाचें जनीं कर्म खोटें ।
जळे दुर्पळे वीवळेना पळेना ।
पळेना तरी दुःख चिंता टळेना ॥ ५ ॥
जनीं सूरसंग्राम लाटीत दाटी ।
चपेटी झपेटी तपेटी लपेटी ।
तयाचे परी तापसी शूर मोठा ।
बळें लावितो लोभ लाटून वाटा ॥ ७ ॥

महाराष्ट्रभूच्या चरणकमलीं शत्रुशिरांची लाखोली वाहणारे शिवाजीमहाराज व पुढें चालत आलेलें जडजवाहिराचें ताट लाथाडणारे तुकाराममहाराज, दोघे हि सारखे च शूर होत.

## ( १३ ) तेरा अक्षरांचा मंत्र

श्रीसमर्थ सर्वांना उघड मंत्रोपदेश करीत आहेत.

**तुला सांगतों गूज हा बीजमंत्रु ।**
**जेणें नीरसे थोर संसारशत्रु ।**
**नव्हे मिथ्य हें बोलणें सत्य वाचा ।**
**जपा अंतरीं मंत्र तेराक्षरांचा ॥ ७४-१९**

इतकें समर्थांचें आश्वासन असतां विलंब कां करावा ?

## ( १४ ) लोकमान्य आणि लोकदास

लोकमान्य ही बहुमानाची पदवी कांहीं आजकालची नाहीं. ज्या ज्या काळांत राजमान्य तो च लोकमान्य असूं शकत नाहीं, त्या त्या काळीं ही स्वतंत्र पदवी लावण्यांत येत असावी, असें दिसतें. समर्थांच्या वेळीं हि ही पदवी होती. लोकमान्य कोणास म्हणावें तें श्रीसमर्थ एका श्लोकांत सांगत आहेत:—

**भक्ति ज्ञान योग ध्यान हें प्रमाण जाणिजे ।**
**कर्मनीति न्यायनीति सर्व नीति मानिजे ।**
**थानमान भेदमान्य लोकमान्य चालणें ।**
**धन्य धन्य ते चि धन्य वेदमान्य बोलणें ॥ १५६–१**

असा जो **लोकमान्य** पुरुष असतो तो स्वतःस **लोकदास** म्हणवीत असतो. श्रीसमर्थ स्वतःस जसे **रामदास** किंवा **देवदास** म्हणत तद्वत् च **लोकदास** हि म्हणत.

**गद्य येक पद्य येक शद्ध येकसारिखा ।**
**यातिभेद द्दश्यभेद अर्थभेद वोळखा ।**
**भाव भिन्न गर्भ भिन्न भिन्न भिन्न सर्व हि ।**
**लोकदास रामदास देवदास तो सही ॥ १५७–५**

लोकदास्य करणाऱ्या लोकमान्याला, लोक हि वेळोवेळीं प्रसंग साधून आपल्या प्रेमादराचें प्रदर्शन करून भक्तिरज्जूनें बांधून टाकीत असतात, कीं तो लोकदास्यांतून केव्हां च सुटूं नये !

## ( १५ ) खरें भजन कोणतें ?

श्रीसमर्थांनीं करुणाष्टकांत एका ठिकाणीं भजनाची सहज च अति मननीय व्याख्या केली आहे, ती आमच्या वाचकांस मोठी कौतुकास्पद वाटेल. समर्थ म्हणतातः—

**भेटों कोणी येक नर धेड माहार चांभार**
**त्याचें राखावें अंतर याचें नांव भजन ॥ २१५–९**

समर्थांच्या वाणींत मळमळीतपणा कधीं च नसावयाचा. पण या वचनाचा आपण काय अर्थ करितां ? हें वचन वाचून सकृद्दर्शनीं कित्येकांना होणारा आनंद, त्याचा खरा अर्थ विचारांत घेतां, मावळणार आहे. पण या कित्येकांना माझें म्हणणें असें आहे कीं, एकदां एक कड घेतली म्हणजे अगदीं मर्यादा सोडून वागलें च पाहिजे, असें कांहीं नाहीं. एवढी काळजी हे कित्येक घेतील तर नुसतें वचन वाचून त्यांना होणारा आनंद, अर्थ पाहतां हि नाहींसा होणार नाहीं. या वचनाचा बरोबर अर्थ करतां यावा म्हणून स्फुट प्रकरणांतील एक वचन, करुणाष्टकांतील च आणखी एक श्लोक व दासबोधांतील कांहीं ओव्या येथें सादर करितों. धेड, महार, चांभार कोणी हि असो, त्याचें अंतर राखावें, त्यास राजी राखावें, याचें नांव भजन. हुबेहुब या च अर्थाचें स्फुट प्रकरणांतील वचन आहे.

**सकळांसी राखणें राजी । हे मुख्य भक्ति जाणिजे ॥** स्फु. प्र. ४२–५

याचा अर्थ असा नाहीं कीं, धेडमहारचांभार यांना घेऊन एका ताटांत जेवावयास बसावें.

**बरें दुग्ध तें मद्यपात्रीं कुपात्रीं ।**
**पुढें देखतां तें तजावें चि श्रोत्रीं ॥**

दूध प्यावयाचें झालें तरी तें जर कोणी दारूच्या पेल्यांत देऊं म्हणेल तर ब्राह्मणानें त्याचा अव्हेर च केला पाहिजे. तद्वत्

**जरी ज्ञान जालें जनीं नीच याती ।**
**तरी तें नव्हे वंद्य कांहीं महंती ॥ १३४–८७**

दासबोधांत हि हेंच सांगितलें आहे.

**रायापासून रंकवरी । अवघ्या मनुष्यांचिया हारी ।**
**सगट समान सरी । कैसी करावी ॥ १३-१०-८**

**साकर माती पृथ्वी होये । परी ते माती खातां नये ।**
**गरळ आप नव्हे काये । परी तें खोटें ॥ १३-१०-११**
**पुण्यात्मा आणि पापात्मा । दोहिंकडे अंतरात्मा ।**
**साधु भोंडु सीमा । सांडूं च नये ॥ १२ ॥**
**अंतर येक तों खरें । परी सांगातें घेऊं न येती माहारें ।**
**पंडित आणि चाटें पोरें । येक कैसीं ॥ १३ ॥**

तेव्हां, या सर्व वचनांचा अर्थ असा कीं, येथून तेथून अंतरात्मा एक च आहे हें जाणून

**दुःख नेदावें कोणाला उंच नीच जरी जाला**
**अंतरात्मा वोळखिला तो चि जाणा सज्जन ॥ २१५-९**

कोणाला दुःख देऊं नये, लहान असो थोर असो, सर्वांचें अंतःकरण एक च आहे हें जाणून सर्वांना राजी राखावें. असें म्हटल्यानें वर्णाश्रम सर्व मोडावे, आचारविचार झुगारून द्यावा, शास्त्रमर्यादा सांभाळूं नये किंवा वेदाज्ञा धाब्यावर बसवावी असें होत नाहीं. विषमता हा च जगाचा न्याय आहे, तें च विश्वाचें रूप आहे.

**भेद ईश्वर करून गेला । त्याच्या बाचेन न वचे मोडिला ।**
**मुखामधें घांस घातला । तो अपानीं घालावा ॥ १७-४-२७**

याहून जास्त कांहीं सांगावयाचें उरलें आहे, असें वाटत नाहीं. लोकमान्याच्या व्याख्येंत जो भेदमान्य शब्द आला आहे, त्याचा अर्थ हि आतां उघड होत आहे.

## ( १६ ) अभिमानाची निर्भर्त्सना

किती जणांना, निदान कांहीं क्षण तरी, आपलेपणाचा गर्व वाटत नसेल, तें एका परमेश्वरास माहित ! पण गर्व वाटावा असें आपल्यांत किंवा आपल्या जवळ काय आहे ? ज्या क्षणीं मनांत गर्व येईल त्याच्या पुढच्या क्षणाला आपलें आपल्याला हसूं आलें पाहिजे.

**थोडें जिणें अर्धपुडी काया । गर्व करिती रडाया ।**
**शरीर आवघें पडाया । वेळ नाहीं ॥ १५-८-३५**

घडीनें घडी मार्पी लागलेलें शरीर केव्हां पडेल याचा नेम नसतो, वैभव म्हणजे केवळ दुपारची सावली, तें केव्हां निघून जाईल हें सांगतां येत नाहीं, आज

गाड्याघोडीं उडवावयास सांपडत आहेत व मुखांतून निघेल तो शब्द झेलण्यास भोंवतालचे लोक तयार आहेत, पण शेवटीं फजितीची वेळ यावयाची कांहीं रहात नाहीं, याचा वेळींच विचार करावयास नको काय ?

मानें मानें चालती सर्व मानें ।
यानें यानें चालवीती गुमानें ।
हा हा हो हो होतसे दों दिसांची ।
ची ची ची ची सेवटीं सर्व ची ची ॥ १३४–९७

या अभिमानाची श्रीसमर्थांनीं परमावधीची चेष्टा केलेली आहे.

वरा देह माझा वरा गूण माझा ।
वरा वेष हो नेटका साज माझा ।
वरा काळ माझा बरा योग माझा ।
बरा पाहतां सर्व संसार माझा ॥ ७१–१
वरीं चीपडें मेकडें सर्व माझीं ।
खतें खांडकें तें बरीं भव्य माझीं ।
पितें फेपसें चारटें सर्व माझीं ।
वरीं आंतडीं कांतडीं मंद माझी ॥ २ ॥
वरा धर्म माझा वरा मूत्र माझा ।
वरा पू वरा वाहतो कान माझा ।
वरा वोक माझा वरा नर्क माझा ।
वरा खोंकला दांट सेंबूड माझा ॥ ३ ॥
वरी युक्ति माझी वरी बुद्धि माझी ।
वरी वासना पाहतां स्थीति माझी ।
वरी दृष्टि माझी वरी पुष्टि माझी ।
वरी कांति माझी वरी शांति माझी ॥ ४ ॥
बरे हात माझे वरे पाय माझे ।
बरे दांत माझे वरे कान माझे ।
बरे चक्षु माझे बरे वोठ माझे ।
बरे शब्द माझे वरे गूण माझे ॥ ५ ॥
बरें कूळ माझें बरें गोत माझें ।
बरें ग्राम माझें बरें गृह माझें ।
बरें सेत माझें बरें वित्त माझें ।
बरें पाहतां चांगलें सर्व माझें ॥ ६ ॥

अहंकाराची याहून कोण जास्त निर्भर्त्सना करूं शकेल ? पण मग, हें जर कांहीं च बरें नाहीं तर बरें तरी काय आहे ?

बरें येक तें पाहतां ब्रह्म आहे ।
तया तूळितां तूळणा ही न साहे ॥ ७ ॥

## ( १७ ) निंदा

नको रे नको मानवा साधुनिंदा ।
नको रे नको निंदितां थोर बाधा ।
जितां सिद्ध चि यातना पावसील ।
अंतीं रवरव भोगितां जाणवेल ॥ ७६–७
जया मानवा लागला हा चि धंदा ।
सदा सर्वदा मानसीं साधुनिंदा ।
सळें मच्छरें येति वादा वेवादा ।
तया जाण त्या लागली थोर बाधा ॥ १२ ॥
जनीं निंदितां सूटला कोण आहे ।
जन सर्वदा सर्व निंदून राहे ।
जया वर्णितां सीणली वेदवाणी ।
जनें निंदिला राम कोदंडपाणी ॥ १६ ॥

तेथें इतरांची कोण कथा ? पण हे निंदका,

स्वयें निंद्य तूं निंदिसी कोणकोणां ।
जनीं सर्व संसार हा दैन्यवाणा ॥ ६३–६

याचा तूं कधीं विचार केला आहेस काय ? तेव्हां

भल्यानें जनीं आपनिंदा करावी ।
नको रे नको वेर्थ निंदा परावी ॥ ६३–८

असें तुला वाटत नाहीं काय ?

एकादा मनुष्य दुसऱ्याची निंदा करीत असतां त्याला जे दोष लावीत असतो ते त्याच्या ठिकाणीं असतात किंवा नसतात याबद्दल एक परी संशय घ्यावा, पण स्वतः त्या निंदकाच्या ठिकाणीं मात्र ते दोष हटकून असतात, असें अनुमान काढल्यास तें शंभरांत नव्याणव खरें असतें. कारण

मनीं काम तो काम सर्वांस लावी ।
मनीं नष्ट तो नष्ट सर्वांस भावी ।

**मनीं पातकी पाप लावी जनाला ।**
**जनीं दोषिया निंदितो सज्जनाला ॥ १०३-४**

असा न्याय आहे.

## ( १८ ) आचारः प्रथमो धर्मः

श्रीसमर्थांचा आचारावर केवढा भर ! त्यांचे सारे ग्रन्थ पहा, त्यांतून आचाराचें समर्थन करणारीं शब्दशः शेंकडों वचनें सांपडतील. तीं सर्व वचनें एका जागीं गोळा केलीं म्हणजे एक मोठा थोरला अभेद्य कोट च होणार आहे. असा कोट कोणीं तरी रचला पाहिजे. अशा कोटाच्या आश्रयानें चालणारा समाज कदापि नष्ट होणार नाहीं.

मनुष्य किती हि ज्ञानी झाला तरी त्यानें आचार सोडतां कामा नये. आचारशून्य मनुष्य किती ही ज्ञान बडबडला तरी तो नष्ट समजावा. भला आणि नष्ट ओळखण्याची मोठी खूण म्हणजे आचार होय.

**भले नष्ट दोघे कसे वोळखावे ।**
**क्रियाभ्रष्ट ते नष्ट जाणोन घ्यावे ॥ ७७-२**

आणि

**भला तो चि जो मुख्य आचार राखे ।**
**गुरु देव लोकीक वेदांसि धाके ।**
**करूं ये बरें कर्म जें तें करीतो ।**
**माहांवाक्य तत्त्वादिकें वीवरीतो ॥ ३ ॥**
**सदा सर्वदा बोलणें प्रत्ययाचें ।**
**अनुद्वेग तें सौख्य नाना सुखाचें ।**
**नव्हे बंड पाषांड मत्तें वेवादें ।**
**भले बोलती बोलणें ज्ञानबोधें ॥ ४ ॥**

## ( १९ ) प्रपंचांत कसें वागावें

कोणी निवळ प्रपंच पहातात आणि असे च बहुधा सगळे. लाखांत एकादा परमार्थ पहातो. पण तो जो परमार्थ पहातो तो मग प्रपंचाकडे ढुंकून हि पहात नाहीं. आमच्या समर्थांचा उपदेश असा आहे कीं, माणसानें इहलोक आणि परलोक अशीं दोन्हीं साधावीं, प्रपंचांत राहून परमार्थ साधावा व परमार्थ साधून प्रपंच करावा. केवळ इहलोक साधला तरी हि व्यर्थ व केवळ परलोक साधला तरी हि जरी व्यर्थ म्हणतां येत नाहीं, तरी पण तो हि पक्ष गौण च.

**येहलोकींचा समर्थ परलोकीं होये वेर्थ**
**याकारणें परमार्थ पुण्यवंत साधिती ।**
**येहलोकीं सावधान परलोकीचें साधन**
**जेणें होये धन्य धन्य वर्तायाची हे रीती ॥ २१४-१३**
**सुखें संसार करावा परलोक हि साधावा**
**काळ सार्थक करावा जन्म धन्य होतसे ।**
**मुख्य करावें भजन परी पाहिजे जीवन ।**
**दोहींकडे सावधान तेणें विद्या विलसे ॥ २१४-१५**

ही च शिकवण दासबोधांत आहे.

**प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा ।**
**परमार्थ अवघा चि बुडवावा । हें विहित नव्हे ॥ ५-३-१०३**

## ( २० ) सावध होई

मरणाचें स्मरण देऊन श्रीसमर्थ साधकास नेहमीं सावध करीत असतात.

**किती वाहसी वेर्थ काबाडवोझें ।**
**विचारूनि पाहें येथें कोण तुझें ।**
**होई सावध कासया भुललासी ।**
**अंतीं येकला सर्व सांडूनि जासी ॥ १०९-३**
**किती सांगणें हें चि हें वीटवाणें ।**
**अंतीं येकलें सर्व सांडूनि जाणें ।**
**बहु बोलतां वीट वाटे जनाला ।**
**अकस्मात येईल रे येमघाला ॥ ४ ॥**

वाटेल तितक्या वेळां सांगा, आम्हांस कांहीं उमज पडणार नाहीं. आम्हांस समजत नाहीं, असें नाहीं, आम्हांस दिसतें कीं, हा सारा पसारा टाकून केव्हां जावें लागेल याचा नेम नाहीं. समजतें पण उमज पडत नाहीं. उमज पडणार तरी केव्हां ? आपण कृपा कराल तेव्हां.

**वणवण विषयांची सर्वथा ही शमेना ।**
**अनुदिन मोहमाया लागली हे तुटेना ।**
**झडकरि मज रामा सोडवीं पूर्णकामा ।**
**तुजविण गुणधामा कोण रक्षील आम्हा ॥ १५०-३**

## ( २१ ) उपाधी

साधकावस्थेंत पाठीमागें उपाधी नसेल तर उत्तम. कारण

उपाधीगुणें सत्य तें मिथ्य होतें ।
उपाधीगुणें मिथ्य तें सत्य होतें ।
उपाधीगुणें येक रंगे विरंगे ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ ७८–११

उपाधीगुणें लागतो पक्ष घेणें ।
उपाधीगुणें सत्य सोडून देणें ।
उपाधीगुणें वीषईं जीव रंगे ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ १२ ॥

उपाधीगुणें सर्व सोसीत जावें ।
उपाधीगुणें मानवाधेन व्हावें ।
उपाधीगुणें वेर्थ हा स्वार्थ लागे ।
उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥ १३ ॥

तात्पर्य साधकाला उपाधी म्हणजे मोठें च विघ्न. राम सांपडावा अशी इच्छा असल्यास साधकानें उपाधी सोडावी.

मनीं सांडितां संगव्याधी उपाधी ।
पुढें सांपडे राम कारुण्यनीधी ॥ १४ ॥

पण एकदा राम सांपडल्यावर मात्र

उपाधीसी विस्तारावें । उपाधींत न संपडावें ॥ ११-५-९

अशी समर्थांची शिकवण आहे.

मोक्षाची वाट फार अवघड असेल असें एकाद्याला वाटेल, पण श्रीसमर्थांनीं अगदीं सोपी वाट दाखविली आहे. साधकानें क्रोध जिंकला, शांति वरिली आणि लीनता धरली म्हणजे तो मोक्षाच्या मार्गाला लागला, असें समजावें.

अती क्रोध त्या बोध होणार नाहीं ।
अती बोध त्या क्रोध येणार नाहीं ।
अती शांति त्या भ्रांति येईल कैची ।
अती लीनता वाट सायोज्यतेची ॥ १२९–१

पण या तीन गोष्टी काय सोप्या आहेत ? त्या सोप्या असोत कीं कठीण असोत, ज्याला मोक्षमार्गाला लागावयाचें असेल त्यानें त्या तीन गोष्टी अभ्यासानें, नित्य नियमानें, विचारानें प्राप्त करून घेतल्या पाहिजेत.

अती आदरें शांति होईल नेमें ।
अती शांति त्या दंडळीना विरामें ।
अती खोल तो बोल बोलेल कैचा ।
असा आंखिला मुक्तिसायोज्यतेचा ॥ २ ॥

## ( २३ ) आमच्या निर्लज्जपणाची कमाल

असंख्यात रे भक्त होऊनि गेले ।
तिहीं साधनाचे बहु कष्ट केले ।
नव्हे कार्यकर्ता भुमीभार जालों ।
तुझा दास मी वेर्थ जन्मास आलों ॥ ८७–१

असें जर समर्थांनीं म्हणावयाचें, समर्थांनीं ! ज्यांनीं वयाच्या अकराव्या बाराव्या वर्षीं घरदार, आईबाप, इष्टमित्र यांचा त्याग करून वनवास पतकरिला, ज्यांनीं बाराव्या वर्षापासून तो चोविसाव्या वर्षापर्यंत, इतक्या अल्प वयांत, बारा वर्षें पुरश्चरणाचें खडतर तप केलें व त्या पुढचीं बारा वर्षें हाल सोसून सर्व भरतखंडभर तीर्थयात्रा केल्या, त्या श्रीसमर्थांनीं जर, आपल्या पूर्वीं होऊन गेलेल्या भक्तांनीं जीं अनेक साधनें केलीं व जे कष्ट सोसले, केवळ एकवार प्रभुचरणाचें दर्शन व्हावें, प्रभूच्या मुखांतील एकादा शब्द ऐकावयास मिळावा म्हणून जन्मचे जन्म गिरिकंदरीं कंठले, हें पाहून आपण केवळ भूमिभार होत, आपल्या हातून त्यांच्या मानानें कांहीं च होत नाहीं, आपण जन्मास येऊन जननीला व्यर्थ शिणविलें, असें म्हणावयाचें, तर कांहीं कष्ट, श्रमसायास न करतां, घरदार, बायकापोरें यांचा संसार यथास्थित चालवीत असतां, ऐहिक सुखदुःखें मनापासून भोगीत असतां, हातीं द्रव्याची जपमाळ घेऊन सर्वकाळ कांताध्यान करीत पळभर हि उसंत न घेतां, जवळजवळ आठ हि प्रहर केवळ प्रपंचाची चिंता करीत असतां, दिवसांतून केव्हां तरी धांदलीधांदलीनें आम्ही मनाचे श्लोक अकरा व दासबोधाचे समास दोन वाचतों म्हणून समर्थांनीं आम्हांस भेट द्यावी व आमचे मनोरथ पुरवावे, अशी अपेक्षा करावी, या निर्लज्जपणाला काय म्हणावें ?

**बहु दास ते तापसी तीर्थवासी ।**
**गिरिकंदरीं भेटि नाहीं जयासी ॥**

म्हणून, ज्यांचा सारा जन्म गिरिकंदरीं च गेला ते श्रीसमर्थ विस्मय करितात आणि आम्हांस मात्र मुंबईच्या बाजारांत, पुण्याच्या खळबळींत आणि धुळयाच्या धुळींत समर्थांनीं भेटावयास यावें अशी आशा असावी, या वेडेपणाला दुसरें काय नांव द्यावें ?

**कितेकीं देहे त्यागिले तुजलागीं ।**

आणि म्हणून ते अखेरीस तुझ्या संगतीचे वाटेकरी झाले आणि समर्थ म्हणतात, आपण मात्र

**देहेदुःख होतां च वेगीं पळालों ।**

हें खरें काय ? कां हें श्रीसमर्थांचें तुम्हां आम्हांला हिणवणें आहे ? समर्थ जे लग्नांतून पळाले ते काय त्यांच्या देहाला लग्नाच्या सोहाळ्यानें दुःख होत होतें म्हणून ? राम भेटत नाहींत म्हणून हिमालयकुंडांत देहार्पण करण्याला सिद्ध झालेले समर्थ कोणीकडे आणि किंचित् पडसें खोकला येतां च नित्यनियमाला टाळा देणारे आपण कोणीकडे ? असो; या ८७ व्या अष्टकाचें तात्पर्य इतकें च कीं श्रीसमर्थांची कृपा कांहीं वाट्यावर पडली नाहीं !

## ( २४ ) समर्थांची झोळी

ही या संप्रदायाची कामधेनु होय. तिची महती श्रीसमर्थांनीं भिक्षेच्या समासांत फार वर्णिली आहे.

**गोरज्य वाणिज्य कृषी । त्याहून प्रतिष्ठा भिक्षेसी ।**
**विसंभों नये झोळीसी । कदाकाळीं ॥ १४-२-१८**

त्या झोळीचा हल्लीं कोणी सांप्रदायिक चरितार्थापलिकडे उपयोग करतांना जरी फारसे आढळत नाहींत, तरी भिक्षा मागण्याची सांप्रदायिकांना मोठी हौस वाटते, असें हि दिसत नाहीं. पण त्या भिक्षेच्या मूळ हेतूची जर पुन्हां जाणीव उत्पन्न होईल, तर कोणास हि भिक्षा मागण्याची लाज वाटावयास नको. तथापि कित्येकांना लाज वाटते, हें खरें. अशी लाज आतांच्या च तेवढ्या कांहीं स्वयंसेवकांना वाटते, असें मात्र नव्हे. श्रीसमर्थांच्या वेळीं हि तरुण

सांप्रदायिक भिक्षा मागण्यास लाजत, असें दिसतें.

**भिक्षा मूळीं पाहतां ब्राह्मणाची ।**
**भिक्षा नस्तां होतसे सर्व ची ची ।**
**भिक्षा मागें रक्षिली थोरथोरी ।**
**आतां लज्जा मानिली मूर्ख पोरीं ॥ ९४–६**

तरी श्रीसमर्थसंप्रदायजीर्णोद्धारादिकार्यासाठीं श्रीसमर्थसेवकांनीं साऱ्या महाराष्ट्रभर श्रीसमर्थांची झोळी फिरविण्यास लाजण्याचें मुळीं च कारण नाहीं.

## ( २५ ) संप्रदायाचा आधार

**रघुराज वैकुंठधामासि गेले ।**
**तधीं मारुती दास हे नीरवीले ।**
**रघुनाथउपासकाला प्रसंगें ।**
**सख्या मारुती पाव रे लागवेगें ॥ ५३–९**

हें ५३ वें अष्टक फार हृदयंगम आहे. तें वाचून सांप्रदायिकांनीं केव्हां हि निराश होण्याचें कारण नाहीं, असें त्यांच्या प्रत्ययास येईल. हें अष्टक एकांतांत, मननपूर्वक, प्रेमभरें वाचून व श्रीराम, श्रीमारुती आणि श्रीसमर्थ यांचें परस्परावरील प्रेम पाहून ज्याचा कंठ भरून येणार नाहीं त्यानें निःसंशय समजावें कीं, भक्ति ही काय चीज आहे ती जाणण्याचें या जन्मीं आपल्या कपाळीं लिहिलेलें नाहीं ! या अष्टकाच्या शेवटीं श्रीसमर्थ म्हणतात कीं, प्रभूच्या कृपेचा मला स्वतःला जो प्रत्यय आला आहे आणि त्यामुळें माझ्या मनाची जी स्थिति झाली आहे ती लोकांस सांगून पुरी पडणार नाहीं, ती माझी मला ठाऊक ! श्रीसमर्थांच्या मनाची ही अशी झालेली स्थिति ज्या अष्टकांत प्रतिबिंबित झाली आहे त्या अष्टकाच्या पठनानें श्रीसमर्थांच्या हृदयाचा वाचकांना ठाव लागला पाहिजे ! या अष्टकाच्या आधारावर सांप्रदायिकांनीं निर्धास्त राहून आपली उपासना चालवावी.

हें च आश्वासन १३४ व्या अष्टकांतील १३१ व्या श्लोकांत दिलेलें आहे.

**स्वधामासि जातां माहां रामराजा ।**
**हनुमंत तो ठेविला या च काजा ।**

**सदा सर्वदा रामदासासि पावे ।**
**खळीं गांजितां ध्यान सांडूनि धांवे ॥ १३४–१३१**

या आश्वासनाची प्रतीति दासविश्रामधामकर्ते आत्मारामममहाराज यांच्या पर्यंत म्हणजे शके १७४० पर्यंत सर्वांना येत होती. आत्मारामममहाराज म्हणतात—

**उद्योग हा चि पां श्रीरामदूता ।**
**रक्षित फिरावें श्रीरामभक्तां ।**
**हा बोल पां नव्हे अन्यथा ।**
**पारंपर्यें प्रचित असे ॥** दासधाम

ती परंपरा काय आतां तुटली म्हणावी ? कां तो कृपेचा झरा आटला म्हणावा ? कां एकवचनी रामरायानें मारुतिरायाला एकवार केलेली आज्ञा आतां रद्द केली आहे म्हणावें ? कां १७४० पर्यंत च तेवढे पुण्यवान् लोक होऊन गेले व पुढें पापी युग लागलें ? यांतलें कांहीं एक झालें नाहीं ! जेथें निष्ठा आहे तेथें त्या निष्ठेचें आज हि फळ मिळत आहे ! असें सांगतात !

**परम कोमळ राम कठीण कां ।**
**दिनदयाळ दया नुपजे चि कां ।**
**मज बहूत उदासिन वाटलें ।**
**न धरितां नयनीं निर लोटलें ॥ १३४–७७**

---

( ३ )

# उपसंहार

माझी प्रस्तावना संपली, पण मला वाटतें, प्रत्येकानें आपआपली स्वतंत्र प्रस्तावना लिहावी. करुणाष्टकें छापण्याचें काम मजकडे आलें म्हणून मी प्रस्तावना लिहून ती इतरांवर लादीत आहे. वाचकांनीं वाटल्यास तिज-वरून एकवार नजर फेकावी, परंतु प्रत्येकानें आपआपल्या आवडीप्रमाणें निराळी प्रस्तावना लिहावी, हें उत्तम. प्रत्येकाची दृष्टि वेगळी, वृत्ति वेगळी,

स्फूर्ति वेगळी, भावना वेगळी, धारणा वेगळी, मग प्रस्तावना च तेवढी एक कोठून असणार ?

**कल्याणस्वामीं**च्या हातच्या बाडावरून हीं करुणाष्टकें छापलीं आहेत. मालेंतील तिसरा भाग श्रीसमर्थांची कविता, पांचवा भाग श्री श्लोक मनाचे व करुणाष्टकांचा हा दहावा भाग, मिळून तें सबंध बाड होतें. यावरून तें बाड केवढें मोठें आहे, याची कल्पना होईल. बाड एवढें मोठें असून अथपासून इतिपर्यंत अक्षर कसें सुंदर, जणूं एका टांकानें, लिहिलेलें आहे. कोठें हि घाई नाहीं. १५४ अष्टकांतील ४० व्या श्लोकांत श्रीसमर्थांनीं, जणूं काय, याच बाडाचें वर्णन केलें आहे !

**सदट सघन वोळी अक्षरें दाट खेटा ।**
**सरळ सगट वाची धाकुटा आणि मोठा ।**
**अचुक चुकत नाहीं पुस्तकीं शोध नाहीं ।**
**बहुत विवरतां ही वेंग कांहीं च नाहीं ॥**

बरोबर एक तप, बारा वर्षें झालीं, मला या बाडाचा सहवास घडला. त्या बाडाला मी आजवर फार शिणविलें. हें बाड म्हणजे श्रीकल्याणांचें च स्वरूप होय. तेव्हां तें आज दृष्टीआड, पण बंदोबस्तानें, ठेवण्यापूर्वीं त्याला साष्टांग नमस्कार घालून त्याची क्षमा मागतों.

करुणाष्टकें छापलीं जात असतां मेढेमठांतील एकनिष्ठ श्रीसमर्थसेवक कै. अनंतबुवा यांचेकडून करुणाष्टकांचें एक लहान, हातांत मावणारें, बाड मिळालें होतें. तें उसवलेलें असल्यामुळें त्याचीं कांहीं पानें गहाळ झालीं होतीं. या हि बाडाचें अक्षर अति सुंदर आहे. श्रीसमर्थांच्या तालमींतलीं माणसें सुव्यवस्थित च असणार. या बाडाच्या अंतर्बाह्य स्वरूपाकडे पाहून मला असें वाटतें कीं, तें कण्हेरीमठपति **वासुदेवपंडित** यांच्या हातचें असावें. दोन्हीं बाडें खुद्द श्रीसमर्थांच्या प्रमुख शिष्यांच्या हातचीं असतां त्यांत इतके पाठभेद कां असावे व श्लोकांचा अनुक्रम हि कां भिन्न असावा, याचें मला कोडें पडलें आहे. जे श्लोक ताडून पाहण्यांत आले त्यांत आढळलेले पाठभेद टिपेंत दर्शविले आहेत. बारिकसारिक पाठांतरें बाजूस राहोत, पण कांहीं पाठांतरें फार महत्त्वाचीं आहेत. एक च उदाहरण देतों. कल्याणांच्या बाडांतील १३४-१११ वा श्लोक असा आहे.

रवीकिर्णीं भासला भास जैसा ।
जिवा भासतो जाण प्रपंच तैसा ।
तयातीत जो ब्रह्म आत्मा स्वभावें ।
पुसाया तयां रे अरण्यासि जावें ॥

यांतील चवथ्या चरणाऐवजीं पंडितांच्या बाडांतील पाठ

बुझाया तया रे अनाम्यासि नावें ॥

असा आहे. अगदीं भिन्न. हें कसें? याला उत्तर एक च सुचतें कीं, श्रीसमर्थांनीं च निरनिराळया वेळीं निरनिराळे पाठ सुचविले असावेत. कल्याणांच्या बाडांत नाहींत असे १००।१५० तरी निराळे श्लोक पंडितांच्या बाडांत आहेत. परिशिष्टरूपानें या च ग्रन्थाला ते जोडावे, असा एकदां विचार होता. पण आधीं च हा ग्रन्थ तयार होण्यास अवधि फार लागला, त्यांत आतां आणखीं भर घालावी असें वाटत नाहीं. ते श्लोक इतरत्र केव्हां तरी प्रसिद्ध करूं.

मनाच्या श्लोकांपैकीं १९४ व १९५ असे दोन श्लोक मढेंप्रतींत स्वतंत्रपणें मध्यें च एका ठिकाणीं १ व २ अशा अनुक्रमांकांनीं आले आहेत. ही बाब विचार करण्यासारखी आहे. हे दोन श्लोक आधीं च केव्हां तरी स्वतंत्रपणें रचले गेले असून मागाहून त्यांचा समावेश मनाच्या श्लोकांत करण्यांत आला असावा, असें वाटतें. या दोन श्लोकांसंबंधानें मनाच्या श्लोकांच्या तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना पहावी, म्हणजे या बाबीचें महत्त्व वाचकांस दिसून येईल.

दहा वीस अष्टकें खेरीज करून बाकींच्या अष्टकांचीं नांवें मुळांत नाहींत. तीं मी आंतील विषयांच्या अनुरोधानें दिलेलीं आहेत. त्यांहून सरस व समर्पक नांवें दुसऱ्या कोणास देतां आलीं असतीं व अजून हि प्रत्येक वाचकानें आपली नामयोजना निराळी केली तरी चालेल. अशी निराळी योजना मला कोणी कळविल्यास तिचा उपयोग पुढील आवृत्तींत करण्यांत येईल.

करुणाष्टकांत कित्येक ठिकाणीं बरे च शब्द मला लागले नाहींत व कांहीं शब्द लागून त्यांचा अर्थ समजला नाहीं. जेथें अर्थ समजला नाहीं तेथें टिपा दिल्या नाहींत. अशा ठिकाणीं टिपा न देण्यानें दोन हेतु साधतात. चुकीच्या

टिपा दिल्यापासून वाचकांचा घोटाळा होतो तो टळतो व संपादकाचें अज्ञान झांकलें जातें. जे शब्द च लागले नाहींत, कसे तोडावे हें हि समजलें नाहीं, असे शब्द कोठें जोडून छापले आहेत तर कोठें अशा शब्दांचीं अक्षरें तुटक छापलीं आहेत. वाचकांपैकीं ज्यांना असे शब्द लागतील व त्यांचा अर्थ समजेल त्यांनीं कळविण्याची कृपा करावी. त्यांच्या माहितीचा उपयोग पुढील आवृत्तीचे वेळीं होईल.

करुणाष्टकें छापून निघण्यास कल्पनेच्या बाहेर उशीर झाला. वाचकांशीं अनेक वायदे केले पण कोणत्या ना कोणत्या तरी कारणामुळें हातून वेळेवर काम झालें नाहीं. महाराष्ट्रवाचकांचा मी अपराधी आहे. क्षमा असावी. महाराष्ट्र-वाचकांना आज हीं अष्टकें सादर करून त्यांच्या एका ऋणांतून मीं मुक्त होत आहे, याचा आनंद वाटतो न वाटतो तों च दुसरीं ऋणें पुढें उभीं राहतात. **दासविश्रामधामाचा** चवथा खंड निघावयाचा आहे, श्रीसमर्थांच्या **आत्मारामादि लघुकाव्यांचा** स्वतंत्र भाग छापावयाचा आहे व श्रीसमर्थकृत जीं हजारों **पदें** आणि **पदांतरें** मिळालीं आहेत तीं तयार करावयाचीं आहेत. पैकीं दासधामाचा चवथा खंड छापत आहे, व आतां करुणाष्टकांतून मुक्त झाल्यामुळें लघुकाव्यें व पदपदांतरें हातीं घेत आहे. आज इतकें खरें कीं, श्रीसमर्थांच्या हृदयाची ओळख करून देणारीं हीं करुणाष्टकें महाराष्ट्र-वाचकांच्या हवालीं करीत आहे; पुढचें पुढें !

धुळें
१८४१ मार्गशीर्ष व. ११

**शंकर श्रीकृष्ण देव**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... वि: ..................
क्रमांक ...................... नों. दि ..................

॥ श्रीरामदासार्पणमस्तु ॥

## ॥ श्रीसद्गुरुस्तवन ॥

श्रीस्वामिन् !


रूप हें अरूप जाहलें । कोठें दृष्टीं पडेना ।
ज्ञानडोहीं सौख्य आडळे । मन तेथें बसेना ॥ १ ॥

दुःखें चि ब्रह्मांड दाटलें । सौख्य कोठें नाडळे ।
स्वामिराया सांगों कवणा । मन सदा भरंगळे ॥ २ ॥

उपकार जाले अमूप । काये आठऊं आतां ।
वियोगें उपरति होईना । कष्टी वाटतें हे चित्ता ॥ ३ ॥

सर्व ही वाटते उदास । कोठें कदा न राहावें ।
टाकुनिया शिवशक्ती हे । शून्यपतें भरावें ॥ ४ ॥

रामदासी भक्त व्याकुळ । ब्रीद ऐसें नसावें ।
श्रीपती बोलणें करुणा । कृपादृष्टीं राहावें ॥ ५ ॥



# श्रीसद्गुरुसमर्थ

त्वरें सीघ्र ऊठोनि वेगीं वळावें । समर्थां प्रभूळागीं भेटोनि यावें ।



तरी सर्व ही सौख्य पावाल वेगीं । तुम्हा सूचना रे वळा सर्व वेगीं ॥

श्रीसमर्थमंदिर — जांब

॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रीसमर्थकृत

# करुणाष्टकें, धाट्या, सवाया, प्रास्ताविक श्लोक

## वगैरे

४५७६

॥ श्रीराम ॥

## ( १ ) नमन

नमूं[1] फर्शपाणी नमूं यंत्रपाणी । नमूं मोक्षपाणी नमूं च्यापपाणी ।
नमूं चक्रपाणी नमूं शूळपाणी । नमूं दंडपाणी हरिद्रुमपाणी[2] ॥ १ ॥
नमूं आदिमाता नमूं योगमाता । नमूं वेदमाता नमूं विश्वमाता ।
नमूं भक्तिमाता नमूं मुक्तिमाता।नमूं सज्जनाची कृपा ज्ञानमाता॥२॥
नमूं योगरूपी नमूं ज्ञानरूपी । नमूं संतरूपी नमूं ध्यानरूपी ।
नमूं दिव्यरूपी नमूं विश्वरूपी । नमूं येकरूपी गुरु सस्वरूपी ॥३॥
नमूं संतयोगी नमूं सिद्धयोगी । नमूं भक्त ज्ञानी विवेकी विरागी ।
नमूं आत्मनिष्ठां नमूं योगनिष्ठां। नमूं सर्वश्रेष्ठां वरिष्ठां वरिष्ठां[3] ॥ ४ ॥
मनीं चिंतितां राम विश्राम वाटे। जगज्जाळजंजाळ हे सर्व तूटे ।
तुटे कांजळी[4] काळ जिंकावयाची। फुटे वृत्ति अर्थांतरीं[5] जावयाची॥५॥

## ( २ ) प्रार्थना

गणपती मति दे मज लांघवी । जनकजापतिचा[6] लघुसा कवी ।
विनवितों करुणाळयकारणा । परम सुंदर दे मज धारणा ॥ १ ॥

---

१ पहिल्या श्लोकांत गणपतीला, दुसऱ्यांत सरस्वतीला, तिसऱ्यांत सद्गुरूला व चवथ्यांत संतसज्जनांना नमन करून, श्रीरामाचें चिंतन केलें असतां काय होतें तें पांचव्या श्लोकांत सांगितलें आहे २ हरिद्रुम=पारिजातक. ३ वरिष्ठां वरिष्ठां=श्रेष्ठांत श्रेष्ठ अशांना. ४ कज्जली. परंतु ‘काळजी’ ऐवजीं ‘काजळी’ लिहिलेलें पुष्कळदां आढळतें. ५ कुशाग्र, तीक्ष्ण, सूक्ष्म. ६ सीतापतीचा.

सबळ रामकथा वदतां नये । म्हणुनि वांछितसे तुझिये दये ।
विधिसुते[1] स्वहिते करुणाळये । हरिजना विजय तुजला जये ॥२॥
बहुत वाडे पवाडे[3] वदों कसे । कवित जाड कळा हृदईं नसे ।
बहुत हीण कठीण सुलक्षणु । रघुविराकरितां चि सुलक्षणु ॥ ३ ॥
बहुत सेवक त्याहुनि हीण मी । बहुत सेवक त्याहुनि दीन मी ।
बहुत काय वदों गुण आपुले । पतित ते मजहूनि भले भले ॥४॥
पतित दास जनीं तुमचे खरे । पतितपावन नाम कसें उरे ।
वचन लागतसे पाहातां धुरे[4] । नुधरितां[5] ब्रिद हें तुमचें नुरे ॥ ५ ॥

## ( ३ ) श्रीरामाचे उपकार

हिणाहून मी हीण जैसे भिकारी । दिनाहून मी दीन नाना विकारी ।
पतीतांसि रे आणि हातीं धरावें । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥१॥
जनीं भक्ति नाहीं मनीं भाव नाहीं।मला युक्ति ना बुद्धि कांहीं च नाहीं ।
कृपाळूपणें राज्य रंकांसि द्यावें । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥ २ ॥
बहूसाल अन्याय कोट्यानकोटी । रघूनायकें घातलें सर्व पोटीं ।
किती काय गूणासि म्यां आठवावें । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ३
समर्थें दिल्हें सौख्य नानापरीचें । सदा सर्वदा जाणसी अंतरीचें ।
लळे पाळिले तूं कृपाळू स्वभावें । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥४॥
दिनानाथ हें ब्रीद तां[6] साच केलें । म्हणे दास भक्तांसि रे उद्धरीलें ।
सुखें सांडणें या देह्याचें करावें । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥५॥

## ( ४ ) प्रभुदर्शन

नव्हे राजयोगी महद्भाग त्यागी । उदासीन जो वीतरागी विरागी ।
जनस्थानगोदातटीं वास केला । प्रभू देखिला दास संतुष्ट जाला॥१॥
लिळाविग्रही देव ब्रह्मादिकांचा । सदा बोलणें चालणें सत्य वाचा ।
जया चिंतितां चंद्रमौळी[7] निवाला । प्रभू देखिला दास संतुष्ट जाला ॥

---

१ ब्रह्मसुते, शारदे. २ मोठी. ३ कीर्ति. ४ पुढाऱ्याला, धुरंधराला. ५ न उद्धरितां. ६ त्वां. ७ शंकर.

दिनानाथ विख्यात हें नाम साजे । प्रजापाळकू रामराजा विराजे ।
बहू सुकृताचा बरा काळ आला । प्रभू देखिला दास संतुष्ट जाला ॥
जेणें सोडिल्या देवकोटी अचाटा[1] । सुखें चालती स्वर्गिंच्या स्वर्गवाटा ।
प्रतापें चि त्रयलोक्य आनंदवीला । प्रभू देखिला दास संतुष्ट जाला ॥
ऋषी[2] तापसी योगरासी विळासी । मनीं चिंतिती राम लावण्यरासी ।
असंभाव्य त्या कीर्तिच्या कीर्तिढाला[3] । प्रभू देखिला दास संतुष्ट जाला

## ( ५ ) जगज्जोति

वसे मुख्य नेत्रीं तथा शब्दश्रोत्रीं । सदा सर्व गात्रीं दिसे प्राणिमात्रीं ।
पहा येकतंत्रीं फिरे देहयंत्रीं । जगज्जोति[4] हिंडे कुपात्रीं सुपात्रीं ॥ १ ॥
पहा तर्कशास्त्रीं पहा न्यायशास्त्रीं । पहा शिल्पिशास्त्रीं पहा सर्व शास्त्रीं ।
पहा मंत्रयंत्रीं पहा सूत्रमात्रीं । पहा मूळमंत्रीं अरत्रीं परत्रीं ॥ २ ॥
पहा वेदशास्त्रीं पहा शास्त्रमात्रीं । पहा कीर्तिमात्रीं पहा काव्यमात्रीं ।
पहा ग्रंथमात्रीं पहा श्लोकमात्रीं । पहा शब्दमात्रीं सुचित्रीं विचित्रीं ॥ ३
कुवर्णीं सुवर्णीं पहा वर्णवर्णीं । अकर्णीं विकर्णीं च कर्णोपकर्णीं ।
कितीयेक धर्णीं[5] किती वृक्षपर्णीं । बहू जीव ते दाटले व्योमतर्णीं[6] ॥ ४ ॥
समस्तांसि कर्णें समस्तांसि धर्णें । समस्तांसि हर्णें समस्तां विवर्णें ।
जगज्जोतिनें राखिलें आपणासी । म्हणे दास हे सौख्यरासी विळासी

## ( ६ ) परमार्थाचें भोजन

सुखें वाढिती ते मुखें संत साधु । असंभाव्य हा ज्ञानबोधु अगाधु ।
रुची भोजनाची मिठी[7] प्राप्त जाली । भले जेविले वृत्ति त्यांची निवाली
कितीयेक ते स्वाद नाना प्रकारें । महांयोग्य ते जेविती श्रोत्रद्वारें ।
मनामाजि संतोष त्या भोजनाचा । गळाल्या महां मौन्य चत्वार वाचा

---

१ पुष्कळ. २ मुळांत " रुसी " आहे; आणि तत्कालीन रामदासी वाङ्मयांत प्रायः " रुसी " असें च लिहिलेलें आढळतें. ३ ढाला=प्रभा, तेज. ४ दासबोधांतल्याप्रमाणें येथें हि मुळांत " जगजोती " असें च बहुधा आहे. जगज्जोति=जाणीव कळा. ५ धरणी=पृथ्वी. ६ व्योम=आकाश. तरणी=नौका. ७ मिठी=अतिगोडपणा.

कितीयेक तीं सारिलीं स्थूळ भक्षें । बहूतांपरीचीं बहूतें सलक्षें ।
वरा वेळिला भात तो सूक्ष्माचा । सुवासें चवाबीतसे साधनाचा ॥३॥
बहूतां व्रतांच्या कितीयेक शाखा । कितीयेक मंत्रावळी लौण शाखा ।
वरान्नें क्षिरी वाढिती कामनेच्या । कितीयेक तीर्थावळी रायत्यांच्या
रुचीची कथी सद्य द्ध्योदनें तें । सुवासें जळें निर्मळें घेति शांतें ।
बहू भोजनें पालटे सर्व काया । म्हणे दास कल्याण हो रामराया ॥ ५ ॥

## ( ७ ) खरा देव

जनीं लोचनीं पाहतां दीसताहे । तया नाश काळांतरीं होत आहे ।
अवीनाश तो कोण आधीं पहावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥१
जनीं धुंडितां देव नाना परीचे । बहू धातु पाषाण कां मृत्तिकेचे ।
जया खेवं तो देव कैसा ह्मणावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥२॥
बहू देव ते जन्मले आणि मेले । असंख्यात होणार होऊनि गेले ।
जया नाश तो जाण मिथ्या ह्मणावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥
जगीं धुंडितां धुंडितां आडळेना । कदा सद्गुरूवीण ठाईं पडेना ।
सदा सर्वदा तो चि धुंडीत जावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥४॥
जयावीण कोठें रिता ठाव नाहीं । तया शोधितां तो चि होऊनि राही ।
म्हणे दास विश्वास भावें धरावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥५॥

## ( ८ ) प्रपंचाचें वेड

बाबा काका माउसा मित्र मामा । दादा नाना मेहुणा पुत्र शामा ।
ताता जीजी गोत ज्यामात साडु । नातू भाचे पूतणे हा पवाडु ॥१॥
आया बाया माउशा पूतणीया । काक्या माम्या सासुवा मेहुणीया ।
आज्या आता भाचिया आणि सूता । सूना कांता गोत्रजी त्या बहूता॥
ऐसीयांचीं सोइरीये प्रपंचीं । नांवें घेती सर्व नानापरीचीं ।
लोभें लोभें गुंतलें चीत येथें । कोण्ही नाहीं राघवेंवीण तेथें ॥३॥

---

१ चवचवीत असे. २ यद्दृष्टं तन्नष्टं । ३ अपाय, नाश. ४ विस्तार.

छेत्र्या घोडीं वैभवें फार जालीं । त्यांचे भेटी सोइरीं सर्व आलीं ।
सालीं धालीं कैचकैचीं मिळालीं । वाखा होतां सर्व सेखीं[1] पळालीं ॥४॥
येका पोटाकारणें सर्व कांहीं । ये संसारीं पाहतां सूख नाहीं ।
देवा देवा काय होईल कैसें । ऐसें तैसें लागलें हें चि पीसें[2] ॥५॥

## ( ९ ) देहकर्म

जिवा[3] जाळितां पोळितां काय होतें । मतीमंद तें चर्फडीतें पिडीतें ।
भला तो बरा सार वीचार सांगे । खुणे पावतां घोर संसार भंगे ॥१॥
देहे आटितां पीटितां सीण होतो । दिसेंदीस तो काळ ही वेर्थ जातो ।
न पाहेशि तूं सर्व शोधूनि सत्या । करीतोसि कां रे बळें आत्महत्या ॥
देहे दंडितां कोण खंडील कर्मा । चुके वर्म तो कोण धर्मा अधर्मा ।
कळेना जया देव तो पापरूपी । भ्रमें भूलला पाप संताप कोपी ॥३॥
भले सांगती संतसंगें चि जावें । विवेकें देहे देवकाजीं झिजावें ।
जनीं वाउगा भार आभार कोण्हा । नव्हे मान्य संसार हा दैन्यवाणा॥
म्हणे दास लोकांस कां वोसणावें । चुके वर्म रे कर्ममार्गें सिणावें ।
देहेकर्म देवासि पावेल कैसें । नव्हे कीं भलें लागलें सर्व पीसें ॥५॥

## ( १० ) विषमता

पदार्थीं बहू दाटली हे धरा हो । करा तर्क नानापरी वीवरा हो ।
जयाची तयाला बरी सौक्ष येते । दुजी साम्यता[4] रंग भंगोन जाते ॥१
जयाचें तयावीण आणीक नाहीं । दुजी ऊपमा या जनीं योग्य नाहीं ।
बहू दृश्य नानापरी दाटलेंसे । भुतासारिखें भूत तें ही न भासे ॥२॥
शशी सूर्य तारा मही मेघधारा । जळे तेज सारा नभाचा उभारा ।
किती काय नानापरी आठवावें । जनीं सारिख्या सारिखें नाम घ्यावें[5]

१ शेवटीं. २ वेड. ३ साधनांच्या पायीं नुसता जीव जाळून किंवा देह कष्टवून कांहीं हित होणार नाहीं; त्यासाठीं सद्गुरुचरणसेवा, श्रीरामचरणसेवा, सारासार विचार व नित्यानित्य-विवेक यांची च कांस धरली पाहिजे, असा या पंचकाचा भावार्थ आहे ४ अनुरूपता, साम्यता, दृष्टान्त. ५ एकासारखी दुसरी वस्तु सांगा पाहूं ?

कितीयेक तीं सारिलीं स्थूळ भक्षें । बहूतांपरीचीं बहूतें सलक्षें ।
वरा वेळिला भात तो सूक्ष्माचा । सुवासें चबाबीतसे साधनाचा ॥३॥
बहूतां व्रतांच्या कितीयेक शाखा । कितीयेक मंत्रावळी लौण शाखा ।
वरान्नें क्षिरी वाढिती कामनेच्या । कितीयेक तीर्थावळी रायत्यांच्या
रुचीची कथी सद्य दध्योदनें तें । सुवासें जळें निर्मळें घेति शांतें ।
बहू भोजनें पालटे सर्व काया । म्हणे दास कल्याण हो रामराया ॥ ५ ॥

## ( ७ ) खरा देव

जनीं लोचनीं पाहतां दीसताहे । तया नाश काळांतरीं होत आहे ।
अवीनाश तो कोण आधीं पहावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥१
जनीं धुंडितां देव नाना परीचे । बहू धातु पाषाण कां मृत्तिकेचे ।
जया खेवँ तो देव कैसा ह्मणावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥२॥
बहू देव ते जन्मले आणि मेले । असंख्यात होणार होऊनि गेले ।
जया नाश तो जाण मिथ्या ह्मणावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥
जगीं धुंडितां धुंडितां आडळेना । कदा सद्गुरूवीण ठाईं पडेना ।
सदा सर्वदा तो चि धुंडीत जावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥४॥
जयावीण कोठें रिता ठाव नाहीं । तया शोधितां तो चि होऊनि राही ।
म्हणे दास विश्वास भावें धरावा । खरा देव तो आदरें वोळखावा ॥५॥

## ( ८ ) प्रपंचाचें वेड

बाबा काका माउसा मित्र मामा । दादा नाना मेहुणा पुत्र शामा ।
ताता जीजी गोत ज्यामात साडु । नातू भाचे पूतणे हा पवाँडु ॥१॥
आया बाया माउशा पूतणीया । काक्या माम्या सासुवा मेहुणीया ।
आज्या आता भाचिया आणि सूता । सूना कांता गोत्रजी त्या बहूता ॥
ऐसीयांचीं सोइरीये प्रपंचीं । नांवें घेती सर्व नानापरीचीं ।
लोभें लोभें गुंतलें चीत येथें । कोण्ही नाहीं राघवेंवीण तेथें ॥३॥

---

१ चबचबीत असे. २ यद्दृष्टं तन्नष्टं । ३ अपाय, नाश. ४ विस्तार.

छेत्र्या घोडीं वैभवें फार जालीं । त्यांचे भेटी सोइरीं सर्व आलीं ।
सालीं धालीं कैचकैचीं मिळालीं । वाखा होतां सर्व सेखीं[1] पळालीं ॥४॥
येका पोटाकारणें सर्व कांहीं । ये संसारीं पाहतां सूख नाहीं ।
देवा देवा काय होईल कैसें । ऐसें तैसें लागलें हें चि पीसें[2] ॥५॥

## ( ९ ) देहकर्म

जिंवा[3] जाळितां पोळितां काय होतें । मतीमंद तें चर्फडीतें पिडीतें ।
भला तो बरा सार वीचार सांगे । खुणे पावतां घोर संसार भंगे ॥१॥
देहे आटितां पीटितां सीण होतो । दिसेंदीस तो काळ ही वेर्थ जातो ।
न पाहेशि तूं सर्व शोधूनि सत्या । करीतोसि कां रे बळें आत्महत्या ॥
देहे दंडितां कोण खंडील कर्मा । चुके वर्म तो कोण धर्मा अधर्मा ।
कळेना जया देव तो पापरूपी । भ्रमें भूलला पाप संताप कोपी ॥३॥
भले सांगती संतसंगें चि जावें । विवेकें देहे देवकाजीं झिजावें ।
जनीं वाउगा भार आभार कोण्हा । नव्हे मान्य संसार हा दैन्यवाणा॥
म्हणे दास लोकांस कां वोसणावें । चुके वर्म रे कर्ममार्गें सिणावें ।
देहेकर्म देवासि पावेल कैसें । नव्हे कीं भलें लागलें सर्व पीसें ॥५॥

## ( १० ) विषमता

पदार्थीं बहू दाटली हे धरा हो । करा तर्क नानापरी वीवरा हो ।
जयाची तयाला बरी सौक्ष[4] येते । दुजी साम्यता रंग भंगोन जाते ॥१
जयाचें तयावीण आणीक नाहीं । दुजी ऊपमा या जनीं योग्य नाहीं ।
बहू दृश्य नानापरी दाटलेंसे । भुतासारिखें भूत तें ही न भासे ॥२॥
शशी सूर्य तारा मही मेघधारा । जळे तेज सारा नभाचा उभारा ।
किती काय नानापरी आठवावें । जनीं सारिख्या सारिखें नाम घ्यावें

१ शेवटीं. २ वेड. ३ साधनांच्या पायीं नुसता जीव जाळून किंवा देह कष्टवून कांहीं हित होणार नाहीं; त्यासाठीं सद्गुरुचरणसेवा, श्रीरामचरणसेवा, सारासार विचार व नित्यानित्य-विवेक यांची च कांस धरली पाहिजे, असा या पंचकाचा भावार्थ आहे ४ अनुरूपता, साम्यता, दृष्टान्त. ५ एकासारखी दुसरी वस्तु सांगा पाहूं ?

दुजा चंद्र नाहीं दुजा सूर्य नाहीं। दुजें सारिख्या सारिखें येक नाहीं।
कदा ही पदार्थीं नसे ऊपमाया। घडे साम्यता केवि या देवराया ॥४॥
तुळावें कसें निर्गुणें निर्गुणाला। निराभास आभास तेथें उडाला।
म्हणे दास ऊदास आहे पहा हो। बहू संग सोडूनि सूखें रहा हो ॥५॥

## ( ११ ) विरोध

बहू आंतुरां[1] चांतुरां[2] ही पडेना[3]। कदा कांतरां[4] वातरां[5] ही पडेना।
बहू निंदकां वादकां ही पडेना। बहू साधकां बाधकां ही पडेना ॥१॥
कदा देव दैत्या मधें सख्य नाहीं। जिवां मानवां ही मधें सख्य नाहीं।
स्वजाती विजाती मधें सख्य नाहीं। महंतां महंतां मधें सख्य नाहीं ॥
कळ्हो[6] लागला पंडितां पंडितांला। कळ्हो लागला ज्ञानियां ज्ञानियांला
कळ्हो लागला योगियां योगियांला। कळ्हो लागला तापसां तापसांला
ईती[7] भीड़ती भांडती दीर्घ द्वेषें। सदा निंदिती येकमेकां निशेषें।
बळें बोलती हाकिती घोर घोषें। अहंतागुणें सांडितां ज्ञान तोषें ॥४॥
बहू जाणते बोलती शास्त्रमतें। जनीं दाविती आपुले वित्पतीतें।
उणें बोलती सीघ्र कोपें बहूतें। बळें मारिती येकमेकांसि हातें ॥५॥

## ( १२ ) विश्वमाता भवानी

हिरे पाच गोमेद वैडुर्य मोतीं। प्रवाळें निळें माणिकें ढाळ[8] देती।
मणी हेमळंकार[9] भांगारखाणी[10]। भजा रे भजा विश्वमाता भवानी ॥१॥
जवादी[11] चुवे[12] कस्तुरी च्यारु[13] गंधें। फुलें केशरें धूसरें[14] तें सुगंधें।
फिटे रुंझतां षट्पदांची[15] शिरांणी[16]। भजा रे भजा विश्वमाता भवानी ॥
सिबीके[17]वरी दिव्य छत्रें विचित्रें। बहू च्यामरें मत्छ मार्तंडपत्रें[18]।
अती शोभती चंद्रसूर्यों[19] निशाणीं। भजा रे भजा विश्वमाता भवानी ॥३

---

१ उतावीळ. २ हुशार, दक्ष. ३ पटत नाहीं. ४ भ्याड. ५ हेकेखोर. ६ कलह, भांडण. ७ यती. ८ प्रभा, प्रकाश. ९ सोन्याचा दागिना. १० भांगारें=सोनें. ११ जवादी मांजराची कस्तूरी. १२ चुवा=चंदनाचा केलेला सुवासिक पदार्थ. १३ चारु, सुंदर. १४ धूसर, पांढुरकें. १५ षट्पद=भ्रमर. १६ आवड, हौस. १७ शिबिका=पालखी. १८ आतपत्र, छत्री. १९ चंद्रसूर्यौ ( द्विवचन ).

बहू चौडकें[1] टाळ मृदांग भेरी । दमामे नगारे बहू दाटि भारी ।
कळीमाजि[2] हें लाविलें विश्वध्यानीं । भजारे भजा विश्वमाता भवानी ।।
सदा उन्मनी योगियांची समाधी । तुटे आत्मनीवेदनें आधिव्याधी ।
सदा सर्वदा राम दासाभिमानी । भजा रे भजा विश्वमाता भवानी।।५

## ( १३ ) देह आणि कर्म

मुळीं देह कीं कर्म निर्माण जालें । विचारें बरें अंतरामाजि आलें ।
पुसे वाक्य श्रोता तया वक्तयासी । मनामाजि ते उत्तराची असोसी[3]।।
देहे कर्म दोरी तिढे[4] वेगळाले । मुळीं पाहतां येक वेळे चि जाले ।
दिसे लागवेगें पुढें आणि मागें । विचारें मुळीं येक भागें विभागें।।२।।
देह्या लागलें कर्म कर्मासि देहो । वृथा आग्रहो निग्रहो हा पहा हो ।
मुळीं कर्म तेणें पुढें देह जालें । मुळीं देहपासून तें कर्म आलें ।। ३ ।।
सुतें वाख तंतु मुळीं गांठि द्यावी । दुतोंडी दुभागें चि दोरी वळावी ।
विचारें मुळीं येक कीं दोनि पाहा । विवंचूनि बूझोनि रीझोनि राहा[6]।।४
म्हणे दास विश्वास त्या प्रत्ययाचा । विवेकी तुम्ही हें विवेकें विवंचा ।
उपाधीमुळीं निर्मळीं दृष्टि घाला । किती येक आक्षेप जाला निमाला।।

## ( १४ ) दीनवत्सल देव

दीनवछल देव खरा हरी । शरणागत दीन करीं धरी ।
निजरूप स्वरूप बराबरी । करुणाघन पावन तो करी ।। १ ।।
रघुनाथ सनाथ करीतसे । भवकाळ विषाळ हरीतसे ।
भवसीण कठीण कदा नसे । निजधाम दया भजकां विलसे ।।२।।
घननीळ तनू अति सांवळें । जघनिचें चिर[7] सुंदर पींवळें ।
कटिं किंकिणि नागर[9] वाजती । पद नेपुर वांकि[10] झणाणिती ।।३।।

---

१ चौंडकें, डुगडुगवाद्य. २ “ कलौ चंडीविनायकौ । ” कलियुगांत देवी आणि गणपति ही दोन मुख्य दैवतें होत. ३ इच्छा, अपेक्षा. ४ तिडा=दोरींतील वळ. देह आणि कर्म हे दोन धागे वेगळाले आहेत, पण त्यांची वळून एक च दोरी झाली आहे. ५ हद्द. ६ विचार करून, समजून घेऊन, समाधान पावून रहा. ७ वस्त्र ८ सुंदर, चांगलें. ९ तोरडी. १० वाळे.

सुरभूषण राम रणांगणीं । रणकर्कश देव शिरोमणी ।
रिपु काळ कराळ[1] विदारितो । रणशूर रणीं मद वारितो ।। ४ ।।
सुरसंकटमोचन पावला । शरमार करीत उठावला ।
दशमूखकुरंग[2] विदारिला । अमरा[3] पदवास विळासला ।। ५ ।।

## ( १५ ) श्रीसमर्थांची इच्छा

सीवणा[4] मनाचा विपरीतत्राणा । उदास वाटे बहुसाल प्राणा ।
मग राघवा रे तुज बाहिलों[5] रे । कृपाळुवें सत्वर पाहिलों रे ।।१।।
देवें दयाळें करुणा करावी । भक्ताभिमानें भरणी[6] भरावी ।
हे रामनौमी तरणी[7] तरावी । दासां समस्तां वरणी[8] वरावी ।। २ ।।
रघुनाथदासा कल्याण व्हावें । अती सौख्य व्हावें आनंदवावें ।
उदेग[9] नासो वर शत्रु नासो । नाना विळासें मग तो विळासो ।।३।।
कोडें[10] नको रे कळहो नको रे । कापट्य कर्मीं सहसा नको रे ।
निर्वाणचिंता निरसीं अनंता । शरणागतां दे बहु धातमाता[11] ।।४।।
अजयो न हो रे जयवंत हो रे । आपदा नको रे बहु भाग्य हो रे ।
श्रीमंतकारी जनहीतकारी । परऊपकारी हरि दास तारीं ।। ५ ।।

## ( १६ ) श्रीसमर्थांची निष्ठा

तुज वर्णितों भाट मी देवराया । सदा सर्वदा गाय श्रीदें सवाया ।
महाराज दे आंगिचें वस्त्र आतां । बहू जीर्ण जाली देहेबुद्धिकंथा।।१।।
तुझा भिक्षकू दातया रामचंद्रा । सदा स्वस्त चिंतीतसे गा महींद्रा ।
राजाधीश देशा ऊरपूर्ण[12] द्यावें । भवदैन्य हें देशधाडी करावें ।। २ ।।
तुझा भृत्य मी भार्गवादर्पजीतां[13] । जीवित्व असे आर्पिलें तूज आतां ।
भवा जिंकितां जीव देईन पाहे । तुज सन्मुख पाठिसीं स्थीर राहे।।३।।

---

१ भयंकर. २ कुरंग=हरिण. ३ देवांना. ४ क्षपणक किंवा श्रमणक या शब्दाचा हा अपभ्रंश असावा. "दुर्बल" असा तात्पर्यार्थ. ५ धांवा केला. ६ पोषण. ७ नौका. ८ पुजेची पाळी. ९ उद्वेग. १० संकट. ११ धात=कल्पित गोष्ट व मात=घडलेली गोष्ट. ( हंसकोश ). १२ ऊरपूर, आबादानी, सुभिक्ष. १३ भार्गवाचा गर्व हरण करणाऱ्या रामा !

रघूनायका नीकट दास तूझा । तुला वीकिलासे स्वयें देह माझा ।
सदा सर्वभावें करी दास्य तूझें । देई आपुलें वेसेवेतन[1] माझें ॥४॥
तुझे मारुतीसारिखे दास देवा । मज मानवा किंकरा कोण केवा[2] ।
दिनानाथ विख्यात हें ब्रीद गाजे । तेणें मानसीं थोर आनंद माजे ॥५

## ( १७ ) चाफळीं श्रीरामाचें आगमन

लवे नेत्रपातें स्फुरे आजि बाहे । दिनानाथ हा राम येणार आहे ।
जयाचेनि योगें सुखानंद लोटे । तया देखतां अंतरीं बाष्प दाटे॥१॥
लळे पाळितो राम आज्ञा दिनाचे । कृपासागरु भाव जाणे मनाचे ।
नुपेक्षी कदा संकटीं धांव घाली । तया देखतां मानसें तें निवालीं ॥२॥
लगा[3] पाहतां राघवेंवीण नाहीं । निराधार हें पाहतां सर्व कांहीं ।
चळेना जनीं तो चि आश्रो[4] धरावा । रघूराज आधार याचा करावा ॥
लपावें अती आदरें रामरूपीं । भयातीत निश्चीत ये सस्वरूपीं ।
कदा तो जनीं पाहतां ही दिसेना । सदा ऐक्य तो भिन्न भावें वसेना॥
लघूलाघवी[6] राम कोदंडधारी । मनीं चिंतितां शोक संताप हारी ।
महा संकटें नाम घेतां निवारी । भवसागरीं मूढ पाषाण तारी ॥५॥

## ( १८ ) श्रीरामाचें ब्रीद

चकोरासि चंद्रोदई सूख जैसें । रघूनायका देखतां सूख तैसें ।
सगूणासि लांचावलें स्थीर राहे । रघूनंदनेंवीण कांहीं न राहे ॥१॥
चळेना समरंगणीं ठाण मागें । चळेना मुखें बोलतां वाक्य युगें ।
चळेना कृपासिंधु कल्पांतकाळीं । रघूराज हा आदरें दास पाळी ॥ २ ॥
चमत्कारलें चित्त हें रामगूणीं । उठे कीर्ति वाखाणितां प्रीति दूणी ।
रघूनायकासारिखा देव नाहीं । क्रिया पाहतां चोखडी सर्व कांहीं॥३॥
चळेना कदा राज्य बीभीषणाचें । चळेना देहे चालतां मारुतीचें ।
चळेना गती राहतां नामछंदीं । चळेना सिमा घातली श्वेतुबंदीं॥४॥

---

१ वेसवेतन=दासाचें वेतन. २ पाड. ३ आधार, आश्रय. ४ आश्रय. ५ हा श्लोक मनाच्या श्लोकांपैकीं १८५ वा आहे. ६ अत्यन्त मायाळू.

चपेटा विझे[1] काळमाथां जयाचा । धरीं रे मना पंथ या राघवाचा ।
विवेकी जनें राजपंथें चि जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥५॥

## ( १९ ) भयानक भीम

भिम भयानक तो सिक[2] लावी । भडकळा[3] सकळां भडकावी ।
वर तरू वरता कडकावी । बळकटां सगटां धडकावी ॥ १ ॥
सबळ ते रजनीचरभारें । सगट बांधत पुछउभारें ।
रडत बोंबलिती विर सारे । न दिसतां चि बळें भुभुकारे ॥ २ ॥
जळतसे त्रिकुटाचळ लंका । धरितसे रजनीचर शंका ।
उमजतां नुमजे वरघाला[4] । अवचिता बुडवी सकळांला ॥ ३ ॥
कठिण मार विरासि न साहे । रुधिरंपूर[5] महीवरि वाहे ।
बहुत भूतभुतावळि आली । रणभुमीवरि येउनि घाली ॥ ४ ॥
अमर ते ह्मणती विर आला । नवल हें पुरला सकळांला ।
उदित काळ बरा दिसताहे । विधिविधान विधी[6] मग पाहे ॥ ५ ॥

## ( २० ) परशुरामाची प्रार्थना

महां कोप आग्नी रुसी जामदाग्नी । समर्था तया आणिजे सर्व सूज्ञी ।
सदा सर्वदा घेतसे नाम तूझें । वरिष्ठा स्वभावें चि हें गोत्र माझें[7] ॥ १ ॥
वसे सागराचे तिरीं सूत[8] तूझा । समाचार तो घेत नाहीं च माझा ।
तयाला बहूतांपरी सीकवावें । स्वभावें चि वोढेल ऐसें करावें ॥ २ ॥
किती येक मागें बहू युध्य केलें । किती वेळ या ब्राह्मणा राज्य दिल्हें ।
अकस्मात सामर्थ्य तें काय जालें । युगासारिखें काय नेणों विझालें ॥
चिरंजीव आहेसि ऐसी वदंती । समर्था तुझें चित्तकाठिण्य कीती ।
तुझें नामधारी तुला हें कळेना । कृपाळूपणें चित्त कैसें वळेना ॥४॥
नको रे उदासीन हें वाक्य मानी । समर्था असावें बहू साभिमानी ।
करावी दिनानाथ हे सत्य वाचा । तुला चिंतितों दास मी राघवाचा ॥

१ विराम पावतो, वाजे. २ शिक्षा लावी. ३ वीराचें तेज आहे ज्याच्या ठायीं असा. ४ वरून येणारा हल्ला. ५ रक्ताचा पूर. ६ ब्रह्मदेव. ७ श्रीसमर्थांचें गोत्र जमदग्नि होय. ८ परशुराम.

## ( २१ ) रडका संसार

नसे आंथराया नसे पांघराया । नसे धाम ना दृढ छयाया निजाया ।
नसे अन्न खाया नसे रम्य जाया । वृथा सीण संसार कर्ती रडाया ॥१
नसे द्रव्य कांहीं घरीं धान्य नाहीं । बहू वेष्टिला कामक्रोधादि देहीं ।
पराधेनता वेळ नाहीं मराया । वृथा सीण संसार कर्ती रडाया ॥२॥
मनासारिखा मित्र तो ही मिळेना । परत्रीक तें ज्ञान पोटीं वसेना ।
सदा कोप आरोप संतप्त काया । वृथा सीण संसार कर्ती रडाया ॥३॥
मनासारिखा सोइरा ही मिळेना । मनीं पाहतां चित्तशुद्धी असेना ।
उणें बोलती सर्व कांहीं छळाया । वृथा सीण संसार कर्ती रडाया ॥४॥
म्हणे दास हे आस कैसी पहा हो । सुखाची बहू होतसे श्लाघ्यता हो ।
पुढें जाहली सर्व काया पडाया । वृथा सीण संसार कर्ती रडाया ॥५॥

## ( २२ ) देहावस्था

निमाले किती शास्त्रिचा शोध घेतां । जनीं मूर्ख हो कायसा बोल आतां
वृथा वाढवीती देहाची अहंता । रुदंती करी लागतां देहचिंता ॥१॥
देहे चालतां सर्व ही सुख आहे । देहे खंगतां कोण संनीध राहे ।
मिळालीं सखीं चोरटीं वैभवाचीं । भले जाणती दायकें हीं भवाचीं ॥२
जयाकारणें सर्व चिंता करावी । सदा संगती दुर्जनाची धरावी ।
जयाकारणें भोगणें दुःख देहीं । तथा[१] वैभव गेलियां चाड नाहीं ॥३॥
न पाहे कदा देव तारुण्यकाळीं । देहे खंगतां सर्व जाती उमाळी[२] ।
बराडी[३] दिसे बापुडें दैन्यवाणें । तयालागि सांभाळिजे काय कोणें ॥४॥
उठे गर्व हा सर्व तारुण्यकाळीं । मदें मातलें चित्त हें काममेळीं ।
विकारें मनीं देव तो आठवेना । पुढें अंतकाळीं स्मरेना स्मरेना ॥५॥

---

१ 'था' अगदीं स्पष्ट आहे. 'या' असता तर बरें झालें असतें. कदाचित् 'था' हस्तदोष असून श्रीसमर्थांनीं 'या' च म्हटलें असेल. २ ओकारी, मळमळ, विषयाधीनता. ३ दुकळलेलें, आशाळभूत.

## ( २३ ) देहभूत

बरें पाहणें सर्व येथील येथें। मुळीं पाहतां सर्व नाहीं च तेथें।
स्वभावें किती येक संगीत होतें। तगेना पुढें शेवटीं वेर्थ जातें ॥१॥
तगेना कदा सर्व माईक माया। रचे तें खचे ऊपजे तें मराया।
चळेना बरा निश्चय तो धरावा। गती संगती वीवरावा वरावा ॥२॥
विधीबंदन्यायें चि हे सृष्टि चाले। विधी चूकतां मोकळीनें न चाले।
उदंडीं जनीं येत्न उदंड केला। परी युगधर्में चि तो वेर्थ गेला ॥३
स्वभावें चि जालें गुणा सर्व आलें। किती वाढलें मोडलें तें निमालें।
किती होत गेले किती जात गेले। किती येक ते देह गेले चि गेले ॥४॥
म्हणे दास रे वास जेथें भुतांचा। भुतें सांडुनी शोध घ्या अद्भुताचा।
नसे भूत अद्भूत त्यातें ह्मणावें। विवेकें देहेभूत सर्वैं जिणावें ॥५॥

## ( २४ ) संचित

जनीं संचितें पिंड निर्माण जाला। मनीं तें चि भोगावया जीव आला।
शुभाशूभ होणार कांहीं कळेना। पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ॥१॥
जिवा ऊगमीं देहनिर्माणकाळीं। विधी वोळि लेहोनि गेला कपोळीं।
शुभाशूभ होणार कांहीं कळेना। पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ॥२॥
समुद्रासि लंघून पैलाड गेले। परी भोगणें तें पुढें सीध ठेलें।
शुभाशूभ होणार कांहीं कळेना। पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ॥३
जनीं वैभवें थोर सायास केले। परी जीव हे मृत्यमार्गीं च गेले।
शुभाशूभ होणार कांहीं कळेना। पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ॥४
म्हणे दास विश्वास नामीं धरावा। मनीं शोक अत्यंत तो ही नसावा।
शुभाशूभ होणार कांहीं कळेना। पुढें प्राप्त ब्रह्मादिकां ही टळेना ॥५

## ( २५ ) महात्मा

नव्हे चाकरी वीण तो सीण केला। तरी भाकरी कोण देतो तयाला।
धणी कोण तो वोळखेना कळेना। तया वेर्थ रे सर्व कांहीं मिळेना १

१ व्यवस्थित, सुरळीत.

प्रितीनें देहेशुद्धि सोडूनि धांवे । धणी कोण जाणोनि तेथें चि पावे ।
प्रभूच्या मनासारिखें चालताहे । भला तो चि साधु जनीं मुक्त पाहे ॥
मनांतील जाणे असा कोण आहे । कसें कोण तें सर्व शोधून पाहे ।
किती येक तें पाहतां ही कळेना । किती एक तें चित्त चित्ता मिळेना ॥
बहू बाप हो बोलतां पाप लागे । जनामाजि विस्मीत होऊनि सांगे ।
बहू देव त्याला बहू बाप जाणा । म्हणोनि मना वोळखे देवराणा ॥४
असा नष्ट तो भ्रष्ट होऊनि गेला । क्रिया धर्म ना कर्म ना मुक्त केला ।
दिसे सर्व आत्मा म्हणे तो दुरात्मा । निराकार आत्मा बुझे तो महात्मा

## ( २६ ) निराकार

निराकार आकार नाहीं जयाला । विवेकें विवंचूनि पाहें तयाला ।
तया पाहतां ऊरि नाहीं भयाला । भजावें तया मोक्षपाणी दयाळा ॥१
रचे तें खचे हो रचेना खचेना । असे तें नसे हो असेना नसेना ।
असे दृश्य मिथ्या नसे भास मिथ्या। मनोभास तो दृश्य हो सर्व मिथ्या
म्हणों साच आहे तरी नासताहे । विचारूनि पाहे दिसे तें न राहे ।
किती येक होतें किती येक जातें । पुढें पंचभूतें चि जाती लयातें ॥३॥
लयातीत आनंद शोधूनि पाहे । जया कल्पनालेश तो ही न साहे ।
तया कल्पितां तूं चि तद्रूप होसी । सद्रूप चिद्रूप होऊनि जासी ॥४॥
मिळाला तरी भीतरीं[२] बोध जैसा । सदा पूर्ण ब्रह्मीं मना मीळ तैसा ।
विवेकें विरावें अणू ही नुरावें । म्हणे दास भावें विभक्ती[३] न यावें ५.

## ( २७ ) अनादि अनंत काळ

सदा सर्वदा होतसे दीनरात्री[४] । किती येक मन्वंतरें होत जाती ।
बहू काळ गेला न ये मागुता तो । पुढें बोलतां चालतां सर्व जातो॥
पहातों जनाला किती येक जाती । तनू टाकिताहे पुढें ते पहाती ।
गताच्या कथा काढितों अल्प कांहीं । पुढें लोक ते काढिती आमुच्या ही

१ समजे. २ अभ्यंतरीं, मध्यें, एकमेकांत. ३ निराळें नसावें. सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना ॥ भक्त म्हणिजे विभक्त नव्हे ॥. ४ दिवस आणि रात्र.

जितां तों किती घालमेली करावी । बहूतांपरीं कल्पना ते धरावी ।
किती येक तें आपुलें तें परावें । जनीं सर्व सांडूनि सेखीं मरावें ॥३॥
अहा रे मना हें तुला कां कळेना । वृथा सीणसी लोभ तूझा ढळेना ।
जिणें सर्व जाईजेणें दों दिसांचें । विचारीं जनीं आपुलें काय कैचें ॥
म्हणे दास ऊदास होईं मना रे । बहूसाल चिंता नको कामना रे ।
स्वभावें चि होणार तें होइना कां । अकस्मात जाणार तें जाइना कां ॥

## ( २८ ) गेलेली घडी

सतीला पती दूसरा शोधवेना । दुजा जन्नकू बोलणें हें घडेना ।
जनीं सद्गुरूसारिखा कोण आहे । मनीं मानवा तूं चि शोधूनि पाहे ॥
पहा तूटला तंत तो मंद वाजे । मनीं शोधितां चोरटें चित्त लाजे ।
पुन्हा सांदितां वेगळा सर्व सांदा । मुखें बोलणें वेर्थ वादा वेवादा ॥२॥
स्नेहे तूटला तो कदा ही जडेना । पुढें भेटि कल्पांतकाळीं घडेना ।
मनीं तूटला तंत कैसा जडावा । पुन्हा मागुता योग कैसा घडावा ॥३॥
सुखाकारणें थोर अन्याय केला । महां लाभ तो लालचीनें बुडाला ।
बरें स्वप्नसूखासि वायां सिणावें । मनीं वेर्थ मागील कां वोसणावें ॥
बहू सोसितां सोसितां सीण जाला । महां मूर्ख मी कष्टवीलें तुम्हाला ।
म्हणे दास मानेल तैसें करावें । बरें वोखटें सर्व ही वीसरावें ॥५॥

## ( २९ ) पडलेलें कोडें

उदासीन हा काळ जातो गमेना । सदा सर्वदा थोर चिंता शमेना ।
उठे मानसीं सर्व सांडूनि जावें । रघूनायका काय कैसें करावें ॥१॥
जनीं बोलतां चालतां वीट वाटे । नसे अंतरीं स्वस्त कोठें न कंठे ।
घडीनें घडी चित्त किती धरावें । रघूनायका काय कैसें करावें ॥२॥
अवस्था मनीं होय नानापरीची । किती काय सांगों गती अंतरीची
विवेकें चि या मानसा आवरावें । रघूनायका काय कैसें करावें ॥३॥
विचारें तऱ्हीं अंतरीं कोड होतो । शरीरासि तो हेत सांडूनि जातो ।

१ शेवटीं २ नश्वर.

उपाधीस देखोनि वाटे सरावें । रघूनायका काय कैसें करावें ।।४।।
म्हणे दास ऊदास जालों दयाळा। जनीं वेर्थ संसार हा वायचाळा।
तुझा मी तुला पूसतों सर्व भावें। रघूनायका काय कैसें करावें ।।५।।

## ( ३० ) सुरलोकपाळ

विध्योक्त वर्ता भजनीं प्रवर्ता । हा पंथ तर्ता इतरां विवेर्ता[१] ।
नेणे अपूर्ता समजेल पूर्ता। अत्यंत धूर्ता वचनीं मधुर्ता ।। १ ।।
धर्माभिमानी सुरसाभिमानी । कैवल्यदानी प्रगटे निदानीं ।
रघोत्तमानी[२] जगदोत्तमानी । उन्मत्त मानी वधिले गुमानी ।। २ ।।
मोठ्या बळांचा बहुतां दळांचा । नाना कळांचा वर तो खळांचा ।
अंतर्पिळांचा धिर कूटिळांचा । नाना मुळांचा कपटी कुळांचा ।। ३ ।।
देवें भुपाळें सुरलोकपाळें । केलीं दयाळें उजळें कपाळें ।
उदीत काळें रमणीय भाळें । पदीं सुकाळें सुरनाथपाळें ।। ४ ।।
तो चालवीतो मन घालवीतो । आनंदवीतो सुख पाववीतो ।
लवा लवीतो सिण मालवीतो । कृपा नवी तो करितो कवी तो ।।५।।

## ( ३१ ) संकटविमोचक राम

बहू पीडिलें वाळिनें सुग्रिवातें । ग्रिवा हे फुटे शोक वाटे जिवातें ।
तया आश्रिता राम आनंदकारी। मना सेविं तूं सर्व चिंता निवारी १
पदें स्पर्श केला मदें लंकनाथें । तजी हर्ष तत्काळ बीभीषणातें ।
तया राम संतोषवी सिंधुतीरीं । मना सेविं तूं सर्व चिंता निवारी।।२
कपी चर्चिला कुंभकर्णें शरीरा । करी शोक दारा कळे हें उदारा ।
तिचा कांत आणून दे राम दारीं। मना सेविं तूं सर्व चिंता निवारी ।।३
रघूवौंश चेडांश[३] रवीप्रदीपें। स्वभक्तां सदा रक्षिलेंसें प्रतापें ।

१ मायेचीं कार्यें, आभास, भ्रम यांना. २ 'रघोत्तम' याचें बहुमानार्थीं अनेकवचन 'रघोत्तमानी' तसेंच 'जगदोत्तम' याचें 'जगदोत्तमानी' हें अनेकवचन; जसें तत्कालीन कागदपत्रांत कारकुन, मोकदम इत्यादिकांचीं कारकुनानी, मोकदमानी इत्यादि अनेकवचनाचीं रूपें आढळतात. ३ चंडांश.

सुरां संकटीं सोडवी साह्यकारी । मना सेविं तूं सर्व चिंता निवारी॥४
खगेशा मृगेशा जगेशा नगेशा । नरेशा सुरेशा हरेशा परेशा ।
तया दास होऊनि नाना प्रकारीं । मना सेविं तूं सर्व चिंता निवारी ॥५

## ( ३२ ) वर्षाकालीन वनश्री

पसरले सरले गिरि साजरे । सरवटें[१] धुकटें भरितें भरे ।
बहुत वात झडांत झडाडितो । वर तरू वरता चि कडाडितो ॥१॥
झिरपती झरती झरती झरे । न धरितां धरतां निर वावरे ।
बहुत पाभेळ[२] वोघ महीतळीं । नभकटें[३] धुकटें कटपाभळी[४] ॥ २ ॥
सरस रम्य रसाळ वनांतरा । हरितें[५] रंग सुरंग दिसे बरा ।
दिसतसे रमणीय वसुंधरा । नुतन पल्लव हा तरु साजिरा ॥ ३ ॥
द्रुम लता समता त्रुण मातलें । सुख मनीं सुमनीं मन रातलें ।
परम सुंदर ते खग[६] बोलती । गमतसे वसती कमळापती ॥ ४ ॥
विमळ सूसिळ तें[७] स्छळ पाहतां । सुख विशेष घडे पळ राहतां ।
वरदराज विराजतसे वनीं । विनटला नटला रत सज्जनीं ॥ ५ ॥

## ( ३३ ) नाना गुणाचे लोक

महीमंडळीं लोक नाना गुणाचे । असंभाव्य लीळा कळा कूसरीचे ।
किती येक साधे किती येक बोधे[८] । किती येक ते देखिले मंदबोधे॥१॥
किती येक लांताड लाबाडवाणे । किती येक पापी पुराणे पुराणे ।
किती येक कापट्य तोंडाळ ऊणे । कुशब्दी किती येक वाचाळ सूंणे[१०] ॥२
करंटे कुरूपी विकारी भिकारी । किती येक ते तामसी दुखकारी ।
किती येक ते पातकी पापरूपी । किती येक ते दक्ष पुण्यस्वरूपी॥३॥
किती येक ते लोक नाना गुणाचे । किती येक ते उत्तमा लक्षणाचे ।
किती येक तारुण्य लावण्यखाणी । किती येक दीक्षा बरी रम्यवाणी ॥

---

१ झिमझिम पाऊस. २ पावळ, झरे. ३ मेघ. ४ कड्यावरून जोरानें पाणी पडणें. ५ हिरवा. ६ पक्षी. ७ कोणत्या विशिष्ट स्थळाचें हें वर्णन आहे कोण जाणे ! न जाणों हेळ्वांक किंवा शिवतर येथील घळीचें तें असेल ! ८ हुशार. ९ पायपोसखाऊ. १० श्वानवत्.

भल्याचे भले बोलती सत्य वाचा। देहे सुकृतें चालतो सुकृताचा।
फिरे दास उदास लोकांस पाहे। मनामाजि थकीत होऊनि राहे ॥५॥

## ( ३४ ) दुर्जन व सज्जन

कुडंपंथ[१] कळोनि पुढें चि कडा। वरि घालितसा उगले चि झडा।
बहु शब्द कठीण धडा विधडा। खळ भुंकत जात जसा गधडा ॥१॥
मंजुळ तो किळ कोकिळ बोले। सज्जन ते जन मस्तक डोले।
उत्तम देखत हें मन तोले। अंकुर ते जन बैसत बोले ॥ २ ॥
रेटित मेंटित खेटित पेंडा[२]। मस्तपणें चवताळत रेडा।
त्यापरि तो खळ दुर्जन तेडा। शब्द कठीण वदे नर वेडा ॥ ३ ॥
तो शुक कौतुक बोलत आहे। ऐकत मानव चकीत राहे।
उत्तम गूण कदापि न राहे। ते जन सज्जन शोधुनि पाहे ॥ ४ ॥
रागिट स्वान निरंतर कुंके। सज्जन हो जन हो परि भुंके।
लालचि लेश तयावरि थिंके[३]। लेटतें पुछे लडबड मुंके ॥ ५ ॥

## ( ३५ ) संगीत भजन

संगित रंग प्रसंग बळावे। गायन मान निरंतर फांवे[६]।
अंतरहेत सुखें चि सुखावे। पुष्पतरूवर जीवन धांवे ॥ १ ॥
धींकट धींकट बींकट ताळे। थोंगत थोंग मृदंग उफाळे।
बंद प्रबंद सुधारस ढाळे। गायन रंग प्रसंग सुकाळें ॥ २ ॥
तंत चण चण उचचणाणी। मंद्र झण झण संच झणाणी।
दंग मृदांग बीकट्ट दणाणी। संगित ताळ कलोळ खणाणी ॥ ३ ॥
भक्तजना येक नेमक तारी। उत्कट कीर्ति उदंड सरारी।
प्रेमळ नाम तुफान भरारी। रामउपासक रंग गरारी ॥ ४ ॥
भक्तजना भजना मुळ जालें। पावन भावन चित्त निवालें।
कीर्तन ध्यान विभागत आलें। दास म्हणे वय सार्थक जालें ॥५॥

१ वाईट मार्ग, कूटमार्ग. २ वेडावलेला. ३ फिदा होते. ४ हल्वीत. ५ लोळे.
६ विस्तार पावे.

## ( ३६ ) राम

परमसुंदर रूपशामळ । इंद्रनीळकीळ कांतिकोमळ ।
भयनिवारण भक्तवछळ । वरपराक्रम कीर्तिवीमळ ॥ १ ॥
भुवनकंटकदैत्यमारक । अमरमोचन दैन्यहारक ।
दुरितनाशन पुण्यकारक । हरितसंकट दासतारक ॥ २ ॥
विकटविषमताळछेदक । वरअनायरदैत्यभेदक ।
दशमुखांतक सीरछेदक । रुषिमुनीजनाचित्तवेधक ॥ ३ ॥
अमरभूषण उत्तमोत्तम । भुवनपाळक हा रघोत्तम ।
वीरवीरांतक हा वीरोत्तम । असुरअंतक हा वरोत्तम ॥ ४ ॥
बहुतपीडकदैत्यभंजन । रुषिमुनीजनयोगिरंजन ।
दुरितदानवदुष्टगंजन । अतुळकीर्तन वेस्तवेंजन ॥ ५ ॥

## ( ३७ ) शंकर

दुःखहर हर देव शंकर । शोकपरिहर शैल्यजावर ।
काळकूटधर तो पुरंधर । परमसुंदर चंद्रशेखर ॥ १ ॥
देवपरतर हा परात्पर । विभूतिधूशर तो फणीवर ।
दासहितकर तो दिगांबर । गांगजळधर तो जटाधर ॥ २ ॥
गुप्त चंचळ देव चळवळ । सर्व चंचळ तो चि केवळ ।
काळ पळ पळ होत सुफळ । अमळ वीमळ मृद कोमळ ॥ ३ ॥
अतळ वितळ तें तळातळ । सुतळ भूतळ तें रसातळ ।
गगनमंडळ इंदुमंडळ । पवनमंडळ मेघमंडळ ॥ ४ ॥
होत करकर चित्त विकर । जीव खरखर जेवि तो खर ।
फार तरतर नेणती हर । होय फरफर जातसे नर ॥ ५ ॥

## ( ३८ ) भेद

नसे सृष्टि हे दृष्टि तेथें असावी । सुखा वृष्टि हे पुष्टि तेथें नसावी ।
सदा पुष्ट संतुष्ट बोधें असावें । असंतुष्ट रे कुष्ट मधें नसावें ॥ १ ॥

तुरंगा खरा येक कैसें करावें । गजा सूकरां साम्य कैसें धरावें ।
बळें मार्जरां व्याघ्र कैसें करावें । फणी दांणिवे[1] येक कैसें गुणावें ॥२॥
सदा देखिजे कोकिळा काक लोकीं । बळें सेवितां दुग्ध की ताक सेकीं ।
जगीं पाहतां सारिखे हंस ढेके[2] । बळ्या दुथडी बैसलीं चक्रवाकें ॥३॥
जनामाजि तो चातकु आणि होला । सदा ऐकिजे सिंह आणीक कोल्हा
मयोरें बहू कोंबडी देखिजेती । चकोरें तथा तीतरें वर्ततातीं ॥ ४ ॥
बहू लागल्या खारिका आणि सिंदी । तथा वृक्ष दाळिंब आणीक मैंदी ।
पहा वृक्ष येरंड ते येक तोयें । स्वता आपुलें लेइजे आणि जाये ॥५॥

## ( ३९ ) प्रत्यय आणि अनुमान

मीन अमीन नमीन मनाला । मानत मान मना सुमनाला ।
सान समान मनें मन घाला । मोहन तो मननें चि निघाला ॥१॥
चाट चवाट मटाट चि बोले । बोलत बोलत तोलत तोले ।
गुंगमती घुमती वनहोले । मंदमतीस मतीवर बोले ॥ २ ॥
नीरज भारसमारसुमारे । झल्लरमारितसेवरवारे ।
तोलत जात सरोवर भारे । रंग सुरंग बहु सुखकारें ॥ ३ ॥
दर्दुर पामर तें वर बोले । भृंग विराग चि घेउनि गेले ।
कोकिळ बोलत चकीत जाले । उत्तम गुण गुणी च निवाले ॥४॥
प्रत्ययज्ञान नव्हे अनुमानें । चालेल पंथ कसा अडरानें ।
तोलति ढोक बहुत गुमानें । हंस जनीं कळती पयपानें ॥ ५ ॥

## ( ४० ) गर्व

बहु थोर मी शूर मी शाहणा मी । बहु दक्ष मी धूर्त मी जाणता मी ।
बहु नाटकु नेटकु चाळकु मी । बहुतांमध्यें मान्यसौजन्य तो मी॥१॥
बहु बोलणें नीट नेमस्त माझें । बहु चालणें सत्य नेमस्त माझें ।
बहुसाल संगीत कर्तुत्व माझें । बहुतांमधें गोड हें सर्व माझें ॥२॥
बहु चांगली वांगली नेटकी मी । बहु जाणती जाण च्यातुर्य ते मी ।

१ दानवा किंवा दानवें, गांडवळ, गांडमांडूळ. २ ढेंका=करकोच पक्षी.

## ( ३६ ) राम

परमसुंदर रूपशामळ । इंद्रनीळकीळ कांतिकोमळ ।
भयनिवारण भक्तवछळ । वरपराक्रम कीर्तिवीमळ ॥ १ ॥
भुवनकंटकदैत्यमारक । अमरमोचन दैन्यहारक ।
दुरितनाशन पुण्यकारक । हरितसंकट दासतारक ॥ २ ॥
विकटविषमताळछेदक । वरअनावरदैत्यभेदक ।
दशमुखांतक सीरछेदक । रुषिमुनीजनचित्तवेधक ॥ ३ ॥
अमरभूषण उत्तमोत्तम । भुवनपाळक हा रघोत्तम ।
वीरवीरांतक हा वीरोत्तम । असुरअंतक हा वरोत्तम ॥ ४ ॥
बहुतपीडकदैत्यभंजन । रुषिमुनीजनयोगिरंजन ।
दुरितदानवदुष्टगंजन । अतुळकीर्तन वेस्तवेंजन ॥ ५ ॥

## ( ३७ ) शंकर

दुःखहर हर देव शंकर । शोकपरिहर शैल्यजावर ।
काळकूटधर तो पुरंधर । परमसुंदर चंद्रशेखर ॥ १ ॥
देवपरतर हा परात्पर । विभूतिधूशर तो फणीवर ।
दासहितकर तो दिगांबर । गांगजळधर तो जटाधर ॥ २ ॥
गुप्त चंचळ देव चळवळ । सर्व चंचळ तो चि केवळ ।
काळ पळ पळ होत सुफळ । अमळ वीमळ मृद कोमळ ॥ ३ ॥
अतळ वितळ तें तळातळ । सुतळ भूतळ तें रसातळ ।
गगनमंडळ इंदुमंडळ । पवनमंडळ मेघमंडळ ॥ ४ ॥
होत करकर चित्त विकर । जीव खरखर जेवि तो खर ।
फार तरतर नेणती हर । होय फरफर जातसे नर ॥ ५ ॥

## ( ३८ ) भेद

नसे सृष्टि हे दृष्टि तेथें असावी । सुखा वृष्टि हे पुष्टि तेथें नसावी ।
सदा पुष्ट संतुष्ट बोधें असावें । असंतुष्ट रे कुष्ट मधें नसावें ॥ १ ॥

तुरंगा खरा येक कैसें करावें । गजा सूकरां साम्य कैसें धरावें ।
बळें मार्जरां व्याघ्र कैसें करावें । फणी दोणिवे[1] येक कैसें गुणावें ॥२॥
सदा देखिजे कोकिळा काक लोकीं । बळें सेवितां दुग्ध की ताक सेकीं ।
जगीं पाहतां सारिखे हंस ढेके[2] । बळ्या दुथडी बैसलीं चक्रवाकें ॥३॥
जनामाजि तो चातकु आणि होला । सदा ऐकिजे सिंह आणीक कोल्हा
मयोरें बहू कोंबडी देखिजेती । चकोरें तथा तीतरें वर्तताती ॥ ४ ॥
बहू लागल्या खारिका आणि सिंदी । तथा वृक्ष दाळिंब आणीक मेंदी ।
पहा वृक्ष येरंड ते येक तोयें । स्वता आपुलें लेइजे आणि जाये ॥५॥

## ( ३९ ) प्रत्यय आणि अनुमान

मीन अमीन नमीन मनाला । मानत मान मना सुमनाला ।
सान समान मनें मन घाला । मोहन तो मननें चि निघाला ॥१॥
चाट चवाट मटाट चि बोले । बोलत बोलत तोलत तोले ।
गुंगमती घुमती वनहोले । मंदमतीस मतीवर बोले ॥ २ ॥
नीरज भारसमारसुमारे । झल्लरमारितसेवरवारे ।
तोलत जात सरोवर भारे । रंग सुरंग बहु सुखकारें ॥ ३ ॥
दर्दुर पामर तें वर बोले । भृंग विराग चि घेउनि गेले ।
कोकिळ बोलत चकीत जाले । उत्तम गुण गुणी च निवाले ॥४॥
प्रत्ययज्ञान नव्हे अनुमानें । चालेल पंथ कसा अडरानें ।
तोलति ढोक बहुत गुमानें । हंस जनीं कळती पयपानें ॥ ५ ॥

## ( ४० ) गर्व

बहु थोर मी शूर मी शाहणा मी । बहु दक्ष मी धूर्त मी जाणता मी ।
बहु नाटकु नेटकु चाळकु मी । बहुतांमध्यें मान्यसौजन्य तो मी॥१॥
बहु बोलणें नीट नेमस्त माझें । बहु चालणें सत्य नेमस्त माझें ।
बहुसाल संगीत कर्तुत्व माझें । बहुतांमधें गोड हें सर्व माझें ॥२॥
बहु चांगली वांगली नेटकी मी । बहु जाणती जाण च्यातुर्य ते मी ।

[1] दानवा किंवा दानवें, गांडवळ, गांडमांडूळ. [2] ढेंका=करकोच पक्षी.

बहु बोलकी चालकी सुग्रिणी मी । बहु भाग्य सौभाग्य लावण्य ते मी॥
बहुसाल हें गोजिरें मूल माझें । बहु सासुरें थोर माहेर माझें ।
बहुतांमधें उंच तें कूळ माझें । बहु गोत माझें बरें सर्व माझें ॥४॥
मी माझें मी माझें चि हें सौख्य वाटे । विटे गर्व काळांतरीं सौख्य आटे।
म्हणे दास विश्वास हा कासयाचा । जनीं सार तें काय ऐसें विवंचा ॥५

## ( ४१ ) देव कर्ता

उर्मी उर्मी सर्वदा ते चि उर्मी । घुर्मी घुर्मी दाटली सर्व घुर्मी ।
पुर्मी पुर्मी निश्चयो हा चि पुर्मी । सुर्मी सुर्मी तो ह्मणे मी च सुर्मी॥१॥
कर्ता कर्ता वोळखा देव कर्ता । गर्ता गर्ता चूकवा जन्मगर्ता ।
तर्ता तर्ता वेगळा पंथ तर्ता । पर्ता पर्ता साधनेंसीं प्रवर्ता ॥ २ ॥
कर्मी कर्मी कोण सोडील कर्मी । धर्मी धर्मी वासना नास्ति धर्मी ।
चर्मी चर्मी सर्वदा वास चर्मी । वर्मी वर्मी चूकले लोक वर्मी ॥३॥
दक्षा दक्षा वोळखा दक्षदक्षा । पक्षा पक्षा रक्षणें पूर्वपक्षा ।
लक्षा लक्षा लक्षणें लक्षलक्षा । रक्षा रक्षा साक्षि ती भक्ति रक्षा ॥ ४ ॥
भीक्षा भीक्षा मागणें सर्व भीक्षा । दक्षा दक्षा दक्ष दाक्षण्य दक्षा ।
चीक्षा चीक्षा भक्तिमार्गें चि चीक्षा । सीक्षा सीक्षा रोकडी साक्ष सीक्षा।

## ( ४२ ) रणमंडळ

कटक कटकटें कट काटी । काटित लाटित लाटित लाटी ।
लाटित तो परभार लटाटी । आटित दाटित दाटित आटी ॥१॥
येकसरें घसरे मधुकोपी । संगीन मान चरचर कापी ।
परवीरभार बहुत चि दापी । रिपु चकीत सुर बहु प्रतापी ॥ २ ॥
मारित गर्द उदंड चि जाला । आणि रणासि वीरेंवीर आला ।
थोर रिपुदळभार निघाला । कीर्तिप्रताप उदंड चि जाला ॥ ३ ॥
घोर कठोर भुमंडळ धाके । रोष मनीं घन घोष तडाखे ।
कोण दुजा रणमंडळ राखे । काळचपेट लपेटुनि धाके ॥ ४ ॥
बळें बळ ते चि खळबळ जाली । युध्यरणा तुळणा चि उडाली ।
बंदविमोचन तो मन घाली । उत्कट कीर्ति समूळ निघाली ॥५॥

## ( ४३ ) कविप्रबंद

हरीकथेसि चउडतं[1] जावें । सज्जनसंगति जुडत जावें ।
निरूपणीं मग बुडत जावें । चटकचेटककुड तजावें ॥ १ ॥
परसुखावरि रीझत जा रे । षडरिपूवरि खीजत जा रे ।
हरिगुणावरि रीझत जा रे । विवरणें मग भीजत जा रे ॥ २ ॥
सीणतसा परि लाज तजाना । अहंमतीवरि वाजत जाना ।
हरिजनीं मग गाजत जाना । हरिरसें करीं माजत जाना ॥ ३ ॥
विवरणें श्रम हारित जा हो । निरूपणें श्रम सारित जा हो ।
षडरिपूवरि मारित जा हो । बहु जना मग तारित जा हो ॥ ४ ॥
कड(क)तोकडकें घन गाजे । बहुत वाद्यकळा घन गाजे ।
कविप्रबंद जनीं घन गाजे । वरि प्रताप घनी घन गाजे ॥ ५ ॥

## ( ४४ ) हरिभजन

वचन कंकर[2] तें उतराया । तरत तें तरणें उतराया ।
गिरिवरु चरणें उतराया । श्रत वीवरणें उतराया ॥ १ ॥
कठिणता पाहातां रत नाहीं । म्हणउनी मन हेंरत नाहीं ।
निरखितां नर सुरतनांहीं । परि हरीसम सुरत नाहीं ॥ २ ॥
वर प्रकाश बरा तरणी[3]चा । गिरिवरु बहु उतरणीचा ।
उगम सुगम वैतरणी[4]चा । फणिसुतें मृत्य हा तरणीचा ॥ ३ ॥
हरि म्हणे[5] विकिला भजनाचा । चुकतसे बहु लाभ जनाचा ।
बुडवितोभ्रमलोभजनाचा । जनरिपुजनक्षोभजनाचा ॥ ४ ॥
हरिजना हरि हा सरसावा । हरिजना भजना सरसावा ।
जिवनिच्या जिवनी सरसावा । हुडकितां न दिसे सरसावा ॥ ५ ॥

## ( ४५ ) हरिरस

हरिरसें सरसें चितरावा । हृदयभिंति बरी चितरावा ।
तनु मनु हरिच्या चितरावा । भवसमुद्र बळेंचि तरावा ॥ १ ॥

१ चवड्यावर चालत. २ कुत्सित. ३ सूर्याचा. ४ यमलोकच्या नदीचा. ५ मन्ये.

झळकती नभिंचे वर तारे । विवरतां कळती वरतारे ।
सिकविल्या सरिसें वरता रे । ध्रुव दिसे सकळां वरता रे ॥ २ ॥
बहु जना जनना हितवारी । बहु जना भजना हितवारी ।
बहु मता ममता हितवारी । बहु श्रमा श्रम हा हितवारी ॥ ३ ॥
रुणझुणी सकळां वर पांवां । सुमन तोवर तो वर पावा ।
भगवतीभजनें वर पावा । सुरस गोरस ही वरपावा ॥ ४ ॥
दपटती जन हे वरमानें । चतुर तो समजे वरमानें ।
इतर तें सहजें वरमानें । प्रगटलेहिणजीवरमानें ॥ ५ ॥

## ( ४६ ) परिसाचा गुण

उठविलीं कितेकें गजरानें[१] । वसविलीं नगरें गजरानें ।
समजती गणिती गजरानें[३] । घडविती जन मर्गजरानें ॥ १ ॥
सकृत सुकृत तें फळ मोठें । उदरिचें कुमरु फळ मोठें ।
तरुवरी मूॅंत तें फळ मोठें । कणिकिचें सिजलें फळ मोठें ॥ २ ॥
विहिरिला धरितो नर मोटा । वाहतसे कण तो नर मोटा ।
कितेक तो शरिरें नर मोटा । सकळिकां निववी नर मोटा ॥ ३ ॥
टणकल्या वरि तो रगडीतो । भुक बहु कण तो रगडीतो ।
वनचरु पशुला रगडीतो । रणभुमी झगडा रगडीतो ॥ ४ ॥
वचन हें जन हो परिसा रे । पीतलोहो गुण हा परिसा रे ।
धन बहुत चि रे परिसारे । न पिकती पिकती परिसारे ॥ ५ ॥

## ( ४७ ) पुष्पयाती

त्या वळी आंवळी रावळी जांवळी । नागवली पोफळी कर्दळी त्यावळी ।
सुंदरा मोंदरा इंदरा हो वरा । वल्लरी झल्लरीच्या परी विस्तरा ॥
केतकी त्या जुती मालती सेवंती । मांडवी वोलल्या डोलती तोलती ।
माजल्या गाजल्या फुलल्या त्या भल्या ।
पुष्पयाती कीतीयेक पाल्हाळल्या ॥ २ ॥

१ हत्तीचीं रानें. २ द्राही फिरवून. ३ तासानें, घंटेनें. ४ पिकलेलें. ५ फुलल्या.

तिंबनें सुंबनें सुमनें ही घनें । आननें माननें त्या जनें सज्जनें ।
रंजलें गंजलें ही भलें भुललें । पातले जीव ते रातले मातले ॥ ३ ॥
गुल्गुला बुल्बुला गल्बला माजला । रोळला घोळला वोळला मेहुला ।
हालती चालती तोलती डोलती । भृंगसे रंगले श्रृंगसेवेगती ॥ ४ ॥
कोकिळा त्या किळावीकळाहोकळा।मोकळा मोकळा तो कळा हृदकळा
ईतरें हीवरें सुस्वरें सुंदरें । अंगरें नागर नागरें पाखिरें ॥ ५ ॥

## ( ४८ ) गोपाळकाला

चला चला रे हरि तो निघाला । मोचे बळें रे चढऊनि घाला ।
कौसावरी हा घालील घाला । त्या संगतीनें पळणी अघाला ॥१॥
गोपाळ म्हणती घालूं हमामा । दोहूं चला रे गाई धमामा ।
वळती करारे सांगात मामा । तोषें तनूचा करिती दमामा ॥ २ ॥
धांवोनि तोंडी कपी तो कटाणे । खाऊनि पाहे समजे फुटाणे ।
बोले चि नेले अवघे वटाणे । बदरीफळांचे घेतो गटाणे ॥ ३ ॥
पाहा बरेंसेंअरथीं तुटे रे । तुटोंनि सिंकें मडकें फुटे रे ।
कितेक प्राणी बहु सानटे रे । धांवोनि जातां मग आपटे रे ॥४॥
अपूर्व जालें नव्हतां निमीशा । जळोन गेल्या अवघ्या च मीशा ।
उरलीं खरांटें जैश्या समीशा । विद्दप जाला वदनीं अमीशा ॥५॥

## ( ४९ ) ग्रंथिचा अर्थ काढा

वडिलासि सांगे माळी उभा जी । घरांत व्हावी बहुसाल भाजी ।
उदंड दारीं बसली सभा जी । माध्यान जालें पाहाणें नभा जी ॥१॥
वंदूनि आधीं वर मोरया रे । तो भक्तिभावें करितो दया रे ।
तेणें गुणें उतरतो रया रे । होतें बहु सार्थकता वया रे ॥ २ ॥
हंसासनी सुंदर ते विराजे । ध्याती जयेला बहुसाल राजे ।
अर्थांतरीं ते मधुरा गिरा जे । अघटीत माया चिदंबरा जे ॥ ३ ॥
निसीमध्यभागीं जाणें उतारा । दिसती जळीं त्या बहुसाल तारा ।
दुधगा धरी तो आत्यं(त)तारा । नौका कराया हटका सुतारा ॥ ४ ॥

१ पापाला.

झळकती नभिंचे वर तारे । विवरतां कळती वरतारे ।
सिकविल्या सरिसें वरता रे । ध्रुव दिसे सकळां वरता रे ॥ २ ॥
बहु जना जनना हितवारी । बहु जना भजना हितवारी ।
बहु मता ममता हितवारी । बहु श्रमा श्रम हा हितवारी ॥ ३ ॥
रुणझुणी सकळां वर पावां । सुमन तोवर तो वर पावा ।
भगवतीभजनें वर पावा । सुरस गोरस ही वरपावा ॥ ४ ॥
दपटती जन हे वरमानें । चतुर तो समजे वरमानें ।
इतर तें सहजें वरमानें । प्रगटलेहिणजीवरमानें ॥ ५ ॥

## ( ४६ ) परिसाचा गुण

उठविलीं कितेकें गजेरानें[1] । वसविलीं नगरें गजेरानें[2] ।
समजती गणिती गजेरानें[3] । घडविती जन मर्गजरानें ॥ १ ॥
सकृत सुकृत तें फळ मोठें । उदरिचें कुमरु फळ मोठें ।
तरुवरी मृत[4] तें फळ मोठें । कणिकिचें सिजलें फळ मोठें ॥ २ ॥
विहिरिला धरितो नर मोटा । वाहतसे कण तो नर मोटा ।
कितेक तो शरिरें नर मोटा । सकळिकां निववी नर मोटा ॥ ३ ॥
टणकल्या वरि तो रगडीतो । भुक बहु कण तो रगडीतो ।
वनचरु पशुला रगडीतो । रणभुमी झगडा रगडीतो ॥ ४ ॥
वचन हें जन हो परिसा रे । पीतलोहो गुण हा परिसा रे ।
धन बहुत चि रे परिसारे । न पिकती पिकती परिसारे ॥ ५ ॥

## ( ४७ ) पुष्पयाती

त्या वळी आंवळी रावळी जांबळी । बाफळी पोफळी कर्दळी च्यावळी ।
सुंदरा मंदिरा इंदिरा ही वरा । वल्लरी झल्लरीच्या परी विस्तरा ॥
केतकी त्या जुती मालती सेवंती । मांडवी वोलल्या डोलती तोलती ।
माजल्या गाजल्या फुलेल्या[5] त्या भल्या ।
पुष्पयाती कीतीयेक पाल्हाळल्या ॥ २ ॥

---

१ हत्तीचीं रानें. २ द्वाही फिरवून. ३ तासानें, घंटेनें. ४ पिकलेलें. ५ फुलल्या.

तिंबनें सुंबनें सुमनें ही घनें । आननें माननें त्या जनें सज्जनें ।
रंजलें गंजलें ही भलें भुललें । पातले जीव ते रातले मातले ॥ ३ ॥
गुल्गुला बुल्बुला गल्बला माजला । रोळला घोळला वोळला मेहुला ।
हालती चालती तोलती डोलती । भृंगसे रंगले श्रृंगसेवेगती ॥ ४ ॥
कोकिळा त्या किळावीकळाहोकळा।मोकळा मोकळा तो कळा हृद्कळा
ईतरें हीवरें सुस्वरें सुंदरें । अंगरें नागर नागरें पाखिरें ॥ ५ ॥

## ( ४८ ) गोपाळकाला

चला चला रे हरि तो निघाला । मोचे बळें रे चढऊनि घाला ।
कौसावरी हा घालील घाला । त्या संगतीनें पळणी[1] अघाला ॥१॥
गोपाळ म्हणती घालूं हमामा । दोहूं चला रे गाई धमामा ।
वळती करारे सांगात मामा । तोषें तनूचा करिती दमामा ॥ २ ॥
धांवोनि तोंडी कपी तो कटाणे । खाऊनि पाहे समजे फुटाणे ।
बोले चि नेले अवघे वटाणे । बदरीफळांचे घेतो गटाणे ॥ ३ ॥
पाहा बरेंसेंअरर्थी तुटे रे । तुटोंनि सिंकें मडकें फुटे रे ।
कितेक प्राणी बहु सानटे रे । धांवोनि जातां मग आपटे रे ॥४॥
अपूर्व जालें न्हवतां निमीशा । जळोन गेल्या अवघ्या च मीशा ।
उरलीं खरांटें जैश्या समीशा । विद्दप जाला वदनी अमीशा ॥५॥

## ( ४९ ) ग्रंथिचा अर्थ काढा

वडिलासि सांगे माळी उभा जी । घरांत व्हावी बहुसाल भाजी ।
उदंड दारीं बसली सभा जी । माध्यान जालें पाहाणें नभा जी ॥१॥
वंदूनि आर्धी वर मोरया रे । तो भक्तिभावें करितो दया रे ।
तेणें गुणें उतरतो रया रे । होतें बहु सार्थकता वया रे ॥ २ ॥
हंसासनी सुंदर ते विराजे । ख्याती जयेला बहुसाल राजे ।
अर्थांतरीं ते मधुरा गिरा जे । अघटीत माया चिदंबरा जे ॥ ३ ॥
निसीमध्यभागीं जाणें उतारा । दिसती जळीं त्या बहुसाल तारा ।
दुधगा धरी तो आत्यं(त)तारा । नौका कराया हटका सुतारा ॥ ४ ॥

---

१ पापाला.

बरा प्रत्ययें ग्रंथिचा अर्थ काढा । प्रसंगीं तुम्हीं ग्रंथिचा अर्थ काढा ।
करी मोकळा ग्रंथिचा अर्थ काढा । पदें तीन ये ग्रंथिचा अर्थ काढा ॥५

येवं श्लोकसंख्या दोनीसें पंचेताळीस ॥ २४५ ॥

# दशकें

## ( ५० ) देवधर्म

विलसती गगनांत कमाना । सरळ माइक नेमक माना ।
उपजवी मनसीलकमाना । विवरतां झट लोकिक माना ॥ १ ॥
सकळिकांवर उत्तम जाती । परम सुंदर सुमन जाती ।
मधुकरें रिझती मगजाती । अमल जेवि सुधावरजाती ॥ २ ॥
फडकती तडकें चि आढाला । जरकसी तगटी गजढाला ।
खड्गमंडित लखाखित ढाला । कीर्ति सुंदर त्या वरढाला ॥ ३ ॥
सिरजितो सकळांवर गाजी । त्यासि सत्वर तुम्ही उमगा जी ।
नुमगितां सकळा सिमगा जी । अंतकाळ घडतां चि दगा जी ॥४॥
विषय स्वार्थ करूं मन लागे । भजनभाव कदापि न लागे ।
वासने तुटतजातसलागे । देवधर्म घडवी मजला गे ॥ ५ ॥
विवरणें धरणें सुगमाला । प्रगट जाउं चला उगमाला ।
दुरि करा परतें चि गमाला । साक्ष सत्वर करा निगमाला ॥ ६ ॥
सजनसंगति जाउं चला रे । विवरतां वरते उचला रे ।
काळदंत अवघे कुचला रे । हा विवेक बरवा सुचला रे ॥ ७ ॥
मुख्य देव न कळे चुकतां रे । झकवितां बहुतीं झकतां रे ।
प्रत्ययेंविण सदा बकतां रे । चालवी बहुत काळ कंतारे[1] ॥ ८ ॥
आलख तो सकळांहुनि वर्ता । श्रवणसाधनि बरें चि प्रवर्ता ।
वदत जाल तसे जरि वर्ता । तजुनि जाल बळें चि विवर्ता ॥ ९ ॥
प्रगटला विपरीत जमाना । बुडविती कितियेक जमाना ।
सकळ ही म्हणती मज माना । न घडतील भल्यांत जमाना॥१०॥

१ श्रीरामदासी भाग ३ रा, स्फुट श्लोक ५७-२ व ५८-५९, ६१ पहा.

## ( ५१ ) जन्मसफलता

निरुपणीं बरवें मन घाला । विवरतां अभिमान निघाला ।
षडरिपूवरता वर घाला । उरि पहा न दिसे चि अघाला ॥ १ ॥
भव भवीं सगळा बुडवावा । आळस तो अवघा दडवावा ।
निरुपणें भ्रम तो बडवावा । मन मनें मननें चढवावा ॥ २ ॥
अगणिता गणितां गणवेना । गणिनसें सहसा म्हणवेना ।
अवघडी सिणतां सिणवेना । वरकसा जिणितां जिणवेना ॥ ३ ॥
अनुभव पाहातां खलकाचा । जन जनीं दिसतो बहु काचा ।
मानितो निळनिळा जनकाचा । ग्रावगोळ ह्मणती कनकाचा ॥४॥
कविप्रबंद बरे तरि वाचा । विगळितें गळितें चि न वाचा ।
सिणविता उगली वर वाचा । वदतसें महिमा गुरुवाचा ॥ ५ ॥
अत्यंत खोट्या हिण पातरा रे । तेणें प्रपंची वर कातरा रे ।
संसार थोडा बुझ चातुरा रे । बहु दुखकारी भव हा तरा रे ॥ ६ ॥
संसार हा दुल्लभ लाभला रे । विवेकयोगें बहु शोभला रे ।
नेणे तयां ईश्वर क्षोभला रे । भक्तीभरें जाइल तो भला रे ॥ ७ ॥
जनीं जनाला बहु सांगताती । कांहीं तरीं वीषय मागताती ।
आशेच मागें जन लागताती । देह्यांतकाळीं मग भागताती ॥ ८ ॥
प्रपंचरंगें बहु रंगलों रे । कठीण काळें मन भंगलों रे ।
गळीतसें वीकळ लंघलों रे । वृधाप्यकाळीं वरि[1] खंगलों रे ॥ ९ ॥
निघोनि जावें कठिणा वनाला । अखंड गावें मग पावनाला ।
रुणी करावें जगजीवनाला । प्रीती धरावी पदसेवनाला ॥ १० ॥

## ( ५२ ) उमज

जगलिना म्हणऊनि जगाया । नरहरी सुख देत जगा या ।
वरद दे मजला तुज गाया । भ्रम तजी ममता नजगाया ॥ १ ॥
भजन हें अवघें चि जगाया । हरिजनीं भजनीं निजगाया ।

1. "बहु" वर हरताळ लावून "वरि" केलें.

कुमतिनें सहसा न जगाया । सुमतिनें बहुसाल जगाया ॥ २ ॥
भजभरें भव हा उतराया । समजतां सकळैक तराया ।
समजतां मुळ हे नुतराया । सकळ ही वदतां उतराया ॥ ३ ॥
समजतां सकळैक तरावें । उमजतां सकळै उतरावें ।
नुमजतां सहसा नुतरावें । न भजतां म्हणती कुतरावें ॥ ४ ॥
श्रम नको सहसा गचकाया । भय नको सहसा बिचकाया ।
गुढ[1] नको सहसा दचकाया । तम नको सहसा वचकाया ॥ ५ ॥
जन मनीं धरितो[2] उपसारा[3] । परि कदापि नव्हे[4] उपसारा ।
स्नेह नसे म्हणती दिप सारा । घसरतो सरतो चि पसारा ॥ ६ ॥
न भरितां भरितां भरताहे । न धरितां धरितां धरताहे ।
न वरितां वरितां वरिताहे । उदित काळ तरी सरताहे ॥ ७ ॥
न करितां करितां करवेना । न भरितां भरितां भरवेना ।
न धरितां धरितां धरवेना । कठिण काळ तरी तरवेना ॥ ८ ॥
उमजतां सकळै उमजावें । समजतां सकळै समजावें ।
उमजल्यावरि कां नुमजावे । समजलें तरि हें तम जावें ॥ ९ ॥
करितसे करतां करितो रे । धरितसे धरितां धरितो रे ।
हरितसे हरितां हरितो रे । भरितसे भरितां भरितो रे ॥ १० ॥

## ( ५३ ) बाहेगांवचा मारुती

बळें सर्व संव्हारिलें रावणाला । दिल्हें आक्षई राज्य बिभीषणाला ।
रघुनायकें देव ते मुक्त केले । अयोध्यापुरी जावयालागि आले ॥१॥
पथीमाजि कृष्णातिरीं रामराया । घडे राहणें स्नानसंध्या कराया ।
सिता राहिली सीरटें गांव जेथें । रघुराज ते पश्चिमेचेनि पंथें ॥२॥
जप ध्यान पूजा करी रामराजा । तयाचे परी वीर सोमीत्र वोजा ।

१ प्रथम " पुठ " शब्द होता, तो खोडून समासांत " गुढ " शब्द लिहिला आहे. २ प्रथम " धीर तो " होतें, त्याचें " धरितो " केलें आहे. ३ प्रथम " बहु " होतें, त्याला हरताळ लावून वर " उप " लिहिलें आहे. ४ " नय " चें " नव्हे " केलें आहे.

स्मरेना देहे चित्त ध्यानस्त जालें। अकस्मात तें तोय अद्भूत आलें॥३
बळें चालिला वोघ नेटें भडाडां। नभीं धांवती लोट लाटा धडाडां।
नदी चालिली राम ध्यानस्त जेथें। बळें[1] विक्रमें पावला भीम तेथें॥४
उभा राहिला भीमरूपी स्वभावें। बळें तुंब तो तुंबिला दोनि गावें।
नदी येक वीभागिली दोनि बाहें। म्हणोनि तया नांव रे गांव बाहें[2]॥५
सुखें लोटती देखतां रामलिंगा। बळें चालिली भोंवती कृष्णगंगा।
परी पाहतां भीम येथें दिसेना। उदासीन हें चित्त कोठें वसेना॥६॥
हनुमंत पाहावयालागि आलों। दिसेना सखा थोर विस्मीत जालों।
तयावीण देवाळयें तीं उदासें। जळांतूनि बो[3]भाइला दास[4] दासें॥७॥
मनांतील जाणोनि केला कुढावा।दिल्हे भेटिचा जाहला थोर यावा।
बळें हाक देतां चि तैसा गडाडी। माहां मेघ गंभीर जैसा घडाडी॥८॥
रघुराज वैकुंठधामासि गेले। तधीं मारुती दास हे नीरविले।
रघुनाथउपासकांला प्रसंगें। सख्या मारुती पाव रे लागवेगें॥९॥
प्रभूचें माहांवाक्य तां साचं[6] केलें। म्हणे दास हें प्रत्यया सद्य आलें।
जनामाजि हें सांगतां पुरवेना। आवस्ता मनीं लागली ते सरेना १०

## ( ५४ ) मुलांना शिकवण

बरें सत्य बोला यथातथ्य चाला। बहु मानिती लोक तेणें तुम्हाला।
धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो। बरा गुण तो अंतरामाजि राहो॥१
बरें दांत घांसोनियां तोंड धोंवें। कळाहीण कां शूद्रमुखी नसावें।
सदा सर्वदा प्रेत्न सांडूं नको रे। बहुसाल हा खेळ कामा नये रे॥२॥
दिसामाजि कांहीं तरीं तें ल्याहावें। प्रसंगें अखंडीत वाचीत जावें।
वयें श्रेष्ठ रे दास्य त्याचें करावें। बरें बोलणें सत्य जीवीं धरावें॥३॥
बहु खेळ खोटा सदालस्य खोटा।समास्तांसि भांडेल जो तो चि खोटा

---

१ "बळी" मढेंपाठ. २ बाहे गांव सातारा जिल्ह्यांत सुप्रसिद्ध आहे. स्थान रम्य आहे. ३ मोठ्यानें हांका मारून बोलाविला. ४ मारुती. ५ श्रीसमर्थांनीं. ६ "सत्य" होतें, हरताळ लावून "साच" केलें आहे. "सत्य" असा च मढेंपाठ असून "तां" ऐवजीं "तें" असा पाठ आहे.

बहुतां जणालागि जीवें झिजावें। भले सांगती न्याय तेथें भिजावें ४
हिसेबीं सदा न्याय सांडूं नका रे। कदांचीत अन्याय होतां धका रे।
जनीं सांडितां न्याय रे दुःख[1] होतें। माहां सुख तें ही अकस्मात जातें।
प्रचीतीविणें बोलणें वेर्थ वांयां। विवेकेंविणें सर्व ही दंभ जायां।
बहु सज्जला नेटका साज केला। विचारेंविणें सर्व ही वेर्थ गेला ॥६॥
वरी चांगलें अंतरीं गोड नाहीं। तया मानवाचें जिणें वेर्थ पांहीं।
वरी चांगलें अंतरीं गोड आहे। तयालागि कोण्ही तरी शोधिताहे॥७
सदा अंतरीं गोड तें सांडवेना। कदा अंतरीं वोखटें तें खपेना।
म्हणोनी बरा गुण आधीं धरावा। माहां घोर संसार हा नीरसावा[2]॥८
भला रे भला बोलती तें करावें। बहुतां जनांच्या मुखें येश घ्यावें।
पुढें सेवटीं सर्व सांडूनि जावें। मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ९ ॥
बरा वोखटा सर्व संसार जाला। अकस्मात येईल रे येमघाला।
म्हणोनि भले सांगती सत्य चाला।जनीं दास तो सीकवीतो मुलांला

## ( ५५ ) आत्मनिवेदन भक्ति

अटवे[3] वनीं भूवनीं राम आहे। जनीं वीजनीं राम सर्वत्र पाहे।
दिशा दाटल्या राम संपूर्ण जाला।विवेकें चि तो दास रामीं मिळाला
सदा सर्वदा सेवकेंवीण स्वामी। भले जाणती भक्ति हे मुख्य नौमी
स्वरूपीं भरावें बरें वीवरावें। विवेकें नुरावें जना उधरावें ॥ २ ॥
दिसे सर्व माया नसे सत्य कांहीं। विवेकें तुला तूं चि शोधूनि पाहीं।
किती पाहसी तूजला ठाव नाहीं। देहेभावना सर्व सांडून राहीं ॥३॥
जनीं सांडणें मांडणें या मनाचें। मनीं मूळ शोधी बरें उन्मनाचें।
परी शोधितां कल्पनारूप होसी। स्वयें संत आनंत सांडूनि जासी४
अरे[4] तूजपासीं तुझें तूं नसावें। मनांतील मी सर्व कांहीं पुसावें।
निराकार तूं मानि रे सत्य भावें। जनीं सर्व ही होत जातें स्वभावें५
स्वभावें चि होतें स्वभावें चि जातें। वृथा सीणसी आवरेना तुला[5] तें।

१ "दुख" म. पा. २ "निस्तरावा" म. पा. ३ अटवि=अरण्य. ४ "असे" म. पा. ५ "तुला" म. पा.

भले सांगती तुजला गूज कांहीं । तयामाजि तों पाहतां हेत नाहीं॥६॥
पहावें कसें पावनें पावनाला । उठे हेतुची भावना भावनेला ।
न बोलोनि बोलों किती काये आतां । अनुर्वाच्य तें सत्य निःसंग होतां
अखंडीत खंडीत कैसें करावें । लोहो[1] हेमं[2] जालें[3] कसें पालटावें ।
नदीचा मुळीं वोघ वोघीं मिळाला । उपायें करावा कसा वेगळाला॥८॥
तसा[4] साधकु लागतां संतसंगें । स्वयें संत आनंत जो तो चि आंगें ।
परब्रह्मबोधें परब्रह्म जाला । म्हणे कोण रे देहधारी तयाला ॥ ९ ॥
देहधारकाला देहे भासताहे । जसी कल्पना ब्रह्म कल्पूनि पाहे ।
परब्रह्म तें नाकळे कल्पनेसी । तसे संत आनंत हे रामदासी ॥ १० ॥

## ( ५६ ) उदासीन हा काळ कोठें न कंठे ।

### अथवा

### श्रीसमर्थांच्या जीवींचें आर्त

समाधान साधुजनाचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें ।
घडीनें घडी सीण अत्यंत वाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥१॥
घरें सुंदरें सौख्य नाना परीचें । परी कोण जाणेल तें अंतरीचें ।
मनीं आठवीतां चि तो कंठ दाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे॥२॥
बळें लावितां चित्त कोठें जडेना । समाधान तें कांहिं केल्यां घडेना ।
नव्हे धीर नैनीं सदा नीर लोटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे॥३॥
आवस्था मनीं लागली काय सांगों । गुणीं गुंतला हेत कोण्हासि मागों
बहुसाल भेटावया प्राण फूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे॥४॥
कृपाळूपणें भेट रे रामराया । वियोगें तुझ्या सर्व[5] व्याकूळ काया ।
जनामाजि लोकीक हा ही न सूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे॥५॥
आहा रे विधी तां असें काय केलें । पराधेनता पाप माझें उदेलें ।
बहुतांमधें चूकतां तूक[6] तूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥६॥

---

१ लोखंड. २ सोनें. ३ " होतां " म. पा. ४ " जनीं " म. पा ५ " राहे " म. पा. ६ तुक=वजन, महत्त्व

समर्था मनीं सांडि माझी नसावी। सदा सर्वदा भक्तचिंता असावी।
घडेना तुझा योग हा प्राप्त खोटें। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥७॥
अखंडीत हे सांग सेवा घडावी। न होतां तुझी भेटि काया पडावी।
दिसेंदीस आयुष्य हें वेर्थ आटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥८॥
भजों काय सर्वा परी हीण देवा। करूं काय रे सर्व माझा चि ठेवा।
म्हणों काय मी कर्मरेखा न लोटे। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥
म्हणे दास मी वास पाहें दयाळा। रघुनायेका भक्तपाळा भुपाळा।
पहावें तुला हें जिवीं आर्त मोठें। उदासीन हा काळ कोठें न कंठे॥१०

( ५७ ) तुजवीण रामा मज कंठवेना।

तुझिया वियोगें जीवित्व आलें। शरीरयोगें बहु दुःख जालें।
अज्ञान दारीद्र माझें सरेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ १ ॥
परतंत्र जीणें कंठूं किती रे। उचाट माझे मनीं वाटतो रे।
ललाटरेखा जंपीं पालटेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ २ ॥
जडली उपाधी अभिमान साधी। विवेक नाहीं बहुसाल बाधी।
स्वामीवियोगें पळ ही गमेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥३॥
विश्रांति देहीं अनुमात्र नाहीं। कुळाभिमानें पडिलों प्रवाहीं।
स्वहीत माझें होतां दिसेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ४ ॥
विषई जनानें मज लाजविलें। प्रपंचसंगें आयुष्य गेलें।
समई बहु क्रोध शांती घडेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ५ ॥
सदृढ जाली देहबुधि देहीं। वैराग्य कांहीं होणार नाहीं।
अपूर्ण कामीं मन हें विटेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ६ ॥
निरूपणीं हे सद्वृत्ति होते। स्छळत्याग होतां सर्वे चि जाते।
काये करूं रे क्रीया घडेना। तुजवीण रामा मज कंठवेना॥ ७ ॥
संसारसंगें बहु पीडलों रे। कारुण्यसिंधु मज सोडवीं रे।

१ घडेना तुझी प्राप्ति हें कर्म खोटें। असा पाठ मर्ढेबाडांत आहे. २ प्राक्तन.
३ देहाच्या पराधीनतेमुळें. ४ ( प्रपंचाचा ) कंटाळा, ( श्रीरामभेटीविषयीं ) आतुरता.
५ “ तरी ” मर्ढेवाड पाठांतर.

कृपाकटाक्ष सांभाळि दीना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ८ ॥
जय जी दयाळा त्रैलोक्यपाळा । भवसिंधु हा रे मज तारि हेळां ।
धारिष्ट माझे हृदई वसेना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ ९ ॥
आम्हा अनाथा तूं एक दाता । संसारवेथा चुकवी समर्था ।
दासां मनीं आठव वीसरेना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥१०॥

( ५८ ) म्हणा रे म्हणा राम लीळावतारी ।

नव्हे मछ ना कूर्म वाराहरूपी । नव्हे खुजट्टु ना नव्हे सीघ्रकोपी ।
नव्हे मातृहंता नव्हे खगधारी । म्हणा रे म्हणा राम लीळावतारी॥१
नव्हे बोध्य ना गोवळ्ळ कूळहंता । नव्हे दत्त दीगंबरु नग्न फिर्ता ।
नव्हे येकदंतु नव्हे त्रीपुरारी । म्हणा रे म्हणा राम लीळावतारी॥२॥
नव्हे ईश्वरु सर्वविराटरूपी । नव्हे ज्ञान विज्ञान ध्यानस्वरूपी ।
जयो होतसे सत्वरा तत्ववारी । म्हणा रे म्हणा राम लीळावतारी॥३
नव्हे सीव ना शक्ति ना वेक्ति कांहीं । नव्हे संग नीसंग ना वेंग नाहीं ।
नव्हे वाच्य ना वाचकु पै विकारी । म्हणा रे म्हणा राम लीळावतारी
नव्हे अंत आनंत ब्रह्मांडमाळा । नव्हे द्वैत अद्वैत अतर्क्यलीळा ।
माहां साधनें संकटें जो निवारी । म्हणा रे म्हणा राम लीळावतारी।
नव्हे शून्य ना अन्य चैतन्यधर्ता । नव्हे उत्पतीस्थीतिसंव्हारकर्ता ।
मनीं चिंतितां शोक संताप हारी । म्हणा रे म्हणा राम लीळावतारी ६
नव्हे लक्ष आलक्ष ना पक्ष दोन्ही । नव्हे खूणं निर्गूण ना गूण तीन्ही
नव्हे बद्ध ना मुक्त ना ना विकारी । ह्मणा रे ह्मणा राम लीळावतारी
नव्हे व्याप्य ना व्यापकु ज्ञेय ज्ञाता । नव्हे दृश्य आदृश्य ना धेय ध्याता
नव्हे निर्विकारी नव्हे वेशधारी । म्हणा रे म्हणा राम लीळावतारी ॥
जया वर्णितां सीणली वेदश्रुती । जया दर्शनें संत आनंत होती ।
जया जाणतां जाणिवे होत हारी । म्हणा रे म्हणा राम लीळावतारी॥९

१ लीलेनें, सत्वर. २ वामन. ३ नृसिंह. ४ परशुराम. ५ खड्गधारी परशुराम. ६ कृष्ण. ७ कंसमातुलादिकांना मारणारा. ८ "तंतवारी" मर्ढेपाठ. ९ "गूण" मर्ढेपाठ.

असो सांगतां राम गूणासि येतो। परी गूण निर्गूण यातीत जो तो।
जनीं सद्गुरु से (वि)[1]तां दास तारी म्हणा रे म्हणा राम लीळावतारी ॥

## ( ५९ ) कर्ता कोण ?

निराकार तें ब्रह्म आकार माया। निराभास तें ब्रह्म रे भास माया।
परब्रह्म तें पाहतां ही दिसेना। दिसे सर्व माया चि हे नीरसेना ॥१॥
दिसे सर्व माया परी कोण कर्ता[2]। करी सृष्टि रे कोण तो विश्वभर्ता।
निराकार आकार होणार नाहीं। खचे दृश्य तें ब्रह्म जाणार नाहीं॥२॥
अकर्ते कदा ब्रह्म कांहीं करीना। सदोदीत निर्धूत कांहीं धरीना।
अविकार वीकार तेथें घडेना। करी सर्व हें कोण ठाई पडेना॥३॥
जनीं दीसतें भासतें सत्य केलें। तिन्ही देव सामर्थ्यें ही त्यांत आलें।
दिसे सर्व माया परी कोण कर्ता। उगी वाउगी सांगती सर्व वार्ता॥४॥
करी सर्व माया तरी सर्व माया। तये वेगळी कोण ते सांग माया।
दिसे सर्व माया तिनें काय केलें। बरें शोधितां वाउगें वेर्थ गेलें॥५॥
करी सर्व ही कोण कर्ता दिसेना। मनीं बैसला संशयो नीरसेना।
म्हणों सर्व निर्माण पांचा भुतांचें। तरी पाहतां साहवें कोण कैचें॥६
अहा रे आहा रे पाहा काय कैसें। दिसे भ्रांतिचें सर्व आभाळ जैसें।
कळाकौतुकें सर्व विस्तार केला। गमे काय कर्तार[3] तो गुप्त जाला ७
जनीं बोलती बाळ बागूल वाचा। विचारीं मनीं कोण कर्ता तयाचा।
निराकार कीं देव कीं काय माया। वरेंसें विवंचूनि पाहें कळाया ॥८
कळे त्या कळे काय सांगोनि आतां। विवंचील त्या निश्चयो जातजातां
मनीचें मनीं सज्जनीं वोळखावें। जिवीचें जिवीं सर्व[3] शोधूनि घ्यावें॥
म्हणे दास लोकांसि मी काय सांगों। तराया जनीं मीच कासेसि लागों
बरीं साक्षपें औषधें वार्टवावीं[4]। जया लागला रोग तेणें चि घ्यावीं॥

---

१ मुळांत " सेतां " पडलेलें आहे. " सेवितां " पाहिजे. तसा मर्ढेपाठ हि आहे. २ दिसे सर्व हे कोण निर्माण कर्ता । म. पा. ३ " सार " म. पाठ. ४ " मेळवावीं " म. पा.

## ( ६० ) सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ।

अनेक दिव्यांबर रत्नमाळा । सिंह्यासनीं फांकति रम्य कीळा ।
शरीर तें ही लागे तजावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥ १ ॥
सर्वत्र हें वैभव ईश्वराचें । अनुमात्र तें ही नाहीं जिवाचें ।
जन्मासि येतां उघडें चि यावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥२॥
मधें चि हें[1] सर्व निर्माण जालें । रुणानुबंधें सकळै मिळालें ।
अज्ञानयोगें ममता भ्रमावें[2] । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥ ३ ॥
जितां जिवातें बहुसाल चित्तीं । करणें घडे हो धन हांव कीर्ती ।
कटीसूत्र तें ही तोडूनि घ्यावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥ ४ ॥
माता पिता ईतर थोरथोरें । देह्यांतकाळीं मिळती अपारें ।
कौतुक तेहीं सकळै पहावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥ ५ ॥
शरीरपांगें बहु सीण जाला । सखीं म्हणोनी बहुसाल केला ।
तेहीं समस्तीं सुखें रहावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥ ६ ॥
तारुण्यकाळीं मद आवरेना । वृद्धाप्यकाळीं कांहीं स्मरेना[3] ।
स्वहित तें ही लोभें चुकावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥ ७ ॥
सांडूनियां वोळखी ईश्वराची । जन्मूनि[4] चिंता केली जयाची ।
निष्ठूर तेही सकळै फिरावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥८॥
संसारचिंता ऐसीं कराया । दुःखानळें व्याकुळ सर्व काया ।
दुजयासि जातां दुःखें रडावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥९॥
ऐकोन हें दास उदास चित्तीं । सीतापतीवांचुनि कोण अंतीं ।
वांयां प्रपंचीं वृथा सिणावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥१०॥

## ( ६१ ) जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ।

मनासारिखी सुंदरा ते अनन्या । मनासारिखे पुत्र ज्यामात कन्या ।

---

१ "सर्वै" होतें, त्याचें "सर्व" करून त्यामागें समासांत "हें" लिहिलें आहे. मढेंपाठ "सर्वै" असा च आहे. २ मायाममतेनें वृथा भुलावें । असा मढेंपाठ. ३ "कळेना" म. पा. ४ "बहुसाल" मढेंपाठ. ५ "माया" म. पा.

सदा सर्वदा बोलती रम्य वाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥
मनासारिखे दीर भर्तार भावे । मनासारिखे सासुर तें असावें ।
सुखें बोलती लेश नाहीं गमाचा[1] । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥२
भलीं मायबापें भले मित्र बंधु । भले सोइरे राखती स्नेहवादु ।
मुलें लेंकुरें येक मेळा सुनाचा[2] । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥३॥
भले धाकुटे थोरले सर्व कांहीं । भले गोत्रजु भिन्न भावार्थ नाहीं ।
अखंडीत हा काळ जातो सुखाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥
गुरें वांसुरें शिंगुरें दास दासी । गुराखे सुणीं[3] मर्जेरें[4] गुणरासी ।
समा[5] चालतो लेश नाहीं तमाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥
धनें धान्य पात्रें आळंकार चीरें[6] । विसोरे[7] घरें सुंदरें रम्य सारें ।
देहे चालतो सर्व आरोग्य ज्याचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥
यहलोकिचे लोक ते ही गुणाचे । परत्रीक ते ही बहू लक्षणाचे ।
समुदाव उछाव येका मनाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥७॥
मनासारिखे ग्राम ग्रामाधिकारी । मनासारिखे लोक शोकापहारी ।
मनासारिखा संग साधुजनाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥८
मनासारिखें चिंतिता देव पावे । मनासारिखे भक्त भावें मिळावे ।
सदा बोलती बोल सारांश वाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥
म्हणे दास सायास केल्यां घडेना । विकल्पें जनीं येक ठांई पडेना ।
घडे योग होतां विवेकी जनाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा १०

## ( ६२ ) अद्वैत चर्चा

अद्वैतचर्चा कैसी करावी । चर्चे चि ऐसी क्रीया धरावी ।
शब्दीं कळालाघव बोलिजेते । रहाणी मयोरापरि नृत्य होतें ॥१॥
सगूण तो सद्गुरु मोकलावा । सगूण तो देव चि गोफणावा ।
तरी च ज्ञातेपण ख्यात जालें । न बोलतां तें सकळै बुडालें ॥ २ ॥

---

१ राग=अविचार. " दुखाचा " असा मर्ढेवाडांतील पाठ आहे. २ प्रथम " सुखाचा " होतें. मर्ढेपाठ हि " सुखाचा " आहे. ३ कुत्रीं. ४ मार्जार, मांजर. ५ समा=एकोपा. ६ वस्त्रें. ७ विसोरा म्हणजे विश्रांतिस्थल तर नव्हे ?

*अद्वैतचर्चा कंटाळवाणी । रहाणी पहातां सकळैक वाणी ।*
तेणें गुणें मानस लाजताहे । होऊनियां सावध तूं चि पाहें ॥ ३ ॥
सगूण भक्तीविण जो पसारा । ज्ञातेपणें घालित वोरबारा ।
*सगूण हें दुल्लभ थोरथोरां । तें दूरि ठेलें शाब्दीक चोरां ॥ ४ ॥*
क्षण येक गूणीं सप्रेम दाटे । क्षण येक ज्ञातेपण तें अव्हाटे ।
दास्यत्वनामांकित आळ आला । सगूण प्रेमा सकळै बुडाला ॥५॥
सगूणभक्ती विषईं विरक्ती । स्वधर्म रक्षी येथानशक्ती ।
सर्वांपरी दुल्लभ तो चि ज्ञाता । वाचाळता माइक तत्त्वचिंता ॥६॥
अद्वैतचर्चा अति श्लाघ्यवाणी । सांडूं नका रे वदली पुराणीं ।
अद्वैतशास्त्रीं ठेवा प्रभूचा । अलभ्य हा रे सकळांसि कैचा ॥ ७ ॥
अद्वैतशास्त्रें हृदईं निवावें । वादांग तें सोडुनि सर्व द्यावें ।
वाच्यांश रे माइक तो तजावा । लक्षांश तो लक्ष जीवीं धरावा॥८॥
अद्वैतचर्चा द्वैतास मोडी । अद्वैतचर्चा वादास तोडी ।
अद्वैतचर्चा माया विभांडी । अद्वैतचर्चा जाणीव फेडी ॥ ९ ॥
अद्वैतचर्चा मुखें करावी । जाणीव पोटीं सुखें धरावी ।
हें वाक्य ज्याचें तया कळेना । जाणीव देवा माझी गळेना ॥१०॥

## ( ६३ ) परनिंदा

बहुतां दिसांच्या वयोवृध मूला । जनीं बायकोच्या गुणें जन्म तुला ।
तये जन्ननीच्या कुळा निंदितोसी । वृथापुष्ट तूं मानवांमाजि होसी॥१
किती दीस तें वाइले पोटवोझें । पुढें जन्मतां खंडिलें नाळ तूझें ।
जिवीं दीस मागील ते आठवावे । जनीं कष्ट कुश्चीळ कैसे करावे॥२॥
मळीं लोळतां घोळतां कष्टलासी । किती हागसी मूतसी वोकिलासी ।
खतें खांडकें दुख उदंड जालें । बहुतां प्रकारें तुला वाढवीलें ॥ ३ ॥
बहू जन्ननीनें तुझे कष्ट केले । बरें वोखटें सर्व साहोनि नेलें ।
मनामाजि मागील कां आठवेना । देहे पुष्ट हा वेर्थ तुझा झिजेना॥४॥

१ अपेक्षा २ क्षत, जखम.

मुढा वोंगळा वोंगळीं जन्मलासी । तुझी जननी ते तुझे कष्ट सोसी ।
जनीं पाळिती सर्व नारी नरांला । तया निंदिती शुधि नाहीं खराला ॥५
स्वयें निंद्य तूं निंदिसी कोणकोणां । जनीं सर्व संसार हा दैन्यवाणा ।
देहे मोधळा कोथळा वांति विष्टा । किती येक दुर्गंधि वर्ती प्रतिष्टा ॥६॥
देहमात्र हा निंद्य तुला कळेना । सदा सर्वदा ताठ तुझा गळेना ।
देह्यातीत होतां बरें सूख आहे । मनामाजि हें तूं विचारूनि पाहें ॥७॥
म्हणे वंद्य मी निंद्य सर्वै परावे । तया [1]कस्मळालागि रे काय ठावें ।
भल्यानें जनीं आपनिंदा करावी । नको रे नको वेर्थ निंदा परावी ॥८॥
पहा मास हाडे देहे कातड्याचें । भले निंदिती वंद्य कैचें मढ्याचें ।
मिळालीं मर्डीं बापुडीं दैन्यवाणीं । जनीं बाळ तारुण्य होती पुराणीं ॥९
देहेबुधि तों ज्ञान कांहीं पहावें । देहे नीरसावें नसावें नसावें ।
देह्यातीत आनंत शोधीत जावा । वृथा गर्व हा सर्व मागें तजावा ॥१०॥

## ( ६४ ) निरूपणें मानस आवरावें ।

संसार माया ममता नसावी । नैराशता दुल्लभ ते असावी ।
आनंदरूपी भजनीं भरावें । निरूपणें मानस आवरावें ॥ १ ॥
कल्याणकारी भवशोकहारी । सत्संगती मानव मूढ तारी ।
ग्रंथांतरीं अंतर [2]वीवरावें । निरूपणें मानस आवरावें ॥ २ ॥
परत्रिचें साधन सार आहे । नाना प्रकारीं तुळणा न साहे ।
अद्वैतबोधें श्रवणें [3]तरावे । निरूपणें मानस आवरावें ॥ ३ ॥
सदा फिरे चंचळ वेशधारी । मनासवें आसन हें थरारी ।
निरंजनीं माइक तें [4]पहावें । निरूपणें मानस आवरावें ॥ ४ ॥
पाहावयातें नयनीं दिसेना । येतःप्रसंगीं पळ ही वसेना ।
तया [5]विवेकें करी पालटावें । निरूपणें मानस आवरावें ॥ ५ ॥
नानापरी हें धरितां धरेना । कल्पीतसे तें सरतां सरेना ।

१ कस्मलाला, पाप्याला. २ " श्रवणीं भरावें " म. पा. ३ " भरावें " म. पा. ४ " तय म. पा. ५ " विवेक त्यानें परी पालटावें " म. पा.

दृष्टेपणें आपण ही नुरावें । निरूपणें मानस आवरावें ॥ ६ ॥
नामाथिलें साधन साधिताहे । कडाकपाटीहुन जात आहे ।
ज्ञातेपणें मीपण वोसरावें । निरूपणें मानस आवरावें ॥ ७ ॥
ब्रह्मादिकां मानस आवरेना । नाना उपाई मरतां मरेना ।
तें निर्गुणीं पांगुळतां मरावें । निरूपणें मानस आवरावें ॥ ८ ॥
जाले तिन्ही देव तिहीं गुणांचे । निसंग होती तरि निर्गुणाचे ।
निरावलंबीं मेज[2] मी हरावें । निरूपणें मानस आवरावें ॥ ९ ॥
जनीं मनावांचुनि सूख नाहीं । मनें चि लाभे गुज सर्व कांहीं ।
परंतु तें स्वाधेन हो करावें । निरूपणें मानस आवरावें ॥ १० ॥

## ( ६५ ) परम सुंदर तें पद पावसी ।

बहुत सार विचार करीं मना । दृढ धरीं रघुनाथउपासना ।
रघुविरा भजतां चि सुखावसी । परम सुंदर तें पद पावसी ॥ १ ॥
तनु मनु धनु या रघुनायेका । निरवणें धरणें सुखदायका ।
भवभयासि बळें भडकाविसी । परम सुंदर तें पद पावसी ॥ २ ॥
न करितां करितां करणें घडे । न धरितां धरितां धरणें पडे ।
विवरतां सरतां सरसावसी । परम सुंदर तें पद पावसी ॥ ३ ॥
बहुत आठवलें जिविचा जिवीं । परि कदापि नये सुखपालवी ।
वरदराम तरी बळकावसी । परम सुंदर तें पद पावसी ॥ ४ ॥
सुख बहूविध हें मन मागतें । झडकरी करितें हरि सांगतें ।
मग मनीं उगला चि उकावसी । परम सुंदर तें पद पावसी ॥५॥
अभय दे हरि बोलत बोलतां । अभय दे हरि चालत चालतां ।
अभय सूख विळास विळाससी । परम सुंदर तें पद पावसी ॥ ६ ॥
सपनिचें मनिचें जनिचें घडे । अवचितें दुचितें सुख सांपडे ।
हुडकितां बहुतांसि न फावसी । परम सुंदर तें पद पावसी ॥ ७ ॥
न घडतें घडवी रघुनंदनु । नुपरतें पुरवी भवकंदनु ।

१ "सीर" म. पा. २ "मन ही भरावें" म. पा.

निच नवा सकळां मनिं भावसी । परम सुंदर तें पद पावसी ॥ ८ ॥
न तरते उदकीं जड तारिले । वनचरीं रजनीचर मारिले ।
बिभिषणासरिसा च नवाजसी । परम सुंदर तें पद पावसी ॥ ९ ॥
सुरपती सुरबंदविमोचना । भज मना भजतां सुख सज्जना ।
सगुण दास म्हणे मग धांवसी । परम सुंदर तें पद पावसी ॥ १० ॥

संख्या दशकें ४०५

## ( ६६ ) सगुण ध्यान

जनकजापति संपति आमुची । सकळ भाग्य सभाग्य सुखा रुची ॥
परम धीर उदार सुधारसु[1] । जपत देव सदाशिव तापसु ॥ १ ॥
खचित मूगुटि कीरटि कुंडलें । पदक ढाळ सुढाळक दंडलें ।
जडित कंकण किंकिणि मेखळा । भुषणमंडित राम ब्रिदागळा॥२॥
कटतटीं निकटीं लघु किंकिणी । लिगटल्या नटल्या नटदामिणी[2] ।
प्रगटतां तुळितां तुळणा नसे । परम सुंदर राम मनीं वसे ॥ ३ ॥
निळतमाळ तनू अति साजिरी । रुळत माळ सुढाळ तयेवरी ।
जडित लोळ कपोळ[3] प्रकाशलें । हसित मूखसरोज[4] विकासलें ॥ ४ ॥
परम सुंदर मूख रसाळ तें । मृंगमदांकित[5] भाळ विशाळ तें ।
नयन रंग सुरंग विकासले । सगुण ध्यान मुनीजन तोषले ॥ ५ ॥
धनुष्य बाण तें[6] ठाण पुढें दिसे । हरित चित्त सुचित्त जिवीं वसे ।
सकळपाळ कृपाळ दयानिधी । घडत सूख स्वसूख निरावधी ॥६॥
रिपुकुळांतक राघव हा रणीं । सकळ शूर प्रताप चुडामणी ।
सकळ बंदविमोच रणांगणीं । विबुध कारण कारण कारणी ॥ ७ ॥
सकळ भूषण भूषण भूषणी । सकळ देव सदेव शिरोमणी ।
सकळ मंडण मंडण राम हा । अरिकुळांतक दंडक तो पहा ॥ ८ ॥
विमळ गूणसिळा रघुनायेका । विमळ कीर्ति परात्परदायेका ।

१ अमृत, अमृततुल्य. २ माळा? ३ कपाळ. ४ मुखकमळ. ५ मृगमद=कस्तुरी. ६ तें?

विमळ मानस पुण्यपरायेणा । विमळ नाम तुझें करुणाघना ॥९॥

## ( ६७ ) रघुनायका मागणें हें चि आतां ।

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी ।
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायेका मागणें हेंचि आतां॥१॥
तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें । तुझे गुण गातां मनासी रहावें ।
उठो आवडी भक्तिपंथें चि जातां । रघुनायका मागणें हें चि आतां ॥२
मनीं वासना भक्ति तुझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी ।
वसावें मज अंतरीं नाम घेतां । रघुनायेका मागणें हें चि आतां ॥३॥
सदा सर्वदा योग तुझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ।
नुपेक्षीं मज गुणवंता अनंता । रघुनायेका मागणें हें चि आतां ॥४॥
नको द्रव्यदारा नको येरझारा । नको मानसीं ज्ञानगर्वें फुगारा ।
सगुणीं मज लाविं रे भक्तिपंथा । रघुनायेका मागणें हें चि आतां ॥५॥
भवें व्यापलों प्रीतिछ्याया करावी । कृपासागरें सर्व चिंता हरावी ।
मज संकटीं सोडवावें समर्था । रघुनायेका मागणें हें चि आतां ॥६॥
मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुधी कुडी वासना नीरसावी ।
नको संशयो तोडिं संसारवेथा । रघुनायेका मागणें हें चि आतां ॥७॥
समर्थापुढें काय मागों कळेना । दुराशा मनीं बैसली हे ढळेना ।
पुढें संशयो नीरसीं सर्व चिंता । रघुनायेका मागणें हें चि आतां ॥८॥
ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तांसि रे उधरावें ।
सुटो ब्रीद आम्हासि सांडूनि जातां । रघुनायेका मागणें हें चि आतां९

## ( ६८ ) वीतरागी राम

करीतो बळें भग्न विघ्ना अघातां । नमस्कार माझा तया येकदंता ।
नमूं शारदा वैखरी वेदमाता । गितीं गाउं या रामचंद्रासि आतां ॥१॥
अयोध्यापुरी सुंदरी दिव्य भारी । तेथें राम नीधान लीळावतारी ।
बळें आगळा मानवी वेशधारी । करीं चंड कोदंड हा रावणारी ॥२॥
मदें मातला रावणू क्रूरबुधी । तेणें घातले सर्व ही देव बंदीं ।

स्वधर्म[१] बुडाला भुमीभार जाला। अनाथां दिना धावण्या राम आला३
खडे रूतले खूतले शुध हेमीं । माहांतेज पुंजाळलें दिव्य रश्मी ।
हिरे माणिकें फांकती दिव्य कीळा। सुढाळा गळां रूळती मुक्तमाळा ४
बरी साजिरी मुकुटीं रम्य शोभा। वरी कीरटी हेम कल्लोळ गाभा ।
शिवा चिंतितो राम त्रिपुंड्र भाळीं। कपोळीं प्रभा कुंडलांची झळाळी ५
करपल्लवीं मुद्रिका रत्नजोडी । विरकंकणें केयुरें बाहुदंडीं ।
कटीं किंकिणी मेखळा ज्वाळमाळा। पदीं तोडरु वांकि वाजे खळाळां६
उटी घेतली कास पीतांबराची। उभी सांवळी ध्यानमूर्ति हराची ।
असा दिव्य सिंह्यासनीं रामराजा। पुढें वैभवा सोडिलें देवकाजा ॥७॥
जटा पिंगटा मस्तकीं शोभताती । विभूतीरजें साजिरी दिव्यकांती ।
अयोध्यापुरीनायका त्या नरेंद्रा। बरी साजिरी बाणली योगमुद्रा॥८॥
वयें नूतनु साजिरा रा[२]म योगी । वना जातुसे तापसी वीतरागी ।
विदेहीसुता नोवरी लग्न जालें। तया राघवा तीव्र वैराग्य आलें॥९॥

## ( ६९ ) राघव नीरवीला

तपोवना सानुजें[३] राम जातां । समागमें जानकि दिव्य कांता ।
माता म्हणे राघव वास पाहे। प्रयाण पाई तुजला न साहे ॥ १ ॥
पृथ्वी तुला राघव नीरवीला । याच्या झणीं रूतसी पाउलाला ।
ज्यामात तूझा प्रतिपाळिं यातें। फळीं तऱ्हीं सीघ्र हरीं क्षुधेतें ॥२॥
आपां[४]पती प्रार्थिते तूजलागी । तपासि जातो रघुराज योगी ।
नद्या तटाकें करिं पूर्ण पंथें। तृषा झणीं पीडिल हो तयातें ॥ ३ ॥
श्रीसूर्य[५]राजा कुळदीप तूझा । तपासि जातो रघुराज माझा ।
स्पर्शों नको तीव्र किर्णें[६] तयातें। ध्यानीं क्षिती वाँ[७]टेल योगियातें ॥४॥
वाजों नको कर्कश[८] रे समीरा । असेल जेथें नृपरत्न हीरा ।
तो स्वामि रे हा तुझिया सुताचा। सधूशरें होइल देह त्याचा ॥५॥

---

१ श्रीसमर्थ या ठिकाणीं आपल्या वेळचें च तर वर्णन करीत नाहींत ना? २ "राज" मढेंपाठ. ३ धाकट्या बंधूसह. ४ समुद्रा. ५ "वनासि" म. पा. ६ "करें" म. पा. ७ "वाटत" म. पा. ८ धुराळ्यामुळें मलिन.

रघोत्तमु सादृश्य वेषधारी । सौमित्र तो सुंदर ब्रह्मचारी ।
वनस्पती हो तुह्मी तोषवा वो । छयायासुगंधें श्रम हा हरा वो ॥६॥
सपक्षिकूळासह कोकिळा हो । सीते सुशब्दीं तुह्मीं रंजवा हो ।
हे धाकुटी योगिणी कुंजवासी । तुम्ही च तेथें सखिया तयेसी ॥७॥
सगद्गदें बोलतसे सुशब्दें । श्रवताति नीरें नयनारविंदें ।
पुसोनियां राघव वास पाहे । कै मागुता देखेन यासि माये ॥८॥
जो राम विश्राम योगेश्वरांचा । त्या गौरवी भक्ति माता सुवाचा ।
क्षमें चि रामें भवशोकहाला । मग दासस्वामी वनासि गेला ॥९॥

## ( ७० ) वनवासी राम

पहा हो पहा राम आरण्यवासी । पुरी त्यागिली सर्व येका[1] जिवेसीं ।
मऊ सुमनें सेज खुपे जयाला । असा राम तो सीघ्र पाईं निघाला ॥१॥
सवें धाकुटा बंधु तो ब्रह्मचारी । नवी नोवरी जानकी दिव्य नारी ।
अती साजिरें ठाण कोदंडधारी । वना जातसे राम लीळावतारी ॥२॥
तिघें ही जणें धाकुटीं बाळलीळा । रुषीनायका पाहती त्यासि डोळां ।
तयां देखतां चित्त हें येकवाटे । मोहो मानसीं देखतां कंठ दाटे ॥३॥
रघुनाथ आरण्यपंथें चि गेले । पुढें गौतमीचे तटीं वास केले ।
तेथें घालणें घातलें राक्षसांनीं । लिळा सर्व संव्हारिले येक बाणीं ॥४॥
सितेकारणें मारिला मृग रामें । वनीं झोडिला पाडिला पूर्णकामें ।
सुमित्रासुतु गेलियां रामशुधी[2] । सिता रावणें चोरिली दुष्टबुधी ॥५॥
पुढें राम सोमित्र गुंफेसि आले । सिता नाडळे शुधी पाहों निघाले ।
जटायु पुढें देखतां दैन्यवाणा । कृपादृष्टिनें ऊठवी रामराणा ॥ ६ ॥
वनीं मारुती देखिला बाळलीळा । मनीं पाहतो रामलीळावलीळा ।
खुणा पाहतां सीघ्र भेटीस आला । तया अंतरीं रामविश्वास जाला ॥७
वनीं येकला भेटला रामचंद्र । तेणें लोटला सर्व सुखें समुद्र ।
पडे मस्तकीं हस्तकु प्रेमछ्याया । कृपाळूपणें जाहली वज्रकाया ॥८॥

१ "येका जिवेसीं" ऐवजीं "ही वैभवेंसी" असा मढेपाठ. २ रामाच्या शोधार्थ.

म्हणे मारुती स्वामि देवाधिदेवा । बळें तांळ छेदूनि वाळी वधावा ।
कपीनाथ सूग्रीव राजा करावा । प्रभु हा चि संकल्प जीवीं धरावा ॥

## ( ७१ ) अभिमान

बरा देह माझा बरा गूण माझा । बरा वेष हो नेटका साज माझा ।
बरा काळ माझा बरा योग माझा । बरा पाहतां सर्व संसार माझा ॥१॥
बरीं चीपडें मेकडें सर्व माझीं । खतें खांडकें तें बरीं भव्य माझीं ।
पित्तें फेंपसें चारटें सर्व माझीं । बरीं अंतडीं कातडी मंद[1] माझी ॥२॥
बरा धर्म[2] माझा बरा मूत्र माझा । बरा पू बरा वाहतो कान माझा ।
बरा वोक माझा बरा नर्क माझा । बरा खोंकला दाट सेंबूड माझा[3] ॥३
बरी युक्ति माझी बरी बुधि माझी । बरी वासना पाहतां स्थीति माझी ।
बरी दृष्टि माझी बरी पुष्टि माझी । बरी कांति माझी बरी शांति माझी ४
बरे हात माझे बरे पाय माझे । बरे दांत माझे बरे कान माझे ।
बरे चक्षु माझे बरे वोठ माझे । बरे शब्द माझे बरे गूण माझे ॥ ५ ॥
बरें कूळ माझें बरें गोत माझें । बरें ग्राम माझें बरें गृह माझें ।
बरें सेत माझें बरें वित्त माझें । बरें पाहतां चांगलें सर्व माझें ॥ ६ ॥
बरें तें बरें दूसरें आडळेना । बरें तें बरें वीवरें[4] ही कळेना ।
बरें येक तें पाहतां ब्रह्म आहे । तया तूळितां तूळणा ही न साहे॥७॥
वृथा साभिमानें चि देहाभिमानें । वृथा थानमानें चि दुराभिमानें ।
मी मोठा मी मोठा चि हा वेर्थ ताठा । विचारेंविणें सर्व खोटा चि खोटा
म्हणे दास उदास आहे कळेना । चळेना ढळेना कदा आकळेना ।
तयावीण कां सीण वांयां करीता । धरेना कदा तें चि कां हो धरीता॥९

## ( ७२ ) हास्य

कपारी खडे खापरें काचखंडें । धुळी ढेंकुळें कोळसे सेणखुंडें ।
चिपाडें त्रृणें कांटकें हाडखुंडें । लिदी भस्म तें चर्मखंडें उदंडें ॥१॥

१. मृदु. २ मुळांत " धर्म " स्पष्ट आहे, पण बहुधा " घर्म " असावयास पाहिजे.
३ या श्लोकांत अहंकाराच्या थट्टेची व निर्भर्त्सनेची कमाल केली आहे. ४ विवरणें.

खडे केंश गुंडाळिले वाखसूतें । जुनी चिर्कुटें फाटकीं तें बहूतें ।
खरांटे जुन्या झाडण्या सुंबखंडें । सुपें मोडकीं टोपलीं दोरखंडें॥२॥
जुन्या वाहणा खोंचडे कांठमोरे । किती दाटले केरकातोर[1] दोरे ।
बहुतांपरीच्या लघू दीर्घ वेस्ती । कितीयेक सध्या बहू जीर्ण अस्ती॥३
मणी फुटके त्या लघु सिंपि कौडे । बहुतांपरीचे बहु मांगचौडे ।
किती जीव कुश्चीळ ते मेदरेंदा । फळें नासलीं जाहलीं चूरचेंदा॥४॥
बहु द्रोण पत्रावळी तें उचिष्टें । कितीयेक ते लोटिती लोक कष्टें ।
जुना मोळ तो टर्कलें कोळचिंचा । किती बोलणें तें चि पींचा नें पींचा[2]५
बहुसाल नाना लघू जीवयाती । किटें भूस कोंडे धुळी सेण माती ।
कितीयेक ते लोक कुंर्चीळ[3] दर्डे । बहुतांपरीचे बहु ते उकर्डे ॥६॥
कितीयेक जाळी कितीयेक सारा । कितीयेक लेंड्या कितीयेक गारा ।
कितीयेक तें मुर्कुटीं मोळमाशा । मिळालीं किती जीव तेथें दुराशा॥७
कितीयेक तें नासकें नासलेंसे । कितीयेक तें कुजकें कुजलेंसे ।
कितीयेक तें फाटकें फाटलेंसे । कितीयेक तें फुटकें फुटलेंसे ॥८॥
मुखें बोलतां वाटतें कैसकैसें । नव्हे सार तें जाणिजे तैसतैसें ।
बरें सार तें फार शोधूनि घ्यावें । नव्हे सार तें चार त्यागूनि द्यावें॥९
उकर्ड्यामधें लोळती पोर पींसें । तया देखतां जाणता लोक हांसे ।
चमत्कार तो जाणत्या नेणत्याला । माहा युक्ति संकेत लागे मनाला ॥
नवांमाजि हा दूसरा बोलिलासे । निवाली सभा हास्यरूपें विळासे ।
म्हणे दास रे रूप तें वोळखावें । बरें अंतरामाजि सूखें धरावें ॥११॥

## ( ७३ ) राम—कृष्ण

करा रे जनीं भक्ति या राघवाची । करीता मनीं वेर्थ चिंता भवाची ।
करीं बाण कोदंड हें ठाण देखा । मनीं चिंतितां दुर्जना कोण लेखा ॥
खरा कृष्ण हा विष्णु पूर्णावतारी । चतुर्भूज पीतांबरु चक्रधारी ।
गरुडध्वज पावतो लागवेगें । दिनाकारणें सर्व सांडूनि मागें ॥२॥

१ केरकतवार, केरकातर, केरकचरा. २ पींचा न पींचा=बोलण्याची पिचापाचि.
३ कुश्चीळ.

गळां वैजयंती रुळे कंठमाळा। कटीं किंकिणी मेखळा ज्वाळमाळा।
गुणी राम हा गुणरत्नें अमोघें। प्रभा फांकली दुथडी कीर्तिवोघें॥३॥
घरें सुंदरें द्वारका पुण्यभूमी। तयेमाजि हा कृष्णजी नीजधामीं।
गुणें आगळा वर्णितां वर्णवेना। लिळावेश ब्रह्मादिकां ही कळेना॥४॥
नसे युध्य तेणें चि नामें अयोध्या। प्रतापें बळें आगळा राम योध्या।
रणीं प्राणहर्ता बळाढ्या विरांचा। माहां संकटीं कार्यकर्ता सुरांचा॥५॥
चरित्रें विचित्रें करी गोपिनाथु। क्रिडाकौतुकें नाटकी तो समर्थु।
यमुने तिरीं गोपि गोपाळ वछें। ध्वनी लोधलीं ऊर्ध वाहूनि पुछें॥६॥
छबीने[१] बहू छेत्र माही निशाणें। माहांराज हा वर्णिजे यासि कोणें।
दुजी ऊपमा रामचंद्रा न साजे। सुरारीवरी तोडरीं ब्रीद गाजे॥७॥
जेणें पर्वताचे तळीं गोकुळासी। बळें राखिलें नाथिलें काळयासी।
जेणें घेतलें सर्व ही भक्तवोझें। रणीं घेतलीं पांडवालागि जूझें॥८॥
झळाळीत गंडस्छळें कुंडलें तें। उणें बोलिजे सर्व ही उपमेतें।
जेणें घेतलें सर्व लावण्य जांयां[२]। नमस्कार माझा तया रामपायां॥९॥
येमाया यमातें भजा उत्तमातें। तजा आणिकें दैवतें सर्वमत्तें।
धरा मानसीं कृष्ण हा प्रेम सांटी। त्रिभंगीं उभा रूपलावण्यपेटी॥१०
टिळा रेखिला कस्तुरीकेशराचा। लपेटा सिरीं रम्य दिव्यांबरांचा।
तुळेना समरंगणीं शक्ति लाटी। उभा राम तूणीर बांधोनि पाठी॥११
ठकारें[३] उभा देहुडां[४] पाउलीं हा। बळें नेतसे चित्त चोरूनि पाहा।
मनीं लागली सर्व ही कृष्णगोडी। जनीं सोडितां सर्वथा ही न सोडी॥
डगा[५] टाकितां दैत्य बाहेर दीसे। तयालागि बिभीषणा राग पूसे।
पुढें राघवें वाइला चंडमेढा[६]। रणीं झोडिला पाडिला दैत्य गाढा॥१३॥
ढळेना प्रिती लागली माधवाची। उभी साजिरी मूर्ति हे चित्सुखाची।
कृपाळु हरी अंतरीं सर्व जाणे। तया देखतां सर्व हि सूख बाणे॥१४॥

१ छत्री. २ जायां घेणें=आंदण घेणें, आपल्याकडे घेणें. ३ ठकार=मनोहर. ४ देहुडा=तिरपा. देहुडां पाउलीं=दीड पायावर. ५ डग=भीति. ६ श्रीसमर्थकृत युद्धकांड प्रसंग ७ श्लोक ५९ व त्यावरील टीप पहा.

नसे दुख ना दंड ना मृत्यमारु। नसे शोक ना लोकनिंदाधिकारु।
नसे काळ दुकाळ उदेग[1] चिंता। नसे शब्दकापट्य हे रामसत्ता ॥१५॥
तनु सांवळी वेणु वाहे त्रिभंगीं। क्रिडाकौतुकी गोपि गोपाळ संगीं।
स्वयें जाहला कृष्ण हा विश्वसत्ता। धरीं रे मना गोपिनाथा समर्था १६
थरारी धरा सप्त पाताळ जेव्हां। करारी बळें चंड कोदंड तेव्हां।
सुरांकारणें पेटला राम द्वंदा। चपेटातळीं मस्तकें होति चेंदा ॥१७॥
दयासागरें नागरें[2] गोपिवेशें। बहु दैत्य संव्हारिले बाळतोषें।
जयाची अती खोल कौसाल्य बुधी। विचारें माहां मत्त तो दैत्य साधी
धिटा वाजटा किंकिणी च्यापबंदीं। झणत्कारती डोलती रामछंदीं।
अती धीर गंभीर तो राम नेणा। बळें सोडिले देव तो देवराणा ॥१९॥
नसे तूळणा तूळितां यादवासी। माहांवीर ते धीर हे सोमवौंसी।
जयांच्या प्रतापें सदा काळ कांपे। धरा घालिती पालथी सर्व कोपें २०
पळाले बळें पीटिले मारुतानें। दडाले पुरीमाजि ते थोर मानें।
भयें कांपिती लोपती देति धापा। वृथा बोलती कापिती वेर्थ लाफा[3] २१
फटी फावली वानरां येक वेळां। चळी कांपती सर्व राजे चळाळां।
बळें नाथिला काळ लंबी विलंबी। लिळा खेळतां द्दमस्तंबीं कदंबीं २२
बळें आगळा मारुती कोटिगूणें। जया रोमरंध्रीं निघे सैन्य दूणें।
दडे मछमूखीं पडे कृष्ण लोभा। चढे विक्रमू आगळी दिव्य शोभा॥
भला मारुती जिंकिला कृष्णनाथें। रणीं रक्षिलीं पांडवें तीं आनाथें।
ध्वजीं लाविला विक्रमें पूर्णकामें। यदुनायकें सत्य नेमें विरामें॥२४॥
मनीं सर्वदा सर्व कापट्य जागे। दिनाचे परी याचकु भीक मागे।
नटाचे परी पालटी कृष्ण काया। करी संकटीं थोर शत्रु जिणाया॥२५
येणें राघवें मारिला वेर्थ वाळी। नव्हे नीति हे सर्व केली धुमाळी।
विरोधेंविणें सर्व ही राज्य हारी। नव्हे निर्मळु राम कापट्यधारी॥
रघुनंदनें दुष्टसंव्हार केला। अती आदरें धर्म तो रक्षियेला।
तया वाळिचें ही बरें हीत केलें। कृपाळुपणें मोक्षपंथासि नेलें ॥२७

१ उद्वेग. २ सुंदर. ३ बाता, अतिशयोक्ति.

लघुचे परी येथ आरण्यपंथें । करुणास्वरें आळवी जानकीतें ।
तया राघवा धीर कैसें म्हणावें । जयां अस्त्रियांचेनि कामें जिणावें ॥
वनीं लाघवी शैल्यजा[1] वेशधारी । सितेसारिखी येकली दिव्य नारी ।
परी अंतरीं नूठिजे काम लेशें । सितेवीण ही राज्य केलें सुरेशें ॥
सवे लागली देवकीनंदनाची । माहां मल्ल चाणूर हो कंदनाची ।
तयावीण आणीक कांहीं दुराशा । तयाचे कृपेची बहूसी पिपाशा ॥
शत्रा ऊठवीलें रघुनायकानें । कृपासागरें सूमतीदायकानें ।
कपी सर्व ही सेवटीं तो सुवासी । बळें आणिलें त्या लघु ब्राह्मणासी ॥
समस्तामधें सार गोपाळकाला । तया देखतां चाखतां जीव धाला ।
स्वयें स्वंगड्या[2] वांटितो कृष्ण पाहा । गडी खेळती तो चि आनंद माहां
हरें जाणिजे राम कोदंडपाणी । अहिल्या सिळारूप लावण्यखाणी ।
जन सर्व आनंदलें राज्य केलें । पुढें ग्राम ही मोक्षपंथासि नेलें ॥
क्षमा सर्वदा ऐक्यरूपें करावी । पथीं आदरें सार्थकाची धरावी ।
म्हणे दास द्वैतास हो नातळावें । जळाचे परी सर्व भूतीं मिळावें॥

## ( ७४ ) अहल्योद्धार

बहु पाप संताप कोपें तमानें । अहिल्या सती श्रापिली गौतमानें ।
वनामाजि होसील तूं चंड सीळा । मनामाजि ते जाहली दुखवेळा
करुणास्वरें तो रुषी प्रार्थियेला । तिनें आपणालागि उश्राप केला ।
बहु काळ तूं त्या वनामाजि दोषी । पुढें राघवाचे पदें मुक्त होसी ॥
सदा सर्वदा लोचनीं वाट पाहे । रघुनायका अंतरीं चिंतिताहे ।
बहुसाल ते कष्टिली दिव्य बाळा । कधीं राम येईल आनंदवेळा ॥
सदा सर्वदा चिंतिते पाय चित्तीं । मनामाजि वाटे बहुसाल खंती ।
दयाळें रघुनायकें सीघ्र यावें । मला सीघ्र येथूनियां सोडवावें ॥
बहु घालणी घातली पूर्व पापें । बळें सोडवावें मला मायबापें ।
समर्था मनीं सांडि माझी नसावी । दिनानाथ तूं दीनचिंता असावी ॥

१ पार्वती. २ संवगड्या.

सदा सर्वदा अंतरीं वास पाहे। तुम्हावेगळे ये वनीं कोण आहे।
उदासीनता येउनी वीतरागें। घटीका पळें भासती कल्पयुगें॥ ६॥
मनामाजि हें नाठवे सुख कांहीं। निराधार आधार कांहीं च नाहीं।
चकोरां मनीं लक्ष चंद्रोदयाचें। तया चातकाचे मनीं माधवाचें॥७॥
तयाहूनि मी ये वनीं वाट पाहे। समर्था तुझे पाय कैसेनि लाहे।
आवस्ता मनीं लागली ते ढळेना। कधीं राम येईल कांहीं कळेना॥८
बहु कष्टली सर्व संकीर्ण गात्रीं। प्रवाहो सदा चालिला रम्य नेत्रीं।
करी सुंदरी ते वनामाजि धावा। कधीं राम येईल माझा कुढावा॥९॥
बहु कष्टले देव ते सोडवीले। दयासागरें सर्व ही मुक्त केले।
प्रतापासि कांहीं च नाहीं तुळाया। समर्था करीं येकदां मुक्त काया १०
सदा सर्वदा लक्षिते मार्ग तुझा। ब्रिदें चालती हा चि आधार माझा।
बहु कष्टली ते वनामाजि होती। तिनें मांडिली दैन्यवाणी रुदंती॥११
पुढें पाहतां राम तत्काळ आला। पदस्पर्शनें श्राप तो मुक्त केला।
नमस्कार घाली बहु स्तुति केली। समर्थें अहिल्या सती सोडवीली१२
म्हणे धन्य देवा ब्रिदें साच केलीं। प्रतापें अनाथें दिनें सोडवीलीं।
म्हणे काय उत्तीर्ण मी होउं आतां। स्तुती बोलतां ते रडे जातजातां१३
सती सव्य घालूनि तैसी निघाली। घडीनें घडी ते नमस्कार घाली।
बहुदीस मी श्रापदुःखीं बुडाले। तुझे पाय हे लागतां धन्य जाले॥ १४
म्हणे मागुता लोभ आतां असावा। सदा अंतरीं लागला वेध जीवा।
नभातून विद्युल्यता ते निघाली। तये सारखी ते सिळेतून गेली॥१५॥
म्हणे दास हा राम तत्काळ पावे। करी संकटीं सेवकाचे कुडावे।
प्रतापें चि ब्रह्मादिकां सोडवीले। महीमंडळालागि आनंदवीलें॥१६॥
बहु जाड उपासना जाड कीर्ती। प्रतापें बळें आगळा धर्ममूर्ती।
तयाच्या गुणें हे जिणें धन्य जालें। बहु सेवकांलागि तें येश आलें १७
सीता राम सौमित्र शत्रुघ्न बंधु। मरुत्सून सुग्रीव बिभीषणादौ।
अती नम्र साष्टांग भावें स्वसर्गा। नमस्कार माझा तया अष्टवर्गा॥१८
तुला सांगतों गूज हा बीजमंत्रु। जेणें नीरसे थोर संसारशत्रु।

नव्हे मिथ्य हें बोलणें सत्य वाचा। जपा अंतरीं मंत्र तेराक्षरांचा १९
क्षराअक्षरातीत तें वोळखावें। अती साक्षपें पंचिकर्णी सिकावें।
पुढें पाहतां पाहतां नीवळावें। म्हणे दास रे सर्व कांहीं कळावें॥२०॥

## (७५) हरिपद

सकळ मंगळ मंगळदायका। विमळ नाम तुझें गणनायका।
सकळ सार विचार विचारणें। विवरणें करणें तुझिया गुणें ॥ १ ॥
सकळ रूप स्वरूप सरस्वती। मज मनीं वदनीं वदती मती।
भगवती गमती गम वीलसे। तुजविणें करणें अनु हीं नसे ॥ २ ॥
न तरवे तरवे गुरुवें नमा। न करवे करवे गमनुगमा।
न धरवे धरवे पथिकां मुखें। विगळितें गळितें सकळै सुखें ॥ ३ ॥
सजन जीवन जीवन आमुचें। परम संगित संगित हें रुचे।
निवळतां कळतां कळतां कळे। निखळ सूख मनीं गम आकळे ॥४॥
हरि मनीं गमनीं[1] गमनीं जनीं। हरि मनीं भुवनीं निधनीं धनी।
हरि मनीं अशेनीं[2] शयनीं वनीं। हरि मनीं पवनीं जिवनीं घनीं॥५
गजपती जगती जगपाळ ते। नरपती नृपती बहुसाल ते।
हयपती भूपती धन संपती। मुढमती भ्रमती मग वीपत्ती ॥ ६ ॥
उपजती मरती जिव हे किती। अवगती झकती मदसंगती।
जनमती समती समता नसे। म्हणउनी हृदईं भ्रम हा वसे ॥ ७ ॥
उपरती परती[3] परती[3] सरे। मग मनीं गमनीगम वीसरे।
गतिमती समती समता नये। वितरेकान्वय नान्वय नान्वये ॥८॥
न करणें करणें करणें वसे। न धरणें धरणें धरणें नसे।
न दिसतें दिसतें दिसतें करा। नलगवीलगवीलगवीसरा ॥ ९ ॥
सकळ हेंकळ हें जन मछरी। न करणें श्रीहरि मज तेपरी।
घडि घडी विघडी वय काळ हा। परम दुर्धर दुर्धर तो मांहा॥

१ "विजनीं" पा. म. २ "आसनीं" पा. म. ३ "सरती" पा. म.

मज दया करिं रे करुणाळया । सकळ वीकळ जाइल वीलया ।
लय तुझें श्रीहरी हृदईं वसे[1] । मज मनीं विपरीत कदा नसे[1] ॥११॥
उपजणें मरणें चुकवी हरी । तुजरहीत नको दुसरी परी ।
भजन हें मज हें गुज मागणें । बहु नसे इतुकें तुज सांगणें ॥१२॥
तुजरहीत स्वहीत कसें घडे । अनुदिनीं सदनीं पतनीं पडे ।
पतितपावन नाम तुझें हरी । पतित मी शरणागत उधरी ॥ १३ ॥
हरिपदें विशदें करिं रे मना । मग चुकेल जनीं येमयातना ।
उगम सुगम होये विलक्षणा । अनुभवें मग जाणसि तूं खुणा ॥१४॥
सुख मना रचना पाहातां घडे । परि घडे तितुकें मग वीघडे ।
अचळ तें चळ सांडुनि पाविजे । विमळ तें मळ त्यागुनि राहिजे ॥१५॥
अचळ तूं चळ तूं नव्हसी कदा । विमळ तूं मळ सांडुनि सर्वदा ।
निखळ तूं खळ संशय वारिं रे । सकळ माइक तें दुरि सारिं रे ॥१६॥
भजनता जनता जन तापसी । मग मता ममता मम वीवसी ।
तजि मना सुमना मनकामना । भव जना भ्रमणा भ्रम वासना ॥१७॥
सकळ जाइल जाइल रे मना । विकळ होइल होइल वासना ।
विकळ तें कळतें कळतें जनीं । परत रे रत रे रत सज्जनीं ॥ १८ ॥
भजनसीळ तपीळ कदा नसे । निखळ भाव स्वभाव सदा वसे ।
अचळ तो चळ तो जन वाउगा । जनजनीं सजनीं स्थिरता उगा ॥१९॥
मरण रे रण रे रण माजलें । मन तरे न तरे जन गाजलें ।
मन भरे न भरे न भरे तरी । भवजळीं बुडतां हरि उधरी ॥ २० ॥

## ( ७६ ) निंदक

गणनायेका दायका सर्वसिधी । प्रचंडा उदंडा मनोबोध बुधी ।
मज देइं रे नेइं रे संगव्याधी । तुटों दे तुटों दे तुटों दे उपाधी ॥१॥
नमूं येकदंता नमूं वेदमाता । नमूं मुक्तिदाता नमूं त्या अनंता ।

[1] “ वसो ” आणि “ नसो ” असा मूळ पाठ होता. हरताळ लावून “ वसे ” आणि “ नसे ” केलें आहे.

नमूं साधुसंतां नमूं व्यास वक्ता। नमूं सर्व श्रोता विरक्तां महंतां ॥२॥
अती वैभवें मानस रंगताहे। परी रंग वोरंगतां भंगताहे।
म्हणोनी धरीं अंतरीं रामराणा। नको रे नको वीषई दैन्यवाणा ॥३॥
धरा रे धरा संगती सज्जनाची। जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची।
बळें भाव सद्बुधि सन्मार्ग लागे। माहांक्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥४॥
करीं संग नीसंग या राघवाचा। धरा उधरा वौंश बेताळिसाचा।
अरे जन्म जाईल हा दों दिसांचा। स्मरा मानसीं शंकरा वेद ज्याचा ५
जया भाव त्या माव माया उपाधी। जया गर्व त्या सर्व संकल्प बाधी।
जया दंभ स्वयंभ देहीं भुगारा। तया पामरा काळ लावी दरारा ॥६॥
नको रे नको मानवा साधुनिंदा। नको रे नको निंदितां थोर बाधा।
जितां सीध ची यातना पावसील। अंतीं रवरव भोगितां जाणवेल॥७॥
जना सज्जना निंदितां देव कोपे। करी दुर्जना दंड कृदांतरूपें।
माहाराज तो कोपतां कोण वारी। किती मानव देहधारी भिकारी॥८॥
केला न्याय अन्याय त्या राजपुत्रें। जन त्यासि दंडावया कोण कुत्रें।
जरी बोलती लोक नाना विकारी। तरी दंडणा पावती राजद्वारीं ॥९॥
नरें मछरें पामरें पापरूपें। अती कर्कशें जल्पती वागजल्पें।
तया वाजटा मर्कटा कोण पूसे। सदा सर्वदा भुंकती स्वान जैसे ॥१०॥
अती लंड तैमुंड पाषांडज्ञानी। अती बंड ते भंड देह्याभिमानी।
अती धीट त्या वीट येईल कैचा। अती बोलणें फोल वाचाळ वाचा ११
जया मानवा लागला हा चि धंदा। सदा सर्वदा मानसीं साधुनिंदा।
सळें मछरें येति वादा वेवादा। तया जाणत्या लागली थोर बाधा॥१२
कटों वाजटाचा नको संग देवा। धिटा उधटा माजि पाषांडठेवा।
जेणें वृत्ति हे ढांसळे साधकाची। तजा रे तजा संगती बाधकाची ॥१३

१ हा श्लोक मनाच्या श्लोकांपैकीं १३५ वा आहे. "धरा रे धरा" ऐवजीं "धरीं रे मना" असा तेथें पाठ आहे. २ चांगला "ध" होता, त्यावर हरताळ लावून कोणीं "द" केला आहे. ३ "फुगारा" लिहावयाचें होतें असें वाटतें. ४ डोयखुपशा दा. २-३-२९ पहा. ५ हे प्रालव्वा.

४८०९६



जना दुर्जनाचा नको संग रामा । [1]जेणें वृत्ति हे पावताहे विरामा ।
सदा सर्वदा संग दे सज्जनासी । [1]जेणें नित्य आनंद वाटे मनासी १४
विखांरा[2] मुखीं दुग्ध तें वीष जालें । माहां तीव्र किल्मीष बाहेरि आलें ।
तसें सज्जनीं दुर्जना तोषवीलें । परी मछरें सर्व ही वेर्थ गेलें ॥१५॥
जनीं निंदितां सूटला कोण आहे । जन सर्वदा सर्व निंदून राहे ।
जया वर्णितां सीणली वेदवाणी । जनें निंदिला राम कोदंडपाणी॥१६
बहुतांपरीं सेवितां त्या वरिष्टा । पाहा आदरें जाति घेऊनि विष्टा ।
जया प्राप्त जें तें चि हातासि आलें । तसें निंदकां दुर्जनांलागि जालें१७
देहे निंद्य हा वंद्य होईल कैसा । ह्मणोनी नको मान्यतेची दुराशा ।
देहे वंदितां निंद्यतां[3] निंद्य आहे । ह्मणोनी देह्यातीत होऊनि राहें॥१८॥
अती क्षार दुर्गूण सिंधूसि आहे । परी गौल्य माधुर्य प्रजेन्य पाहें ।
तया सज्जना माधवाचेनि संगें । माहां तीव्र दुर्गूण तात्काळ भंगे॥१९
नको रे मना संग त्या दुर्जनाचा । तजावा भजावा हरी अंतरींचा ।
तरी उधरी नाथ लोकत्रयाचा । फिरे दास उदास छेदूं[4] तयाचा॥२०॥

## ( ७७ ) गुरुगम्य गोप्य

गुरूनें तुला काय निरोपिलें रे । जप ध्यान कीं देखणें सांग पां रे ।
पाहा पूसिलें श्रोतयानें गुमानें । माहां थोर गर्वें चि ज्ञानाभिमानें ॥१
भले पूसती रे कृपाळुस्वभावें । तया ज्ञानगर्वें चि कैसें ह्मणावें ।
भले नष्ट दोघे कसे वोळखावे । क्रियाभ्रष्ट ते नष्ट जाणोन घ्यावे॥२॥
भला तो चि जो मुख्य आचार राखे । गुरु देव लोकीक वेदांसि धाके ।
करूं ये बरें कर्म जें तें करीतो । माहांवाक्य तत्वादिकें वीवरीतो॥३॥
सदा सर्वदा बोलणें प्रत्ययाचें । अनुद्वेग तें गौल्य नाना सुखाचें ।
नव्हे बंड पाषांड मत्तें वेवादें । भले बोलती बोलणें ज्ञानबोधें ॥४॥

---

१ मुळांत 'जेणी' आहे. "जनीं" व "जेणें" यांच्या घोंटाळ्यांत हातून "जेणी" पडलेलें दिसतें. २ सर्पांच्या. ३ निंदितां. ४ छंद. ५ चमत्कार. दा. ५-४-२३ पहा.

नव्हे बोध जो मत्त उन्मत्त व्हावें । नव्हे बोध जो साधकां भ्रष्टवावें ।
नव्हे बोध जो निंद्य चोरूनि खावें । नव्हे बोध जो ज्ञानगर्वें बुडावें ५
पुसों जाणताहे परी सांगवेना । तथा बोलण्यासारिखें चालवेना ।
विचारें बरा त्याग कांहीं घडेना । न होतां मनासारिखें त्या पडेना ॥६
कसा न्याय अन्याय तो ही कळेना । कदा बोलणें वेदशास्त्रीं मिळेना ।
सदा पूर्वपक्षांत सिधांत आणी । कपाळीं बळें न्याय होतां झणाणी ७
इहीं लक्षणीं मूर्ख तो वोळखावा । नव्हे निश्चयो संग त्याचा तजावा ।
भला तो चि तो सर्व सत्याभिमानी । नव्हे बाष्कळु भ्रष्टज्ञानी गुमानी ॥
असो पूसिलें तें चि आतां वदों रे । गुरूनें तुला काय निरोपिलें रे ।
माहांवाक्य[1] सांगीतला अर्थ त्याचा । गुणीं तंत जो बोध त्या निर्गुणाचा
विचारें बरा पाहतां तत्त्वझाडा । विवंचूनियां मीपणाचा निवाडा ।
मला शोधितां शोधितां मी च नाहीं । स्वभावें चि आकारलें सर्व कांहीं
बरी शोधिली पिंड ब्रह्मांड माया । भजायासि म्यां पाहिलें देवराया ।
तया पाहतां मी च तद्रूप जालों । बहू संग सोडून सूखें निवालों ॥११
निवालों गिवालों असें ही घडेना । बरें शोधिल्यावीण ठाईं पडेना ।
निशब्दें चि शब्दें चि आधीं वदावें । पुढें शब्द सांडूनि निशब्द व्हावें
मुळारंभ तो शब्द वाच्यांश घ्यावा । पुढें अर्थ लक्ष्यांश लक्षीत जावा ।
परब्रह्म तें ब्रह्म लक्ष्यांश कैचा । दुरावे स्वभावें चि वाच्यांश वाचा १३
गुरूनें देह्यातीत बोधून केलें । पुढें जागृती पाहतां स्वप्न गेलें ।
तयाचें परी देह संसार माया । क्रिया कर्म नानापरी सर्व काया ॥१४॥
निजेला तया जागृती ही कळेना । खुणा सांगतां ही निजेला वळेना ।
बहु बैसला लोक जागा पहातो । निजेला तयामाजि तो वोसणातो[2] १५
तया पूसतां हो ह्मणे कोण केव्हां । सभे बैसले हांसती लोक तेव्हां ।
बहुतां मनीं पाहतां साक्ष आली । पाहा जागृती स्वप्नखेदें उडाली १६
घडे स्वप्न सांडूनि जागृति जेव्हां । कळों नीवळों लागतें सर्व तेव्हां ।
मनामाजि तो आठवीतो पहातो । प्रबोधें चि विस्मीत होऊनि जातो ॥

---

१ अहं ब्रह्मास्मि । २ बरळतो.

तयाचे परी स्वप्न अज्ञान जालें। विवेकें चि तें जागृती ज्ञान आलें।
प्रचीतीवीणें तो गुरु ही कळेना। मनीं पाहतां प्रत्ययो नीवळेना ॥१८
गुरुच्या प्रतापें अहंभाव खंगे। बरें पाहतां सर्व ही संग भंगे।
मुळीं बद्ध नाहीं तया मोक्ष कैचा। जनीं साधकु साध्य होतां विवंचा १९
नव्हे साध्य ना साधकु ज्ञेय ज्ञाता। नव्हे बोध्य ना बोधकु धेय ध्याता।
नसे नांवरूपासि संकेत कांहीं। नसे जन्म ना मृत्यु कांहीं च नाहीं ॥२०
नसे तें असेना असे तें नसेना। असेना वसेना नसेना दिसेना।
किती शब्द नानापरी भेद नाना। नसे वृत्ति संकेत नामाभिधाना २१
गुरुगम्य तें गोप्य तेथें पुसावें। म्हणे दास भावें नुरावें नुरावें।
असावें परी सर्व कांहीं नसावें। कळेना तरी सज्जनाला पुसावें ॥२२॥

## ( ७८ ) उदासीन हे वृत्ति कोठें न लागे।

रघुनायेकावीण हा सीण आहे। सदा सर्वदा रंग वोरंगताहे।
निसीदीन या राघवाच्या वियोगें। उदासीन हे वृत्ति कोठें न लागे॥१
गुणीं गुंतलें चीत हें आवरेना। तयावीण आणीक कांहीं स्मरेना।
समाधान हें होये त्याचेनि संगें। उदासीन हे वृत्ति कोठें न लागे॥२
मनीं प्रीति हे लागली राघवाची। सदानंद हे राम मूर्ती सुखाची।
पदार्थीं बळें लावितां चीत भंगे। उदासीन हे वृत्ति कोठें न लागे॥३॥
मनीं आठवीतां समाधान वाटे। तया देखतां संशयो सर्व तूटे।[१]
न लिंपे कदा चीत दुश्चीत भंगे। उदासीन हे वृत्ति कोठें न लागे॥४॥
मनीं तंत आनंत या राघवाचा। तुटे[२] किंत तो नावडे या भवाचा।
सदा सर्वदा अंतरीं राम जागे। उदासीन हे वृत्ति कोठें न लागे॥५॥
मनीं नावडे द्रव्य दारा पसारा। मनीं नावडे माइकांचा उबारा।
मनीं नावडे भोग हा राजयोगें। उदासीन हे वृत्ति कोठें न लागे॥६॥
जनीं पाहतां भेदबुधी अनेका। मदमछरें निंदिती येकमेकां।
घडे त्याग याकारणें लागवेगें। उदासीन हे वृत्ति कोठें न लागे॥७॥

१ " मनीं आठवीतां च तो कंठ दाटे। तया देखतां अंतरीं बाष्प लोटे।" असा मढेपाठ. २ " उठे " पा. म.

बहुसाल हें बोलणें आवडेना । जनीं वासना शब्दज्ञानें पडेना ।
क्रियेवीण तें बोलतां चीत भंगे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥८॥
मनीं सर्वथा[1] सत्य तें सांडवेना । मनीं सर्वथा[1] मीथ्य तें मांडवेना ।
समाधान[2] तें योगसंगें निसंगें । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥९॥
जनासारिखें बोलणें[3] ही घडेना । म्हणोनी जनीं सर्वथा ही पडेना ।
अहंतागुणें बुधि वेवाद लागे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥१०॥
उपाधीगुणें सत्य तें मीथ्य होतें । उपाधीगुणें मीथ्य तें सत्य होतें ।
उपाधीगुणें येक रंगे विरंगें । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥११॥
उपाधीगुणें लागतो पक्ष घेणें । उपाधीगुणें सत्य सोडून देणें ।
उपाधीगुणें वीषईं जीव रंगे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥१२॥
उपाधीगुणें सर्व सोसीत जावें । उपाधीगुणें मानवाधेन व्हावें ।
उपाधीगुणें वेर्थ हा स्वार्थ लागे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे १३
मनीं सांडितां संगव्याधी उपाधी । पुढें सांपडे राम कारुण्यनीधी ।
विवेकें मनींचा अहंभाव[4] भंगे । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे ॥१४॥
पराधेनतां रामदासीं घडेना । देहे चालतां रामभाक्ति उडेना ।
उभा राम सांभाळितो पुष्टिभागें । उदासीन हे वृत्ति कोठें न लागे १५

## ( ७९ ) भवाचा वीट

मना[6] चाल ऊठीं वना दुर्गमातें । न गुंतें भवागाँरदारादिकातें ।
विवेकें विचारें विवंचूनि पाहीं । जनीं पाहतां सर्वथा ऊरि नाहीं ॥१
अती दुष्करें क्लेश कीजेत देहीं । तथापी तरी वीषयो प्राप्त नाहीं ।
कदापी जरी लाहिजे प्राप्ति याची । तरी इंद्रियांलागि संतृप्ति कैची ॥

१ "सर्वदा" पा. म. २ समाधान तें सत्य निःसंग संगे । पा. म. ३ "चालणें" पा. म. ४ "खंगे" पा. म. ५ ह्या श्लोकाच्या चिंतनानें प्रत्येक श्रीरामदासांकिताला किती तरी धीर यावा ! ६ लग्नसमारंभांतून निसटतांना श्रीसमर्थांनीं जो विचार केला असावा तो या अष्टकांत सहज आला आहे. अष्टक फार प्रेमळ व मननार्ह आहे. ७ आगार=घर. दार=पत्नी. ८ उरी, ऊरी, ठाव.

तिहीं लोकिंच्या सुंदरा वेक्तिमात्रा । जरी दाविल्या येक वेळे चि नेत्रा
तऱ्ही त्रृप्ति नाहीं सिखा[1] वाढताहे । जसा इंधनें[2] दिगपती[3] दीप्त होये ॥
विषयस्तुती देहें श्रोत्रें विनोदें । तथा ग्राम्यगीतादि साहित्यशब्दें ।
सदा सर्वदा श्रोत्रभागासि देतो । तऱ्हीं त्रृप्तिचा गंध नाहीं पहा तो ॥
फळें अष्टगंधें[4] तथा गंधचूर्णें । निमग्नें तयामाजि संपूर्ण घ्राणें ।
दुराशा तरी शूकरी आवरेना । पुढें धांवतां मागुती हे फिरेना ॥५॥
द्युती शक्ति संतुष्ट पुष्टी सगौल्ये । असावृत्त ते सेविता ही अमोल्यें[5] ।
तरी वासना मद्यपानीं तयांची । कदा दुर्भरें जीभिके त्रृप्ति कैची ६
त्वचे झांकिली अस्तिची वेस्त मोळी । तया कामपीसा धरी कंठनाळीं
[6]अैसोसी च कैसी करी सर्वकाळीं । कदा नूपजे विकृतीची नव्हाळी ॥७
दुराशा करी किंकरी कोण आतां । निराशा धरी अंतरीं मुक्तिकांता ।
त्यजीं अंत्यजी वृत्ति हे दुःखकामी।भजें निवृती सौख्यदाती श्रीरामी॥
बहू वीट आला भवाचा न सांवे[10] । अटव्यांत देऊनियां हाक जावें ।
मनातें दमावें श्रीरामीं रमावें । दिगांतीं फिरावें जना न स्मरावें ॥९॥
जरी प्रत्यगीं[11]वृत्तितें चित्त आलें । तरी वृक्षपक्षादिकीं सौख्य केलें ।
उदारःतपस्वी उदासीन मोठे । तयाचे गतीं संगतीं वेळ कंठें ॥१०॥
रामा तूं सीते तूं कपोतासि बोले । तेणें पौंतलें[12] चित्त नीवांत जालें ।
शुका शारिकां कुंजती मृद बोली।अशोकीं जिहीं जानकी रंजवीली ॥
दुधेना नवताती ते वृक्ष कांहीं । जया याचकांचेन संकोच्य नाहीं ।
रामें सेविलीं तें चि आपण खावीं । तयाचीं चरित्रें विचित्रें स्मरावीं॥
असी वृत्ति दार्ढ्यें विवेकें तुरक्ती । पदार्थें स्थितीचें नसे आर्त चित्तीं ।
सती निघते ते जसी हर्ष खंती । नसे काढितां घालितां वस्त्रबुंथी[13] ॥१३

१ शिखा, ज्वाला. आशेच्या ज्वाला. २ सर्पणानें, ३ अष्टदिग्पतीं पैकीं अग्नि. ४ गंधाष्टक. ५ " जुगार व शक्तीची व पुष्टिमार्गाची सेवा अमोल खर्च करून असंवरत म्हणजे अविरत जरी केली " असा पहिल्या दोन चरणांचा अर्थ. ६ हांव, इच्छा. ७ प्राप्ति. ८ दासी. ९ प्रवृत्ति. दुःखदायक त्याज्य प्रवृत्ति. टाका. १० सहन होत नाहीं. ११ जर पुन्हां मन संसाराकडे वळलें. १२ " तापलें " पाहिजे होतें काय ? कां " पातलें " म्हणजे संगतींत असलेलें ? १३ बुंथी=बुरखा.

सुषुप्ती[१]अवस्थेसि भूमीं निजावें । उसें रामपाद स्मरोनी धरावें ।
दिशांचा माहां पःटें[२] तो पांघरावा । सितां[३]कारणें साह्य वन्ही करावा ॥
यथा[४]वीध देहो वनामाजि जावा । तथागारदारादिकींहीं पिडावा[५] ।
श्रीरामोस्मि बोधें स्मरावा स्मरावा । रामी रामदास्यें स्वशांती निवावा

( ८० ) परी अंतरात्मा चि नाना विकारी ।

बहुतांपरीं मानवी जीव जोडे । महींमंडळीं शकटें[६] हस्ति घोडे ।
किती धाकुटे थोरले देहधारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥१
खरें डुकरें म्हैसरे बैल गाइ । गउ चीतळें सामरें रानगाइ ।
चिते वाग तसें रिसें कुंजरारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥२॥
कुह्याँ[७] सेरडें मेंढरें भेंकरें[८] तें । सुणीं मर्कटें वानरें येशरें[९] तें ।
जळीं कासवें दर्दुरें मछ सुश्री । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥३॥
ससे सायळें खोंकडें रानसूणी । मृगें जंबुकें मार्जरें कोळं[१०]सूणी ।
घुसी मुंगसें मार्जरें सरड खारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥
विरोळे कणे[११] दाणवे सर्प नाना । बहुतां प्रकारीं लघु जीव नाना ।
किती दुःखदाते किती सौख्यकारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी
चिड्या चीमण्या काउळे ढोंक होले । किन्हे पारवे साळ्या[१२] शुक बोले।
किळा कोकिळा बोलतां सौख्य भारी।परी अंतरात्माचि नानाविकारी
हुमे[१३] लांवरे[१४] तीतरे पाणचोरे । चिड्या भोरड्या चक्रवाकें चकोरें ।
बळ्या टिवटिव्या कोंबडीं गीध घारी।परी अंतरात्मा चि नानाविकारी

---

१ निद्रावस्था. २ वस्त्र, पांघरूण. ३ थंडीकरितां. ४ " नरदेह सांग असतां तो सुखानें वनांत जावो अथवा प्रपंचांत पीडा पावो " असा पहिल्या दोन चरणांचा अर्थ दिसतो. ५ " पडावा " केलें आहे ६ शकट म्हणजे गाडी, पण गाडीचा येथें काय संबंध ? षेकटें =खेकटें=खेकडे असा शब्द योजावयाचा असल्यास न कळे ७ कुही एक जनावर. ८ लहान हरिणाची जात. ९ एसर एक जनावर आहे. १० कोळसिंदा, कोळसुंदा कोळसुना, कोळिष्णा या नांवाचें एक लहान जनावर आहे, तें वाघाला मारतें म्हणतात. ११ कणा म्हणून एक लांबडें कीटक जनावर आहे. १२ " सायळा " होतें त्यावर हरताळ लावून " साळ्या " केलें आहे. साइला म्हणजे जंगली जनावर व साळी म्हणून पाखरूं आहे. १३ हुम्मा म्हणून पक्षी आहे. १४ एक पाखरूं आहे.

नुरा पातरा कातरा बुल्बुला त्या । बहु रंगिणी सुग्रिणी रजकिणी त्या ।
किती रूपधारी किती गूणधारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥८
मृगे पींगळे उलुकें गोरखोरे । वसें सारसें चातकें तें मयोरें ।
त्रिंवे पांकळ्या वाघळा पापकारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥
मृगें मखमलें सोनके टोळमाशा । लघु मशकें मुकुटीं मौळमाशा ।
लघु संख सिंपीलिव्या भृंग भारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥
लिखा वासुवा पीसुवा डांस विंचु । सुते नीवळे कांतण्या पाणविंचु ।
बहु पीप्लिका पाली पांचाळकारी। परी अंतरात्मा चि नाना विकारी॥
बहु खेचरें भूचरें कोण जाणे । शाहामृग ते बाजबहिरी ससाणे ।
पाहा हंस तो क्षीरनीरास वारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी १२
जुरे तासलङ्के कुऱ्हाडे बगूळे । किड्या हुंडण्या डोमळ्या गोमचीळे ।
जळा जोगिणी काजिवे ते दिपारी। परी अंतरात्मा चि नाना विकारी॥
जनीं च्यारिखाणी जनीं च्यारिवाणी।किती कोण प्राणी पाहावे पुराणीं
बहु चंचळीं जन्मले देहधारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥१४
किती संत साधु भले भक्त ज्ञानी । किती वेषधारी च मत्ताभिमानी ।
रुसी देव गंधर्व सामर्थ्येधारी । परी अंतरात्मा चि नाना विकारी॥१५
नव्हे सार साचार कांहीं विकारी । म्हणे दास रे मुख्य तो निर्विकारी ।
जगीं जाणता सत्य मीथ्या विचारी । परी अंतरात्मा चि नानाविकारी

## ( ८१ ) नित्यानित्य

इति श्री भुतांची इति श्री गुणाची।इति श्री नव्हे सर्वथा निर्गुणाची
तया नेणतां होतसे सर्व ची ची । अहा रे असें काय केलें विरंची॥१॥
जनीं पाहतां सर्व ही जात आहे । सदा सर्वदा निर्विकारी च राहे ।
तयाच्या विचारामधें मग्न व्हावें । देहाच्या मदें भ्रांत कांहीं नसावें२
बहुतां रसीं तृप्त केलें जनाला । तयाची रुची ठाउकी सज्जनाला ।
मनाची स्वयें साक्ष येते मनाला । नसे तोषवीलें जगजीवनाला ॥३॥

१ एक पाखरूं आहे. २ भितऱ्या. ३ मनोहर. ४ शेवट, अंत.

बहु स्वाद पाहोन घालून गेला। समर्थें बहु लोक संतुष्ट केला।
तया नेणती लोक नाना विकारी।बहु भाग्य भोगून जाले भिकारी४
जनीं सर्व निर्मीत आहे प्रभूचें। तयावीण आणीक निर्माण कैचें।
तयाचें चि खावें तयासी चुकावें। पुढें पाहतां कस्पटासी तुकावें॥५॥
सदा सर्वदा सर्व लोकीक केला। प्रभूचे दयेचा वरा काळ गेला।
पुढें हिंडतां फीरतां दैन्यवाणा। मुंडासा सिरीं धोंगडासा पुराणा॥६
भुकेला सदा स्वान हिंडे बराडी। तयाचे परी देवतांचा वऱ्हाडी।
परस्तावला कावला दैन्यवाणा। पुढें प्राण सांडूनि लोटे उताणा ॥७
उताणा पडे पालथा वेस्तकाया। दिसे नग्न लोकांसि गा देवराया।
देहेपाळ सांभाळितो तो दिसेना। अहंभाव लज्या कदा ही असेना८
मदें साभिमानें असंभाव्य ताठा। पुढें बैसला काळदंडें चपेटा।
तयासारिखें वेर्थ भुलों नको रे। समस्तांपुढें नीति सांडूं नका रे ॥९
बरा काळ देखोनि सर्वै मिळालीं। अभाग्यास देखोनि सर्वै पळालीं।
नसे भीड कांहीं देहे[1]धर्म नाहीं।आपेसी तयालागि कांहीं च नाहीं१०
समुदाव सारा बहु पुत्र दारा। तगे सेवटीं कोण येतो विचारा।
बहु संग केला परी वेर्थ गेला। विदेशामधें कष्टकष्टों चि मेला ॥११
सखीं सोइरीं हा चि घेऊनि थाया। पाहातां नसे येक ही ऊलथाया॥
मदें मातला चूकला देवराया। जयालागि सामर्थ्यें चिंता कराया१२
दिनानाथ विख्यात हें ब्रीद ज्याचें। नसे अंतरीं ध्यान तें ही पुं[2]काचें
नव्हे कीं दयासिंधु त्याचे विल्हेचा।जनीं दास जाला तये बायलेचा॥
म्हणे दास सायास नाना उपायें। मला काढिलें राघवें देवरायें।
समर्था तया लागली सर्व चिंता।मिळाले बहु दास दासी अनंता १४

## ( ८२ ) मोठा चितारी

असंभाव्य तें उंच बारीक चित्रें। बहु रंग नानापरीचीं विचित्रें।
रुसी तापसी देवधर्मी पवित्रें। अनंतें तया कर्तयाचीं चरित्रें ॥ १ ॥

१ "देह" चें मागाहून कोणीं "दया" केलें आहे. २ "फु" ऐवजीं "पु" पडलेलें दिसतें.

अंढंचे अचाटें रुसी देव थाटें। बहुसाल दाटे रुपें लखलखाटें।
रुषी तोलदारी बहुसाल भारी। अज्वसीदिदारी जना सौख्यकारी २
मनीं चटक लागे गुणी चित्र जागे। विवर्ता न भागे समस्तां विभागे।
मनांतील मौजा कटक फार फौजा। भला लोक योजा तयाला नवाजा
बहु बंद गाजे जनीं कीर्ति माजे। महद्भाग्य साजे गुणी तो नवाजे।
खबर्दार लाजे रिपू दूरि भाजे। समस्तांमधें थोर आवेश ताजे ॥४॥
तऱ्हे कोप नाहीं सदालस्य नाहीं। कुडी वासना सर्व कांहीं च नाहीं।
सदा सर्वदा गाजवीतो तडाखे। बळें मस्त नेमस्त त्या लोक धाके ५.
सदा मस्त नेमस्त तो हस्तभारें। सदा फेरतालीम ते उंच श्वारें।
जबर्जंग गाड्या च गाड्या कर्तोरे। बळें व्याघ्रसे ऊठती लोक सारे ६
बळें दह्ल खुंदह्ल लाटीत लाटी। रिपुभार तो सर्व भेणें लटाटी।
पळों लागती लोकथाटी च थाटी। असंभाव्य मागून दाटी च दाटी
कटक बंद फावे पुढें कीर्ति धावें। झडा घालिती लोक नेटें उठावे।
जबर्दस्त घाले रिपू ते निघाले। महीमंडळीं सर्व सामर्थ्ये चाले॥८॥
पुढें देव देवाळयें हाटकाचीं। ध्वजा गोपुरें सीखरें नाटकाचीं।
पुराणें हरीकीर्तनें तीर्थयात्रा। पुजा ब्रह्मसंतर्पणें संतपात्रा ॥ ९ ॥
पुरें पटणें आटणें दाट वस्ती। फिरे वावरे भोंवती मस्त गस्ती।
असंभाव्य पीकें बहु लोक धाला। महीमंडळी थोर आनंद जाला १०
रुपासारिखें रूप नाना विकारी। करी येकला लोक मोटा चितारी।
म्हणे दास विळास लोकांस केला। दिसेना कदा गुप्त होऊन ठेला ११

## ( ८३ ) लोकांच्या तऱ्हा

किती येक तें अस्कटें विस्कटेंसीं। किती येक तें फस्कटें फिस्कटेंसीं।
किती येक तें आचकुलें वचकलेंसीं। किती येक तें माणसें कचकलेंसीं॥
किती कर्करीती किती कुर्कुरीती। किती खर्खरीती किती खुर्खुरीती।

१ मोठे, प्रतिष्ठित. २ रांग. मालेंतील तिसऱ्या भागांतील स्फुट श्लोक ५७×२ व. ५८×५९, ६१ पहा. ३ अचकूल=दुबळें. ४ कचकल=अर्धवट.

किती गर्गरीती किती गुर्गुरीती । किती घर्घरीती किती घुर्घुरीती ॥
किती येक तीं अलगटें विलगटेंसीं । किती येक तें हलगटें हुलगटेंसीं
किती येक तें नाळटें[1] बालटेंसीं । किती येक तें झीलटें[2] भीलटेंसीं ॥२
किती चर्चरीती किती चुर्चुरीती । किती सर्सरीती किती सुर्सुरीती ।
किती फर्फरीती किती फुर्फुरीती । किती बर्बरीती किती बुर्बुरीती ४
किती येक तें वागवादें चणाणा । किती येक तें उडताती टणाणा ।
किती येक तें बोलताती ठणाणा । किती येक तें नास्तिं[3] भाकी भणाणा
किती येक तें वादकें बाधकेंसीं । किती येक तें निंदकें भेदकेंसीं ।
किती येक तें उधटेंसीं धटेंसीं । किती येक तें लंपटे सिंपटेंसीं ॥६॥
किती येक तें कारटीं पोरटींसीं । किती येक तीं होरटीं[4] चोरटींसीं ।
किती येक तें दैन्य द्वाडें लबाडें । किती येक तें नीकटेंसीं कवाडें ॥७
किती घातकी पातकी दैन्यवाणे । किती येक ते मूढ खोटे पुराणे ।
किती येक तें आपस्वार्थी अनर्थी । क्रिया पाहतां सर्व ही वेर्थ वेर्थी८
किती येक तें नाटकी चेटकीसे । किती येक ते सांबरी[5] मंत्रपीसे ।
किती येक डाईक ते सर्पकाळे । किती येक ते देवताळे भुताळे ॥९॥
किती येक निसंगळें वोंगळेंसीं । किती येक आमंगळें कस्मळेंसीं ।
किती येक तें पामरें सींगुरेंसीं । किती कुजकें वाहताती पुरेंसीं॥१०॥
किती झोलती झुलती मस्तमस्ती । सदा सर्वदा येकमेकांसिं कुस्ती ।
सरे वोसरे वात ते थोर तुंदें । बळें मारिती येकमेकांसि हुंदे ॥ ११ ॥
बहु तामसी वृत्ति अत्यंत कर्डी । बळे झोंबती येकमेकांसि नर्डी ।
गचांड्या बुक्या तप्रका आणि लाता।तया भोंवत्या बोंबलीताति माता
जनामाजि तें थोर अत्यंत जालें । तया भोंवतें गोत सर्वै मिळालें ।
प्रसंगीं तये थोर जाली रुदंती । मुलें लेंकुरें भोंवतीं तोंड घेती ॥१३॥
धरीतां जनीं आवरेना उकावे । किती येक लोखंड घेऊनि धांवे ।
मर्दे मातले धावती ते भटारी । बळें मारिती येकमेकां कटारी ॥१४॥

१ दुराचारी, अव्यवस्थित. २ झिल्लट, क्षुल्लक, क्षुद्र. ३ हे शब्द बरोबर लागले नाहींत. ४ वडबडे, दुराग्रही. ५ शावरी, मांत्रिक.

उभे पाहती लोक मोठे तमासे । माहांकाळ चौताळले दोनि ह्मैसे ।
सळें पीटिती येकमेकां दणाणा । बळें आगळे बोलताती ठणाणा ।।१५
जनामाजि ते बोंब उदंड जाली । स्वभावें दिवाणांत ते हाक गेली ।
किती येक तें धींग धावोनि आले । किती लाटिले कुटिले चुर केले१६
किती येक ते सांगती वीतंबंदी[1] । पुढें राजकीं फोडिले जेरबंदीं ।
घरें लुटिली सर्व हि नागवीले । पुढें सोडितां थंड जाले निवाले १७
मदें मातले वारिजे त्यासि कोणें । कळी तोडिली थोर नेटें दिवाणें ।
बळाचे पुढें घातले चालवीले । पुढें काष्टयंत्रांत ते घालवीले ।। १८ ।।
किती येक ते लोक येणें प्रकारें । बहुसाल ते कष्ट होती विकारें ।
किती येक ते मोहजाळीं बुडाले । किती येक ते वीतरागें उडाले १९
महीमंडळीं काय कैसें कळेना । म्हणोनि भ्रमों लागला देश नाना ।
जना हातिचें सुटलें चंड जालें । किती येक तें संगत्यागें उडालें २०

## ( ८४ ) लंकेतील हरिलीला

नमन गा तुज गा भिमराया । निजमती मज दे तुज गाया ।
तडकितां तडका तडकाया । भडकितां भडका भडकाया ।। १ ।।
हरुषला हर हा वरदानी । प्रगटला नटला मज मानी ।
वदवितां वदनीं वदवीतो । पुरवितो सदनीं पदवी तो ।। २ ।।
अवचिता चढला गड लंका । पळभरी न धरी मन शंका ।
तडकितां तडके तडकीतो । भडकितां भडके भडकीतो ।। ३ ।।
खवळले रजनीचरभारें । भडकितां तडके भडमारें ।
अवचिता गरजे भुभुकारें । रगडिजे गमकें[2] दळ सारें ।। ४ ।।
कितिकां खरडी खुरडीतो । कितेकां नरडी मुरडीतो ।
कितेकां चरडी चिरडीतो । कितेकां आरडी दरडीतो ।। ५ ।।
माहांबळी रजनीचर आले । भीम भयानकसे चि मिळाले ।
रपटितां रपटी रपटेना । आपटितां आपटी आपटेना ।। ६ ।।

१ सुटण्याचा मार्ग (?). २ लीलेनें (?).

खिजवितां खिजवी खिजवेना । झिजवितां झिजवी झिजवेना ।
रिझवितां रिझवी रिझवेना । विझवितां विझवी विझवेना ॥ ७ ॥
झिडकितां झिडकी झिडकेना । तडकितां तडकी तडकेना ।
फडकितां फडकी फडकेना । कडकितां कडकी कडकेना ॥ ८ ॥
दपटितां दपटी दपटेना । झपटितां झपटी झपटेना ।
लपटितां लपटी लपटेना । चपटितां चपटी चपटेना ॥ ९ ॥
दडवितां दडवी दडवेना । घडवितां घडवी घडवेना ।
बडवितां बडवी बडवेना । रडवितां रडवी रडवेना ॥ १० ॥
कवळितां कवळी कवळेना । खवळितां खवळी खवळेना ।
जवळितां जवळी जवळेना । मवळितां मवळी मवळेना ॥ ११ ॥
चढवितां चढवी चढवेना । झडवितां झडवी झडवेना ।
तडवितां तडवी तडवेना । गडवितां गडवी गडवेना ॥ १२ ॥
तगटितां तगटी तगटेना । झगटितां झगटी झगटेना ।
लगटितां लगटी लगटेना । झुगटितां झुगटी झुगटेना ॥ १३ ॥
टणकितां टणकी टणकेना । ठणकितां ठणकी ठणकेना ।
दणगितां दणगी दणगेना । फुणगितां फुणगी फुणगेना ॥ १४ ॥
चळवितां चळवी चळवेना । छळवितां छळवी छळवेना ।
जळवितां जळवी जळवेना । टळवितां टळवी टळवेना ॥ १५ ॥
घसरितां घसरी घसरेना । विसरितां विसरी विसरेना ।
मरवितां मरवी मरवेना । हरवितां हरवी हरवेना ॥ १६ ॥
उलथितां उलथी उलथेना । कलथितां कलथी कलथेना ।
उडवितां उडवी उडवेना । बुडवितां बुडवी बुडवेना ॥ १७ ॥
बुकलितां बुकली बुकलेना । धुमसितां धुमसी धुमसेना ।
धरवितां धरवी धरवेना । सरवितां सरवी सरवेना ॥ १८ ॥
झडपितां झडपी झडपेना । दडपितां दडपी दडपेना ।
तटवितां तटवी तटवेना । फटवितां फटवी फटवेना ॥ १९ ॥

वळवितां वळवी वळवेना । पळवितां पळवी पळवेना ।
ढळवितां ढळवी ढळवेना । ललवितां ललवी ललवेना ॥ २० ॥
घुरकितां घुरके घुरकावी । थरकितां थरके थरकावी ।
भरकितां भरके भरकावी । झरकितां झरके झरकावी ॥ २१ ॥
परम दास हटी हटवादी । लिगटला उतटी तटवादी ।
सिकवितां सिकवी सिक लावी । दपटितां दपटून दटावी ॥२२॥

( ८५ )

## धाट्या २५

नमूं गणनाथ करील सनाथ । जरी वरदान तरी जनमान ॥ १ ॥
रम्याक्षी रम्यवदना । रम्यरूपा मनोरमा ।
रम्य वाणी कळा विद्या । रम्य नागर शारदा ॥ २ ॥
श्रेष्ठता प्रविष्ट पष्ट । पष्टता वरिष्ठ जेष्ठ ।
जेष्ठ[1] तो कनिष्ठ कष्ट । सुष्ट दुष्ट नेदखे ॥ ३ ॥
भव्य भावीत सव्य दावीत हव्य लावीत संशया ।
अंग संगीत हे प्रसंगीत सर्व संगीत हो तया ॥ ४ ॥
नानाकारी चित्त विकारी । मिथ्या वारी काळ निवारी ।
माया सारी मृत्य विदारी । वेदाधारी भेदपहारी ॥ ५ ॥
येक नेक वीतरेक पाहे । संग वेंग सहसा न साहे ।
धात मात विरहित साधु । साधकां विलसे निजबोधु ॥ ६ ॥
निज संत सतंत अनंत तो । निगमागम सुगम भावितो ।
निजरूप निरंजन दावितो । विजनीं विलया लय लावितो ॥ ७ ॥
सदा निज गूज मनीं गमनीं । कदा भवसीण नसे वदनीं ।
जनीं सुखसार सुखालय तो । हरी जन पार उतारवितो ॥ ८ ॥
आनंदरूपी अनुपम्यरूपी । सत्यस्वरूपी निगमांतरूपी ।
त्रैलोक्यवासी बहुधा विळासी । अत्यंत त्रासी कुमतांतरासी ॥ ९ ॥

१ "जेष्ठता" म. पा.

मत्तें मत्तें स्फूर्तिवंतें अनंतें । अंतेंवंतें सर्व तंतें निवांतें ।
वारी वारी जन्म वारी निवारी । ज्ञानें सारी भक्त देवाधिकारी॥१०
पीत पीतांबर सुंदर शाम । नुरवी दुरितें पुरवी काम ।
पाळी हरिजन मनविश्राम । सत्य निरंजन तारक राम ॥ ११ ॥
कदा ही चळेना पदार्थी मिळेना । मना आकळेना जनाला कळेना ।
मती वीवळेना गती नीवळेना । सदोदीत आत्मा रुळेना मळेना १२
उडगणें[1] गणणें कवण्या परी । अनुरणें धरणें न घडे करीं ।
अगणिता गणिता कवणु असे । जरि दया पुरती तरि वीलसे॥१३
अवनीं पवनीं जिवनीं भुवनीं । रघुराज दिसे[2] दहनीं गहनीं ।
अतळीं वितळीं सुतळीं भुतळीं रघुराज दिसे[2] सकळीं अकळीं ॥१४॥
जना मन धरा धरा धरवरा । वरा परतरा तरा भव हरा ।
हरांतर बरा बरा दृढ करा । करा अवसरा सरा मग खरा ॥ १५ ॥
थकीत मनांतर अंतरवासी । सरत चराचर गुज निगमासी ।
सकळ सुरासुर राजविळासी । भ्रमीत सदा चुकले गुणरासी ॥१६॥

करी करीत करी न करी न करी ।
धरी धरीत धरी न धरी न धरी ।
सदा सतंत वदे न वदे न वदे ।
पदा शरीर पदें न पदें न पदें ॥ १७ ॥
मिथ्या विचार[3] निजसार विचारणा हे ।
आनंत संत मुळतंत शोधूनि पाहे ।
विश्वासलें मन भलें गमलें जयाला ।
चिद्रूप तें उमगलें चुकलें तयाला ॥ १८ ॥
श्रीराम राम हरहृदय राम राम ।
श्रीराम राम करुणाळय राम राम ।
श्रीराम राम मुनिमानस राम राम ।
श्रीराम राम जगज्जनक राम राम ॥ १९ ॥

---

१ उडुगण, आकाशांतील तारे. २ " वसे " म. पा. ३ " विकार " म. पा.

मृदपण गगनाचें तूळितां तूळवेना ।
गगन चळत आहे देव कांहीं चळेना ।
आचळ विमळ लीळा वर्णितां वर्णवेना ।
निगम सिणत पोटीं पार कांहीं कळेना ॥ २० ॥

सार सार हा विचार पैलपार पाविजे ।
थार थार थोर थार निर्विकार भाविजे ।
अंतवंत हें असंत सर्व संत वोळखा ।
हावभाव हा स्वभाव येक देव तो सखा ॥ २१ ॥

मनीं ध्यानीं मानी निजरुप निजानंद वदनीं ।
जनीं सानी योनी न[1]पवत निरावेव सदनीं ।
सदा राहे पाहे सकळ वैभव कांहिं न राहे ।
पदा लाहे साहे अनुरेण संग तो हि न साहे ॥ २२ ॥

सारासार विचार फार करणें जेणें तुटे संशयो ।
नित्यानित्य विवेक येक धरणें जेणें घडे निश्चयो ।
भेदाभेद अभेद सुख पाहातां स्वानंद मार्गे सरे ।
लोकालोक विलोक लोक सकळै साभास तेथें नुरे ॥ २३ ॥

नुरे नुरवीत पुरे पुरवीत सरे सरवीत [2]नसो ।
हरे हरवीत भरे भरवीत मरे मरवीत [3]नसो ।
सुरासुरवंद्य नव्हे जगनिंद्य वरावर सद्य [4]असो ।
तरे परपार धरे निजसार संतत विचार वसो ॥ २४ ॥

वोंकारें सर्व सारें बहुविध पाहातां शास्त्रवाक्यें आपारें ।
नानाकारें विकारें प्रगटित हृदई येक तें निर्विकारें ।
वेदाधारें विचारें निजबिज सकळै पाविजे श्रोत्रद्वारें ।
विस्तारें थोरथोरें विगळित जाहाले संत येणें प्रकारें ॥२५॥

---

१ " निरसत " म. पा. २ " वसे " म. पा. ३ "नसे" म. पा. ४ "नसो" म. पा.

## ( ८६ ) उभी सुंदरी सांग पां कोण आहे ।

नमूं येकदंता अनंता अपारा । जया दर्शनें चुकती येरझारा ।
तया निर्मळा संग तो ही न साहे । उभी सुंदरी सांग पां कोण आहे ॥
निसीभ्रांतिवेळीं दिसे सर्व काळीं । निराधार निर्माण जे अंतराळीं ।
करीं व्याप आकाशिचें शोभताहे । उभी सुंदरी सांग पां कोण आहे ॥
अळंकार भांगार ते सुक्तिकेचे । गळां हार श्रृंघार ते दर्पणीचे ।
रजु सर्प हातीं जना दाविताहे । उभी सुंदरी सांग पां कोण आहे ॥३
प्रतीउत्तराची ध्वनी वाद्य वाजे । भ्रमें भूलि मिथ्यापणें ब्रीद गाजे ॥
बळत्कार ब्रह्मादिकां मोहिताहे । उभी सुंदरी सांग पां कोण आहे ॥
सदा स्वर्ग गंधर्वपुरीं विळासे । ज्वरें दाटलें शैन्य उदंड भासे ।
बळें चंचळा नाचती नृत्य पाहे । उभी सुंदरी सांग पां कोण आहे ॥५
घरें सुंदरें नांदतीं क्लीब वंध्या । तिच्या लेंकुरीं मांडली स्नानसंध्या ।
जळें रोहिणीच्या बळें पूर वाहे । उभी सुंदरी सांग पां कोण आहे ॥६
कदा बाधिजेना तुझी तुज छयाया । सदा ब्रह्मरूपीं तसी जाण माया
विचारें तदाकार होऊनि राहें । उभी सुंदरी सांग पां कोण आहे ॥७
सदा सर्वदा दासविश्वास जेथें । तदाकार विस्तार हा सर्व तेथें ।
तया देखतां द्वैत नीशेष राहे । उभी सुंदरी सांग पां कोण आहे ॥८

## ( ८७ ) तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों ।

असंख्यांत रे भक्त होऊनि गेले । तिहीं साधनाचे बहु कष्ट केले ।
नव्हे कार्यकर्ता भुमीभार जालों । तुझा दास मी वेर्थ जन्मास आलों १
बहु दास ते तापसी तीर्थवासी । गिरीकंदरीं भेटि नाहीं जनांसी ।
स्थिती ऐकतां थोर विस्मीत जालों । तुझा दास मी वेर्थ जन्मास आलों
सदा प्रेमरासी तया भेटलासी । तुझ्या दर्शनें स्पर्शनें सौख्यरासी ।
अहंता मनीं शब्दज्ञानें बुडालों । तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों ३

---

१ माया २ रात्र ३ सोनें ४ " पर्व " पा. म. ५ ' सूंन्य ' पा. म. ६ ' पाहे ' पा. म. ७ " असंभाव्य " पा. म. ८ " जयासी " पा म.

तुझे प्रीतिचे दास निर्माण जाले । आसंभाव्य ते कीर्ति बोलोनि गेले ।
बहु धारणा थोर चकीत जालों । तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों ४
बहुसाल देवाळयें हाटकाचीं[1] । रसाळा कळा लाघवें नाटकाचीं ।
पुजा देखतां जाड जीवीं गळालों । तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों॥
कितेकीं देहे त्यागिले तुजलागीं । पुढें जाहले संगतीचे विभागी ।
देहेदुख होतां च वेगीं पळालों । तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों ॥६
सदा सर्वदा राम सांडूनि कामी । समर्था तुझे दास आम्ही निकामी ।
बहु स्वार्थबुधीन रे कष्टवीलों । तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों ॥७
किती योगमूर्ती किती पुण्यमूर्ती । किती धर्मसंस्छापना अन्नशांती ।
परस्तावलों कावलों तप्त जालों । तुझा दास मी वेर्थ जन्मासि आलों ८

## ( ८८ ) शहाणें

जगीं शाहाणें तें चि नेमस्त राहे । जगीं शाहाणें तें चि देवासि पाहे ।
जगीं शाहाणें तें गुणी गुणग्राही । जगीं ण्याहाणें[2] तें चि नाना प्रवांहीं १
जगीं शाहाणें तें चि साहित्य[3] जाणे । जया अंतरीं सर्व च्यातुर्य बाणे ।
जगीं शाहाणें तें चि स्वहीतकारी । नव्हे तें चि दुश्चीत्त नाना विकारी २
जगीं शाहाणें तें चि तारुण्यकाळीं । करीना कदा वीषयांची धुमाळी[4] ।
जगीं शाहाणें जें अहंभाव जाळी । सदा सर्वदा मानसीं चंद्रमौळी ॥३॥
जगीं शाहाणें तें कसें वोळखावें । भजे शंकरालागि अनन्य भावें ।
म्हणेना कदा आपुलें कीं परावें । दया सर्वभूतीं जयाची स्वभावें॥४॥
जगीं शाहाणें देखतां सौख्य वाटे । जयाचेनि बोलें अहंभाव तुटे ।
जगीं शाहाणें भक्तिपंथें चि लावी । जगीं मूर्ख तें वीषईं चीत्त गोवी[5]॥५
जगीं संपतीसीं बरें देह वागे । हरीची करी भक्ति ते लागवेगें ।
दिसे सर्व संसार हा स्वप्न आहे । जगीं शाहाणें तें चि शोधूनि पाहे॥६
जगीं शाहाणें तें कदा सीतरेना । भवाचे भरीं सर्वथा ही भरेना ।
देहे चालतां राघवा वीसरेना । तया भाग्य वैराग्य तें वोसरेना ॥७॥

१ सोन्याचीं. २ (?). ३ काव्य. ४ गर्दी. ५ फसवीत नाहीं.

जगीं पाहतां साच तें काय आहे । अती आदरें सर्व शोधूनि पाहे ।
पुढें पाहतां पाहतां देव जोडे । भ्रमें भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ॥८॥

## ( ८९ ) कृष्णपर[1]

नटे नेटकें रूपलावण्य साजे । येमुनेतिरीं[2] रम्य राजे विराजे ।
अती मृद वेणुस्वरें रंग माजे । आळापें जळा रोध आकाश गाजे ॥१॥
उभा देउढां[3] पाउलीं वौशपाणी । ध्वनी गौल्य रागावळींची सिरोंणी[4] ।
तया खेचरें भूचरें लुब्ध जालीं । देहेभावनाहेत सुखें विरालीं ॥ २ ॥
पदें मूर्छना[5] ताळ संगीत वाचा । उठे रागकल्लोळ सप्त स्वरांचा ।
उभे सर्व गंधर्व चकीत जाले । कळेना लिळा वेणु हा काय बोले ॥३॥
पडे नाद कानीं तया पावयाचा । बहु जीव व्याकूळ गोपीजनाचा ।
अकस्मात हा नाद कोठूनि आला । तया नादमूळास नेऊनि घाला ४
सये[6] चीत हें चोरिलें वेणुनादें । मनु भेदिला साजणी नादछेदें ।
आवस्ता बहु लागली रूपवेधें । आहा रे असें काय केलें मुकुंदें ॥५॥
उदासीन या वैभवें सीण वाटे । युगासारिखा दीन कोठें न कंठे ।
त्रिभंगीं[7] उभें सावळें रूप ज्याचें । ठसावे मनीं ध्यान सर्वोत्तमाचें[8] ॥६॥
पदीं वक्र वामांग ठाणी विराजे । ग्रिवा वक्र बोटें ध्वनी वक्र वाजे ।
कटीं वक्रता भृलता वक्र पाहे । तया देखतां जीव थकीत राहे ॥७॥
उभा वक्र हा देउडां[9] चक्रपाणी । जया शक्र भांबावला नक्र ताणी ।
सदा सेविती तक्र त्या विक्रयो ही । जगीं धन्य गौळी म्हणे दास तो ही

## ( ९० ) सुखसागर

विसरलों मज मी ममतागुणें । बहुत काळवरी दुख भोगणें ।
अवचिता सुखासागर भेटला । भवजळेंसरितापति आटला ॥ १ ॥

---

१ असा मथळा मर्ढेप्रतींत आहे. २ " तटीं " पा. म. ३ देहुडा, दीड. देउढां पाउलीं=दीड चरणीं ४ श्रेष्टता. ५ स्वराचा चढउतार. ६ सखे. ७ तीन ठिकाणीं वांकलेलें. ८ ठसावे मनीं अंतरीं ध्यान त्याचें । पा. म.. हा पाठ बरा आहे, कारण सांप्रदायिक वाङ्मयांत " सर्वोत्तम " म्हणजे " राम " होत. ९ " देखिला " पा. म.

निगमगूज मुनीजन पाहती । सुखरुपीं स्वरुपीं मग राहती ।
अहंमती जगती जं[1]ग चोरलें । हरिजना सजना मनिं थारलें ॥ २ ॥

दशदिशा भरलें दुरिचा दुरी । दुरि म्हणों तरि तें मज अंतरीं ।
निरखितां नयनीं भरलें असे । प्रगटतां लपतां सरिसें [2]वसे ॥ ३ ॥

मृदपणें गगनाहुनि कोंवळें । कठिण तें कठिणांतर चाळिलें ।
उभयता उपमेहुनि वेगळें । वचन तें न फुटे मज आगळें ॥ ४ ॥

प्रिति सदा जडली मज निर्गुणीं । प्रगटला सगुणीं परतां[3] गुणी ।
[4]न कळतें कळलें मनिं भाविलें । न दिसतें नयनेंविण दाविलें[5]॥५॥

निरुपणें श्रवणें मननें मनीं । निकट तें वचनीं मग उन्मनी ।
अनुभवी वचनांतर जाणती । निजखुणे स्वखुणे मग बाणती ॥६॥

भय बहु स्वपनीं भरलें मनीं । निरसलें दुचितेपण जाउनी ।
स्मरण तें स्म[6]रलें परि नाथिलें । समसरी करणें देहे आथिलें ॥७॥

अचपळीं चपळु निजदास हा । विनटला नटला विचरे पाहा ।
अनुदिनीं वदनीं गुण गातसे । जनवनँविर्जनीं निज ध्यातसे ॥८॥

## ( ९१ ) उन्मनी पद

समजलें म्हणसी परि तें नव्हे । उमजलें म्हणसी तरि तें नव्हे ।
समजलें मज भासतसे मनीं । अचळ तें पाहातां पद उन्मनी ॥ १ ॥

सहज हें घडलें जडलें पाहा । अचळ तें समजे उमजे पाहा ।
विलसतें लसतें तितुकें पाहा । निवेदनें सदनें सकळै वाहा ॥ २ ॥

भर भरें भु[9]रेंरें बळकावतें । धर धरे न धरे मग कावतें ।
उचकलें चकलें तरि फावतें । बहु चका वचका चक भावतें ॥ ३ ॥

---

१ मूळ " वरी " होतें, त्याला हरताळ लावून वर " जग " लिहिलें. २ वरप्रमाणें " दिसे " चें " वसे " केलें आहे. ३ " पुरता " चें " परता " केलें आहे. ४ " सकळ तें " पा. म. ५ " थारलें " पा. म. हरताळ लावून वर " दाविलें " लिहिलेलें आहे. मूळ कदाचित् " थारलें " च असेल. ६ स्मरतें पा. म. ७ मागाहून कोणी वेलांटी काढून " वनी " केलें आहे. ८ " गमनीं " पा. म. ९ चेटूक.

जगीं पाहतां साच तें काय आहे । अती आदरें सर्व शोधूनि पाहे ।
पुढें पाहतां पाहतां देव जोडे । भ्रमें भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे॥८॥

## ( ८९ ) कृष्णपर

नटे नेटकें रूपलावण्य साजे । येमुनेतिरीं[2] रम्य राजे विराजे ।
अती मृद् वेणुस्वरें रंग माजे । आळापें जळा रोध आकाश गाजे॥१
उभा देउंढां[3] पाउलीं वोंशपाणी । ध्वनी गौल्य रागावळीची सिरोंणी[4] ।
तया खेचरें भूचरें लुब्ध जालीं । देहेभावनाहेत सुखें विरालीं ॥ २ ॥
पदें मूर्छना ताळ संगीत वाचा । उठे रागकल्लोळ सप्त स्वरांचा ।
उभे सर्व गंधर्व चकीत जाले । कळेना लिळा वेणु हा काय बोले॥३॥
पडे नाद कानीं तया पावयाचा । बहु जीव व्याकूळ गोपीजनाचा ।
अकस्मात हा नाद कोठूनि आला । तया नादमूळास नेऊनि घाला ४
सये[6] चीत हें चोरिलें वेणुनादें । मनु भेदिला साजणी नादछेदें ।
आवस्ता बहु लागली रूपवेधें । आहा रे असें काय केलें मुकुंदें॥५॥
उदासीन या वैभवें सीण वाटे । युगासारिखा दीन कोठें न कंठे ।
त्रिभंगीं उभें सावळें रूप ज्याचें । ठसावे मनीं ध्यान सर्वोत्तमाचें॥६॥
पदीं वक्र वामांग ठाणी विराजे । ग्रिवा वक्र बोटें ध्वनी वक्र वाजे ।
कटीं वक्रता भृल्लता वक्र पाहे । तया देखतां जीव थकीत राहे॥७॥
उभा वक्र हा देउंडां चक्रपाणी । जया शक्र भांबावला नक्र ताणी ।
सदा सेविती तक्र त्या विक्रयो ही । जगीं धन्य गौळी म्हणे दास तो ही

## ( ९० ) सुखसागर

विसरलों मज मी ममतागुणें । बहुत काळवरी दुख भोगणें ।
अवचिता सुखासागर भेटला । भवजळेंसरितापति आटला ॥ १ ॥

१ असा मथळा मर्ढेप्रतींत आहे. २ " तटीं " पा. म. ३ देहुडा, दीड. देउढां पाउलीं=दीड चरणीं ४ श्रेष्ठता. ५ स्वराचा चढउतार. ६ सखे. ७ तीन ठिकाणीं वांकलेलें. ८ ठसावे मनीं अंतरीं ध्यान त्याचें । पा. म.. हा पाठ बरा आहे, कारण सांप्रदायिक वाङ्मयांत " सर्वोत्तम " म्हणजे " राम " होत. ९ " देखिला " पा. म.

निगमगूज मुनीजन पाहती । सुखरुपीं स्वरुपीं मग राहती ।
अहंमती जगतीं जंग[1] चोरलें । हरिजना सजना मनिं थारलें ॥ २ ॥

दशदिशा भरलें दुरिचा दुरी । दुरि म्हणों तरि तें मज अंतरीं ।
निरखितां नयनीं भरलें असे । प्रगटतां लपतां सरिसें वसे[2] ॥ ३ ॥

मृदपणें गगनाहुनि कोंवळें । कठिण तें कठिणांतर चाळिलें ।
उभयता उपमेहुनि वेगळें । वचन तें न फुटे मज आगळें ॥ ४ ॥

प्रिति सदा जडली मज निर्गुणीं । प्रगटला सगुणीं परतां[3] गुणी ।
नें कळतें कळलें मनिं भाविलें । न दिसतें नयनेंविण दाविलें॥५॥

निरुपणें श्रवणें मननें मनीं । निकट तें वचनीं मग उन्मनी ।
अनुभवी वचनांतर जाणती । निजखुणे स्वखुणे मग बाणती ॥६॥

भय बहु स्वपनीं भरलें मनीं । निरसलें दुचितेपण जाउनी ।
स्मरण तें स्मरलें[6] परि नाथिलें । समसरी करणें देहे आथिलें ॥७॥

अचपळीं चपळ निजदास हा । विनटला नटला विचरे पाहा ।
अनुदिनीं वदनीं गुण गातसे । जनवनविर्जनीं[8] निज ध्यातसे ॥८॥

## ( ९१ ) उन्मनी पद

समजलें म्हणसी परि तें नव्हे । उमजलें म्हणसी तरि तें नव्हे ।
समजलें मज भासतसे मनीं । अचळ तें पाहातां पद उन्मनी ॥ १ ॥

सहज हें घडलें जडलें पाहा । अचल तें समजे उमजे पाहा ।
विलसतें लसतें तितुकें पाहा । निवेदनें सदनें सकळै वाहा ॥ २ ॥

भर भरें भुररें[9] बळकावतें । धर धरे न धरे मग कावतें ।
उचकलें चकलें तरि फावतें । बहु चका वचका चक भावतें ॥ ३ ॥

---

१ मूळ "वरी" होतें, त्याला हरताळ लावून वर "जग" लिहिलें. २ वरप्रमाणें "दिसे" चें "वसे" केलें आहे. ३ "पुरता" चें "परता" केलें आहे. ४ "सकळ तें" पा. म. ५ "थारलें" पा. म. हरताळ लावून वर "दाविलें" लिहिलेलें आहे. मूळ कदाचित् "थारलें" च असेल. ६ स्मरतें पा. म. ७ मागाहून कोणी वेलांटी काढून "वनी" केलें आहे. ८ "गमनीं" पा. म. ९ चेहूक.

विवरतां भरतां भरतां भरे । न धरतां धरतां धरतां धरे ।
तम दिने[1] सरतां सरतां सरे । उगवतां तरतां तरतां तरे ॥ ४ ॥
समजलें उमजे मनिचे मनीं । विहित तें करणें जनिचे जनीं ।
सगट तें न घडे वनभोजनीं । वरतलावरतोवरतेजनी ॥ ५ ॥
कस कसा नवसा हरिते तरी । वस वसा नवसा वरते वरी ।
घस घसा करितां जन पावनी । कठिणता न चुके तरि भावनी ॥६॥
कर करी सवरी वरि कावळा । अधम संगतिनें हिंण वावळा ।
हिणमती कुमती नर जावळों[2] । प्रगटला रवि तो दिन मावळा॥७॥
चळवळी सकळै तनु चालवी । विधी भुगोळ बळें चळ हालवी ।
चतुर तो चतुरा मन पालवी । गमतिनें गमती तम मालवी ॥८॥

## ( ९२ ) तुळजा माता

अघटीत तें तें उदंड केलें । विवंचितां तें समजोन गेलें ।
आतां दया कां नुपजे मनासी । तुळजे दयाळे दयाळ कैसी ॥ १ ॥
दयाळ होसी करिसी कुढावां[3] । समजोन गेला सामर्थ्ये यावा ।
थोडें जिणें हें वय वेर्थ गेलें । जगदेश्वेरी तां सनाथ केलें ॥ २ ॥
अन्याय माझे बहुसाल जाले । समजोनिया ते क्षमा च केले ।
अज्ञान तें बाळक काय जाणे । जननी करी तें कांहीं च नेणे॥३॥
संन्नीध माता परिं वोळखेना । वदवीतसे तें कांहीं कळेना ।
रडों च जाणे समजों च नेणे । मातेविणें तें मग दैन्यवाणें ॥ ४ ॥
अनाथनाथें जगदैकनाथें । संसारकोडें उगवीं समर्थे ।
निवेदनें मानस उगवीलें । भूमंडळीं तां मज धन्य केलें ॥ ५ ॥
मी काये फेडूं उपकार तुझा । तुझिये दयेचा संसार माझा ।
तुजवीण माझें कांहीं च नाहीं । येथार्थ आहे समजोन पाहीं ॥६॥

---

१ " दिसे " होतें, हरताळ लावून " दिने " केलें आहे. २ शेजारी. ३ रक्षण.

जगदांतरीं तूं मदांतरीं तूं। जगत्रइं तूं तूं तूं चि मी तूं।
येहलोक तूं तूं परत्र[1] तूं तूं। अगणीत तूं तूं सायोज्यता तूं॥ ७॥

## ( ९३ ) वैराग्य

किती येक ते लोक जन्मासि आले। बरें वोखटें सर्व पाहोनि गेले।
नवे लोक येती जुने लोक जाती। मिळे सेवटीं सर्व मातीस माती॥
किती बाळ गेले किती वृध गेले। किती येक तारुण्यमधें चि मेले।
किती काये कोणास हो आठवावें। उगें वाउगें वेर्थ पोटीं सिणावें॥
किती उत्पती स्छिती संव्हार होतो। सदा सर्वदा प्रत्यइ देखिजेतो।
पाहाती भले मोठमोठे तमासा। परी वासना बंद सोडील कैसा॥३॥
उदासीन होणार ते होति ना कां। दिगांतासि जाणार ते जाति ना कां
सवे लागली अंतरीं मोह माया। नवा[2] लोक जाईल कोठें पाहाया॥४॥
घडे धन्य वैराग्य तें भाग्य मोठें। घडेना तयाचें जनीं कर्म खोटें।
जळे हुर्पळे[3] वीवळेना पळेना। पळेना तरी दुख चिंता टळेना॥५॥
अकस्मात उदेग बेंचाड उठे। विवेकासि जाया पुढें वाट फुटे।
जनीं धन्य तो तापसी तीर्थवासी। मनीं जाणते राघवाचे उपासी॥६॥
जनीं सुरसंग्राम लाटीत दाटी। चपेटी झपेटी तपेटी तपेटी[6]।
तयाचे परी तापसी शूर मोठा। बळें लावितो लोभ लाटून वाटा॥७॥

## ( ९४ ) निस्पृह

अनेक वीघ्नें समर्थ वारी। आनेक चीन्हें[7] सकळै निवारी।
संन्नीध आस्तां मस्तावतां कां। साहेबकामीं खस्तावना कां॥१॥

---

१, "परलोक" चें हरताळ लावून "परत्र" केलें आहे. २ "नवे" चे "नवा" केलें आहे. ३ "वीवळे हुर्पळे कां" म. पा. ४ "चिंतिती" म. पा. ५ उपासक. ६ लपेटी झपेटी चपेटी तपेटी। म. पा. ७ "न्हें" ऐवजीं समासोंत "तां" लिहिलें आहे. हेतु "चिंता" म्हणावयाचा दिसतो.

साहेबकामाविण काम नाहीं । सर्वांअतीतु तो सांग कांहीं ।
अखंड रामार्पण वासना हे । तयासि सर्वैं शोधूनि पाहे ॥ २ ॥
स्वर्गांगनासीं सन्मुख आली । लावण्यरूपीं दृष्टी न घाली ।
मुक्ताफळीं शुक्र उघडी च रासी। परंतु आरण्य मिरासि त्यासी॥३॥
नाना श्रीमतीं कदापि येना । तथापि आला तरि तो थिरेना ।
बहूचकी भोजन तें जिरेना । उठोनि जातों परि आवरेना ॥ ४ ॥
उघडा फिरे जो पिशाच्य जैसा । कितेक प्राणी पाहाती तमासा ।
आशापाशीं पाडितां ही पडेना । धुंडूं जातां सर्वथा सांपडेना ॥५॥
भीक्षा मूळी पाहतां ब्राह्मणाची । भीक्षा नस्तां होतसे सर्व चीं चीं ।
भीक्षा मागें रक्षिली थोरथोरीं । आतां लज्या मानिली मूर्ख पोरीं ॥
भीक्षेमधें गुण उदंड अस्ती । वैरागी तो अहुणामाजि खस्ती ।
कर्ता भोक्ता देव तो मस्तहस्ती । अज्ञानाला वाउगी वेर्थ मस्ती ॥

## ( ९५ ) सार्थकता

जागा जागा धूर्त आधीं च जागा । लागा लागा भक्तिपंथें चि लागा ।
गा गा गा गा कीर्तनीं देव गा गा । मागा मागा भाव देवासि मागा ॥
वारा वारा वीवरा दृश्य वारा । सारा सारा सार्थकें जन्म सारा ।
तारा तारा लोक भावीक तारा । मारा मारा वासना दुष्ट मारा ॥
कुटा कुटा कोप कापट्य कुटा । लुटा लुटा नष्ट संदेह लुटा ।
सुटा सुटा घोर संसार सुटा । फुटा फुटा संतसंगें चि फुटा ॥ ३ ॥
रंगा रंगा अंतरंगें चि रंगा । तंगा तंगा कीर्तनाच्या तरंगा ।
गंगा गंगा वाहती ज्ञानगंगा । भंगा भंगा भ्रांतिचा भेद भंगा ॥४॥
तंडा तंडा प्रत्ययालागि तंडा । खंडा खंडा बंड पाषांड खंडा ।
दंडा दंडा निश्चळीं काळ दंडा । भंडा भंडा चुकवा लंड भंडा ॥
सेवा सेवा आदरें राम सेवा । देवा देवा मी नसें तूं चि देवा ।
हेवा हेवा भक्तिचा फार हेवा । रेवा[१] रेवा साक्षपें काळ रेवा ॥ ६ ॥

१ रेवणें=कंठणें.

## ( ९६ ) अहिल्या शिळा

रुसी गौतमें श्रापिली दिव्य बाळा। वनामाजि होसील तूं चंड सीळा।
कृपा भाकितां शब्द बोले तायासी[1]। म्हणे राघवाचे[2] पदीं मुक्त होसी॥
अहिल्या सिळा ते वनीं वाट पाहे। सदा सर्वदा राम चिंतीत आहे।
मला काळ आला म्हणे दैन्यवाणा। कृपाळुपणें कां न ये रामराणा २
वनामाजि येईल तो रामराजा। पदीं लागतां श्राप तुटेल माझा।
दिनानाथ तो जाणता अंतरीचा। कुढावा करीतो अनाथा दिनाचा ३
रघुनायकावीण कीती सिणावें। वना दारुणा माजि कीती[3] राहावें।
रुसी सर्व जाती सीतासैंवरातें। रघुराज येईल येणें चि पंथें॥४॥
बहु कष्टली शब्द कारुण्य बोले। पुढें सत्वर भाग्य तीचें उदेलें।
रुसी सर्व हि राम घेऊनि वेगें। निघाला[4] वना सीघ्र तेणें चि मार्गें॥५॥
पुढें राघवें देखिली चंड सीळा। पदीं लागतां जाहाली दिव्य बाळा।
अहिल्या सती मुक्त होऊनि गेली। तिनें राघवाची बहु स्तुती केली ६

## ( ९७ ) रामराज्य

असंख्या दळाचा आचाटा बळाचा। वदे सत्य वाचा जपु त्या सिवाचा
कुंवासा दिनाचा गुणी सज्जनाचा। प्रभु राम हा देव ब्रह्मादिकांचा१
बहु राज्यधारी जना सौख्यकारी। नव्हे तो विकारी गुणी येकिनारी।
सदा सत्यवादी असत्यासि खेदी। माहां दुष्ट तो दुर्जनाचा विरोधी२
बहु वृष्टि नाहीं अनावृष्टि नाहीं। कदा ही भुमी पीक सांडीत नाहीं।
जना दंड नाहीं तथा मार नाहीं। जरा मृत्य ना व्याधि कांहीं च नाहीं
पाहा बंद निर्बंद कोण्हा असेना। जनीं मछरु पाहातां ही दिसेना।
कुरूपी नसे शब्द कापट्य कांहीं। जनीं पाहातां वादवेवाद नाहीं॥[5]४

---

१ हस्तदोष असेल. "तयेसी" पाहिजे. २ "च्या पदें" असें होतें. ३ "कोणें जगावें" असा कांहींसा पाठ आरंभीं होता, त्यास हरताळ लावून प्रस्तुतचा पाठ केला आहे. "कोणा म्हणावें" असा मढेंपाठ. ४ "निघाले" म. पा. ५ नसे शोक ना वादवेवाद नाहीं। पा. म.

सुखानंद आनंद उल्हास वाटे। माहां सुकृती लोक धार्मीक मोठे।
बरा कौल[1] पाळी असा कोण कैचा। जगीं धन्य हा राम दाता दिनाचा
सदा सर्वदा न्याय अन्याय नाहीं। नसे हो भुमी वोस उदास कांहीं।
जगजंन्नकु राम राजा स्वभावें। म्हणे दास रायास कल्याण व्होवें ॥६

## ( ९८ ) समुद्रेश्वर[2]

ध्वजा गोपुरें सीखरें धर्मशाळा। भुयेरीं घरें वीवरें होमशाळा।
बऱ्या वोवऱ्या सुंदरा चित्रशाळा। विचित्रा बहु बांधल्या दीपमाळा ॥१॥
बहु सुंदरा स्छापिल्या विष्णुमूर्ती। महीमंडळीं धन्य रे धन्य कीर्ती।
बहुतें सिवाल्यें बहुतां परीचीं। बहु देव देवाळयें कुसरीचीं ॥ २ ॥
बनें फोफळी कर्दळी नारिकेळी। वनें आंबळी जांबळी रम्य वोळी।
बहु वृक्षयाती बहु पुष्पयाती। बहु कुंप बावी तळीं वोघ जाती ॥३॥
वनें पावनें जीवनें भुवनें तें। सुखें गोमुखें रम्य वृंदावनें तें।
तिरें सुंदरें बांधले सार वोटे। अकस्मात ते देखतां सौख्य वाटे ॥४॥
बहु अन्नदानें बहु वस्त्रदानें। बहु तोयदानें बहु भूमिदानें।
बहु रत्नदानें बहु द्रव्यदानें। बहुतांपरीचीं बहुसाल दानें ॥ ५ ॥
धनेंसीं मनें ईश्वरीं सर्व वेची। जगीं धन्य लोकोतरीं कीर्ति त्याची।
विशाळें स्छळें देउळें तें उदासें। समुद्रेश्वेरु पाहिला रामदासें ॥६॥

## ( ९९ ) दृश्य नानापरीचें

किती येक ते लोक नाना विकारी। किती येक ते तामसी[3] दुखकारी।
किती येक ते लोक नाना गुणाचे। किती येक ते हीण जाले हिणाचे १
किती येक आले किती येक गेले। किती येक ते स्वार्थ कर्ता चि मेले।
किती योगयागी किती भोगत्यागी[4]। किती येक ते वीतरागी विरागी
पुरें पट्टणें हाट बाजार पेंठा। बहु वस्ति नानापरी दाट खेटा।
वनें जीवनें भुवनें कुंप बावी। मतीची गती ते किती आठवावी ॥२

१ अभयवचन, करार. २ हें बहुधा रामेश्वराचें वर्णन दिसतें. ३ "शोकसंतापहारी" पा. म. ४ "किती येक यागी किती येक भोगी" पा. म.

सुखानंद आनंद उल्हास वाटे । माहां सुकृती लोक धार्मीक मोठे ।
बरा कौल[1] पाळी असा कोण कैचा । जगीं धन्य हा राम दाता दिनाचा
सदा सर्वदा न्याय अन्याय नाहीं । नसे हो भुमी वोस उदास कांहीं ।
जगजंनकु राम राजा स्वभावें । म्हणे दास रायास कल्याण व्होवें ॥६

## ( ९८ ) समुद्रेश्वर[2]

ध्वजा गोपुरें सीखरें धर्मशाळा । भुयेरीं घरें वीवरें होमशाळा ।
बऱ्या वोवऱ्या सुंदरा चित्रशाळा । विचित्रा बहु बांधल्या दीपमाळा ॥१॥
बहु सुंदरा स्छापिल्या विष्णुमूर्ती । महीमंडळीं धन्य रे धन्य कीर्ती ।
बहुतें सिवाल्यें बहुतां परीचीं । बहु देव देवाळयें कुसरीचीं ॥ २ ॥
वनें फोफळी कर्दळी नारिकेळी । वनें आंवळी जांबळी रम्य वोळी ।
बहु वृक्षयाती बहु पुष्पयाती । बहु कुंप वावी तळीं वोघ जाती ॥३॥
वनें पावनें जीवनें भुवनें तें । सुखें गोमुखें रम्य वृंदावनें तें ।
तिरें सुंदरें बांधले सार वोटे । अकस्मात ते देखतां सौख्य वाटे ॥४॥
बहु अन्नदानें बहु वस्त्रदानें । बहु तोयदानें बहु भूमिदानें ।
बहु रत्नदानें बहु द्रव्यदानें । बहुतांपरीचीं बहुसाल दानें ॥ ५ ॥
धनेंसीं मनें ईश्वरीं सर्व वेचीं । जगीं धन्य लोकोतरीं कीर्ति त्याची ।
विशाळें स्छळें देउळें तें उदासें । समुद्रेश्वेरु पाहिला रामदासें ॥६॥

## ( ९९ ) दृश्य नानापरीचें

किती येक ते लोक नाना विकारी । किती येक ते तामसी[3] दुखकारी ।
किती येक ते लोक नाना गुणाचे । किती येक ते हीण जाले हिणाचे १
किती येक आले किती येक गेले । किती येक ते स्वार्थ कर्ता चि मेले ।
किती योगयागी किती भोगत्यागी[4] । किती येक ते वीतरागी विरागी
पुरें पट्टणें हाट बाजार पेंठा । बहु वस्ति नानापरी दाट खेटा ।
वनें जीवनें भुवनें कुंप वावी । मतीची गती ते किती आठवावी ॥२

१ अभयवचन, करार. २ हें बहुधा रामेश्वराचें वर्णन दिसतें. ३ " शोकसंतापहारी " पा. म. ४ " किती येक यागी किती येक भोगी " पा. म.

कितीयेक तें भुवनें जाडजाडें । कितीयेक नानापरी वाड झाडें ।
कितीयेक तें मानवीं सीध केलीं । परी सेवटीं सर्व [1]भंगोन गेलीं ॥ ४ ॥
घडे येक येकीकडे [2]सर्व मोडे । घडे येक येकीकडे [2]सर्व वाढे ।
कितीयेक नानापरी होत जातें । पुढें सेवटीं सर्व पावे लयातें॥५॥
पथीं चालतां सुखदुखा शमावें । महीमंडळीं काय कीती पाहावें ।
म्हणे दास हें दृश्य नानापरीचें । किती होत जातें कळाकुसरीचें ॥६॥

## ( १०० ) शिका रे शिका रे

मनामाजि जो हेत तो चेतवावा । बरा गुण तो लागवेगें धरावा ।
धरेना तरी सर्वथा ही [3]धरेना । जनामाजि नेणीव ते ही हरेना ॥१॥
बरें जाणतां तें कळे सर्व कांहीं । मनें नेणतां हीत कांहीं च नाहीं ।
जनीं जाणतां सीकतां हीत [4]होतें । न सीके तरी वेर्थ आयुष्य जातें ॥२॥
सिकेना तरी त्यास कांहीं च येना । सिके तो गुणाला कदा जाउं देना ।
गुणें श्रेष्ट तो श्रेष्टसा वोळखावा । गुणेंवीण तो हीण जाणोन घ्यावा॥३
सिका रे सिका रे फिका जन्म जातो । नका रे नका रे [5]तुकां घात होतो
तुटे तुक त्या भीक ते ही मिळेना । गुणेंवीण लोकासि कांहीं कळेना॥४
गुणें पाविजेतें जनीं वैभवाला । विवेकी [6]विभांडीतसे [7]रौरवाला ।
कळों दे कळों दे मना नीवळों दे । वळों दे वळों दे अहंता गळों दे॥५॥
कळाया कळा निवळावें मनाला । पुसावें घडीनें घडी सज्जनाला ।
बरी वेळ जाणे बरा काळ जाणे । प्रसंगीं तये सर्व ही सौख्य बाणे ॥६॥

## ( १०१ ) रामावर भार

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं । नसे प्रेम हें रामविश्राम नाहीं ।
असा दीन अज्ञान मी दास तुझा । समर्था जनीं घेतला भार माझा॥१

१ "भोग भोगून गेलीं" पा. म. २ "येक" पा. म. ३ "सरेना" म. पा. ४ "पीक" म. पा. ५ तुक=वजन, महत्त्व. ६ जिंकीतसे. ७ मूळ शब्द उमजत नाहीं, त्यावर हरताळ लावली आहे. रौरव=नरक.

रघुनायेका जन्मजन्मांतरीचा । अहंभाव छेदूनि टाकीं दिनाचा ।
जनीं बोलती दास या राघवाचा । परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ॥२॥
दिनाचें उणें दीसतां लाज कोण्हा । जनीं दास दीसे तुझा दैन्यवाणा ।
सिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी । तुझा [1]दास पाहें सदा सीघ्रकोपी॥३॥
रघुनायेका दीन हातीं धरावें । अहंभाव छेदूनियां उधरावें ।
अगुणी तयालागि गुणी करावें । समर्थें भवसागरीं उतरावें ॥ ४ ॥
किती भार घालूं रघुनायेकाला । मजकारणें सीण होईल त्याला ।
दिनानाथ हा संकटीं धांव घाली । तयाचेन हे सर्व काया निवाली ॥५
मज कोंवसा[2] राम कैवल्यदाता । तयाचेन हे फीटली सर्व चिंता ।
समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें । सदा सर्वदा नाम वाचे म्हणावें॥६॥

## ( १०२ ) स्फूर्ति

हवाया नळे बाण भौंडीं[3] अनंतें । बळें सोडितां जाति आकाशपंथें ।
बती लागतां वेळ नाहीं उठाया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥ १ ॥
वरी पाहतां दृष्टि हे दूरि धांवे । तयाच्या [4]सवें कल्पना हे उठावे ।
उठे मारुती वेळ नाहीं उडाया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥२॥
फिरे वावरे वात सर्वांत जैसा । चळे नीवळे ही कळे पष्ट तैसा ।
धरीतां [5]बळें संधि नाहीं धराया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥३॥
विवेकी[6] विवंचूनियां लागवेगें । पॅळे सर्व ही दृश्य सांडूनि मागें ।
उपायें चि तो जाय लंघून माया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥४॥
असावें तरी सर्व कांहीं असावें । नसावें तरी लेश तें ही नसावें ।
परब्रह्म तें वीवराया वराया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥५॥
म्हणे दास रे वास भूतीं भुतांचा । तयाचे परी निर्गुणीं निर्गुणाचा ।
विचारें चि वीनासती अष्टकाया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया॥६

१ "तुझी वास" म. पा. २ आश्रय, आधार. ३ तोफा. ४ "तयाचे परी" होतें, वर हरताळ लावून "तयाच्या सवें" केलें आहे. ५ "बहुतापरी" म. पा. ६ "विवेकें" म. पा. ७ "बळें" म. पा. ८ "विवेकें" म. पा.

## ( १०३ ) काम

फळें तोये सांडूनियां थोरथोरीं । गिरीकंदरीं राहिजे निर्विकारीं ।
तया ऐसियां काम बाधून गेला । धरे धीर कैसा तया मानवाला॥१॥
सदन्नें वरी सद्य नानापरीचीं । रसाळें रसामाजि तें कुसरीचीं ।
जनीं भोजनीं जो मनीं त्रुप्त होतो । तया काम तो नष्ट कैसा राहातो ॥२
जऱ्हीं पक्षयाती खडे भक्षिताती । तया कामप्राप्ती नव्हे नित्य त्रुप्ती ।
माहा मस्त तो हस्त मारी चपेटे । तया येक संवछरें काम उठे॥३॥
मनीं काम तो काम सर्वांस लावी । मनीं नष्ट तो नष्ट सर्वांस भावी ।
मनीं पातकी पाप लावी जनाला । जनीं दोषिया निंदितो सज्जनाला॥
भले नष्ट पापी दुरात्मे चि कांहीं । जनीं पाहातां सारिखें येक नाहीं ।
बहु लोक हो ते बहुतां परींचे । भले ते हरीचे तथा दुर्भरीचे[2]॥ ५ ॥
म्हणे दास लोकांस कीती म्हणावें । हरीभक्ति सांडून कां वोसणावें ।
वदे फार बाजार तो कां वदेना । भला सर्व शोधून कां सार घेना॥६

## ( १०४ ) शाश्वताचा निश्चयो

म्हणे माय बाबा म्हणे बाप बाबा । जनामाजि दोघां जणा येक बाबा ।
म्हणे माय आई म्हणे बाप आई । जनामाजि दोघां जणा येक आई ॥१
रुसी बोलिले आपुलाले[3] वधूला । माहादेव तो बोलिला पार्वतीला ।
गुरु जाहले बाप भर्तार कैसे । देहे अष्ट ही निर्शतां भ्रांति नासे ॥२॥
गुरु सेवकांला देह्यातीत दावी । गुरुलागि तो शिष्य माणूस भावी ।
चळेना ढळेना कदां आकळेना । परब्रह्म तें पाहतां ही कळेना ॥३॥

---

१. हे दोन श्लोक वाचून भर्तृहरीच्या त्या श्लोकाची आठवण होतेः

विश्वामित्रपराशरप्रभृतयः वातांबुपर्णाशनाः ।
तेऽपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्टैव मोहं गताः ।
शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं भुञ्जन्ति ये मानवाः ।
तेषामिंद्रियनिग्रहो यदि भवेद्विन्ध्यस्तरेत्सागरम् ॥

२ दुर्भर=पोट. ३ " ल्या " चा " ले " केला आहे. ४ " मना " म. पा
५ " सांगतां " म. पा.

देह्यातीत देह्यास लाऊनि पाहे । तया कर्दमें संदेह वाढताहे ।
विवेकें करावा वरा तत्वझाडा । विचारें चि नेमस्त होतो निवाडा ४
देहेमात्र तो येकला चालवीतो । देहेमात्र तो येकला हालेवीतो ।
बहु बोलवी चालवीतो पाहातो । करी सर्व सांभाळ सेखी राहातो ॥५
चळों लागलें तें कदा ही तगेना । कितीयेक माइक कांहीं जगेना ।
म्हणे दास वीचार आधीं पाहावा । मनीं निश्चयो शाश्वताचा राहावा६

## ( १०५ ) हनुमंत

चपळ ठाण विराजतसे बरें । परम सुंदर तें रुप साजिरें ।
धगधगीत बरी उटि सेंदुरें । निकट दास कपी वीर हें खरें ॥ १ ॥
कपी वीर जेठी उडे च्यारि कोटी । गिरी द्रोण दाटी तळाथें उपाटी ।
झपेटी लपेटी करी पुछ्यवेष्टी । त्रिकुटाचळी उठवी वीर कोटी ॥२॥
रघुविरा समिरात्मज भेटला । हरिजना भजनांकुर फूटला ।
कपिकुळें सकळें मिनलीं बळें । रिपुदळें विकळें वडवांनळें ॥ ३ ॥
कपी वीर तो लीन तल्लीन जाला । प्रसंगें चि पाहोन सन्मुख आला ।
हनुमंत हें पावला नाम तेथें । महीमंडळीं चालिलें सर्व येथें ॥४॥
नव्हे सौम्य हा भीम पूर्णप्रतापी । देहे आचळातुल्हे हा काळरूपी ।
पुढें देखतां दैत्यकुळा दरारां । भुतें कांपती नाम घेतां थरारां ॥ ५ ॥
सिमा सांडिली भीमराजें विशाळें । बळें रेंटिले दैत्य कृदांत काळें ।
गजा मस्तकीं केशरीचा चपेटा । माहां रुद्र तैसा विभांडी त्रिकूटा ६

## ( १०६ ) राम कोदंडधारी

जेणें ताटिका पीटिली नीजबाणीं । आरीकाळ वीशाळ कोदंडपाणी ।
जेणें त्रासिला राव त्रीकूटवासी । बळें भग्न केलें तया भार्गवासी ॥१

१ "बो" वर हरताळ लावून "हा" केलें आहे. मढेपाठ "बोलवीतो" च आहे. २ प्रथम "खाला" पडलें होतें, "खा" खोडलेला आहे व बाजूला "हा" लिहिला आहे. "पोथा" पहातां त्यांत "आला" असें आहे. ३ तुल्य. पर्वतप्राय. ४ जिंकी.

प्रतापें दिसे आगळा राजयोगी। उभासे रिसां वानरां मध्यभागीं।
दळेंसीं बळें जातसे रामराजा। बळें सिंधु पाला[1]णिला देवकाजा॥२॥
उभा कोण हा राम कोदंडधारी। दिसे साजिरें रूप लावण्य भारी।
पदस्पर्श होतां सिळा दिव्य नारी। लिळा सागरीं शैल्यें[2] पाषाण तारी३
रुपें सांवळा राम कोदंडपाणी। गुणें आगळा सर्वलावण्यखाणी।
लिळा वेष हा धीर गंभीर पाहे। मना अंतरीं राम चिंतीत राहें॥४॥

## ( १०७ ) आशा प्रपंचीं

आशा प्रपंचीं जंवं दृढ आहे। तंव राम चित्तीं कदा न राहे।
आसक्त कामीं मन[3] हें विटेना। तंवं संशयो ही[4] कदा तुटेना॥ १॥
आशा दुराशा मज सांडवेना। निष्काम कामीं मन हें विटेना।
भक्ती घडेना मज आवडेना। दासांसि वैराग्य तें ही असेना॥२॥
काये करावें देवाधिदेवा। अभिमान घेतो करूनि हेवा।
स्वामी बळें हा गुण पालटावा। देऊनि भावा दवडीं अभावा॥३॥
सर्व पाप भवताप हारी। नामछेद[5] मतिमंद तारी।
सर्व गर्व आभिमान वा[6]री। निजदासदुरितें निवारी॥ ४॥

## ( १०८ ) ग्रन्थ कोट्यानकोटी।

जगीं पाहतां ग्रंथ कोट्यानकोटी। किती संस्कृतें देशभाषा मऱ्हाटी।
कितेकी[7] किती निश्चयो होत आहे। परी तुळणा ज्ञानमार्गा न साहे॥
तया ज्ञानमार्गामधें प्रत्ययाचें। पाहतां बरें बोलणें पष्ट कैचें।
किती येक ग्रंथीं गथागोवि जाली। बहु निश्चयो येक बुधी बुडाली॥

१ " ल्हा " वर हरताळ लावून " ला " केला आहे. पालाणणें=आच्छादणें, सेतु बांधणें. २ कठीण, जड. ३ ' मन हें विटेना ' ऐवजीं ' जव हें सुटेना ' असा मढेंपाठ. ४ ' ही कदा तुटेना ' ऐवजीं ' हा सहसा तुटेना ' असा मढेंपाठ. ५ श्रीसमर्थवाङ्मयांत " छंद " लिहावयाचें तें " छेद " असें लिहिलेलें सर्वत्र आहे. वाचतांना " छंद " म्हणून च वाचावयाचें. ६ हरताळ लावून " मारी " चें ' वारी ' केलें आहे. मढेंपाठ " मारी " च आहे. ७ मुळांत एक " की " गळालेली आहे. हस्तदोष असावा.

जनीं साधकें पाहतां काये ध्यावें। सदा संशयामाजि कीती पडावें।
खरा देव तो मुख्य ठाईं पडेना। म्हणोनि जगोधार तेणें घडेना॥ ३॥
जगीं अल्प ते चुकती कारणाला। नसे धारणा सर्व साधारणाला।
किती येक नानापरीचीं पुराणें। ठके लोक मतांतरीं साभिमानें॥४॥

## ( १०९ ) सावध होईं

जन सर्व ही भुलले कामरंगें[१]। वय वेचलें कामिणीचेनि संगें।
अती क्षीणता पावली सर्व आंगें। परस्तावलें[२] मानसीं रंगभंगें॥१॥
नरें किंकरें बापुडीं दैन्यवाणीं। देह्या येउनी जाहली थोर हाणी।
वय वेचितां ना मिळे लक्ष कोटी। दिसा लुटिलें चोरटीं भ्रांति मोठी २
किती वाहसी वेर्थ काबाड वोझें। विचारून पाहें येथें कोण तुझें।
होईं सावध कासया भुललासी। अंतीं येकला सर्व सांडूनि जासी॥३
किती सांगणें हें चि हें वीटवाणें। अंतीं येकलें सर्व सांडूनि जाणें।
बहु बोलतां वीट वाटे जनाला। अकस्मात येईल रे येमघाला॥४॥

## ( ११० ) सर्वोत्तमा कै मज भेटि देसी।

दुःखानळें मी संतप्त देहीं। तुजवीण रामा विश्रांति नाहीं।
आधार तुझा मज मी विदेसी। सर्वोत्तमा कै मज भेटि देसी॥१॥
प्रालब्ध खाटें[३] अभिमान आला। स्वामी समर्था वियोग जाला।
तेणें बहु क्षीति वाटे मनासी। सर्वोत्तमा कै मज भेटि देसी॥२॥
तुझिया वियोगें बहु वेधना[४] रे। विवेक नाहीं आम्हा दिना रे।
पडिला समंधु या दुर्जनेसीं। सर्वोत्तमा कै मज भेटि देसी॥ ३॥
संसारचिंता मज वाटते रे। रामा प्रपंचीं मन जातसे रे।
संसर्ग आहे इतरां जनासीं। सर्वोत्तमा कै मज भेटि देसी॥ ४॥

---

१ "सं" वर हरताळ लावून "रं" केलें आहे. २ "लो" चें "लें" केलें आहे. ३ तिरसट, कठोर. ओबडधोबड या अर्थी "खाट" असा शब्द आहे; पण बहुधा "खोटें" ऐवजीं हस्तदोषानें "खाटें" पडलें असावें, असें वाटतें. "खोटें" असा च मढेंपाठ आहे. ४ "ने" चा "ना" केला आहे.

## ( १११ ) जबर्दस्त

जबर्दस्त तो मस्त गाजी नवाजी। खबर्वेस्त ते सुस्त भाजी च भाजी।
ठिके चामके नेटका उंच वाजी। निकामी तट्टु कोण त्याला नवाजी॥
पडे मान तेव्हां जनीं मान देणें। नव्हे मान तेव्हां जिणें दैन्यवाणें।
मनामाजि मानेल तें तें करावें। परी लागतें सर्व ही निस्तरावें॥२
जनीं[1] धूर्त तो तुर्त वर्ते प्रवर्ते। किती येक ते लोक सर्ते न सर्ते।
किती येक तारांगणामाजि वर्ते। जगीं धन्य जे आपुलें हीतकर्ते॥३
तना कष्टवीना मना कष्टवीना। पुढें होय संसार हा दैन्यवाणा।
किती कष्टती नष्ट भ्रष्टोन जाती। किती येक ते वाढवीती महंती॥४

## ( ११२ ) जिणें दैन्यवाणें

नसे तोल ते बोल कंटाळवाणे। बहु बोल ते फोल सर्वत्र जाणे।
बहुं[2] बोल तैसे येथातथ्य चाले। बहु लोक धाले निवाले निवाले॥१
बहु धूर्त[3] कांही करंटा असेना। करंटा तरी धूर्त पुर्ता दिसेना।
मनें धूर्त पुर्ता तनें तूर्त पुर्ता। सदा सर्वदा येत्न पुर्ता सपुर्ता॥२॥
बहु रीण तें हीण माणूस जाणा। नव्हे सार संसार हा दैन्यवाणा।
पराधेन दारीद्र मोटी फजीती। चुडु चांचुडुनें बहु लोक जीती॥३॥
पोटें पोटें नासिलें काम खोटें। खोटें खोटें पाहतां हें चि खोटें।
नानाकारी वासना हे विकारी। नित्यानित्यें होतसे निर्विकारी॥४

## ( ११३ ) अद्वैतचर्चा

अद्वैतचर्चा जंव हे कळेना। विकल्प भ्रांती तंव हे टळेना।
प्रत्ययेविणें तों मन तें वळेना। श्रीराम भक्तीविण आकळेना॥१॥
कर्ण घ्राण विषय इंद्रिय पंचकें। पंच भूत गुण पांच पंचकें।
पिंड देहे द्रुय तत्व बोलिजे। ब्रह्म कोश समतुल्य जाणिजे॥ २॥

१ मुळांत "जीनी" आहे, तो केवळ हस्तदोष वाटतो. २ "मुखें" म. पा.
३ "दक्ष" म. पा.

अद्वैतचर्चा कंटाळवाणी । सांडूनि वर्णी कोदंडपाणी ।
कैळासवासी ठेवा प्रभूचा । अलभ्य हा रे सकळांसि कैचा ॥ ३ ॥
अद्वैतचर्चा गुरुगम्य आहे । कळे म्हणे तो सहसा न लाहे ।
चोरूनि जागे हृदईं अहंता । कळे म्हणे त्या न कळे चि भ्रांता॥४॥

## ( ११४ ) दुनिया

हमेशा तमाशा बडा है दुन्यका । घडीमें दमामे घडीमें चि फाखा ।
खुसीहाल रंजीस होतें चि ज्यातें । बडे जोरथी सब्र दुन्या लुट खाते ॥
बडे मस्त हाथी चले भार श्वारें । गलोले बडे बाण गाड्या कर्तारे ।
सिले टोप ढाला दमामे नगारे । बडे चौघडे धींग कर्णे तुतारे॥२॥
चेलावे दुन्याई खडी पातशाही । बडी तल्ब आई काहांकी दुन्याई ।
खुसीहाल चेंगा चेले उठि नंगा । बुरे फेलसें सींस बाजे वंडगा॥३॥
फिकीर सब सहोरे जिकीरमें रहो रे ।नको बख्त बाजी सबो ज्यात हारे
नको बेहुशारी धरो खबर्दारी ।दुन्या धुंद सारी खुदाई हमारी ॥४॥

## ( ११५ ) फुलांचे हार

बहु चांगलीं त्या तरूचीं गलंडें । लघु थोरलीं दाटलीं तें उदंडें ।
क्षुधाहारकें कारकें तें नव्हेती । नसे शब्द माधुर्य तें सेवितातो॥१॥
फुलें हार माळा बहुतां परींच्या । तुरे घोष जाळ्या बहु कुसरीच्या ।
दुधारें तिधारें चतुर्वीध धारें । किती हार शृंघारले वाड धारे ॥२॥
बहुतां परीचीं बहु रंगवर्णें । किती गुंफिलीं रंगवर्णें सुवर्णें ।
झबे झेल बासींग वोली फुल्यांच्या ।
लघु कंचुक्या टोप कुंच्या मुलांच्या ॥ ३ ॥

## ( ११६ ) प्रसंग बरा वाईट

न जावें चि तेथें चि लागेल जावें । न खावें चि जें तें चि लागेल खावें ।
वदावें चि ना तें चि लागे वदावें।स्वभावें चि निर्माण केलें चि देवें १
प्रसंगें घडे तें चि मानून घ्यावें । अहंतागुणें दुखशोका न घ्यावें ।
पुढें काय होईल तें तें पाहावें । विवेकें चि ज्ञानें चि सुखें राहावें॥२॥

१ उंटांची रांग.

देहेभोग होणार कांहीं सुटेना। जनाच्या मना सांगतां ही तुटेना।
म्हणे दास उदास कांहीं न व्हावें। बरें वोखटें सर्व साहोनि न्यावें॥३॥

## ( ११७ ) ज्ञानमार्ग

मतीमंद रे दंद[1] त्याचें सरेना। अती मूढ त्या गूढ माया हरेना।
बहु तर्क या ज्ञानमार्गासि व्हावा। अती साक्षपु श्रवणाचा करावा॥१
बहु जाणता पुसणें सर्व जाणे। परी साधकां मार्ग दाऊं च नेणे।
असा संत जो अंत नेदी मनाचा। तजा रे तजा संग त्या कृपणाचा॥२
जना सांगतां ऐकतां जन्म गेला। परी आपुलाला स्वयें घात केला।
मनीं अर्थ कीमर्थ हें स्वार्थबोझें। जना लाजवीना तुला चीत तुझें॥३॥

## ( ११८ ) सुपुत्र

क्रियेवीण पाषांड तें नोवलावें[2]। क्रियेवीण थोतांड तें ही तजावें।
सदा सर्वदा भक्तिपंथें चि जावें। सुपुत्रें बळें पूर्वजां उधरावें॥ १॥
मनीं गर्व हा सर्व सांडून द्यावा। अहंभाव तो वाव जीवीं नसावा।
माहांघोर संसार हा निस्तरावा। बरा गुण तो आदरेंसीं धरावा॥२॥
जिणें तें चि जें कीर्तिरूपें चि ज्यावें[3]। कळेना अकस्मात कोठें मरावें।
देहे चालतें हें चि आश्चीर्य आहे। जनीं पाहतां कीर्ति जे ते चि राहे॥३

## ( ११९ ) रामनवमी

वाजंत्रांचा जाहला येक मेळा। सर्वत्रांचा दाटला गच पाळा[4]।
नामें ताळी गर्जती अंतराळा। पाहों जातां अष्टमी धन्य वेळा॥१॥
नौमीमध्यें मौन सर्वत्र जालें। पाहों जातां भाग्य हातासि आलें।
जाणा जाणा जाणतां सर्व जाणा। नेणा नेणा नेणतां[5] खुण बाणा॥२॥
मोन्यामध्यें पाहिजे वाचणारा। अर्थामधें[6] भीजतो जन्म सारा।
वाचाना कां सर्व पानें फुकाचीं। काचीं काचीं माणसें सर्व कांचीं[7]॥३॥

---

१ द्वंद्व. २ बोलूं नये. श्रेष्ठांनीं हि हा शब्द योजिलेला आहे. श्रेष्ठांची स्फुट कविता अकरावी पाहणें. ३ जगावें. ४ समुदाव. ५ "धन्य ते सुख" म. पा. ६ अर्थामध्यें पाहिजे भीजणारा। म. पा. ७ मढेंवाडांत या तीन श्लोकानंतर पुढील १३४-५३ हा श्लोक चवथा म्हणून दिलेला आहे.

## ( १२० ) गय—अनास्था

गई लेखनाची गई काजळाची । गई कागदाची गई पुस्तकाची ।
गई वाचण्याची गई शोधण्याची । गई सर्व कामा नये कारणाची ॥१॥
सदा सर्वदा पाठ कांहीं करीना । कदा ऐकिली गोष्टि जीवीं धरीना ।
उगा वेर्थ खातो उगा काळ जातो ।
निकामी रिकामा रिकामा चि जो तो ॥ २ ॥
निबुधी करंटें करंटें निबुधी । नसे अल्प बुधी कुबुधी कुबुधी ।
कळेना वळेना कळेना कळेना । तया सर्व कांहीं फळेना फळेना ॥३॥

## ( १२१ ) दीक्षा

रघुनाथगोष्टी करा सर्व सृष्टीं । सदानंद वेष्टी महंतीस पुष्टी ।
परब्रह्म वेष्टी नव्हे जीव कष्टी । मनीं राम वेष्टी वळें काळ घष्टी ॥१॥
क्रिया सर्व वेस्ती नको योगसुस्ती । फिरे काळ गस्ती कळेना फिरस्ती।
पुढें होत खस्ती नसे पुण्यपुस्ती । भल्यामाजि वस्ती करा रे समस्तीं २
मनामाजि दीक्षा बरी भव्य दक्षा । आचारासि रक्षा विचारें परीक्षा ।
सदा सत्य पक्षा करीतो अपेक्षा । अपेक्षा उपेक्षा निराकार लक्षा ॥३॥

## ( १२२ ) अलक्ष

अलक्षा विलक्षा तितिक्षास लक्षा । अपेक्षा उपेक्षा सुपक्षासि रक्षा ।
तितिक्षा न रक्षा सपक्षा परीक्षा । कुवक्षासि सीक्षा मुमुक्षासि दीक्षा ॥१
लक्षा लक्षा लक्षलक्षा अलक्षा । दीक्षा दीक्षा दीक्षदीक्षा परीक्षा ।
पक्षा पक्षा पक्षपक्षा उपेक्षा । भीक्षा भीक्षा भीक्षभीक्षा अपेक्षा ॥२॥
कर्ता कर्ता कर्तकर्ता चि कर्ता । धर्ता धर्ता धर्तधर्ता चि धर्ता ।
भर्ता भर्ता भर्तभर्ता चि भर्ता । वर्ता वर्ता वर्तवर्ता चि वर्ता ॥३॥

## ( १२३ ) हरिकीर्तन

कळीमाजि भूमंडळीं सार आहे । हरीकीर्तनें दोष कोठें न राहे ।
पवित्रें चरित्रें रघुनायेकाचीं । धरावीं मनीं आदरेंसीं फुकाचीं ॥१॥
हरिकथाश्रवणें हरि सांपडे । सकळ सारकथा श्रवणीं पडे ।
परम दुल्लभ तें पाहाणें घडे । अहंमता ममता मग वीघडे ॥ २ ॥

## ( १२४ ) बाळका चाळवावें

जानुमधें घालिती जीव[1] पोळी । पोटामधें वाढती वृक्ष जाळी ।
पाहों नये पाहतां नेत्र जाती । पुसों जातां कावळे सीवताती ॥ १ ॥
बाउ बाउ बाळका चाळवावें । मिथ्या वादें अर्भकाला वळावें ।
हें तों कांहीं जाणत्यालागि नाहीं । पाहीं पाहीं सार शोधूनि पाहीं ॥२॥

## ( १२५ ) इति श्री

इति श्री पुढें पंचभूतांसि होते । इति श्री त्रिगुणासि होऊनि जाते ।
इति श्री समस्तांसि होणार आहे । इति श्री नव्हे तें चि शोधूनि पाहें ॥
इति श्री नव्हे तें जनीं वोळखावें । विवेकें विचारूनि जाणोनि घ्यावें ।
नव्हे जाणिजेसें नव्हे नेणिजेसें । निराकार तें ब्रह्म आकार जैसें ॥

## ( १२६ ) धान्य वगैरे

चणे नाचणे पावटे तीळ राळे । मसुरा तुरी लांक चौळे हुलौळे ।
मुग्या मुग मटक्या गहुं भात सातु । जव्या जोंधळे सज्गुरे उंच भातु ॥
किती केळ नारेळ नाना परीचे । बहु युक्ष दाळींब मेवे तरीचे ।
खलेलें तुतें सेपं अंजीर बोरें । बहु खबुंजें तबुंजें थोरथोरें ॥ २ ॥

## ( १२७ ) ब्रह्मांडमाळा

नभीं मोहरीतुल्य पाषाण पाहे । वरी टाकितां अंतराळीं न राहे ।
गिरीसीखरें भार[3] आहे भुगोळा । कसी राहिली सर्व ब्रह्मांडमाळा ॥
तळीं वात वातावरी तेज आहे । वरी आप आपावरी शेष पाहें ।
धरी मस्तकीं तो लिळेनें भुगोळा । असी राहिली सर्व ब्रह्मांडमाळा ॥

## ( १२८ ) नामाभिधानें

गणोजी गुणोजी जिवाजी सिवाजी ।
तुकोजी भिकोजी सिकोजी मुकोजी ।
सिदाजी पदाजी कुमाजी लुमाजी । तुबाजी तबाजी तमाजी दमाजी ॥

---

१ मौंजीबंधनाचे वेळीं मांडीमध्यें बेडुक व पुरणाची पोळी घालतात. २ हरताळ लावून वर 'प' आहे. मूळ 'ब' होता. मर्डपाठ. 'सेव' असा च आहे. ३ 'नाद गेला' असें होतें. त्यावर हरताळ लाविली आहे.

सुरोवा मुरोवा विरोवा नऱ्होवा। पिलोवा चिलोवा धुळोवा निळोवा।
धनोवा मनोवा जिनोवा विनोवा। टिकोवा ठकोवा बिरोवा हिरोवा ॥

## ( १२९ ) सायोज्यतेची वाट

अती क्रोध त्या बोध होणार नाहीं। अती बोध त्या क्रोध येणार नाहीं
अती शांति त्या भ्रांति येईल कैची। अती लीनता वाट सायोज्यतेची॥
अती आदरें शांति होईल नेमें। अती शांति त्या दंडळीना विरामें।
अती खोल तो बोल बोलेल कैचा। असा आंखिलों मुक्तिसायोज्यतेचा

## ( १३० ) मुक्तता आणि बद्धता

अती वीषयो तो चि तो बध जाणा। कुडी वासना बापुडा दैन्यवाणा।
मना कल्पना वीषईं त्रास आला। तो गे तो चि तो मानव धन्य जाला॥
जनीं मुक्तता बधता वीषयांची। जनीं वासना गुंतलीसे जयाची।
तया भोगणें लागती जन्म कोटी। नको रे मना यातना ते चि मोटी॥२

## ( १३१ ) गुहा

येकांत गुन्हा निर्वात जेथें। चर्चा करावी अद्वैत तेथें।
संसर्ग खोटा इतरां जनांचा। जयांस नाहीं वर सज्जनाचा ॥१॥
सत्संगती ज्या नरांसि नाहीं। ते पापरूपी पडती प्रवाहीं।
संदेह चीतीं सहसा टळेना। सीधांत साधुविण आकळेना॥ २ ॥

## ( १३२ ) मिथ्या भास

मिथ्या भासें अंतरीं धाक वाटे। धाकें धाकें सर्वदा प्राण फुटे।
स्वप्नाकारें भेदरे वोसणातो। जागा होतां धाक सोडूनि जातो ॥१॥
मरे वोसरे ते रमा काळयोगें। अकस्मात सामर्थ्ये जाते प्रसंगें।
बहु तोलदारी पुढें तो भिकारी। कळेना कसा काळ नाना विकारी॥२

१ " दांती ते " म. पा. २ नेमस्त केला.

## ( १३३ ) नवांकित

धरा स्वास मार्तंड कोदंड पाहे । कळाहीण कां अंतरीं काये आहे ।
पडे मेघ वीदुल्यता गर्जताहे । नवांकीत होऊनियां स्छीर राहे ॥१॥
अहं कूर्म धर्ता चि सत्ता स्वभावें । तया नेणती देव त्या या न ठावें ।
लिळा वन्हि वायो प्रतापें गडाडी । बळें सागरामाजि तैसा धडाडी ॥

येकुन ९४१

## ( १३४ ) स्फुट श्लोक

अरे उधवा[1] माधवा काये केलें । हरीवीण कां वेर्थ आयुष्य गेलें ।
कळेना तुला ज्ञान तुझें जळालें । तुझे प्रीतिचें सौख्य कोठें बुडालें ॥१॥
आर्धी आर्धी मूळ आर्धी च आर्धी । साधीं साधीं मुख्य तें तेंचि साधीं ।
सारासारा शुध आर्धी विचारा । नित्यानित्यें पाविजे निर्विकारा ॥२॥

अभागी किती लोक भाग्यासि आले ।
कितीयेक ते भाग्य निर्भाग्य जाले ।
कितीयेक ते सुकृती वाढताती ।
कितीयेक ते पातकी मोडताती ॥ ३ ॥

अनघडां दगडा विघडां घडां । अनघडां न घडां विघडां गडां ।
तडतडां विधडां दुघडां धडां । कडकडां चि कडां उकडां पडां ॥४॥
आला आला जीव जन्मासि आला । जाला जाला वाढला थोर जाला ।
केला केला व्याप उदंड केला । गेला गेला बापुडा वेर्थ मेला ॥ ५ ॥
अकस्मात मार्गे भुमीकंप जाला[2] । नभामाजि तारेंसि सेंडा निघाला ।
तदारभ्य भूमंडळीं धुंदि जाली । नसे न्याय ना नीति सर्वै बुडाली॥६
अनेक शास्त्रीं पाहतां पडेना । आयुष्य थोडें पाहाणें घडेना ।
विश्वास येके वचनीं धरावा । संसार हा दुस्तर नीरसावा ॥ ७ ॥

---

१ उद्धव हे श्रीसमर्थशिष्य व माधव हे उद्धवांचे शिष्य, त्या उद्धवमाधवांनाच जणूं श्रीसमर्थ उपदेशितात. २ श्रीसमर्थांच्या पूर्वकालीं भुमिकंप केव्हां झाला होता व शेंडें नक्षत्र केव्हां निघालें होतें याचा शोध केला पाहिजे.

अलगट हटवादी वानरवेशधारी ।
वन कडकड मोडी मोडितां भुभुकारी ।
बळकट अखया तो देखोनीयां धिकारी ।
वधुनि अवलिळेसी जाळिली हेमपुरी ॥ ८ ॥

असे अर्थ तें सार्थकें धन्य होतें । नसे अर्थ तें बोलणें वेर्थ जातें ।
कणेंवीण कावाड तें वेर्थ जाणा । बरें शोधितां ही नसे येक दाणा॥
असे सार मुक्तांफळां जन्म जेथें । सदा सर्वदा दर्प सुगंध तेथें ।
फणत्कारती भक्ति आरंभ दोनी । अती साजिरे भव्य मार्तंड तीन्ही ॥
आनीळा आरीचा आरीरूढ होतो । तया पौत्रसुता अरीलागि ध्यातो
असा जो विषारी तयाच्या सुताचें । स्मरावें अती आदरें नाम त्याचें ॥
आनंदवेळ मनिची मन वेळ वाहे । उल्हास वास भरला गगनीं न [1]साहे
बेफाम सोहरकती दुरमारकुते । मार्तंड भैरव करी तरि काम फते ॥१२

अहा हा अहा हा अहा हा चि हा हा ।
हालाहा लाहाहा लाहाहा चि हा हा ।
पाहा हा पाहा हा पाहा हा चि पाहा ।
माहां हां माहां हां माहा हां चि माहां ॥ १३ ॥

आजी माता सुंदरी ते चि कन्या । [2]असे सासु माउसी ते चि धन्या ।
असें आतां पाहतां सीध आहे । पाहें पाहें तूं चि होऊनि राहे ॥१४॥

अक्रा अक्रा अक्र अक्रा अकक्रा । शक्रा शक्रा शक्र शक्रा शकक्रा ।
नक्रा नक्रा नक्र नक्रा नकक्रा । वक्रा वक्रा वक्र वक्रा वकक्रा ॥१५॥

[3]उठे घोष ज्या मंदिरीं रामनामें । जळो संपदा जाळिं ते हेमधामें ।
जळो बोल ते फोल वाचाळज्ञानी । नसे मानसीं राम कैवल्यदानी १६

कल्याणकारी निजहीतकारी । आनंदकारी अतिसौख्यकारी ।
परोपकारी निज निर्विकारी । कोदंडधारी लीळावतारी ॥ १७ ॥

---

१ "राहे" पा. म. २ मढें प्रतींत "आसे" चे "आजे" केलेलें आहे.
३ "नुठे" पाहिजे.

करावी हरीभक्ति ते पर्वकाळीं। येथासांग रे अन्न खावें सुकाळीं।
वरा काळ कांहीं अखंडीत नाहीं। बहु लोक गेले विचारूनि पाहीं१८
किती घालणें भार या देवराया। पडो रे वनामाजि हे सर्व काया।
आहा रे मना तुजला काये जालें। रघुनायेका तां बहु कष्टवीलें॥१९
करें पूजन राघवाचें करावें। पदें राघवा आश्रमासी च जावें।
बरें कर्णबीळीं कथे ऐकवावें। सदा सर्वदा साधुसंगीं बसावें॥२०॥
करी लौकरी चाकरी भाकरीला। तयाचे परी कां करीना हरीला।
मुखें वीवरीनावरीनावरीला। तरी नीरवीलादरीलादरीला॥ २१॥
क्रूरां अक्रूरां दीधलें नाम जेणें। तया पाहतां सर्व च्यातुर्य उणें।
तया नीर्दयाला दयाळु म्हणावें। गुणेंवीण गुणास कैसें गुणावें॥२२
कुटीळ प्राणी सत्रा सिरोंणी। कापट्यत्राणी मुखीं पोहोंणी।
तो कागपक्षी क्षुद्रें चि लक्षी। अमेद भक्षी क्षतें परीक्षी॥ २३॥
कसें ठाण लावण्य या राघवाचें। करीं चंड कोदंड या भार्गवाचें।
जया उदरीं जन्मला शंकरारी। उभी साजिरी मूर्ति लीळावतारी२४
करा तर्क कर्डा कुतर्कास खर्डा। विधी घट्य गर्डा कुडा भाव पर्डा।
पडे देह दर्डा विवेकासि वर्डा। करा लोभ नर्डा विकल्पासि भर्डा२५
कामीं जयाची सुखदृष्टि राहे। पंडीत तो ही घन गर्जताहे।
रामीं मिळाली अती धन्य जाली। वैशी वैकुंठा न पढोन गेली॥२६
क्रियेचें कटाळें तुळे धर्मशास्त्रीं। तथा वा प्रसंगार्थ वेदांत मंत्रीं।
वनीतामँता नीति रक्षीत दोघीं। जसा सिंधु आदित्यआज्ञा नुलंघी॥
किती येक ते पाहतां फार खोटे। किती येक ते पाहतां अल्प खोटें।
किती फार खोटे किती अल्प खोटे। किती येक ते सर्व खोटे चि खोटे॥
कळा निर्मळा वीकळा हीण जाली। दिसे जागृती स्वप्न खेदें बुडाली।
गुणा निर्गुणा आणिलें लोकबोली। कळेना कदा संत आनंत खोली।

१ मढेंप्रतींत हा श्लोक असा च आहे. २ दुर्भिळता. ३ घाण. ४ अमेध्य, अपवित्र, घाणेरडें. ५ "घर्डा" म. पा. ६ वेश्या. ७ "विनीतात्मता" म. पा. व हा च योग्य.

अलगट हटवादी वानरवेशधारी ।
वन कडकड मोडी मोडितां भुभुकारी ।
बळकट अखया तो देखोनीयां धिकारी ।
वधुनि अवलिळेसी जाळिली हेमपुरी ॥ ८ ॥

असे अर्थ तें सार्थकें धन्य होतें । नसे अर्थ तें बोलणें वेर्थ जातें ।
कणेंवीण काबाड तें वेर्थ जाणा । बरें शोधितां ही नसे येक दाणा॥
असे सार मुक्तांफळां जन्म जेथें । सदा सर्वदा दर्प सुगंध तेथें ।
फणत्कारती भक्ति आरंभ दोनी । अती साजिरे भव्य मार्तंड तीन्ही ॥
आनीळा आरीचा आरीरूढ होतो । तया पौत्रसुता अरीलागि ध्यातो
असा जो विषारी तयाच्या सुताचें । स्मरावें अती आदरें नाम त्याचें ॥
आनंदवेळ मनिची मन वेळ वाहे । उल्हास वास भरला गगनीं न साहे
बेफाम सोहरकती दुरमारकुते । मार्तंड भैरव करी तरि काम फते ॥१२

अहा हा अहा हा अहा हा चि हा हा ।
हालाहा लाहाहा लाहाहा चि हा हा ।
पाहा हा पाहा हा पाहा हा चि पाहा ।
माहां हां माहां हां माहा हां चि माहां ॥ १३ ॥

आजी[2] माता सुंदरी ते चि कन्या । असे सासु माउसी ते चि धन्या ।
असें आतां पाहतां सीध आहे । पाहें पाहें तूं चि होऊनि राहे[1] ॥१४॥

अक्रा अक्रा अक्र अक्रा अकक्रा । शक्रा शक्रा शक्र शक्रा शकक्रा ।
नक्रा नक्रा नक्र नक्रा नकक्रा । वक्रा वक्रा वक्र वक्रा वकक्रा ॥१५॥

उठे[3] घोष ज्या मंदिरीं रामनामें । जळो संपदा जाळिं ते हेमधामें ।
जळो बोल ते फोल वाचाळज्ञानी । नसे मानसीं राम कैवल्यदानी १६

कल्याणकारी निजहीतकारी । आनंदकारी अतिसौख्यकारी ।
परोपकारी निज निर्विकारी । कोदंडधारी लीळावतारी ॥ १७ ॥

---

१ "राहे" पा. म. २ मर्ढे प्रतींत "आसे" चे "आजे" केलेलें आहे. ३ "नुठे" पाहिजे.

करावी हरीभक्ति ते पर्वकाळीं । येथासांग रे अन्न खावें सुकाळीं ।
बरा काळ कांहीं अखंडीत नाहीं । बहु लोक गेले विचारूनि पाहीं१८
किती घालणें भार या देवराया । पडो रे वनामाजि हे सर्व काया ।
आहा रे मना तुजला काये जालें । रघुनायेका तां बहु कष्टवीलें॥१९
करें पूजन राघवाचें करावें । पदें राघवा आश्रमासी च जावें ।
बरें कर्णवीळीं कथे ऐकवावें । सदा सर्वदा साधुसंगीं बसावें ॥२०॥
करी लौकरी चाकरी भाकरीला । तयाचे परी कां करीना हरीला ।
मुखें वीवरीनावरीनावरीला । तरी नीरवीलादरीलादरीला ॥ २१ ॥
क्रूरां अक्रूरां दीधलें नाम जेणें । तया पाहतां सर्व च्यातुर्य उणें ।
तया नीर्दयाला दयाळु म्हणावें । गुणेंवीण गुणास कैसें गुणावें ॥२२
कुटीळ प्राणी सत्रा सिरोणी । कापठ्यत्राणी मुखीं पोहोणी ।
तो कागपक्षी क्षुद्रें चि लक्षी । आमेद भक्षी क्षतें परीक्षी ॥ २३ ॥
कसें ठाण लावण्य या राघवाचें । करीं चंड कोदंड या भार्गवाचें ।
जया उदरीं जन्मला शंकरारी । उभी साजिरी मूर्ति लीळावतारी२४
करा तर्क कर्डा कुतर्कास खर्डा । विधी घव्य गर्डा कुडा भाव पर्डा ।
पडे देह दर्डा विवेकासि वर्डा । करा लोभ नर्डा विकल्पासि भर्डा२५
कामीं जयाची सुखदृष्टि राहे । पंडीत तो ही घन गर्जताहे ।
रामीं मिळाली अती धन्य जाली । वैशा वैकुंठा न पढोन गेली ॥२६
क्रियेचें कटाळें तुळे धर्मशास्त्रीं । तथा वा प्रसंगार्थ वेदांत मंत्रीं ।
वनीतामँता नीति रक्षीत दोघीं । जसा सिंधु आदित्यआज्ञा नुलंघी॥
किती येक ते पाहतां फार खोटे । किती येक ते पाहतां अल्प खोटें ।
किती फार खोटे किती अल्प खोटे।किती येक ते सर्व खोटे चि खोटे॥
कळा निर्मळा वीकळा हीण जाली। दिसे जागृती स्वप्न खेदें बुडाली।
गुणा निर्गुणा आणिलें लोकबोली ।कळेना कदा संत आनंत खोली ।

१ मर्डेप्रतींत हा श्लोक असा च आहे. २ दुर्भिळता. ३ घाण. ४ अमेध्य, अपवित्र, घाणेरडें. ५ " घर्डा " म. पा. ६ वेश्या. ७ " विनीतात्मता " म. पा. व हा च योग्य.

कळेना पुढें काय होणार आहे । कळेना देहे कोठपरियंत राहे ।
कळेना मरावें स्वदेसीं विदेसीं । कळेना पुढें वेळ येईल कैसी ॥३०॥
कमळाकमळाकमळाकमळा । कमळाकमळाकमळाकमळा ।
कमळाकमळाकमळाकमळा । कमळाकमळाकमळाकमळा ॥ ३१ ॥
कळेना कळेना गळेना घळेना । चळेना ळळेना जळेना जुळेना ।
टळेना ढळेना वळेना तुळेना । पळेना फळेना रुळेना मळेना ॥३२॥
खळांळा सवें हुंबरी घालवेना । निगुऱ्यां सवें बोलतां पुरवेना ।
खुणा दावितां चक्षुहीना कळेना । बळें लावितां सत्य पंथीं मिळेना॥
गणराज तो चि विराजतो । बहु साजतो रस माजतो ।
गुण काजतो घन गाजतो । मन डाजतो चि नवाजतो ॥ ३४ ॥
गिरीचे दरी भीतरी वास केला । पुढें पाहतां राम संन्मुख जाला ।
स्थळें लोक संख्या मही मध्यभागीं । सुवर्णाचळु राहिला पृष्टिभागीं॥
गुणेंवीण निर्गुण तो आडळेना । जनीं शोधितां सर्वथा ही कळेना ।
तया आरता देव सर्वेश्वरु तो । रुपें माइकें सर्व कांहीं करीतो॥३६॥
गंवीमाजि जाल्याआसंभाव्य पीसा।जया चावितातीं दिसेतोचिपीसा
चटाटां बळें सेविती रक्त मौशा।सदा सर्वदा हा चि मोटा तमासा३७
घरें आपणाला वधु आपणाला । मुलें आपणाला धनें आपणाला ।
पशु आपणाला कणें आपणाला । बहुतांपरीं पाहिजे आपणाला॥३८
घरें सुंदरें मंदिरें रम्य दारा । झणी आपुलीं मानिसी रे गंव्हारां ।
जिवा जन्मतां निर्मिलें तें टळेना । क्षणा काय होईल ऐसें कळेना३९
घडी येक वस्ती नको वेर्थ मस्ती । सदा सर्व सुस्ती अहंतेसि वस्ती ।
क्रिया वेस्तवेस्ती विकल्पास पुस्ती ।फिरे वावरे सर्वदा काळ गस्ती॥
चटकि चटका चट लाउनि जातो । अटकि झटका झट होउनि येतो ।
लटकि लटका लट लंपट मातो । नटकि नटका नटकिंनटसातो ॥
चिंता चिंता वेर्थ चिंता करीता । किंता किंता वाय किंता धरीता ।
सीताकांता सेवकाची अहंता। दाता दाता राम हा सौख्यदाता॥४२

१ अत्यन्त दुष्ट. २ खेळ, वाद. ३ गुरुविरहित. ४ घळ, गुहा. ५ मूर्खा.

चंणक जाण चणाण चणाणी । तंत वितंत सुतंत झणाणी ।
संगित ताळ उलाळ खणाणी । धी धी किटी धी किटी घोर दणाणी ॥
जनीं खेळतो खेळ नाना परीचे । परी खेळतां वेर्थ आयुष्य वेचे ।
न कंठे तया काळ कंठोन जातो । दिसेंदीस तो अंत येतो पाहातो४४
जगीं गाढवें राखतां जन्म गेला । नव्हे भोग्य हें तुछय वाटे तयाला ।
मुळींचा करंटा तया योग्य[1] कैचें । महद्भाग्य हें देखवेना जनाचें॥४५
जनामाजि होणार हें जैसजैसें । प्रसंगें घडों लागतें तैसतैसें ।
घडीनें घडी वेर्थ चिंता करावी । कृपा सज्जनाची बरी वीवरावी४६
जनीं पाहतां कर्म तें ही घडेना । जनीं पाहतां भक्ति ते आतुडेना ।
जनीं पाहतां ज्ञान ही शुध नाहीं । मना सज्जना हीत शोधूनि पाहीं॥
जनीं लाविती नष्ट संदेह चेडें[2] । तेणें थोर भांबावती लोक वेडे ।
सदा सद्गुरुसंगतीचेनि योगें । कदा संशयो भूतबाधा न लागे॥४८॥
जळो [3]भाग्य वैराग्य हें सीघ्रकोपी । जळो ज्ञान विज्ञान हें लोभरूपी ।
जळो भक्ति वीभक्ति जेथें सुटेना।जळो वित्पती वाद जेथें तुटेना ४९
जनाचार संपादितां जन्म गेला । येथासांग रे सर्व लोकीक केला ।
जप ध्यान पूजा मनामाजि नाहीं । वृथा निश्चयेंवीण तें सर्व कांहीं ॥
जगीं बोलती थोर लक्षापती हा । जगीं बापुडा मागतो भीक पाहा ।
बहु संपती गेलिया विपती रे । म्हणोनी धरावा मनीं श्रीपती रे॥५१
जया[4]लश्य तो वश्य होतो मनाला।अनां[5]लश्य तो वश्य होतो जनाला
मनोधारणा कारणा मूळ आहे । जनी सज्जनी तो चि होऊनि लाहे॥
[6]जनी लोक ते लोक होऊनि गेले । सखे आमुचे सर्व तद्रूप जाले ।
तुम्ही रामउपासकें आपुले की । मनामाजि वोळखी सांडूं नये कीं ॥
झणत्कारघोषें पदीं वांकि वाजे । अ री पू त ळे तोडरीं ब्रीद गाजे ।
समरंगणीं दैत्य चंड प्रतापें । बहु त्रासिलें कूळ आदित्यभूपें ॥५४॥

१ मुळांत " यो " नाहीं. पोथ्यांत आहे. २ चेटकें. ३ " आग्य " म. पा. ४ ज्याला आळस आहे. ५ ज्याला आलस्य नाहीं. ६ हा श्लोक मढेंबाडांत ११९ व्या अष्टकापैकीं ४ था म्हणून दिलेला आहे.

झळाळीत अंकुश धारा कुठारा । जया देखतां थोर विघ्ना दरारा ।
भयें भूलला रोम येती भरारां । चळीं कांपती लागला घायवारा ५५
ठसा हेमधातुवरी वातसुतु । तथा ताइताची बरी रौप्यधातु ।
तयाची पुजा मंदवारीं करावी । बरी आवडी आर्त पोटीं धरावी ५६
डगा[1] लांडगा[2] बांडगा टाकिताहे । पाहा रे पाहा हा दगा देत आहे ।
वनामाजि थारा जनाला दरारा । मनामाजि आतां विचारा विचारा
तमोगुणें ईश्वरें[3] पाविजेना । स्वहीत होणें सहसा दिसेना ।
सद्भाव सत्वें जव दृढ नाहीं । तवं भ्रांत प्राणी पडिला प्रवाहीं ॥५८
तुम्ही दृष्टि घाला बरी अंतराळें । समस्तांमधें ब्रह्म तैसें निराळें ।
नव्हे श्वेत आरक्त ना पीत काळें । करा सद्गुरु लभ्य तेणेंचि कळें ॥
तुला नेणतां जन्मलों आणि मेलों । किती वेळ मी सर्व सृष्टी च जालों
तुला लागतां तूं चि होऊनि गेलों । विचारें कृपासागरें मुक्त केलों ॥
ते जा नु जा री पीत्रु तयाचा । जो भृत्य जाला शरणागतांचा ।
आयुष्य तेथें ज्याचे करीचें । होतें वदा रे त्या अंतरीचें ॥ ६१ ॥
दया राघवाची कृपा सज्जनाची । स्नेहाळुपणें वृत्ति सर्वै जनाची ।
बहु जाणता शब्दभेदासि जाणे । माहां मूर्ख तो वेर्थ कांहीं च नेणे ॥
दाहामाजि जो सातवा साच आहे।कळीसारिखा धर्म त्याला न साहे
हरीदास विश्वास येकादशावा । करी संकटीं सर्व कल्याण जीवां ॥
देहाची कथा सांगतां पुरवेना । बरें वोखटें सांगतां ही सरेना ।
किती येक नानापरी सुख जालें । किती येक तें दुःख होऊनि गेलें ॥६४
दिपा पासुनी मैस निर्माण होते । परी दीपिका केवि लागों शके ते ।
तथा संत आनंत ग र्गि न लागे । तरी सज्जना शब्द कैसेनि लागे ॥ ६५
द्रुम लता समता जरि वीघडे । तरि जनीं विजनीं हरि सांपडे ।
गुण गुणी अगुणी जरि लाविती । तरि सदा प्रमदा मनि भाविती ६६

१ टांग. २ कामक्रोधादिरूपी लांडगा. ३ शंकर म. पा. ४ "वेर्थ आलो निमालों" म. पा. ५ "जाणता" म. पा. ६ "वन्य" म. पा. ७ "त" चा "ज" केलेला आहे. ८ तैसा संत आकित मार्गि न लागे । म. पा.

देहे आवस्छा अभिमान स्थानें । ते भोग मात्रा गुण शक्ति जाणे ।
पींडी सवज्ञा बत्तीस जाणा । ब्रह्मांडीं ह्या रे समतुल्य खूणा[1] ॥६७॥
दरे दुर्कुटें झाडखंडें अनेकीं । कपाटें कडे वीवरें आणि टांकीं ।
वनीं पावनीं पांडवीं वास केला । गिरी देखिला दास संतुष्ट जाला ६८
न चालतां पाउल तीर्थ जोडे । जें जोडतां कैकटें[2] सर्व मोडे ।
ज्या दर्शनें आपण देव व्हावें । संतीं सदा सेउनियां राहावें ॥६९॥
नवविधा नव पंकज भाळिं का । सुखकरा सुखसागरबाळिका ।
निकट रूप हरा हृदईं वसे । जप सदा आपदागम नीरसे ॥ ७० ॥
नव्हे बोलतें तें नव्हे चालतें तें । परब्रह्म कांहीं नव्हे हालतें तें ।
नव्हे पापकारी नव्हे पुण्यकारी । परब्रह्म तें सर्वदा निर्विकारी ॥७१॥
नसे भक्ति उपासना येक भावें । नसे कर्म साहित्य तें आचरावें ।
नसे दान ना धर्म ना पुण्य गांठीं । वृथा वाउगी चाउटी ते चि मोठी ॥
नसे उष्ण ना चांदिणें चंद्र तारा । नसे दामिणी[3] ना नसे वन्हि वारा ।
बुडालें गमे पाहतां विश्व सारें । नभीं धूम्र तें दाटलें अंधकारें ॥७३॥*
निंदूनि सिंधु बुडसी तळार्थी[4] । तजूनि सोनें धरिसील माती ।
ऐसा प्रपंचीं भुललासि कामा । सांडूनि रामा फिरसी रिकामा ॥७४॥
प्रसंगें स्वभावें चि तो तोल आला । परी पाहतां न्याय गेला बुडाला ।
धनें गोधनें कांचनें धान्य वाजी । परी पाहतां नाडळे लोक राजी ७५
परम सुंदर ते सुमनमाळिका । परम सुंदर पूजनकाळिका ।
परम सुंदर ते वनमाळिका । बहुत लोक पिटी करताळिका ॥७६॥
परम कोमळ राम कठीण कां । दिनदयाळ दया नुपजे चि कां ।
मज बहूत उदासिन वाटलें । न धरितां नयनीं निरें[5] लोटलें ॥७७॥

१ सतराव्या दशकाचा नववा समास पहा. २ पाखांड. ३ सौदामिनी, वीज. *यानंतर मुळांत पुढील श्लोक असून तो खोडलेला आहे. नव्हे सौम्य हा भीम पूर्ण प्रतापी । देहे आचळातुल्य हा काळरूपी । पुढें देखतां दैत्यकुळां दरारां । भुतें कांपती नाम घेतां थरारां ॥. ४ तळाथ म्हणजे तळहात. पण येथें तळार्थी म्हणजे डबक्यांत असा अर्थ घ्यावा, असें वाटतें. ५ " जळ " म. पा.

पतितपावन तूं जनपावना । पतितपावन सज्जनजीवना ।
पतितपावन पावनपावना । जनरहीत रहीत निरंजना ॥ ७८* ॥
पिके सेत रे हेत तेथें चि लागे । पिकेना तरी चीत रंगे[1] विरंगे ।
तयाचे परी सार विचार होतां । पिके अर्थ निरूपणीं अर्थ[2] घेतां ॥७९॥
प्रभु आमुचा देव वैकुंठवासी । सुवर्णाचळामाजि नाना विळासी ।
पुरीसीं विमानांत बैसोनि गेला । कपी दास तो ही चिरंजीव केला ८०
पाहणें राहणें साहणें वाहणें । बोलणें चालणें हालणें डोलणें ।
साधणें बाधणें शोधणें बोधणें । नेणणें जाणणें बाणणें मीपणें ॥८१॥
पदीं पंकजीं शटपदी वृत्ति रंगे । बहु रंगली सज्जनाचेनि संगें ।
सुख पाहतां पांगुळती निजांगें । गुणीं गुंतली निजयोगें परागें ॥८२॥
पुढें काये होणार तें हीं कळेना । पाहा भंड काशास कांहीं मिळेना ।
बरें वोखटें सोसिती लोक जीती । परी पोट लाऊनि केली फैजीती[3] ८३
फसा पुसूनि ससा आसा चि जैसा । पसा पतंग जसा फसा चि तैसा ।
नसा करून जसा हसा गमे तो । पीसा अखंड थीसा गिसा नव्हे तो ॥
बिजेंवीण अंकुर निर्माण जाला । दुजेंवीण जो येकला तो चि गेला ।
नरेंवीण छयाया भ्रमेंवीण माया । जळेंवीण तारु विवेकें बुडाया॥८५॥
बहु देश भाषा रिती वेगळाल्या । महीं मंडळीं त्या असंभाव्य जाल्या ।
जनीं वर्तता येक येकां न माने । समुदाव तो त्यास त्यातें चि माने ८६
बरें दुग्ध तें मद्यपात्रीं कुपात्रीं । पुढें देखतां तें[4] तजावें चि श्रोतीं ।
जरी ज्ञान जालें जनीं नीच यातीं । तरी तें नव्हे वंद्य कांहीं महंती ॥८७
बहु पाप होतां चि दारिद्र येतें । बहु पुण्य होतां चि तें भाग्य येतें ।
बरें कोण मानेल तैसें करावें । मनीं थोर पाहोन हातीं धरावें ॥८८॥

---

* याच्या पुढें मुळांत ११२×४ श्लोक लिहून तो खोडलेला आहे. १ "भंगे" म. पा. २ "पक्ष" म. पा. ३ एक अकरा श्लोकांचें अष्टक मर्ढेबाडांत आहे त्यांतील हा नववा श्लोक होय. ४ या दोन्ही ठिकाणीं ‿ अशी खूण करून एक च "तें" समासांत मागाहून लिहिलेलें आहे.

बहु बोल ते फोल कंटाळवाणे। जया शांति ते दांति ते ही न वाणे।
बहु क्रोध त्या बोध होईल कैंचा। जळों तें जिणें लेश नाहीं सुखाचा॥
बरी शाक ते शुंकणीं मुंकणीची। रुची चोखडी निर्गुडीचे कढीची।
करी लोकरी भाकरी भात भाजी। फुटें तीखटें लोणचें तक्र आजी॥
ब्रह्मादिकां दुर्लभ ध्यान रंगीं। तो हा सदा सुल्लभ भक्तसंगीं।
जाणे कळा अंतरभावगोडी। देखोनियां राघव सीघ्र सोडी॥९१॥
बहु नेणत्याचे बहु दक्ष होतां। बहु दीस त्या लागती ज्ञान घेतां।
बहु काळ गेला बहु दक्ष जाला। अकस्मात तो दक्ष होऊनि मेला९२
बुरी हाल माजी दुन्या दालबाजी। किन्होंनें नवाजी खुदावंद गाजी
बुरा बख्त वाखा गनीमों तडाखा। नहीं खर्च फाखा लगाते इलाखा॥
भद्रीं शोभे राम लावण्यखाणी। पुष्टीं भाता बाण कोदंडपाणी।
वामे सीता दक्षणे शेष बंधु। पुढें उभा मारुती वीरसिंधु॥ ९४॥
माहा पातकी वात हा लागलासे[1]। उठे भाळ तात्काळ हा काळ भासे
नव्हे योग[2] हा रोग भोगस्वरूपी। नव्हे आप हें पाप संतापरूपी ९५
मला लागतां उष्ण मी कृष्ण जालों। परी सेवितां तक्र सुखें निवालों।
माहां तक्र स्वाधीष्ट तो शक्र नेणे। तया मानवी जीव हा काय जाणे॥
मानें मानें चालती सर्व मानें। यानें यानें चालवीती गुमानें।
हा हा हो हो होतसे दों दिसांची। चीचि चीचि सेवटीं सर्व चीचि॥
मन मूळ आधीं शोधूनि पाहे। कोणे स्छळीं जाउनि स्छीर राहे।
अत्यादरें शोधन हें करावें। आणी विवेकें मन हें वरावें॥ ९८॥
मेल्यां वाटे बांधती आपुलाले। आले गेले लोक कीती निमाले।
ज्याची त्याची पालवी चालवीते। वेळा येता सर्व ही हालवीते ९९
मनांतील जाणे असा कोण आहे। कसें काय तें सर्व शोधूनि पांहे।
कितीयेक तें पाहतां ही कळेना। कितीयेक तें चित्त चित्ता मिळेना॥
महां मूर्ख नाहीं अत्रीं परत्रीं। सदा घातला कुजतो देह यंत्रीं।
सदांचा करंटा अखंडीत ताठा। तयालागि नाहींत रे स्वर्गवाटा॥१

१ 'मातलासे" म. पा. २ "त्याग" म. पा.

मदें नारदें इछिलें गोपिकेसी । तेणें नारदीं जाहला सीघ्र कैसी ।
कुविद्ये करीं अंतरीं सुख वाढे । तया साठि संवंछर पुत्र गाढे ॥२॥
माहां भाग्य वैराग्य हें ज्ञानियांसीं।घडे त्याग हा लोभ[1] लोलंगतासी।
तयावीण तें ज्ञान हें दैन्यवाणें । क्रियेवीण शाब्दीक लाजीरवाणें ३*
मिथ्या भासें अंतरीं धाक सुटे । धाकें धाकें सर्वदा प्राण फुटे ।
स्वप्नाकारें भेदरें वोसणातो । जागा होतां धाक सांडून जातो ॥४॥
माहां पातकें जीव पाषाण जाले । वसे ची नसे ते किती काळ गेले ।
स्तुतीवीण कोण्हास कोण्ही न पावें । तया राम तारी कृपेच्या स्वभावें ५
मनीं साधनाची धरी वेधना रे । धनावाधनाची नको भावना रे ।
जना कांचना लागली प्रीति मोठी । सरेना कदा कामना कल्पकोटी ६
युग्माननाचें वास्तव्य जेथें । जळबिंदुरत्नें निर्माण तेथें ।
आखंड बंदीं परी नाम मुक्तें । तैसें चि जाणा क्रीयाचळातें[2] ॥७॥
रघुनायेका सारिखा स्वामि दाता । असोनी सिरीं वाहसी वेर्थ चिंता ।
नको वीसरों राघवा भूजकांता । नुपेक्षी नुपेक्षी कदा तुज भ्रांता ॥८॥
रिकामा विकारी रिता[3]ळहारी । रिझेना[4] भिकारी रिपु खेदकारी ।
रिसा माजि सारी निघोना गरारी । रिठासुर मारीत मारी मुरारी ॥९॥
रघुकुळवल्ली बरी पद्मिणी हे । तेथें शामरामाकृती पद्म पाहे ।
तिच्या गुणगंधें धरा दाटलीसे । तेथें षट्पदी वृत्ति हे रंगलीसे॥११०॥
रवीकीर्णी भासला भास जैसा । जिवा भासतो जाण प्रपंच तैसा ।
तयातीत जो ब्रह्म आत्मा स्वभावें । पुसायां तया रे अरण्यासि जावें ॥
राम राम रसने रस घेई । जन्ममृत्यासि तिळांजुळी देई ।
नित्य राम गुण रंगणि रंगे । रंग राम करिसी अनुरागें ॥ १२ ॥

---

१ " भोग " म. पा. * यानंतर मुळांत पुढील श्लोक असून तो खोडलेला आहे. मरणेरेणरेरणमाजलें । मनतरेनतरेजनगाजले । मनभरेनभरेनभरेतरी । भवजळीं बुडतां हरि ऊतरी ॥ २ " क्रियानळातें " म. पा. ३ प्रथम 'सदा' होतें, वाटतें, त्याला हरताळ लावून वर 'रिता' लिहिलें आहे. ४ " नसेना " चें हरताळ लावून " रिझेना " केलें आहे. ५ वुझाया तयारे आनांम्यासी नावें । म. पा.

चलंड चि लंड कलंडत जातो । तंड चि तंड वितंड चि गातो ।
बंड चि बंड निलंड साहातो । भंड चि भंड उभंड पाहातो॥१३॥

लोकामधें लोकलाजेसि भ्यावें । नाना देसीं[1] दंडकें आचरावें ।
कोण्ही येकें मूळ शोधूं नये हो । मिथ्या वादें लाविला धाक पाहो ॥

लघूसी परी मूर्ति हे हाटकाची । करावी तथा मारुती नाटकाची ।
असावी सदा ताइतामाजि दंडीं । समरंगणीं पाठि दीजे उदंडी॥१५॥

वसे अंतरीं रामविश्वास जेथें । नसे मानसीं नष्ट संदेह तेथें ।
विवेकें अहंभाव ज्याचा गळाला । सदा राघवीं ऐक्यरूपें मिळाला ॥

विनटलें लटकें लटकें कळे । निवळतें वळतें[2] जरि वीवळे ।
तरि तया विजया जय जाणिजे । न कळतां सहसा सुख नेणिजे॥१७

वयें थोर ते चोर भावार्थ नाहीं[3] । विकल्पें बुडाले अहंभावडोहीं ।
अहंता नसे हो तया लेंकुरासी । म्हणोनी बहु आवडी रामदासीं ॥१८

वसे न्याय तेथें भल्यानें असावें । नसे न्याय तेथें कदा ही नसावें ।
प्रमाणोत्तरें चीत्त तें ही न घाली । तया पापरूप्यासि कां रांड व्याली॥

विदगदी दगदीं दगदावला । नरपती विपती जरि पावला ।
नदसुरा[4] दुसरा नर चेववी । तरि तया चळलें पद पाववी ॥ १२०॥

विषयसूखसुखें चि सुखावला । विषयदुखदुखें दुख पावला ।
उबवला भ्रमला भ्रम भूलला । भ्रमरहीत भला पद पावला ॥२१॥

विसरतें भ्रमतें भुलतें मनीं । वचकतें चकतें चुकतें मनीं[5] ।
अवचितें दुचितें दचकावतें । कदरतें सिणतें मग कावतें ॥ २२ ॥

वरी अंतराळें नभीं कीट काळें । तया वेगळें दृश्य नाहीं निराळें ।
मनेंची मवाळें नसे दृश्य हाळें[6] । बुडालीं नभीं तीन ताळें विषाळें॥२३॥

---

१ 'वीं' ला हरताळ लावून "सीं" केलें आहे. २ निवळे । म. पा. व मूळ प्रतींत हि "वळतें" होतें त्याचें कोणी 'निवळे' केलेलें दिसतें. ३ "नाहीं" चें कोणी "देहीं" केलेलें दिसत आहे. ४ "निदसुरा" म पा., निजलेल्याला. ५ "जनीं" म. पा. ६ हाळ= डोंगरांतून वाहणारा पाण्याचा झोत.

सलगिचा लगिचा गुरु तो नको। बळखिचा सखिचा गुरु तो नको।
भ्रमभरु भ्रमरु गुरु तो नको। मुढमती प्रचितीविण तो नको॥२४॥
सघन काळ घनें घन गाजे। उकडतां महिमंडळ डाजे।
विजु तडक तडक तडक चि वाजे। सकळ जीवन भूवन माजे॥२५॥
स्वासोस्वासें नीघतां काळ जातो। पात्या पातें लागतां काळ जातो
वीवेकी तो सर्व कांहीं पाहातो। सारासारें ज्ञानयोगें राहातो॥२६॥
स्मरहरांतकवीषकळा बहु। मग प्रेत्न हरें सुचिले बहु।
स्मरत नाम सुखी जाहाला बहु। मग जिवीं प्रितिनें धरिलें बहु॥२७॥
सदा तेल आणा सदा मीठ आणा।सदा धान्य आणा सदा द्रव्य आणा
सदा वस्त्र आणा सदा शाख आणा। सदा सर्वदा सर्व आणा चि आणा
संसार [1]बाजार उदंड भर्ला। उदंड भर्ला सवें चि सर्ला।
कितेक लोकां थोर लाभ जाला। कितेक प्राणी मुदलें बुडाला॥२९॥
सदा मागता दास देवा न साहे। न मागे तयाची रमा दासि होये।
असे आस तो दास जाला जगाचा।नसे आस तो ईशु ब्रह्मादिकांचा३०
स्वधामासि जातां माहां रामराजा। हनुमंत तो ठेविला या च काजा।
सदा सर्वदा रामदासांसि पावे।खळीं गांजितां ध्यान सांडूनि धावे ३१
सुरनदी सुनदी विनदी नदी। निरवदी विधदी उधदी दधी।
निरमळा विमळा निवळा बरें। निजसुरें विसरें विसरे खरें॥ ३२॥
संपन्न तारुण्य लावण्य नारी। कौशल्यता वैभव चित्तहारी।
येकांतकाळीं पडतां समंधु। अभिळाष न करी तो धन्य साधु॥३३॥
सदा सर्वदा मोक्ष नामाभिधानी। भुकेल्[2]या मुखें सेविजे [3]तो चि दानी।
[4]जरा [5]आर्थ [6]साधी गजा शोभता हाँ। आळापें शुळी सर्व थकीत राहाँ॥

१ संसारसांतेस आले। येक लाभें अभर जाले। येक ते करंटे ठकले। मुदल गेलें ॥. ११–४–२५. २ ‘ ला ’ चें ‘ ल्या ’ हरताळ लावून केलेलें आहे. ३ “ जो तो चि यानी ” म. पा. ४ “ रजा ” म. पा. मुळांत ‘ गजा ’ पडलें होतें. ‘ ग ’ ला हरताळ लावून “जा” चा ‘ ज ’ करून पुढें समासांत ‘ रा ’ लिहिलेला आहे ५ “ आर्थ ” म. पा. ६ “ सीधीः ” म. पा. ७ “ हे ” म. पा.

श्री हरी हरि सुंदर नामें । गणपतीसमती सम कामें ।
गौर सागर शाम धुमाळी । क्रिडतसे वनिचा वनमाळी ॥ १३५॥
श्रीरामचंद्रा करुणासमुद्रा । ध्यातों तुझी राजस योगमुद्रा ।
नेत्रीं नये रे तुजवीण निद्रा । कै भेटसी बा मजला समुद्रा ॥३६॥
होती साधकें बाधकें शक्तिसंगें । चळे सार वीचार त्या कामरंगें ।
म्हणोनी नको रे मना संग त्याचा । म्हणे दास उदास सर्वोत्तमाचा ३७
हाराहोरा चालतो दों दिसांचा । जेव्हां तेव्हां सारिखा काळ कैचा ।
संसाराचा भर्वसा कोण कैचा । काया वाचा राम ध्यावा जिवाचा॥३८
हरीतो हरी तो करीतो परीक्षा । धरीतो धरीतो वरीतो वरीक्षा ।
माहां दंभ तो राक्षितो पक्षपातीं । म्हणे दास विश्वास होतां महंती ॥३९
हरीतो हरी पाप संसार माया । तजा रे भजा माधवा देवराया ।
अरे वेर्थ कीमर्थ प्रपंच माया । करी तापल्या निववी निजछयाया ॥४०
क्षुधाक्रांत कःक्रांत आक्रांत वाटे । माहां कोप संताप संताप लोटे ।
मनीं धीर गंभीर तो वीर होतो । सदाचार विचार तो वेर्थ जातो ॥४१॥
धर्माभिमानी क्षत्राभिमानी । विद्याभिमानी विप्राभिमानी ।
ज्ञानाभिमानी सत्याभिमानी । भक्ताभिमानी कोदंडपाणी ॥ ४२ ॥
येथासांग आधीं फळाहार कीजे । पुढें मागुती भोजनाला उठीजे ।
बरें जेविजे जेविजे स्वाद सत्ता । सदानंद हा राम कैवल्यदाता ॥४३॥
जटिलः कुटिलश्चैव । पंडितो मुंडितस्तथा ।
वादको निंदको बद्धो गायको भटयेवनाः ॥ १४४ ॥
क्षीरानिराचा निवाड लोकां । करूनियां दावित हंस जो कां ।
तैसा चि मायाब्रह्मा विवंची । परमहंस पवित्र तोचि ॥ १४५ ॥
जया येत्न फावेल तेणें करावा । मोहोछाव या राघवाचा भरावा ।
माहां येत्न देखोनियां काळ धाके । प्रतापें बळें गाजवावे तडाखे १४६

संख्या १०९० *

[ मुद्रांत यापुढें मनाचे श्लोक आहेत ]

१ "राघवा रामराया" म. पा. * मागील अष्टकाच्या अंतीं दिलेली संख्या ९४१, हे १४६ श्लोक व मध्यंतरीं खोडलेले ३ श्लोक, मिळून ही संख्या बराबर येते.

## ( १३५ ) गणराज

विद्यानिधान गणराज विराजताहे ।
सिंधूर तो घवघवीत रसाळ पाहे ।
विघ्नासि मार अनिवाराचि होत आहे ।
आनंदरूप तुळणा दुसरी न साहे ॥ १ ॥
गंडस्थळें झिरपती बहु वास जेथें ।
सुवास मस्त रिझले अळिकूळ तेथें ।
शुंडा प्रचंड मिरवी गजकर्णथापा ।
तेजाळ अंकुश म्हणे दुरितासि कापा ॥ २ ॥
फर्सा[१] पुसूनि सर्सावतसे अघाला ।
भक्तांसि विघ्न रचतां रिचवीत घाला ।
साठी सहस्र गण त्यांसरिसा निघाला ।
मुशकवाहन करी दुरितासि हाला ॥ ३ ॥
वीतंडसा बलवंड गिरितुल्य धांवे ।
भक्तांसि रक्षित रिपूवरि तो उठावे ।
अंदूस तोडरगुणें करितो चपेटा ।
गर्जोनल्या घणघणाट प्रचंड घंटा ॥ ४ ॥
ध्यानीं धरील नरकुंजर बुद्धिदाता ।
त्याची फिटे अवलिळा सकळैक चिंता ।
आधीं गणेश सकळां पुजणेंचि लागे ।
दासां मनीं तजविजा आवजो[२] न लागे ॥ ५ ॥

## ( १३६ ) गणेशशारदासद्गुरु

गजवदन विराजे रंगसाहित्य माजे ।
रतिपतिगतिलाजे लुब्ध कैळासराजे ।

१ परशु. २ अवज्ञा, भीति (?)

फरश कमळ साजे तोडरीं ब्रीद गाजे ।
सिधि बुधि आभिळा[1] जे पावती[2] विश्वबीजें ॥ १ ॥
नटवर नटनाथें नाट्य नट्वांग संगीं ।
गजवदन सुरंगीं रंगसाहित्यरंगीं ।
अभिनव नटलीळा रंगवीरंग[3] माजे ।
चपळपण विराजे सर्व कल्लोळ गाजे ॥ २ ॥
हरिसुतदुहिता ते मुख्य आधीं नमावी ।
मग सुगम पथीं हे सीघ्र काळें गमावी ।
मतिकमळ विकासे सर्व साहित्य भासे ।
दुरित सकळ नासे सस्वरूपीं विळासे ॥ ३ ॥
तुजविण मति माझी मंदली शारदांबे ।
लगबग जगदंबे तूं करी वो विलंबें ।
प्रगट रुप करावें वोखरीमाजि[5] आतां ।
अगणित गुण गातां तोषवी बुधिमंता ॥ ४ ॥
अगणितसुखदाता त्यासी वंदीन आतां ।
शुभ लिखित विधाता सीकवी धातमाता ।
गुरुवचनबळें हा साधकां मोक्ष लाभे ।
विमळ भजन लीळा अंतरामाजि शोभे ॥ ५ ॥

## ( १३७ ) विमळ विवेक

गजमुख सुखदाता मानसीं आठवावा ।
मग विमळ मतीचा योग पुढें करावा ।
सुरवर मुनि योगी वंदिती धुंडिराजा ।
सकळ सफळ विद्या यावया आत्मकाजा ॥ १ ॥

१ " आबळा जे " म. पा. मुळांत " बी " ला हरताळ लावून वर 'भि' लिहिली आहे. २ " पाविजे " म. पा. व मुळांत तसा च पाठ होता त्यास हरताळ लावून 'पावती' केलें आहे. ३ " रंगणी रंग " म. पा. ४ " तोडरीं ब्रीद साजे " म. पा. ५ मुळांत च 'वोखरीं' आहे. 'वैखरी' ऐवजीं हस्तदोषानें वोखरीं पडलें असावें.

४०९६

खळखळ खळयोगें वाउगी होत आहे ।
तळमळ तळमळ पोटीं सज्जनातें न साहे ।
मळमळ करिताहे तें कदा ही न राहे ।
परि विमळ विवेकें कल्पना स्थीर राहे ॥ २ ।
चटपट विषयांची सर्व सोडूनि द्यावी ।
वटवट न करावी भक्ति भावें करावी ।
खटपट हटयोगें कामना ते नसावी ।
झटपट श्रवणाची सार चित्तीं वसावी ॥ ३ ।
जपतजपतकाचा मेळ त्या मात्रुकांचा ।
निगमगुज फुकाचा योग सर्वां सुखाचा ।
सकलभुवनवासी चुकलासी तयासी ।
हर हर हर कासी सर्वदा तूजपासी ॥ ४ ॥

( १३८ ) धांव रे रामराया

रघुपतितनुरंगें रंगली नीळ शोभा ।
रघुपतिरुपयोगें सर्व लावण्य शोभा ।
रघुपतिगुणगंधें धीर्य गंभीर्य लोकीं ।
रघुपति मम चित्तीं बैसला येकनेकीं[1] ॥ १ ॥
त्रैलोक्यनाथ रघुनाथ अनाथबंधु ।
त्रैलोक्यनाथ रघुनाथ करुणैकसिंधु ।
त्रैलोक्यनाथ रघुनाथ कोदंडधारी ।
त्रैलोक्यनाथ रघुनाथ लीळावतारी ॥ २ ॥
रघुपतिपदयुग्मीं लीन भावें असावें ।
रविकुळटिळकाचें नाम वाचे वसावें ।
श्रवणमनन भावें आदरेंसीं करावें ।
परम सुख समाधी संतसंगें तरावें ॥ ३ ॥

---

१ अनेकीं एक.

तुजविण सिण जाला धांव रे रामराया ।
कठिण दिवस जातो तापली सर्व काया ।
सकळ विकळ गात्रें अवस्ता लागली रे ।
तुजविण जगदीशा बुधि हे भंगली रे ॥ ४ ॥

## ( १३९ ) श्री देव

श्री देव देव करुणाकर देव देवा । श्री देव देव कमळाकर देव देवा ।
श्री देव देव विधिपूर्वज देव देवा । श्री देव देववर केशव देव देवा ॥१॥
श्री देव देव गिरिजापति देव देवा । श्री देव देव मदनांतक देव देवा ।
श्री देव देव सुरभूषण देव देवा । श्री देव देव शिवशंकर देव देवा ॥२॥
श्री देव देव जनपावन देव देवा । श्री देव देव गरुडध्वज देव देवा ।
श्री देव देव गजमोचन देव देवा । श्री देव देववर केशव देव देवा ॥३॥
श्री देव देव सिरसाजळ देव देवा । श्री देव देव नयनानळ देव देवा ।
श्री देव देव निगमांतर देव देवा । श्री देव देव शिवशंकर देव देवा ॥ ४
श्री देव देव भवतारक देव देवा । श्री देव देव भवहारक देव देवा ।
श्री देव देव सुरवंदन देव देवा । श्री देव देववर केशव देव देवा ॥५॥

## ( १४० ) गूज हें सज्जनाचें

वदनिं मदन इंदू तूळितां हि तुळेना ।
अगणितगुणसिंधु बिंदु तो वर्णवेना ।
सकळ भुवन पाळी[1] ऊपमा काय द्यावी ।
विकळशरिरभावें भावितां चित्त गोवी ॥ १ ॥

दशशतवदनाचा धीर मेरू[2] बळाचा ।
परम कुशळ वाचा शेष सर्वोत्तमाचा ।
अगणितगुणमुद्रा शोधितां त्या नरेंद्रा ।
अकळ विकळ भावें जाहला गुणनिद्रा ॥ २ ॥

१ पोटीं. म. पा. २ भूमंडळाचा. म. पा.

खळखळ खळयोगें वाउगी होत आहे।
तळमळ तळमळ पोटीं सज्जनातें न साहे।
मळमळ करिताहे तें कदा ही न राहे।
परि विमळ विवेकें कल्पना स्थीर राहे ॥ २ ॥
चटपट विषयांची सर्व सोडूनि द्यावी।
वटवट न करावी भक्ति भावें करावी।
खटपट हटयोगें कामना ते नसावी।
झटपट श्रवणाची सार चित्तीं वसावी ॥ ३ ॥
जपतजपतकाचा मेळ त्या मात्रुकांचा।
निगमगुज फुकाचा योग सर्वां[१] सुखाचा।
सकलभुवनवासी चुकलासी तयासी।
हर हर हर कासी सर्वदा तूजपासी ॥ ४ ॥

## ( १३८ ) धांव रे रामराया

रघुपतितनुरंगें रंगली नीळ शोभा।
रघुपतिरुपयोगें सर्व लावण्य शोभा।
रघुपतिगुणगंधें धीर्य गंभीर्य लोकीं।
रघुपति मम चित्तीं बैसला येकनेकीं ॥ १ ॥
त्रैलोक्यनाथ रघुनाथ अनाथबंधु।
त्रैलोक्यनाथ रघुनाथ करुणैकसिंधु।
त्रैलोक्यनाथ रघुनाथ कोदंडधारी।
त्रैलोक्यनाथ रघुनाथ लीळावतारी ॥ २ ॥
रघुपतिपदयुग्मीं लीन भावें असावें।
रविकुळटिळकाचें नाम वाचे वसावें।
श्रवणमनन भावें आदरेंसीं करावें।
परम सुख समाधी संतसंगें तरावें ॥ ३ ॥

---

१ अनेकीं एक.

तुजविण सिण जाला धांव रे रामराया ।
कठिण दिवस जातो तापली सर्व काया ।
सकळ विकळ गात्रें अवस्ता लागली रे ।
तुजविण जगदीशा बुधि हे भंगली रे ॥ ४ ॥

## ( १३९ ) श्री देव

श्री देव देव करुणाकर देव देवा । श्री देव देव कमळाकर देव देवा ।
श्री देव देव विधिपूर्वज देव देवा । श्री देव देववर केशव देव देवा ॥१॥
श्री देव देव गिरिजापति देव देवा । श्री देव देव मदनांतक देव देवा ।
श्री देव देव सुरभूषण देव देवा । श्री देव देव शिवशंकर देव देवा ॥२॥
श्री देव देव जनपावन देव देवा । श्री देव देव गरुडध्वज देव देवा ।
श्री देव देव गजमोचन देव देवा । श्री देव देववर केशव देव देवा ॥३॥
श्री देव देव सिरसाजळ देव देवा । श्री देव देव नयनानळ देव देवा ।
श्री देव देव निगमांतर देव देवा । श्री देव देव शिवशंकर देव देवा ॥ ४
श्री देव देव भवतारक देव देवा । श्री देव देव भवहारक देव देवा ।
श्री देव देव सुरवंदन देव देवा । श्री देव देववर केशव देव देवा ॥ ५ ॥

## ( १४० ) गूज हें सज्जनाचें

वदनिं मदन इंदू तूळितां हि तुळेना ।
अगणितगुणसिंधु बिंदु तो वर्णवेना ।
सकळ भुवन पांळी[१] ऊपमा काय द्यावी ।
विकळशरिरभावें भावितां चित्त गोवी ॥ १ ॥

दशशतवदनाचा धीर मेरू[२] बळाचा ।
परम कुशळ वाचा शेष सर्वोत्तमाचा ।
अगणितगुणमुद्रा शोधितां त्या नरेंद्रा ।
अकळ विकळ भावें जाहला गुणनिद्रा ॥ २ ॥

१ पोटीं. म. पा. २ भूमंडळाचा. म. पा.

सरण स्मररिपूचें वीषहर्ते वपूचें ।
निज बिज निगमाचें सार सर्वागमाचें ।
मन त्रिभुवनाचें गूज योगीजनाचें ।
जिवन जड जिवांचें नाम या राघवाचें ॥ ३ ॥
हरिजन भजनांचा[1] होये साक्षी मनाचा ।
सकळ त्रिभुवनाचा प्राण साधुजनाचा ।
परि हरि भजनाचा आखिलासे दिनाचा ।
घननिळ गगनाचा रंग सर्वोत्तमाचा[2] ॥ ४ ॥
विधि कुळ भुषणाचें धाम सर्वां गुणांचें ।
भरण अभरणाचें सर्व लावण्य साचें ।
सुख परमसुखाचें ध्येय ब्रह्मादिकांचें ।
भजन हरिजनाचें गूज हें सज्जनाचें ॥ ५ ॥

## ( १४१ ) शीतल छाया

रघुविरभजनाची मानसीं प्रीति लागो ।
रघुविरस्मरणाची अंतरीं वृत्ति जागो ।
रघुविरचरणाची वासना वास मागो ।
रघुविरगुण गातां वाणि हे नित्य सांगो[3] ॥ १ ॥
चतुरपण जनीं हें पाहतां आडळेना ।
निकट रघुविराचें रूप कैसें कळेना ।
चपळ मन वळेना गर्वताठा गळेना ।
तुजविण जगदीशा कर्मरेखा[4] टळेना ॥ २ ॥
तरुणपण देह्याचें लोपतां वेळ नाहीं ।
तन मन धन अंतीं वोसरे सर्व कांहीं ।
सकळ जन बुडाले वेर्थ मायाप्रवाहीं ।
झडकरि सुमना रे हीत शोधूनि पांही ॥ ३ ॥

१ ‘जनकाचा’ म. पा. २ ‘सर्वांतरींचा’ म. पा. ३ “रंगो” म. पा.
४ “खोटें”चें ‘रेखा’ केलें आहे.

पळपळ चळताहे बाळ तारुण्य देहीं।
तळमळ विषयांची नेणवे[1] हीत कांहीं।
ळळळळ गरळा तो काळ लाळीत आहे।
जळजळ सितळा हे भक्ति सेउनि राहे ॥ ४ ॥
दिनकरकुळवल्ली लोटली आंगभारें।
रघुविरअवतारें दाटली थोरथोरें।
सुखरूप सुखवासि राहिले योगरासी।
सफळ सितळ छयाया फावली रामदासीं ॥ ५ ॥

## ( १४२ ) वृद्धापकाळ

वण वण वण हिंडे चित्त वृद्धाप्यकाळीं।
भण भण भण माशा भोंवती सर्व नाळीं।
चण चण चण पींसा आणि ढेकूण खाती।
सण सण सण मुंग्या तीडका फार येती ॥१ ॥
गड गड कफ कंठीं सर्वदा दाटलासे।
भड भड भड वांतीं वस्त्र सर्वांग नासे।
धड धड धड सीतें कापतां जीव त्रासे।
चड चड चड गंधी सूटली ते न सोसे ॥ २ ॥
भर भर भर वातें सर्वदा आंग सूजे।
पर पर पर कांहीं बोलतां तोंड वाजे।
गर गर गर भोंवें आंग हें भोंवंडीनें।
हर हर हर प्राणी सांडिला वैभवानें ॥ ३ ॥
तर तर तर केली वैभवें दों दिसांची।
मर मर मर अंतीं होतसे यातनेची।
कर कर कर दांढा वाजती पायखोडी।
फर फर फर देहे सूजतां प्राण सोडी ॥ ४ ॥

---

१ " नाठवे " म. पा.

न करित हित कांहीं बापुडा वेर्थ मेला।
भजनरहित पापी काळमूखीं निमाला।
तन मन धन वेचे सार्थकीं देह ज्यांचे।
हरिहरवर दासां धाम लाभे कवीचें॥ ५॥

## ( १४३ ) भीम रुद्रावतारी

भुवनदहनकाळीं काळ विक्राळ जैसा।
सकळ गिळित ऊभा भासला भीम तैसा।
दुपटत कपि झोंके झोंकली मेदनी हे।
तळवट धरि धाकें धोकली जाउं पाहे॥ १॥

गिरिवरुनि उडाला तो गिरी गुप्त जाला।
घसरत दशगांवें भूमिके माजि गेला।
उडति झडझडाटें वृक्ष हे नेटपाटें।
पडति कडकडाटें आंग वातें धुधाटें॥ २॥

थरथरित थरारी वज्र लांगूळ जेव्हां।
गरगरित गरारी सप्त पाताळ तेव्हां।
फणिवर कमठाचे पुष्टिसीं आंग घाली।
तगटित पवनाची झेंप लंकेसी गेली॥ ३॥

थरकत धरणी हे हाणतां वज्रपुछें।
रगडित रणरंगीं राक्षसें तृणतुछें।
सहज रिपुदळाचा थोर संव्हार केला।
अवघड गड लंका सीघ्र जाळूनि आला॥ ४॥

सहज करतळें जो मेरुमांदार पाडी।
दशवदन रिपू हे कोण कीती बराडी।
अगणित गणवेना शक्ति काळासि हारी।
पवनतनुज पाहो पूर्ण रुद्रावतारी॥ ५॥

## ( १४४ ) फणिवर उठवीलो

फणिवर उठवीला वेग अद्भूत केला ।
त्रिभुवनजनलोकीं कीर्तिचा घोष गेला ।
रघुपतिउपकारें दाटले थोर भारें ।
परम धिर उदारें रक्षिले सौख्यकारें ॥ १ ॥
सबळ दळ मिळालें युध्य उदंड जालें ।
कपिकटक निमालें पाहतां येश गेलें ।
परदळशरघातें कोटिच्या कोटि प्रेतें ।
अभिनव रणपातें दुख बिभीषणातें ॥ २ ॥
कपिरिसघनदाटी जाहली थोर आटी ।
म्हणउनि जगजेठी धांवणी च्यारि कोटी ।
मूर्त्यविर उठवीले मोकळे सीध जाले ।
सकळ जन निवाले धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥
बहुप्रिय रघुनाथा मुख्य तूं प्राणनाथा ।
उठावे मज अनाथा दूरि सारूनि वेथा ।
झडकरि भिमराया तूं करीं दृढ काया ।
रघुविरभजना या लागवेगें चि जाया ॥ ४ ॥
तुजविण मज पाहे पाहतां कोण आहे ।
म्हणउनि मन माझें रे तुझी वास पाहे ।
मज तुज निरवीलें पाहिजे आठवीलें ।
सकळिक निजदासांलागि सांभाळवीलें ॥ ५ ॥
उचित हित करावें उधरावें धरावें ।
अनुचित न करावें तां जनीं येश घ्यावें ।
अघटित घडवावें सेवकां सोडवावें ।
हरिभजन घडावें दुख तें वीघडावें ॥ ६ ॥

१ एकदां श्रीसमर्थांस कफाची व्यथा झाली होती त्या वेळीं त्यांनीं हें भीमरूपी स्तोत्र केलें, अशी कथा आहे.

प्रभुवर विरराया जाहली वज्रकाया ।
परदळ निवटाया दैत्यकूळें कुटाया ।
गिरिवर उतटाया रम्य वेशें नटाया ।
तुज चि अलगटाया ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥

बहुत सबळ सांठा मागतों अल्प वांटा ।
न करित हितकांटा थोर होईल तांठा ।
कृपणपण नसावें भव्य लोकीं दिसावें ।
अनुदिन करुणेचें चिन्ह पोटीं वसावें ॥ ८ ॥

जळधर करुणेचा अंतरामाजि राहे ।
तरि तुज करुणा हे कां न ये सांग पाहे ।
कठिण हृदय जालें काय कारुण्य गेलें ।
न पवसि मज कां रे म्यां तुझें काय केलें ॥ ९ ॥

वडिलपण करावें सेवकां सांवरावें ।
अनहित न करावें तूर्त हातीं धरावें ।
निपट चि हटवादें प्रार्थिला शब्दभेदें ।
कपि घन करुणेचा बोळला रामवेधें ॥ १० ॥

बहुत चि करुणा या लोटली देवराया ।
सहज चि कफकेतें जाहली वज्रकाया ।
परम सुख विळासे सर्व दासानुदासें ।
पवनतनुज तोषें वंदिला सावकाशें ॥ ११ ॥

## ( १४५ ) रामपंचायतन

देवाळयें परम सुंदर दीपमाळा ।
वृंदावनें रमणियें वर धर्मशाळा ।
राजांगणें समघनें भुमिका सुढाळा ।
पुंजाळ ते झळकती बहु रत्नमाळा ॥ १ ॥

सुवर्णवर्ण बहुवर्ण कीर्णं अपारें ।
मिश्रीत ते तळपती घन थोरथोरें ।
उंचावले गगन त्याहुनि उंच भासे ।
मुक्ताफळीं जडित मंडप तो विळासे ॥ २ ॥

सिंह्यासनावरि रघोत्तम मध्यभागीं ।
बंधु तिघे परम सुंदर पुष्टिभागीं ।
वन्हीसुता निकट शोभत वामभागीं ।
वीलासतो भीम भयानक पूर्वभागीं ॥ ३ ॥

मार्तंडमंडप उदंड चि सौख्यकारी ।
त्रैलोक्यपावन प्रभु दुरितें निवारी ।
ध्यातो सदाशिव अखंडित च्यापपाणी ।
उदंड कीर्ति निगमीं महिमा पुराणीं ॥ ४ ॥

आनंदकंद रघुनंदन शोभताहे ।
कंदर्पकोटि वदनीं उपमा न साहे ।
आकर्ण पूर्णनयनीं रमणीय शोभा ।
विस्तीर्ण कीर्ण भुषणीं जगदीश उभा ॥ ५ ॥

## ( १४६ ) रविकुळटिळक

रविकुळटिळकाचें रूपलावण्य पाहे ।
रविकुळटिळकाचे चिंतनीं चित्त राहे ।
रविकुळटिळकाची कीर्ति जीवीं भरावी ।
रविकुळटिळकाची मूर्ति ध्यानीं धरावी ॥ १ ॥

कमळनयनरामें वेधिलें पूर्णकामें ।
सकळभयविरामें राम विश्रामधामें ।
घननिळतनुशामें चित्ततोषें आरामें ।
भुवनभजननेमें तारिले दास रामें ॥ २ ॥

बहुविध भजनाचीं दैवतें पाहिलीं हो ।
सकळ तजुनि रामीं वृत्ति हे राहिली हो ।
विमळगुणशिळाची लागली प्रीति मोठी ।
विमळ हृदय होतां उधरे कूळकोटी ॥ ३ ॥
विमळगुणशिळाचे आदरें गुण गावे ।
विमळगुणशिळाचे दास वाचे वदावे ।
विमळगुणशिळाचा अंतरीं वेध लागो ।
विमळगुणशिळाचा रंगणीं रंग जागो ॥ ४ ॥
सकळगुणनिधीचा राम लावण्यसिंधु ।
अगणित गणवेना शक्तिरूपें अगाधु ।
प्रबळ बळ चळेना वाउगें वेर्थ कामीं ।
म्हणउनि मन रामीं लागलें पूर्णकामीं ॥ ५ ॥
परमसुखनदीचा मानसीं पूर लोटे ।
घननिळतनु जेव्हां अंतरीं राम भेटे ।
सुख परमसुखाचें सर्व लावण्य साचें ।
स्वरुप जगदिशाचें ध्यान त्या ईश्वराचें ॥ ६ ॥
मधुकर मन माझें रामपादांबुजीं हो ।
सगुण गुण निजांगें नित्य रंगोनि राहो ।
अचपळ गुणगुणीं बैसली प्रीति दूणी ।
शरणचरणभावें जाहला राम रूणी ॥ ७ ॥
रघुपति गुणरंगें पाविजे भक्तिसंगें ।
भजन जन तरंगें सर्व सांडुनि मागें ।
अनुदिन वितरागें योगयागें विरागें ।
प्रगट तरत संगें सर्वदासानुरागें ॥ ८ ॥
रघुवरपर आतां कीर्तनीं गुण गावे ।
मथन त्रिभुवनाचें सर्व साहित्य फावे ।
सकळ जन तरावे वौंश हीं उधरावे ।
स्वजन जन करावें रामरूपीं भरावें ॥ ९ ॥

सकळ भुवन तारी राम लीळावतारी ।
भवभय अपहारी राम कोदंडधारी ।
मनन करि मना रे धीर हे वासना रे ।
रघुविरभजनाची हे धरीं कामना रे ॥ १० ॥

## ( १४७ ) अनुदिन अनुतापें तापलों

अनुदिन अनुतापें तापलों देवराया ।
परमदिनदयाळा नीरसी मोहमाया ।
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण सिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥

भजनरहित रामा सर्व ही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला ।
रघुपति मति माझी आपुलीसी करावी ।
सकळ तजुनि भावें कास तूझी धरावी ॥ २ ॥

विषयजनित सूखें सौख्य होणार नाहीं ।
तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांहीं ।
रविकुळटिळका रे हीत माझें करावें ।
दुरित दुरि हरावें सस्वरूपीं भरावें ॥ ३ ॥

तनु मनु धनु माझें राघवा रूप तुझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ।
प्रचळित न करावी सर्वथा बुधि माझी ।
अचळभजनलीळा लागली आस तुझी ॥ ४ ॥

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळस्वजनमाया तोडितां तोडवेना ।
घडि घडि विघडे हा निश्चयो अंतरीचा ।
म्हणउनि करुणा हे बोलतों दीनवाचा ॥ ५ ॥

जळत हृदय माझें जन्म कोट्यानकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ।
तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधु ।
षडरिपुकुळ माझे तोडि याचा विरोधु ॥ ६ ॥

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी ।
सिणत सिणत पोटीं पाहिली वास तुझी ।
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे ।
तुजविण मज नेते जंबुकी वासना रे ॥ ७ ॥

सबळ जनक माझा राम लावण्यपेटी ।
म्हणउनि मज पोटीं लागली आस मोठी ।
दिवस गणित बोटीं प्राण ठेऊनि कंठीं ।
अवचट मज भेटी होत घालीन मीठी ॥ ८ ॥

जननिजनकमाया लेंकरूं काय जाणे ।
पय न लगत मूखें हाणतां वछ नेणे ।
जळधरकणआशा लागली चातकासी ।
हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी ॥ ९ ॥

तुजविण मज तैसें जाहलें देवराया ।
विलगविषमकाळीं तूटली सर्व माया ।
सकळजनसखा तूं स्वामि आणीक नाहीं ।
वमकवमन जैसें त्यागिलें सर्व कांहीं ॥ १० ॥

स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे ।
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ।
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि देती ।
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ११ ॥

सकळ जन भवाचे आखिले वैभवाचे ।
जिवलग मग कैचें चालतें हें चि साचें ।

विलग विषमकाळीं सांडिती सर्व माळी ।
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥ १२ ॥

सुख सुख म्हणतां हें दुख ठाकूनि आलें ।
भजन सकळ गेलें चीत्त दुश्चीत जालें ।
भ्रमित मन कळेना हीत तें आकळेना ।
परम कठिण देहीं देहबुधि वळेना ॥ १३ ॥

उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं ।
सकळ[1]भ्रमविरामीं राम विश्रामधामीं ।
घडिघडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रविकुळटिळका रे आपुलेंसें करावें ॥ १४ ॥

जळचर जळवासी नेणती त्या जळासी ।
निसिदिन तुजपासीं चूकलों गुणरासी ।
भुमिधरनिगमासी वर्णवेना जयासी ।
सकळभुवनवासी भेटि हे रामदासीं ॥ १५ ॥

## ( १४८ ) सीतेनें केलेला धांवा

तुजविण रघुनाथा सर्वथा कंठवेना ।
वियोगविषगिरी हा घोटितां घोटवेना ।
झडकरि करुणाब्धी हा भवाब्धी तरावा ।
दशमुख हि मरावा शोक माझा हरावा ॥ १ ॥

रघुकुळनभचंद्रा निःकळंका अछीद्रा ।
मिथुळकरतुषारा पावलें मी चकोरा ।
दशमुखतम भद्रा आड केली[2] कुमुद्रा ।
तगबगित शरीरा दाखवीं बींब नेत्रा ॥ २ ॥

अशोकवन जनासी शोकसंताप नासी ।
तुजविण गुणरासी हे मला सर्व त्रासी ।

---

१ " विषयसुख " पा. मढे. मुळांतील ' भ्रम ' शब्द बरोबर लागला नाहीं.
२ " ठेली " म. पा.

कनकपुरि विशेषीं वीटली लोचनासी ।
रघुपति कइं येसी[1] दर्शनें सौख्यराशी ॥ ३ ॥

लक्ष्मण निजसाधु त्वत्सखा दीनबंधु ।
करुन छेळणवादु म्यां दिल्हा दुखशब्दु ।
धरुनि तो चि विषादु टाकिला आड सिंधु ।
क्षमुनु मज पराधु सोडवी रामइंदु ॥ ४ ॥

वैष्णव निजधनूसीं हात वाउनि सीसीं ।
आकरण[2] गुणरासी देखतां काळ त्रासी ।
दशमुखमशकासी कोण लेखा विशेषीं ।
वधुन अवलिळेसीं सोडवी रामदासी ॥ ५ ॥

## ( १४९ ) नृसिंह[3]

नरहरि नरपाळें भक्तपाळें भुपाळें ।
प्रगट रुप विशाळें दाविलें लोकपाळें ।
खवळत[4] रिपुकाळें काळकाळें कराळें ।
तटतट तट स्छंभीं व्यापिलें वन्हिजाळें[5] ॥ १ ॥

झळझळित झळाळी ज्वाळलोळें झळाळी ।
ळळलळित लळाळी लाळ लाळीत लाळी ।
हळहळित हळाळी गोळमाळा हळाळी ।
कळकळित कळाळी व्योम पोळीत जाळी ॥ २ ॥

कडकडित कडाडी कडकडाटें कडाडी ।
घडघडित घडाडी घडघडाटें घडाडी ।
तडतडित तडाडी तडतडाटें तडाडी ।
धडधडित धडाडी धडधडाटें धडाडी ॥ ३ ॥

भरभरित भरारी भर्भराटें भरारी ।
थरथरित थरारी थर्थराटें थरारी ।

१ " देसी " म. पा. २ " आकर्ण गुण शरासी " म. पा. ३ असा मथळा मढेबाडांत दिलेला च आहे. ४ " खळवळीत " म. पा. ५ " ज्वाळें " म. पा.

तरतरित तरारी तर्तराटें तरारी ।
चर्चरित चरारी चर्चराटें चरारी ॥ ४ ॥

रजनिचर विभांडी दों करें पोट फाडी ।
गडगडित गडाडी आंतडीं सर्व काढी ।
न धरित जन मानें लोक गेले निदानें ।
हरिजन भजनानें शांत केले दयेनें ॥ ५ ॥

## ( १५० ) झडकरि मज रामा सोडवीं

वरुण वदन वापी माजि जिव्हा स्वरूपी ।
मुख वसंत[1] तदापी वैखरी कोकिळापी ।
मधुर मधुर कुंजे नाम या राघवाचें ।
निववी[2] वसत संतीं श्रोतयां सज्जनाचें ॥ १ ॥

मम वदनसरोजीं षट्पदें शारदांबे ।
रघुपतिगुण रुंझे तूं न गुंते विलंबें ।
तववरि करि लाहो प्राण जं अर्क आहे ।
प्रचळित समई आकर्षणें स्थीर राहे ॥ २ ॥

वणवण विषयांची सर्वथा ही शमेना ।
अनुदिन मोहमाया लागली हे तुटेना ।
झडकरि मज रामा सोडवीं पूर्णकामा ।
तुजविण गुणधामा कोण रक्षील आम्हा ॥ ३ ॥

विषयविष वमावें कल्पनेला दमावें ।
निजपद निजभावें दृढ चित्तीं धरावें ।
भवभय निरसावें साधुसंगीं वसावें ।
सगुणभजन द्यावें स्वामि देवाधिदेवें ॥ ४ ॥

विगळित मन माझें तूं करीं देवराया ।
हरिभजन कराया पाहिजे दृढ काया ।

१ " मुवितवसतदापी " म. पा. २ " निववी वयत " म. पा.

निरुपण विवराया तर्कपंथें चि जाया ।
रघुपतिगुणछाया चित्त माझें निवाया ॥ ५ ॥

( १५१ ) कांत वन्हीसुतेचा

हरिहरहृदईचा कांत वन्हीसुतेचा ।
अग्रज भुमिधराचा वौंश त्या दिनकराचा ।
तनुज दशरथाचा स्वामि वायोसुताचा ।
वदति सकळ वाचा घोंष नामांबृताचा ॥ १ ॥
तरणि निजतपाचा वन्हि वैराग्य वाचा ।
मुगुटमणि सुरांचा मेरु धैर्या गुणाचा ।
प्रेमजळधर साचा सिंधु शांतीरसाचा ।
वदति सकळ वाचा बंधु त्या राघवाचा ॥ २ ॥

( १५२ ) नाथ लोकत्रयाचा

हरि हरि[1] दुरितें तो स्वामि वैकुंठराजा ।
सुरवर नर पाळीं शोभती चारी भूजा ।
झळफळित [2]किळा हे हेमरत्नांबरांचा ।
परम कुशळ[3] शोभे नाथ लोकत्रयाचा ॥ १ ॥
शमशम[4] विषयांची कांहि केल्यां शमेना ।
आचपळ मन माझें साजणी हें दमेना ।
अनुदिन मज पोटीं दुख तें ही वमेना ।
तुजविण जगदीशा वेळ तो ही गमेना ॥ २ ॥

( १५३ ) सुख दुःख मज माझें

विषम गति मनाची ते मला आवरेना ।
शरिर विकळ कामें तें कदा सांवरेना ।
सुख दुख मज माझें वाढिलें तें चि जेऊं ।
रघुपति तुजला रे कासया बोल ठेऊं ॥ १ ॥

१ 'हर' म. पा. २ "झळफळ किळ फा़क" म. पा. ३ 'पुरख' म. पा.
४ 'समरस' म. पा.

नवस हरिकथेचे रामभक्तीं करावे ।
कठिण विषम काळीं नेम जीवीं धरावे ।
विविध सकळ कांहीं दोष नासोनि जाती ।
रघुविरभजनें हो कामना पूर्ण होती ॥ २ ॥

## ( १५४ ) स्वतंत्र श्लोक

जन वमनपरी तूं टाकि थुंकून चित्ता ।
वन विजन धरी तूं ज्ञानवैराग्यवंता ।
विसर सकळ दुखें पावती शांति रामीं ।
पहुडसि सुखसेजे सर्व कल्याणधामीं ॥ १ ॥
स्मरण स्मर हरीतो श्रांत प्राणी करीतो ।
मन बहु विकरीतो[1] शाहणें सिंतरीतो[2] ।
विवेक विसरवीतो नष्ट धारिष्ट नेतो ।
रघुविरस्मरणें तो काम ही जिंकिजेतो ॥ २ ॥
गजबज मज आतां सर्वथा आवडेना ।
बहुत बडबडीतो त्यास आम्हा पडेना ।
विचरत नरमानें[3] सर्वदा आनुरागें ।
आनुदिन वितरागें भोगत्यागें विरागें ॥ ३ ॥
नीळें नसे परि असे न दिसोन डोळां ।
स्पर्शों न ये परि सये घन योमलीळा ।
ऐसा विराम विण काम च काम आहे ।
सांडून दृश्य अघटीत प्रगटीत राहे ॥ ४ ॥
विमळ विमळ भासे भासतां भास नासे ।
निखळ सुख विळासे बुद्धिबोधें विकासे ।
वचनजनित सूखा कोप संख्या करावी ।
निजखुण निजभावें दृढ जीवीं धरावी ॥ ५ ।

---

१ विखरितो, विस्तारितो. २ फसवितो. ३ नर्मानें, सुखानें, स्वच्छंदानें.

मन मनन करीतें धारणा ही धरीतें ।
त्वरित गति वरीतें निर्गुणा वीवरीतें ।
भवजळ उतरीतें लीन ही होत जातें ।
आचपळ प्रणवातें उन्मनी मुक्तिदातें ॥ ६ ॥

नवल किती करावें काय जीवीं धरावें ।
तन मन विवरावें सर्व चकीत व्हावें ।
बहुरुप दिसे नाना अंतरीं भाववेना ।
जीवनगति कळेना नीवळेना वळेना ॥ ७ ॥

विलगट हट नाहीं चाट मोकाट नाहीं ।
खटपट झट नाहीं सर्वथा गर्व नाहीं ।
निपट कपट नाहीं कोप आरोप नाहीं ।
चटपट चट नाहीं वेर्थ ग्रामण्य नाहीं ॥ ८ ॥

भजन पुजन आहे ज्ञान वैराग्य आहे ।
बहुत श्रवण आहे धारणा सिद्ध आहे ।
हृदय सदय आहे पुण्य कारुण्य आहे ।
विवर विवरताहे गुणसंपन्न आहे ॥ ९ ॥

बहुविध पद बोधी बोध बोधीं प्रबोधी ।
पवनतनुज शोधी प्राण रोधी विरोधी ।
हरिहरविधिशक्रादीक देवां समस्तां ।
बहु तळमळ वेथा थोर जाली अवस्ता ॥ १० ॥

श्रवण मनन केलें अंतरामाजि नेलें ।
निजबिज निवडीलें दृश्य गेलें निमालें ।
कठिणपण उडालें आर्त पोटीं दडालें ।
गगन सघन जालें चीत्त धालें निवालें ॥ ११ ॥

सुतक सुतवधूचें बंधुमातापित्याचें ।
उपजत मरतां ही गोत्रजांगोत्रजांचें ।

परि हरिहरदासां त्यागितां देह कांहीं ।
इतर जडजिवांला सूतकीं चाड नाहीं ॥ १२ ॥

तुजविण करुणाब्धी बाधिता हे भवाब्धी ।
सकळवरगुणाब्धी पाहें दीना दयाब्धी ।
सुरवरद सुखाब्धी बांधवीला जळाब्धी ।
हरिहर वर देतो आर्भकांला क्षिराब्धी ॥ १३ ॥

समरस विषयांची वाउगी वेर्थ वायां ।
तरुणपण शरीरीं घेतलें सर्व जायां ।
कठिण विषम काळीं सर्व सांडूनि जावें ।
म्हणउनि रघुनाथीं सर्व भावीं भजावें ॥ १४ ॥

करकर न करावी प्रीति रामीं धरावी ।
गरगर फिरवी ते वासना वीसरावी ।
हरिहर म्हणतां तो देव तत्काळ पावे ।
अति विमळ पवाडे मानसीं आठवावे ॥ १५ ॥

मदनदमनकर्ता तो चि सामर्थ्येधर्ता ।
सकळजनविवर्ता जाणत्याहूनि पर्ता ।
भजनजनप्रवर्ता तूर्त तैसाचि वर्ता ।
भ्रमत विषम गर्ता धूर्त त्याहूनि पर्ता ॥ १६ ॥

हुर हुर हुर वाटे अंतरीं बाष्प दाटे ।
तुजविण रघुराजा लोचनीं नीर लोटे ।
तन मन धन वीटे दुख देहीं[1] न कंठे ।
बहुविध उपचारें क्षोभलें चित्त ऊठे ॥ १७ ॥

शमदमनदमानें ध्यान ध्यानी मनानें ।
येम नियम जनानें पाविजे सज्जनानें ।
तदुपरि वरि वारी वीवरीतां विचारी ।
रज तम दुरि सारी दास देवाधिकारी ॥ १८ ॥

---

१ 'हें ही' म. पा.

बहुत कलकलीतें उष्ण हें प्राण घेतें ।
शरिर विकळ होतें तोंड वाळोनि जातें ।
निपट कळकळीतें पष्ट धारिष्ट नेतें ।
कठिण तगबगीतें खेद कंपीत होतें ॥ १९ ॥
सहज घडत आहे तैसतैसें करावें ।
अनकुळ पडताहे तेथतेथें फिरावें ।
आवचट घडतें तें सज्ज होऊन येतें ।
खटपट करणें तें शेवटीं वेर्थ जातें ॥ २० ॥
कोदंड चंड दोर्दंडबळें कडाडी ।
महेशवासकैळास तेणें घडाडी ।
वितंड बंद दशमुंड क्रोधें भडाडी ।
जैसा समीरमिळणी वन्ही तडाडी ॥ २१ ॥
कृतांत काळ भवव्याळ पळोनि गेला ।
अभिमान मान अपमान उभा विराला ।
प्रपंच संच वीसंच असतां च जाला ।
कृपा अपार सार फव्ली सद्भाविकाला ॥ २२ ॥
सुरवरवरदाचें सैन्य गोलांगुळांचें[1] ।
सकळ विकळ केलें राज्य लंकेश्वराचें ।
अघटित घडलें हो श्वेत बंदीं जयाचें ।
सबळ बळमधांधें खुंटिलें राज्य[2] साचें ॥ २३ ॥
दशमुख रणशोधें शक्तिबोधें विरोधें ।
अनुज रघुविराचा पीडिला मुख्य क्रोधें ।
कपिकटकविरामें मांडिला शोक रामें ।
परम विकल शुधी सांडिली योगधामें ॥ २४ ॥
विधिकुळभुषणाचें राज्य लंकापुरीचें ।
अगणित सळ ज्याचें सर्व गेलें तयाचें ।
म्हणउनि विषयांचें वैभव कोण साचें ।
तजुन जगदिशाचें नाम घ्यावें फुकाचें ॥ २५ ॥

१ माकडाचें. २ राक्षसांचें म. पा.

स्वजन जन तजावे देश लंघूनि जावें ।
कठिण मन करावें झाडखंडीं भरावें ।
अनुदिन विवरावें दूरि देशीं भरावें ।
निरुपण विवरावें तर्कपंथें चि जावें ॥ २६ ॥

हरिसुतदमना रे व्योमजानंदना रे ।
तुजविण सजना रे खंति वाटे मना रे ।
स्वजनजनघना रे तूं चि आम्हा दिना रे ।
नयनिं वदन पाहे हे मनीं वासना रे ॥ २७ ॥

सिंधूर वर्ण सरळा गिरि मंद्र जैसा ।
क्रुदांत काळ खवळे बलभीम तैसा ।
गंभीर मेघ धडके प्रळई गडाडी ।
कल्पांत वीज तडके तैसा तडाडी ॥ २८ ॥

भजन करित गेले ते जनीं ख्यात जाले ।
भव निरखित भ्याले रामसुखें निवाले ।
गुण जळधर धाले रामगुणीं बुडाले ।
भ्रमत भ्रमत गेले लोक संतृप्त जाले ॥ २९ ॥

मि मि मि मि म्हणतां हीं सर्वथा बाध नाहीं ।
गुणविवरण पाही निर्गुणामाजि राहीं ।
श्रवण मनन कांहीं भेद गेला प्रवाहीं ।
अतुळ वितुळ तां हीं वंदिजे योग दांहीं ॥ ३० ॥

जनी हरकसी वरकसी बरकसीसी ।
नको फरकसी तरकसी भरकसीसी ।
किती चरकसी झरकसी थरकसीसी ।
पुढें किरकसी किरकसी किरकसीसी ॥ ३१ ॥

खणखणित खणाणी ताळ कल्लोळ जेव्हां ।
दणदणित दणाणी चंग मृदांग तेव्हां ।

झणझणित झणाणी सप्त रागें प्रसंगें ।
चणचणित चणाणी वाणि ते रागरंगें ॥ ३२ ॥

चक चक चक वायां वेर्थे[1] संसार जायां ।
ठक ठक ठक काया लाग गोपाळपाया ।
हरित दुरित नाशी देव नाना विळासी ।
निशिदिन तुजपासीं बैसलासी [2]तपासी ॥ ३३ ॥

अचुक वर चुकेना कीर्ति कोण्ही तुकीना ।
सुरवर नर नाना चालवी सर्व सेना ।
बहुरुप बहुवेक्ती अंतरीं आदिशक्ती ।
प्रथम श्रवणचेनी होये सायोज्यमुक्ती ॥ ३४ ॥

रतिमद पळ पाहे पाप कल्पांत राहे ।
सुख लघुतर आहे दुख अंतीं न साहे ।
त्यजि परवनितेचा लोभ हा अंतरींचा ।
येजि पति जगतीचा नाथ योध्यापुरीचा ॥ ३५ ॥

पट पट तें निपट निट लाविना मना ।
फट फट फट फट काय सांगतो जना ।
चट पट चट पट चपट काचना ।
लट फट लट फट लट फट वासना ॥ ३६ ॥

सीरजोर सीरजोर वरजोर जोर हा ।
थोर थोर फार थोर धींग मारुती पहा ।
भार भार राजभार दैत्यभार मारितो ।
भुभुकारणें अपार सुर तो विदारितो ॥ ३७ ॥

चटचुट चुटचट चट चुटका बरा ।
फट फुट फट फुट फट फट खापरा ।
लट लुट लट लुट लट लुट होतसे ।
तट तुट तट तुट तट तुट जातसे ॥ ३८ ॥

१ " सर्व " पा. म. २ " बैसलासे जपासी " पा. म.

हृदय परि हरातें पितृ जीवाकरातें ।
स्वसुख मुनिवरातें साह्यकारी सुरातें ।
जिवनईवनरासी मित्र त्या वानरांसी ।
रिपु रजनिचरांसी स्वामि तो रामदासी ॥ ३९ ॥

सदट सघन वोळी अक्षरें दाटखेटा ।
सरळ सगट वाची धाकुटा आणि मोठा ।
अचुक चुकत नाहीं पुस्तकीं शोध नाहीं ।
बहुत विवरतां ही वेंग[1] कांहीं च नाहीं ॥ ४० ॥

परहित निवटाया वेश केला नटाया ।
करिसि किति धिटाया देह आलें विटाया ।
स्वहित करिं सुटाया काळ येतो कुटाया ।
भज सुरमुगटा या कर्मबुधी सुटाया ॥ ४१ ॥

## ( १५५ ) गुप्त पंथ

मान थोर यान मोर तो समोर मोरया ।
सार सारसा विचार तो चि राखतो रया ।
हीन दीन ते चि लीन होतसे दया तया ।
बुधी हे प्रसीध देव देतसे जया तया ॥ १ ॥

स्फूर्तिरूप ते अमूप शारदा बळावली ।
सावचीत होत चीत साधकांसि फावली ।
अंतरीं मनांतरीं विवंचितां चि पावली ।
भाव तो स्वभाव भाव भावनेसि भावली ॥ २ ॥

भक्तिरंग ते तरंग अंतरंग ऊठती ।
स्छळसंग ते प्रसंग सर्व संग सूटती ।
वाड वाड तें पवाड जाड जाड बोलणें ।
बंद ही प्रबंद छेद आर्थरूप चालणें ॥ ३ ॥

---

१ व्यंग.

गुप्त संत गुप्त पंथ तो अनंत पाविजे ।
दृश्यमूळ सानकूळ भावनेसि भाविजे ।
देव दक्ष तो अलक्ष त्यास लक्ष लाविजे ।
तत्व सार वेदनें निवेदनें चि पाविजे ॥ ४ ॥

गुप्त होये त्या न होय जन्ममृत्ययातना ।
ज्ञान गुप्त तो आलिप्त वेगळा चि या जना ।
अंतरें चि वोसरे सरोन ही उपासना ।
भक्तराज मुक्तकाज काये कर्म कामना ॥ ५ ॥

बंड बंड तें उदंड लंड भंड होतसे ।
तंड तंड तें वितंड अर्थ वेर्थ जातसे ।
हीण काळ वेळ ते भुतासि भूत खातसे ।
फार मछरें भरे अभिष्ट त्यांत जातसे ॥ ६ ॥

## ( १५६ ) धन्य धन्य ते चि धन्य

भक्ति ज्ञान योग ध्यान हें प्रमाण जाणिजे ।
कर्मनीति न्यायनीति सर्व नीति मानिजे ।
थानमान भेदमान्य लोकमान्य चालणें ।
धन्य धन्य ते चि धन्य वेदमान्य बोलणें ॥ १ ॥

देव देव मुख्य देव वासुदेव वोळखा ।
काय काय कोण काये हा उपाय तो सखा ।
हीत हीत हें स्वहीत सप्रचीत बोलणें ।
भक्त भक्त देव भक्त बोलणें न चालणें ॥ २ ॥

भास दृश्य दृश्य भास भास वास तो फिका ।
शेष तो अशेष शेष लेश ही नका नका ।
हेत तो अहेत हेत वृत्ति हेत मावळे ।
तें मनें विवंचनें निवेदनें चि नीवळे ॥ ३ ॥

साळ माळसा विशाळ काळवेळ नाडळे ।
वेद श्रुती नेति नेति तो मनासि नाकळे ।

योग याग भोगत्याग वीतराग होइजे ।
हें नहोन मुख्य ज्ञान तें चि होउनि जाइजे ॥ ४ ॥
रामदास देवदास निजदास दास तो ।
दासदास तो उदास आसपास भासतो ।
गुप्त पीर तो फकीर त्या जिकीर कासया ।
पीर पीर बेफिकीर तो जिकीर हो तया ॥ ५ ॥

## ( १५७ ) शब्दार्थभेद

पुष्पमाळ भूमिमाळ मानमाळ जाणिजे ।
वाद्यताळ क्रोधताळ वृक्षताळ नेणिजे ।
वृत्तिढाळ रत्नढाळ पाणढाळ बोलिजे ।
मुख्य जाळ पोटजाळ दुखजाळ खोलिजे ॥ १ ॥
काष्ठपाट बाजपाट तोयपाट वेगळा ।
मुख्य पाट मेळकाट पापकाट तो खळा ।
पात्रघाट वाटघाट आटघाट भिन्न तो ।
काशताट शस्त्रताट वंशताट छिन्न तो ॥ २ ॥
घातवेळ खाद्यवेळ काळवेळ ते भली ।
शस्त्रधार वोघधार दुग्धधार देखिली ।
शस्त्रतीर काष्ठतीर पैलतीर तें पहा ।
राजभार भूमिभार वृक्षभार ते माहां ॥ ३ ॥
शस्त्रसीग धान्यसीग उच सीग देउळा ।
शस्त्रमार शब्दमार खेळमार राउळा ।
सौख्यरंग रागरंग सर्वरंग रंग तो ।
वस्तसार बुद्धिसार अर्थसार सार तो ॥ ४ ॥
गद्य येक पद्य येक शब्द येकसारिखा ।
यातिभेद दृश्यभेद अर्थभेद वोळखा ।
भाव भिन्न गर्भ भिन्न भिन्न भिन्न सर्व ही ।
लोकदास रामदास देवदास तो सही ॥ ५ ॥

## ( १५८ ) लंकेंत मारुती

रुद्र हा समुद्र देखत क्षणीं उठावला ।
सिराणिचें[1] किरोण[2] सज्ज त्रीकुटासि पावला ।
वात जातसे तसा चि स्थूळ देह राहिला ।
वावरोन वीवरोन तो त्रिकूट पाहिला ॥ १ ॥

हीण देव दीनरूप देखतां चि पावला ।
गडगडीत घडघडीत कडकडीत कोपला ।
लाटि कुटी पाडि फोडि झोडि झोडि झोडिला ।
दैत्यलोक येक हाक गर्व सर्व मोडिला ॥ २ ॥

सानरूप तें स्वरूप गुप्तरूप बैसला ।
पुछ्यकेत शोध घेत त्रीकुटांत पैसला ।
गडगडी दिसेचिना बुझेल कोण कैसला ।
वळवळी चळचळी विशाळ ज्वाळ जैसला ॥ ३ ॥

काळदंडसें प्रचंड तें वितंड जातसे ।
भार भार राजभार पुछ्यमार होतसे ।
पाडिले पछ्याडिले रुधीरपूर वातसे ।
दैत्य बोलती चलें पळोन काये घ्यातसे ॥ ४ ॥

काळकूट तें त्रिकूट धुट धुट ऊठिले ।
दाट थाट लाट लाट कुट कुट कुटिले ।
घोर मार ते सुमार लुट लुट लुटिले ।
चिर्डिलें चि घर्डिलें चि फुट फुट फुटिले ॥ ५ ॥

दाट थाट आट घाट तें कपाट घातलें ।
सर्व रोध तो निरोध थोर दुख पातलें ।
सैन्यकट त्यासि कट्ट कर्करूनि बांधलें ।
थोर घात देहपात चर्फडीत चेंदलें ॥ ६ ॥

१ शिराणी=अपूर्वता, आनंद २ उड्डान.

वज्रपुछ्य त्यासि तुछ्य मानिलें निशाचरीं ।
सर्व हि खणखणाट ऊठिले घरोघरीं ।
फुटेचिना तुटेचिना समस्त भागले करीं ।
लटलटीत कांपती बहुत धाक अंतरीं ॥ ७ ॥

थोर थोर दूर दूर दाट दाट दाटले ।
कोठ मस्त तंग बस्त थाट थाट थाटले ।
मंदिरीं घरोघरीं अचाट पुछ्य वाढलें ।
दैत्यनास तो घसास काट काट काटिले ॥ ८ ॥

हात पाय मान माज वोढितें पछ्याडितें ।
आड्चणीत आड्कऊनि पीळपेंच काढितें ।
लोहोदंडसें अखंड राक्षसांसि ताडितें ।
मूळ डाळ व्याळ जाळ दैत्यकूळ नाडितें ॥ ९ ॥

थोर धाक होत हाक त्रीकुटास पूरले ।
घरोघरीं चळवळी पुढें उदंड ऊरले ।
बैसले उदंड दैत्य ते सभेंत घूसलें ।
सभा विटंबिली बळें च कोणसें न सूचलें ॥ १० ॥

देहमात्र येक सूत्र थोर येंत्र हालिलें ।
पुरोन ऊरलें बळें सभेमधें चि चालिलें ।
रत्नदीप तेलदीप तेज सर्व काढिलें ।
लाटि कूटि धामधूम पाडिले पछ्याडिले ॥ ११ ॥

गुप्तरूप मारुती दशाननाकडे भरे ।
मुगुट पाडिला सिरीं कठोर वज्रठोंसरें ।
सभा विटंबिली बळें चि गर्गरीत वावरे ।
बळाढ्य दैत्य मारिले कठीण पुछ्य नावरे ॥ १२ ॥

हस्तमार दैत्यमार दंडमार होतसे ।
लेंड ते कलंडले उलंडले चि भंडसे ।
येत येत पुछ्यकेत दैत्य सर्व बोलती ।
बळें चि बैसले भुमी न बोलती न चालती ॥ १३ ॥

स्वप्नहेत सौख्य देत दैत्यघात भावला ।
रुद्र हा उठावला कुढावयासि पावला ।
जाळिलें त्रिकूट नीट आपटूनि रावणीं ।
राक्षसांसि थोर दुख ऊसिणें ततक्षणीं ॥ १४ ॥
दीनरूप देव सर्व हास्यरूप पाहिले ।
कळवळोनि अंतरीं रघोत्तमासि वाहिलें ।
येक वीर तो सधीर थोर धीर वाटला ।
तोष तोष तो विशेष अंतरीं च दाटला ॥ १५ ॥
उदंड देव आटिले तयांसि भीम आटितो ।
रामदूत वातसूत लाट लाट लाटितो ।
उट आमुचें समस्त कुट कुट कुटितो ।
धुट धुट दैत्य त्यांस लुट लुट लुटितो ॥ १६ ॥
समस्त दैत्य आ[1]ळितो बळें त्रिकूट जाळितो ।
पुरांत गोपुरें वरीं निशाचरांसि वाळितो ।
उदंड अग्न लाविला ब[2]हु बळें भळावला ।
कडाडिला खडाडिला गडाडिला घडाडिला ॥ १७ ॥
उदंड जाळिलीं घरें कितेक भार खेचरें ।
कि[3]लाळ धांवती भरें सुरांसि वाटलें बरें ।
वितंड दैत्य धांवडी तयांत पुछ्य भोंवडी ।
कडकडी खडखडी गडगडी घडघडी ॥ १८ ॥
बळें चपेट मारिला उदंड दैत्य राहिला ।
तरारिला थरारिला भयंकरु भरारिला ।
गदगदी तनु वितंड सागरीं सरारिला ।
ज्यानकीस भेटला प्रभुकडे झरारिला ॥ १९ ॥

---

१ ' वाळितो ' चें ' आळितो ' केलें आहे. २ ' बळें ' चें ' बहु ' केलें आहे. ३ तिसऱ्या भागांतील स्फुट श्लोक ५ यांत हा शब्द आला आहे. तेथें अर्थ दिलेला नाहीं. संदर्भावरून ' पाणी ' असा अर्थ दिसतो.

स्वप्नहेत सौख्य देत दैत्यघात भावला ।
रुद्र हा उठावला कुढावयासि पावला ।
जाळिलें त्रिकूट नीट आपटूनि रावणीं ।
राक्षसांसि थोर दुख ऊसिणें ततक्षणीं ॥ १४ ॥

दीनरूप देव सर्व हास्यरूप पाहिले ।
कळवळोनि अंतरीं रघोत्तमासि बाहिलें ।
येक वीर तो सधीर थोर धीर वाटला ।
तोष तोष तो विशेष अंतरीं च दाटला ॥ १५ ॥

उदंड देव आटिले तयांसि भीम आटितो ।
रामदूत वातसूत लाट लाट लाटितो ।
उट आमुचें समस्त कुट कुट कुटितो ।
धुट धुट दैत्य त्यांस लुट लुट लुटितो ॥ १६ ॥

समस्त दैत्य आळिंतो[1] बळें त्रिकूट जाळितो ।
पुरांत गोपुरें वरीं निशाचरांसि वाळितो ।
उदंड अग्न लाविला बहु[2] बळें मळावला ।
कडाडिला खडाडिला गडाडिला धडाडिला ॥ १७ ॥

उदंड जाळिलीं घरें कितेक भार खेचरें ।
किलौळ[3] धांवती भरें सुरांसि वाटलें बरें ।
वितंड दैत्य धांवडी तयांत पुछ्य भोंवडी ।
कडकडी खडखडी गडगडी घडघडी ॥ १८ ॥

बळें चपेट मारिला उदंड दैत्य राहिला ।
तरारिला थरारिला भयंकरु भरारिला ।
गदगदी तनु वितंड सागरीं सरारिला ।
ज्यानकीस भेटला प्रभुकडे झरारिला ॥ १९ ॥

---

१ 'वाळितो' चें 'आळितो' केलें आहे. २ 'बळें' चें 'बहु' केलें आहे. ३ तिसऱ्या भागांतील स्फुट श्लोक ५ यांत हा शब्द आला आहे. तेथें अर्थ दिलेला नाहीं. संदर्भावरुन 'पाणी' असा अर्थ दिसतो.

काळसे विशाळ दैत्य त्यांत येकला भरे ।
थोर धाक येक हाक काळचक्र बावरे ।
शक्ति शोधिली बळें चि भव्य देखिलें धुरें ।
वानरांसहीत रामदास भेटला त्वरें ॥ २० ॥

## ( १५९ ) विचारवंत

मेरुमंदारावरी सरी कदा असेचिना ।
विधीभुगोळ ब्रह्मगोळ दुसरा दिसेचिना ।
सार सार हा विचार तुळणा वसेचिना ।
दृश्य भार फार फार थाट नीरसेचिना ॥ १ ॥
महि उदंड हे प्रचंड खंड खंड राहिली ।
बंड बंड ते अभंड चंड भार साहिली ।
कटतटीं च सेवटीं नसे कदापि पाहिली ।
लघुलयें चि अन्वयें उदंड वेळ दाहिली ॥ २ ॥
चित्र हें विचित्र चित्र निर्मिलें कळेचिना ।
सुत्र तें परत्र सुत्र गुप्त आकळेचिना ।
उदंड वीवरें भरें विवर्तु हा ढळेचिना ।
लयो चि उदयो पुढें कुटीळ हा टळेचिना ॥ ३ ॥
शस्त्रसार हा विचार ढोबळें तुटावया ।
लागवेग हाल हाल दृश्य हें लुटावया ।
ज्ञान जाड तर्क वाड काळ तो कुटावया ।
गर्व त्याग संग त्याग वीवरीं सुटावया ॥ ४ ॥
दास दास तो उदास निर्मळीं च राहतों ।
पंचभूत अष्टधा आधोर्ध सर्व पाहतो ।
सुखें दुखें परोपरीं विचारवंत साहतो ।
अखंड भक्तवछ्ळु दयाळुवासि बाहतो ॥ ५ ॥

## ( १६० ) पांडुरंग

रंग रंग तो सुरंग पांडुरंग पाहतां ।

धींग धींग थेर धींग कीर्तनांत राहतां ।
घोष घोष तो विशेष नामघोष बाहतां ।
तेथें जाइजे आगत्य सुख दुख साहतां ॥ १ ॥

( १६१ ) जटाधरु

गळां कराळ मुंडमाळ व्याळ लाळ गाळितो ।
करीं कपाळ भूतपाळ शूळ तो झळाळितो ।
डीडीम डीडीम डौर नाद वाजवी ।
जटाधरु दिगंबरु विभूति ऊटि साजवी ॥ १ ॥

संवाया[1]

( १६२ ) हरिदास्य

खांसील[2] लेसील देसील घेसील तें चि तुला तितुकें तरि भोगे ।
काळचपेट लपेटित लाटित दाटित ते नव्हती तुज जोगे ।
कर्कश हाकुनि झोकुनि टाकुनि मारिति रे मनुजा तुज धोंगे[3] ।
दास म्हणे हरिदास्य करीं तरि धृव जसा न चळे वरि तो गे ॥१॥

( १६३ ) पंचवटींत कपटी रावण

नर सुंदर फार विकार करी वरि बोलतसे मनिंचा कपटी ।
परि अंतर चोर निशाचर हा वर वेश धरूनि बळें दपटी ।
जगतीतळ मंडळ धुंडितसे जन पावन भूवन पंचवटी ।
भीक मागत रावण हिंडतसे खट चावट चाट कुटीळ जटी ॥ १ ॥

श्रीराम महिम्न

( १६४ ) स्तवन

गणाधीशा ईशा परम रमणीयां कमणियां ।
कृपाळुवा देवा झडकरि मला करणें दया ।

---

१ मुळांत च हा ' मथळा ' आहे. पण एवढ्या दोन च सवाया देऊन पुढें सबंद पान कोरें सोडलें आहे. २ ही सवाई आणखी पुढें एकदा आली आहे. ३ धोंगे=लवकर.

समर्थानें दीनें सकळिक गुणी करणें सदा ।
दिनानाथा वेथा चुकउनि बळें बसवीं पदा ॥ १ ॥
सदा विद्या बुधी तुजविण कदा न घडे जनीं ।
विधीसूते माते निकट चि जनीं वससि मनीं ।
स्फुरद्रूपें सोपें अनुभव तुझा घ्यास धरितां ।
सदानंदें छेंदें आवघड पदें घ्यान धरितां ॥ २ ॥
गुरुदेवा सेवा बहुत चि घडो हेतु पुरता ।
महंतांच्या संगें पतित चि परी होये सरता ।
प्रचीतीनें न्यासें सकळिक जनामाजि वरता ।
अधोमुखी माया तजुन चि बळें सर्व परता ॥ ३ ॥
प्रबंदाचीं कामें परम कठिणें जाणत कवी ।
बहु धाटी मुद्रा सकळिक जना मानत नवी ।
माहां गद्यें पद्यें विवरत सदा बोलत खवी[1] ।
परीक्षेचे साधु बहुविध जनीं जाणत चवी ॥ ४ ॥
सदा ताळें घोळें हरिजन कथा करिती बरी ।
बहु ज्ञाता श्रोता निरखित पदें पद वीवरी ।
खरें खोटें जाणे श्रवणमननें निश्चय करी ।
तरे तारी मोरी[2] जननमरणें दुखलहरी ॥ ५ ॥

## ( १६५ ) शारदा[3]

चतुर्भूजा देव्या चमकत गुणी हंसवहनी ।
विणे ताळें घोळें झमकत लिळा दोषदहनी ।
विधीसूते माते गमकत कळा योगगहनी ।

---

१ या शब्दाचा काय अर्थ करावा ? शम् किंवा क्षम् धातूपासून हा शब्द निघाला आहे काय ? तसें असेल तर खवी म्हणजे विचारवंत, क्षमाशील असा अर्थ होईल. हा च शब्द तिसरा भाग स्फुट श्लोक ५६ त व श्रीसमर्थप्रताप १७×१५ त आला आहे. तो पाहणें. २ ‘ वा ’ चा ‘ मा ’ केला आहे. ३ हीं पंचकांचीं नांवें मुळांत च दिलेलीं आहेत.

सदा सतीं पुतीं धमकत रसें रंगरहनी ॥ १ ॥
जयाला बोळे तो सुरवर नरांमाजि पुरता ।
तिहीं लोकामध्यें मिरवत रुपें सार सरता ।
कळेना कोणाला विवरत परेहूनि परता ।
जनीं सर्ते पुर्ते विलसत रमा त्यास वरता ॥ २ ॥
जना शोधी बोधी बहुत चि जनामाजि चटका ।
गुणें वेधी भेदी रसिक चि कळा रम्य चुटका ।
विकाराचा तूटे समजत मनीं सर्व तटका ।
चुके यातायाती कठिण समयो काळ फटका ॥ ३ ॥
स्फुरद्रूपा वाणी सुलळित मुखीं सार वचनें ।
फुकासाठीं लाभे आवचट जनीं मोक्षवचनें ।
गुणी ज्ञाता त्राता जडमुढ जिवां पावन करी ।
समस्तै ब्रंह्मांडीं वदत चि मुखें कीर्ति पसरी ॥ ४ ॥
जगजोती जागे प्रगट चि जनामाजि जिवनीं ।
भला भावीताहे अकळ चि कळा सर्व भुवनीं ।
समर्था देवाचा विनवित मुखें दास वदनीं ।
वसावें वो माते निसिदिन मनामाजि सदनीं ॥ ५ ॥

## ( १६६ ) कथा ५

कथा चाले बोले वदवित सदानंद घमडी ।
बरी दीक्षा दक्षा आवगत मुखें धींग धिमडी ।
विणे ताळें ताळी फडकत पदें त्रास मिळणी ।
प्रमाणानें येतीं सहज चि पुढें लोक मिळणी ॥ १ ॥
वदे वक्ता साक्षी नवविध भरें भाव पुरता ।
प्रसंगाचें गाणें चढत चि नव्हे रंग सरता ।
सिमा नाहीं तेथें परतर सुखामाजि झुलती ।
सदा श्रोते वक्ते अभिनव मनामाजि डुलती ॥ २ ॥

बहु धाटी मुद्रा अवघड पदें[1] त्रास दोहडे ।
माहांगद्यें पद्यें नवरस कळा रंग निवडे ।
समस्तांचीं चित्तें चकित चि देहेभाव नसती ।
भरे अर्थाकारें विवरत सदा येक दिसती ॥ ३ ॥
फुलें माळा गंधें उधळत भरें फार धुशरें ।
मोहोछायें न्यायें मिरवत नसे ध्यान दुसरें ।
बहु वाद्यें मेळा कडकत भरें व्योम भरलें ।
समाधानें जालीं हरुषत मनीं आर्त पुरलें ॥ ४ ॥
कथा हे देवाची अगणित सिमा पुण्यमहिमा ।
कथेंमधें देवो वसत चि असे हें चि सहि मा ।
तदाकारें थोरें निसिदिन मनामाजि धमके ।
निजध्यासें तोषें स्मरत चि सुखें चित्त चमके ॥ ५ ॥

## ( १६७ ) गायन ५

समारंभें गावें प्रगट चि जनामाजि सुख तें ।
सदा वाचे देवो अनुदिन वदे नाम मुख तें ।
भले गाती ध्याती प्रगट चि सुखें दूरि दुख तें ।
करी वेळे वारी स्वहित चि सदानंद तुकतें ॥ १ ॥
सदा वाचीताहे विवरत मनीं तो चि पुरता ।
प्रचीतीचें बोले समजत मनीं तो चि सरता ।
जना तारीताहे निज बिज सुखें तो चि पुरता ।
भजावें देवाला नवविध जनीं तो चि तरता ॥ २ ॥
खरें खोटें नेणे अनुभव वदे तो चि लटिका ।
माहां योगी त्यागी सकळिक जनालागि चटका ।
तुटावा मायेचा समजत मनीं सर्व तटका ।
पुढें येणें चुके विवरत नसे काळ फटका ॥ ३ ॥

---

1 ' पदें त्रास ' असा च शब्द सर्वत्र सांप्रदायिक वाङ्मयांत आला आहे.

सदानंदा वंदा प्रगटत हरी जनमानसीं ।
जनें हीनें दीनें वळगत परी तुळणा तसी ।
चमत्कारें वारें प्रचळित जनांतर वीवरी ।
घरें दारें पोरें सकळिक नव्हे दुरि हें करी ॥ ४ ॥
मनाचा वीसांवा सकळमंगळदायक हरी ।
परि त्यागें योगें अगणित सुखा पाव लौकरी ।
बरी भक्तियोगें नवविध भजनें चि विवरी ।
करी कर्ता भर्ता निगमगुज वरी समसरी ॥ ५ ॥

## ( १६८ ) विष्णु ५

चतुर्भूजा देवा क्षिरनिधिवरी शेषशयना ।
तुझे भेटीसाठीं बहुत चि जिवीं आस नयना ।
त्रिलोकीच्या नाथा निपट चि हिणाहूनि हिण मी
समर्था मी तुझा म्हणवित जनीं वेर्थ सिण मी ॥ १ ॥
चरित्रें देवाचीं अगणित नसे त्यास गणणा ।
समर्थाची लीळा आतुळ चि किती देउं तुळणा ।
बहुतांला देवें बहुत चि बरें सौख्य दिधलें ।
तुझे सेवेसाठीं न कळत मुखें दीन वदलें ॥ २ ॥
दिनानाथा स्वामी उचित चि बरें नाम न टळे ।
महीमा देवाचा सुरवरविधीलागि न कळे ।
उपाधीचा साक्षी सकळिक जिवांलागि जिववी ।
दयासिंधु दाता हिनादिनजनालागि निववी ॥ ३
समर्था मी तुझा तुजविण मला कोण पाहातां ।
सदा सांभाळावें जवळि च जिवामाजि राहातां ।
सुखानंदें छंदें तव गुणकथा गात वदनीं ।
विवेकाचे वाटे अघटित घडे मार्ग सदनीं ॥ ४ ॥
सुरांचा कैवारी विलसत जनामाजि न कळे ।
सदा पाळीताहे हरिजनसखा ब्रीद न चळे ।

करीतो कर्ता तो सहज चि सुखें भेटि दिधली ।
भरीतो भर्ता तो सहज चि पुढें सृष्टि रुचिली ॥ ५ ॥

## ( १६९ ) शंकर ५

माहादेवा शंभो प्रगट चि सदा योग सदना ।
दयाळु दासांचा मुदित चि सुखें हास्यवदना ।
माहांयोगी त्यागी दमित चि बळें काममदना ।
प्रतापाचा सिंधु सुरवररिपुकुळकंदना ॥ १ ॥
पिनाकी जो शूळीं पशुपति गजासूरदमना ।
कुढावा सर्वांचा समरत चि माहां शोकशमना ।
तिही लोकांमधें भ्रमत चि बहुरूपगमना ।
तया गातां ध्यातां विवरत मनीं भेदममना ॥ २ ॥
जटाधारी लीळा उधळण चिताभस्म शयनीं ।
फणीधर्ता भर्ता धवळित तनु ज्वाळ नयनीं ।
भुतें प्रेतें तेथें क्रिडत चि सुखें दीसरयनी ।
वदे नामें निष्ठा डुलत चि सदा पंचवयनी ॥ ३ ॥
उदारांचा राणा त्रिभुवनपती कोण तुळणा ।
गुणाचीया खूणा आगणित कळा सर्व निपुणा ।
रिधी सीधी पुढें न गणित तयालागि सहसा ।
समर्थाला वर्णूं न शकत कदा आल्पवयसा ॥ ४ ॥
माहां मेरु माथां रमणिय पाहा तीन सिखरें ।
तयामधें शोभे धवळित प्रभा भासत भरें ।
हरु ते कैळासीं मिरवत रुपें ध्यान धवळा ।
तया ध्यानीं राहे निरखित सदा दास जवळा ॥५॥

## ( १७० ) भवानी ५

भवानी वानीतां न कळत लिळा आल्पवदनीं ।
जगंन्माता ज्ञाता तिजविण कवी कोण भुवनीं ।

मुळीं काया माया आगणित धरी गुप्त न कळे ।
दयेनें पाहे त्या आवचट मनामाजि निवळे ॥ १ ॥
समस्तांचे राजे हरिहरविधी त्यास वर तूं ।
चतुर्खाणी वाणी सकळिक परेहूनि परतु ।
जगंन्माते माते प्रगट चि कळा कीर्तिमहिमा ।
दुजी कोठें पाहों अभिनव तुझी तूज उपमा ॥ २ ॥
तुझीं तान्हीं बाळें हरिहरविधी लोक सकळै ।
तुझ्या लोभें चाले न करित दया सर्व विकळै ।
जना माया पाळी जिववित सदा जीव जिवनें ।
तुझी कृपा होतां सकळैक सुखानंद भुवनें ॥ ३ ॥
प्रकुर्तीचें कर्णे त्रिभुवनजनामाजि वसतें ।
त्रिगूणापतें तें मुनिजनकवीलागि दिसतें ।
उदो जाला तीचा प्रचळित कळा सृष्टिरचना ।
परा वाचा तीची बहुविध जनीं मूळवचना ॥ ४ ॥
किती येके ठाईं न कळत जनीं गुप्त प्रगटे ।
नटे नाना वेशें भुलवित कळा वेश विनटे ।
समस्तांचे आंगीं भरत चि सदा काळ फिरवी ।
स्मरावें जाणावे बहुविध जनीं खेद तुरवी ॥ ५ ॥

( १७१ ) रघुनाथ ५

अनंता नामाचा रघुविर जनामाजि वसतो ।
विवेकी लोकांला प्रगट चि मनामाजि दिसतो ।
देहेपूरीं वर्ते पुरुष चि तयालागि म्हणती ।
तया लक्षी जो तो तद्रुप चि पहा वेर्थ सिणती ॥ १ ॥
सिणावें कोणाला जगदिश तरी बाह्यभितरी ।
तिहीं लोकामध्यें सकळिक जिवां पाळण करी ।
कळेना दीसेना जंववरि नसे ज्ञान पुरतें ।
असारा त्यागावें तदुपरि पुढें काय उरतें ॥ २ ॥

विसर्जावी पूजा सकळिक पुढें त्याग करणें ।
विसर्जेना जो तो सद्दढ चि मनामाजि धरणें ।
धरीतो धर्ता तो विलसत जनामाजि पुरता ।
करीतो कर्ता तो सहज चि अहंभाव नुरता ॥ ३ ॥
अनन्याची लीळा हरिरुप रुपामाजि सरली ।
अहंत्यागें बुधी आगणित सुखामाजि भरली ।
मिळाला तो जाला नसत चि वसे सर्वभुवनीं ।
घनाचें जें वाहे मिसळत मिळे तोय जिवनीं ॥ ४ ॥
माहांसख्यें जालें त्रिभुवन सखें येक समता ।
विराली ते गेली सकळिक जनामाजि ममता ।
नसेना ही कैंचा हरिजन हरीमाजि मिळला ।
माहां ज्ञानी त्याला समजत मनामाजि कळला ॥ ५ ।

## ( १७२ ) रवि ५

रवीकीर्णें उष्णें उजळत दिशा पष्ट प्रगटे ।
दिसों लागे लोकां बहुविध जनीं दृष्टि निवटे ।
पळों लागे मेला निसिचर किती थार धरती ।
दिवाभीतें भीती पळत चि वनामाजि भरती ॥ १ ।
जळामधें राहे रविप्रिय सदा सूख नळणी[1] ।
सदानंदें छेंदें आळिकुळखगालागि मिळणी ।
भले योगी साधु मुनिजन विधी सांग करिती ।
परी त्यागी योगी विचरत मही पंथ धरिती ॥ २ ।
पिडा होते सीतें खटपट जनीं दंत बसती ।
रवीकीर्णें उष्णें चळवळ सुखें लोक करिती ।
किती येकें कामें निमकत पुढें चालि धरिती ।
उपाधीच्या लोकां लगबग बहु वेग करिती ॥ ३ ।

१ नलिनी, कमल.

जनामध्यें चक्षु असत चि रवीवीण न दिसे ।
तमांधारें चोरें विषधर पिडा सर्व निरसे ।
पिकें त्रृणें वल्ली तरुवर सुखानंद डुलती ।
देहेधारी प्राणी मिरवत मनामाजि झुलती ॥ ४ ॥
रवीरस्माखालें[१] आगणित लिळा वेश नटले ।
किती ये संसारीं विलसत सुखामाजि सुटले ।
समस्तांच्या माथां खडतर कळा जात गगनी ।
तयाच्या आधारें हरिजन म्हणे मार्ग सदनी ॥ ५ ॥

## ( १७३ ) पृथ्वी ५

महीमुर्वी पृथ्वी वसुमति थरा भार धरिते ।
बहु सेतें भातें आगणित पिकें सौख्य करिते ।
धनें धान्यें धातु न कळत भुमी आड करिती ।
तुपें तेलें टांकीं बहुविध गिरीमाजि भरिती ॥ १ ॥
फळें फुलें वल्ली तरुवर किती भार धरिती ।
मुळें डाळें कंदें समजत महांरोग हरती ।
हिरे खाणी धातु सकाळिक बिजेंमाजि भरली ।
गिरी पुरें ग्रामें आगणित धरेमाजि धरली ॥ २ ॥
नद्या तीर्थें क्षेत्रें बहुविध किती देशरचना ।
किती भाषाभेदें अगणित नसे मीत्य वचना ।
माहा सिंधुमध्यें जिवन चि असंख्यात भरलें ।
भुमीच्या आधारें विलसत जळामाजि तरले ॥ ३ ॥
दीपें[२] खंडें चंडें महिवरि गुणा कोण गणणा ।
चतुर्खाणी वाणी उमजत बळें कोण कवणा ।
कळा विद्या सद्या त्रिभुवन जनामाजि वसती ।
विवेकी लोकांला विवरत मनामाजि दिसती ॥ ४ ॥

१ रश्मि=किरण. २ द्वीपें.

गुणी आष्टै भोगें नृपवर सदानंद करिती ।
पदार्थांचीं नामें न कळत जनीं तें चि धरिती ।
निदानीं ते सर्वै मरत चि भुमीमाजि भरती ।
किती येती जाती सुरवरमुनी हे चि जगती ॥ ५ ॥

## ( १७४ ) आप ५

मही हे आपाची अभिनव जळामाजि वसते ।
जळाच्या आधारें फणिवर तया भार दिसते ।
जळें होतें जातें जळरुप सदा सृष्टिरचना ।
बरें घ्यावें श्रोतीं अविकळपणें चीत वचना ॥ १ ॥
पडे पाणी तेथें सकळिक जिवां जन्म घडतो ।
नसे पाणी तेथें विकळचिपणें देह पडतो ।
पिकें झाडें वल्ली करपत नसे जीवन जरी ।
वरी पाणी होतां रसमस दिसे सार कुसरी ॥ २ ॥
जनीं मेघांसाठीं तळमळित किती देश फुटती ।
गुरें ढोरें पोरें चरफडित किती देह सुटती ।
नसे पाणी तेव्हां कठिण चि जनामाजि घडतें ।
देहेधारी प्राणी अगणित भुमी थाट पडतें ॥ ३ ॥
जळें काया माया बहुविध सुखें लोक झुलती ।
नसे तेव्हां जाती रडत चि पुढें देश डुलती ।
करी वारावारी सकळ भुवनें वोस पडती ।
कितेकां लोकांचें न चलत पुढें गर्व गळती ॥ ४ ॥
जळाचा हा बांधा चळवळ देहेमात्र तितुका ।
बरें शोभे नीरें चमकत घडे सौख्य जितुका ।
चतुर्खाणी पाणी जिववित जिवांलागि सदनीं ।
नसे पाणी तेव्हां सकळिक उठे वों[1] वदनीं ॥ ५ ॥

१ मुळांत च नाहीं. पोथ्यांत ‘ वाय ’ आहे.

## ( १७५ ) तेज ५

पाहा तेजें बींबें सकळिक जिवांमाजि जठरीं ।
सदा नेत्रीं गात्रीं लखलख दिसे सार विवरीं ।
बळें बोले चाले चळवळ करी तेज नसतां ।
न बोले ना चाले हिणरुप दिसे तेज नसतां ॥ १ ॥
माहां तेजे जालें जिवन चि पुढें होये अवनी ।
बळें येतें जातें प्रचाळित पाहा तेज पवनी ।
शशी सुर्यो तारा झगमगरुपें वीज झमके ।
चमत्कारें वारें चळत चि घनामाजि धमके ॥ २ ॥
भुगोळाचा वेढा अभिनव पुढें ज्वाळ जळती ।
समुद्राचे पोटीं खडतररुपें जीव पळती ।
भवानीशा नेत्रीं धगधग करी गुप्त वसतो ।
सदा जेथें तेथें प्रगट चि जनामाजि दिसतो ॥ ३ ॥
माहां सर्पा पोटीं प्रचळित सदा वीष चळतें ।
किती येके ठाईं आवचट पुढें रान जळतें ।
माहांकाळीं मीळे अगणित कळा ज्वाळभडका ।
भुगोळाची होळी धडकत बळें काळ कडका ॥ ४ ॥
रजें तेजेंवीणें त्रिभुवन जनीं कार्य न चले ।
सदा जेथें तेथें सबळचिपणें कार्य उचले ।
माहां जोतीरूपें सुरवर जनामाजि फिरती ।
धनें[1] धान्यें ज्याळा दिसत चि पुढें लोक पळती ॥ ५ ।

## ( १७६ ) वायो ५

करी सारें वारें सुटत चि पुढें मेघ उचली ।
सदा झोली तोली गरजत पुढें सृष्टि भिजली ।
भरारीतो वारा आचपळपणें देश पिकती ।

१ यावर हरताळ लाविली आहे, पण वर कांहीं लिहिलेलें नाहीं, काय लिहावयाचें होतें कोण जाणे ?

पिकें होतां धान्यें घणसर[1] बहु स्वस्त विकती ॥ १ ॥
फिरे वायो चक्रीं रवि शशि ग्रहो जीव धरिती ।
धरा धर्ता वायो तदुपरि तरी देश थिरती ।
सदा स्वासोस्वासें आगणित देहे जीव जिववी ।
सिरानाडीमधें फिरत चि सदा लोक निववी ॥ २ ॥
सदा वायोरूपें सुरवर मुनी देश फिरती ।
बहु देवो देव्या कळत चि जनामाजि थिरती ।
भुतें केतें मुंजे प्रगट चि किती येक वचना ।
कितेकां लोकांला प्रचित चि घडे स्वप्नसुचना ॥ ३ ॥
दिसेना तो वारा बहुत चि बरा व्याप करितो ।
थिरे नाना थारा असत चि नसे भार धरितो ।
तिहीं लोकांमधें विवरत फिरे आणि फिरवी ।
समस्तां वस्तांला प्रगट चि धरी आणि धरवी ॥ ४ ॥
सदा प्राणापानें वसत चि सदा देहममता ।
वदे व्यानोदानें कळिवर भरे सर्व समता ।
वसे प्राणी प्राणें नसत चि पुढें प्रेत सकळै ।
चळे वायो तेणें विपरित दशा देह विकळै ॥ ५ ॥

## ( १७७ ) आकाश ५

धरत्री हे मोठी तिजहुनि बहु थोर जळ तें ।
जळा पेक्षा मोठें कडकत बरें तेज जळतें ।
तया तेजा पेक्षा कडकत बळें वात सुटला ।
तया वाता वर्ता धडकत नभीं श्रृंग फुटला ॥ १ ॥
भुतामधें वायो न दिसत बळें गुप्त वसतो ।
तिहीं लोकांमध्यें अचपळपणें पष्ट कळतो ।
तया पेक्षा मोठा जगदिश करी सर्व रचना ।

1 दाट, विपुल.

पाहाना कां श्रोता विवरत बळें वेदवचना ॥ २ ॥
निमीशाचें अर्धें त्रिभुवन फिरे आणि विवरे ।
तया पुढें वायो विकळ चि सदा धीर न धरे ।
भुतांचा भूतात्मा प्रगट चि सदा देह मुळिचा ।
विवेकाचा योगी समजत बरा सत्य कुळिचा ॥ ३ ॥
जनीं द्रष्टा साक्षी त्रिभुवनपती थोर महिमा ।
तयाला वायोची न मिळत बहु हीण उपमा ।
चळे चाळी पाळी विवरत सुखें लोक सकळै ।
तयावीणें भूतें गळित चि कळा सर्व विकळै ॥ ४ ॥
चहुं भूतामध्यें मिरवत महद्भूत न कळे ।
तया वीणें कांहीं विपरित तरुपर्ण न चळे ।
भुतें शब्दें जालीं निरसत पुढें ब्रह्मप्रळईं ।
देहे आष्टै जाती सकळिक सरे ते चि समईं ॥ ५ ॥

## ( १७८ ) प्रवृत्ति ५

त्रिगूणा भूतांची प्रकृति च कुडीत्याग करणें ।
देहातीतानंता समजत मुळीं सोये धरणें ।
चळेना ते वस्तु आचळ चि सदा सर्व भुवनीं ।
दिसे भासे नासे उपजत मरे ते चि सघनी ॥ १ ॥
नभाकारें सारें विमळ चि सदोदीत भरलें ।
विवेकाचे वाटे असत चि नसे दृश्य सरलें ।
अखंडै खंडेना न चळत वसे पार न दिसे ।
रितें नाहीं कोठें अणुभरि कदा येक विलसे ॥ २ ॥
समस्तांचे ठाईं निकट चि जिवामाजि वसतें ।
तळीं वर्तें पर्तें अगणित सिमा दृश्य नसतें ।
अलक्षा लक्षावें तुरत चि घडे भक्ति नवमी ।
भवाला भावीते उरत चि सदा हेत सवमी ॥ ३ ॥

सदा पंचीकर्णें विवरत तनु च्यारि निरसा।
माहावाक्यें ऐक्यें समजत बरा योग सरसा।
अहं सोहं साठीं तुरत चि तुरे वृत्ति तुरवा।
सदा संगत्यागें अनुभव सुखालागि पुरवा ॥ ४ ॥
परत्रीचा सांठा श्रवण चि सदाऽद्वैत करणें।
विवेकी लोकांचा निकट चि बरा संग धरणें।
सदा भक्तीयोगें उमजत सुखें दुःख तरणें।
कथायोगें रंगें विवरत मही कीर्ति भरणें ॥ ५ ॥

## ( १७९ ) वैराग्य ५

मना रे तां आतां समजत जिवीं सांडि करणें।
विवेकाचा काचा नसत चि बरा संग धरणें।
जना तारी मारी हरिजन सदा देव भजतो।
दयाळु देवांचा[1] मुनिवर मुनीनाथ मज तो ॥ १ ॥
दयासिंधु दाता भजत चि तजा देहममता।
विवेकानें पाहे सकळिक जिवांमाजि समता।
कळेना तो देवो चळवळ करी सद्य कवळी।
पवाडे तो जातो विवरत बळें जाय आकळी ॥ २ ॥
पाहा रे तो कैसा बहुविध ठसा कोण वळसा।
तगेना ना कोठें चळवळ बळें येक पळसा।
देहधारी कीती अगणित गणु त्यांत फिरतो।
तिहीं लोकांमध्यें हरिहर पाहा देववर तो ॥ ३ ॥
जना कर्ता भर्ता जवळि च कसे देव चुकले।
महीधर्ता वर्ता भरित चि बहु लोक मुकले।
देहे काळा पाळा न कळत जनीं जन्ममरणें।
तयाच्या संयोगें समजत सवंसार तरणें ॥ ४ ॥

---

१ " दोसांचा " ला हरताळ लावून ' देवाचा ' केलें आहे.

तरे तारी ज्ञाता बहुजन जनामाजि वसतां ।
सुटे सोडी लोका निरसुनि बळें देहममता ।
सदा काळा चाळा चुकत चि बळें लोक बुडवी ।
भ्रमे मायाजाळें बहुत चि तया दुख घडवी ॥ ५ ॥

## ( १८० ) विमळपंचक

निरावेघा देवा अवघड सेवा करणें कसी ।
स्मरावें पाहावें समजत बळें भेद निरसी ।
अनन्याचा भावो विवरत कसें काय सुचतें ।
विचाराचा ज्ञानी अवघड जनीं त्यास रुचतें ॥ १ ॥

रुचावें तें कैसें पाहात चि पुढें ठक पडिलें ।
अहं सोहं नाहीं प्रगट चि पाहा काये घडलें ।
निशब्दाचीं बीजें सहज चि पुढें वास करिती ।
विवेकाचीं द्वारें विलसत सुखानंद भरिती ॥ २ ॥

चळावें तें जावें आचळ चि चळामाजि वसतें ।
दिसेना तें कोणा भ्रमरुप जगामाजि दिसतें ।
सदा सारासारें उमजत बरें हीत घडतें ।
पहीले भक्तीनें सकळिक जना ज्ञान चढतें ॥ ३ ॥

माहां भक्ती नोमी न घडत जना हीत न घडे ।
घडे तेव्हां जाणा अहंमति देहेमूळ विघडे ।
अहंता ते कैची न कळत वसे बधममता ।
विवेकें साधावी हरिजनलिळा योगसमता ॥ ४ ॥

कळेना तो देवो न कळत जनामाजि चुकले ।
मोहोजाळासाठीं प्रगट चि किती लोक मुकले ।
भुतां वर्ता पर्ता जवळि च वसे आणि न दिसे ।
विवेकाचे दृष्टी विमळ चि जसें व्योम विलसे ॥ ५ ॥

## ( १८१ ) निश्चळ ५॥१८

दिसे तें नासे रे निगम चि वदे सारवचनें ।
पाहाना कां आधीं सुरवर मुनी योग सुमनें ।
विवंचावें भावें प्रचळित जनीं काय चळतें ।
प्रचीतीनें शोधा सहज चि पुढें सार कळतें ॥ १ ॥
खरें खोटें जाणे बहुविध जनामाजि निवडी ।
प्रपंचाच्या गोष्टी फलकट जनामाजि दवडी ।
तजावें कीं घ्यावें कळत चि पुढें भीड न करी ।
सदा वर्तों जाणे बहुचक जनीं मुख्य चि धरी ॥ २ ॥
सहस्रामधें तो आवचट कळे न्याय पुरता ।
कळा युक्ती बुधी विधिवर जनामाजि वरता ।
देहे च्यारी वारी विगळित मोहोजाळ सरले ।
उपाधीला टाकी आमळ चि पुढें चीत उरलें ॥ ३ ॥
किती जाले गेले बहुत चि गुणालागि वदले ।
प्रचीतीचें घ्यावें जनपद वदे वेर्थ न चले ।
बहुसें बाजारी बहुचक विके सार न कळे ।
जया व्हावें तें तों सहज चि मनामाजि निवळे ॥ ४ ॥
बहुतांच्या बोलें स्वहित न घडे योग विघडे ।
अहंता ते वाढे नुमजत पुढें वेर्थ चि रडे ।
चुकावेंना लोकीं फुकट चि देहेसार सरतो ।
माहांवाक्यें ऐक्यें समजत पुढें योग वरतो ॥ ५ ॥

## ( १८२ ) संव्हारपंा

अनावृष्टी लोकीं शतकवरुषें मेघ न दिसे ।
देहेधारी प्राणी मरत चि पुढें येकसरसे ।
रवी जाळीताहे गिरिवर धरा दग्ध भुवनें ।
तरु वल्ली नद्या बहुविध स्थळें शुष्क जिवनें ॥ १ ॥

पडे शुंडाधारी जळधर माहांवृष्टि घडते ।
माहां मेघें तेणें जळमय पुढें सृष्टि बुडते ।
जळामधें पृथ्वी घसरत विरे आणि वितुळे ।
बहु पाणी जालें जळमय करी भेद न कळे ॥ २ ॥
माहां तेजें तेथें बहुत चि कळा ज्वाळ मिळले ।
तिहीं लोकीं ज्वाळा कडकडित नभीं देव न चले ।
जळें पाणी सर्वे उडुगण शशी सूर्य नसती ।
नभामध्यें मोठें भडकत माहां ज्वाळ वसती ॥ ३ ॥
माहां वायो तेथें सुटत चि बळें वन्हि विझला ।
तिहीं लोकामधें प्रगट चि माहां वात खिजला ।
झडाडीतो वारा झडकत नभामाजि वितुळे ।
तुरे द्रष्टा तेणें गगन चि बरें सार निवळे ॥ ४ ॥
निराकारीं[१] गेलें बहुविध जळें फार सरलें ।
माहां कल्पीं भूतें निरसत पुढें काय उरलें ।
चळेना ते वस्तु आचळ चि सदोदीत भरली ।
खरें खोटें मोठें हरिहर विधी भ्रांति सरली ॥ ५ ॥

## ( १८३ ) निराकारपंथ

निराकारीं सारीं बहुविध पदें सर्व चळती ।
विवेकाच्या पंथें विचरत पुढें सर्व कळती ।
विवेकी लोकाचे भ्रमरुप बहु गर्व गळती ।
कळेना जें कोणा समजत बरें सर्व वळती ॥ १ ॥
प्रपंचाच्या बुधी मळिण चि सदा काट जडला ।
मोहोमायाजाळें भ्रमरुप बळें योग घडला ।
देहेलोभासाठीं आवखळ[२] जनीं लोक पडिला ।
भल्यांच्या संयोगें सुरवरपदाहूनि चढला ॥ २ ॥

१ या ऐवजीं ' विकारी तें ' असें केलें आहे. २ उच्छृंखलपणें.

विहंगाच्या पंथें परतर सुखें होत जवळी ।
प्रचीतीचा साधु वद्‌वित वळें चित्त निवळी ।
नव्हे योगें यागें जपतपव्रतें प्राप्त कवणा ।
विचारानें होतें सहज चि नसे त्यास तुळणा ॥ ३ ॥
करावीं सत्कर्में सुखरुप जनामाजि असतां ।
विचारावीं तत्वें मरमर घडे ज्ञान नसतां ।
नसे ज्ञाना ऐसें जनहित सदा सर्व भुवनीं ।
समस्तांचीं बीजें निरसुनि पाहा येक जिवनीं ॥ ४ ॥
बहु ये संसारीं चरफड करी लोक सिणतो ।
सुटावें ये लोकीं हरिजनसखा दास म्हणतो ।
भले लोकीं आतां त्वरित चि बरें हीतभुषणें ।
करावीं वीचारें निज बिज मुनिन्यायवचनें ॥ ५ ॥

पंचकांचा उपसंहार

शत श्लोकामध्यें विवरत सुखें सुख घडतें ।
बरें अर्थामध्यें भरत चि सदा दुख झडतें ।
माहां पापें जाती कळत चि पुढें पुण्यमहिमा ।
जनामध्यें सीमा पुरत चि सदा होति निसीमा ॥ १ ॥
इति श्रीमहिम्नघाटीचे श्लोक संख्या येक शत संपूर्णमस्तु ॥१०१॥

## सवाया

### ( १८४ ) गजमस्तक

गजमस्तक सुंदर दिव्यकळा । वरि चर्चित सिंदुर भव्य लिळा ।
चपळांग कळा सकळा विकळा । गुणि गायक चाकित त्या अबळा ॥१॥
गणराज विराज विराजतसे । रुप सजत वाजत गाजतसे ।
रंग माजत माजत माजतसे । बहु नृत्य कळा हृदई विलसे ॥ २ ॥
धी धी ता धी धी ता धी धी धीं गी त था ।
त त था त त था त त थों गी त था ।

कु कु था री कु था री कु था री कु था ।
नट नाट उलाट करी उलथा ॥ ३ ॥
नरकुंजर सुंदर नृत्य करी । धीकिता धीकिता करताळ धरी ।
थरके चमके बहुधा भवरी । शुभ रंग भरीत भरीत भरी ॥ ४ ॥
हरिदास उदास विशेष भले । गित संगित राग कळा शुलले ।
विधि विष्णु हरादिक मानवले । सुरनाथ मुनींद्र मनीं मिनले ॥५॥

## ( १८५ ) सार विचार

काकविलोकन हंस करीना । सज्जन दुर्जनसंग धरीना ।
अमृत जाउन वीष भरीना । सूर्य कदा रजनीस वरीना ॥ १ ॥
काम विराम विरंग करीतो । अंतरहेत सदा विखरीतो ।
त्यास विळास कदा न करावा । सज्जनसंग विशेष धरावा ॥ २ ॥
सांडुनि रामपदा दुरि जासी । मांडुनि काम सदा लथ खासी ।
सोडि मदा अपदा गुणरासी । सार विचार मना तुजपासी ॥ ३ ॥
योग तजूनि भजे मनुजांला । त्यावरि घालुं शके येम घाला ।
राज्य तजूनि भिकेसि निघाला । तो नर पामर जीत चि मेला ॥ ४ ॥
लंग मलंग बळें भडकावी । वारण कर्ण जसा फडकावी ।
ज्ञानमदें[१] मत उन्मत जाला । हे नर सुर मजुर तयाला ॥ ५ ॥

## ( १८६ ) ज्ञानरहित

ऐसे हे लोक अनेक विकारी । सज्जनसंग बहु सुखकारी ।
लेटत जात महीतरवासी । निश्चळ होत विवेक विळासी ॥ १ ॥
दीनदयाळ रघुवीर ध्यावा । अंतरहेत कदापि न जावा ।
लोकिकीं सेवकसें म्हणवावें । वैभव ज्ञान पदीं विलसावें ॥ २ ॥
कर्म कचाट करीत चि मेला । नातरि भ्रष्ट अनर्गळ जाला ।
दोघ हि येक पदाप्रति जाती । ज्ञानरहीत सदा लथ खाती ॥ ३ ॥

---

१ " राजमदें " चें " ज्ञानमदें " केलें आहे.

लेटत लेटत लेट चपेटी । लाटित दाटित दाटित लाटी ।
काळ कराळ कलोळ करीतो । ज्ञानरहीत तयास धरीतो ॥ ४ ॥
भजतां हरिलागि बहु आळसा । परी काळ चपेट करी वळसा ।
सुख माइक काम न ये कळसा । मग संशय बैसेल तो गळसा ॥५॥

## ( १८७ ) निजसार

किती रडसील किती पडसील । किती दडसील किती घडसील ।
नको बहुचार तर्जीं अविचार । करूनि विचार पाहा निजसार ॥१॥
बहु जन ढंक म्हणोनि कढंक । वदे कवि रंक हिसेब निशंक ।
विचार विचार कळे परपार । बळें अनिवार गळे धुधुकार ॥ २ ॥
मनीं येक विचार जनीं निजसार । तयासि विचार करी भडमार ।
उठे जन धुंद रडे जन तुंद । पडे वर फुंद चढे मन कुंद ॥ ३ ॥
न दिसा न दिसा न दिसोनि दिसा । न वसा न वसा न वसोन वसा ।
निरसा निरसा निरसोनि नसा । सरसा वरसा सरसावतसा ॥ ४ ॥
सरतो सरतो सरतो वरतो । वरतो वरतो वर वावरतो ।
हरतो हरतो हर उधरतो । धरतो धरतो धर सादरतो ॥ ५ ॥

## ( १८८ ) राम रणीं रजनीचर मारी

मुगुट कीरटी कुंडल माळा । कोटि रवी शशी तेज उमाळा ।
देवरुषीगण चकित जाले । रामरुपीं रुप योग मिळाले ॥ १ ॥
युध्य कळा सकळा विकळा हो । राम रणीं रिघतां वीर बाहो ।
वाउनि सज्ज करी जरि मेढा । काळभयें बसवी तरि दाढा ॥२॥
राम रणीं रजनीचर मारी । देखत काळ विशाळ थरारी ।
जीव धणी धरणी धरवेना । धाक रणीं मरणीं मरवेना ॥ ३ ॥
भांडति वीर भरें गजभारें । राघव चूर करी भडमारें ।
गर्जति रीस कपी भुभुकारें । वाजति घोर रणीं रणतूरें ॥ ४ ॥
मार कठोर पुढें रिघवेना । गर्भगळीत विरे वीर येना ।
भार भरें घसरे जीव धाके । धाक मनीं घन घोष तडाखे ॥ ५ ॥

## ( १८९ ) वैभवाची चंचलता

देखत चंद्र चकोर सुखावे । देखत मेघ मयोर तुकावे ।
बाळ मनीं जननी जन भावी । दास जनीं विजनीं लय लावी॥१॥
होये म्हणोनि बहुत सिण केला । सांडुनि राम विराम चि मेला ।
लालुच ते उरली पुरवेना । वैभव जाय कदा धरवेना ॥ २ ॥
मज होये म्हणोनि बहुत करी । परि देखत देखत काळ हरी ।
सुचिलें न घडे दुखकार घडे । मग वैभव राज्य कळा विघडे ॥ ३ ॥
राज्यमदा प्रमदा सुख दावी । नाटक चेटकसी चट लावी ।
जाय सता नुसतां नुर पाहे । पामर तो खरसा दिसताहे ॥ ४ ॥
चंचळ वैभव हें बहुतांचें । देखत देखत जात जनाचें ।
येक चढे दुसरा पडताहे । येक पडे दुसरा रडताहे ॥ ५ ॥

## ( १९० ) नरदेह

मन गोउन कामभरें पसरा । परि शेवट होइल हें विसरा ।
नरदेह नसे दुसरा तिसरा । हित नेणत थोर बसे घसरा ॥ १ ॥
मन हें पट लंपट निपटसें । खट ना नट उधटसें झटसें ।
लट ना लटसें तटसें फटसें । धीट वाजट तें चि करा निटसें ॥ २ ॥
बहु चातुर आतुरसें दिसता । न कळोन धणी उगले सिणता ।
नव्हे लाभ चि लोभ धरा नुसता । नुसता परि होइल रे पुसता ॥३
सरसे वरसे नर सुंदरसे । परि वृधपणीं श्रुत बादरसे ।
हरि चिद्दप सांडुनि विद्दपसे । मनशुधि नसे चि नसे चि नसे ॥४॥
हरिभक्तिविणें धटसे गमता । हित नेणत वेर्थ किती दुमता ।
झट जाणत जाणत हे ममता । निजसार विचार नसे समता ॥५॥
पुसतां येम दारुण रे करडा । बहुसाल करी अरडा नरडा ।
पुण्य पातक राखत जा खरडा । विपति गती नेदखतां वरडा ॥ ६ ॥
कठिणोतर ऐकत लाज धरा । हरिभक्ति करा चि करा विवरा ।
बहु त्रासक औषध हीत असे । नर पावन मोक्षपदीं विलसे ॥ ७ ॥

## ( १९१ ) सुखसारविचार

जन पावन होत असे चरणीं । सुख सार विचार मिळे चरणीं ।
धरणीधर सुंदर गुण वदे । न कळे परपार बहु आपदे ॥ १ ॥
जगजीवन जागतसे जगतीं । जन दोष करूनि कसे तगती ।
मनिचा मनभाव कळोन वळें । अभिमान गळे मग तो विवळे ॥ २ ॥
वनिता धन सुत शरीर बरें । असतें दिसतें परि काय खरें ।
सुख होइल जाइल येकसरें । परि पावन नाम नसे दुसरें ॥ ३ ॥
मन मान तुफान चळोन वळें । मग प्रीति जहाज बुडे सगळें ।
जरि अंतरहेत चुकेल जनीं । तरि नेमक भाव धरा वचनीं ॥ ४ ॥
मृदभाषण नाशन दुर्जन रे । हृदयासन ते जन सज्जन रे ।
सुख सार विचार करूनि धरा । परि अंतरहेत बरा विवरा ॥ ५ ॥

## ( १९२ ) काय काय नको

छळणा छळवाद वेवाद नको । हरिवीण कदा भवसीण नको ।
हिण संग नको कठिणांग नको । चळसंग सुरंग विरंग नको ॥१॥
वाद्य तडक तुफान कडक । कडक्ड भडक धडक धडाडी ।
किति येक लंग तजुनि अलंग । धरूनि मलंग भडंग भडाडी ॥२॥

## ( १९३ ) मूढ

मन मान गुमान मुढासनसे । परि सान कळा चतुरीं विलसे ।
हळवार मनीं तळवार जनीं । सुख पावेल मूढ कसा सजनी ॥ १ ॥

## ( १९४ ) अभिमान गळे

चुकतां चि तुकें तुकतां चि मुकें । जितुके तितुके नर होति फिके ।
चुकतां न कळे तुकतां चि कळे । अभिमान गळे विव्रळे विवळे ॥१॥

## ( १९५ ) जड चंचळ निश्चळ

जड चंचळ निश्चळ तीन खरीं । परि सार विचार बरा विव्ररी ।
जळ थावर जंगम चंचळ रे । परब्रह्म निरंजन निश्चळ रे ॥ १ ॥

## ( १९६ ) खाणी चारी

आंडज जारस श्वेतज उद्बीज । यासि मुळीं बीज कोठुन हें बीज ।
वायोज तेंरज नीरज भूरज । जाणपणें रिझ नेणपणें खिज ॥ १ ॥

## ( १९७ ) सार आणि असार

सार असोन चि असार चि घेणें । चिद्रूप सांडुनि विद्रूप होणें ।
सुंदर सांडुनि बादर घेती । साकर सांडुनि घडिंत माती ॥ १ ॥
ज्ञान तजूनि वसे अविचारें । संगीत सांडुनि नाचती चोंरें ।
सद्गुण सांडुनि दुर्गुण पाहे । गायन सांडुनि बोंबलिताहे ॥ २ ॥
हरिदास विळास विळासतसे । हरिभाग्य सभाग्य सदा विलसे ।
रघुनंदन कंदन दानव रे । सुरनाथ किती जीव मानव रे ॥ ३ ॥
निज अंतरहेत बरा फिरवी । जन जिन्नस त्यांत सदा सिरवी ।
जगदांतर वीवर वीवरवी । रघुनाथउपासकसें मिरवी ॥ ४ ॥

## ( १९८ ) महंत भला

जगदांतर वीवरला वरला । सकळा प्रिय तो चि महंत भला ।
परतंत्र नसे स्वतसीध वसे । जगदांतर धूर्तपणें विलसे ॥ १ ॥

## ( १९९ ) रघोत्तम

भुवनपाळ दयाळ रघोत्तम । सुंदररूप विशेष रघोत्तम ।
नीतमाळ[2] विषाळ रघोत्तम । नीरजनेत्र पवीत्र रघोत्तम ॥ १ ॥
भूषणमंडित भव्य रघोत्तम । परिमळ गंध सुगंध रघोत्तम ।
मुनिवरवंदित देव रघोत्तम । पाळक दास विषाळ रघोत्तम ॥ २ ॥

## ( २०० ) नाम जनपावन

अनुमान चि रान आरान वसे । मन मान गुमान समान नसे ।
भजनीं गुज हें मज सांपडलें । अघटीत घडोनि बरें जडलें ॥ १ ॥
सुरनाथ सनाथ करूनि भले । भजनीं जन सज्जन सोडविले ।
तिन्ही लोक थरकती कीर्तिभरें । जनपावन नाम खरें चि खरें ॥ २

१ ‘ पोरें ’ चें ‘ चारें ’ केलें आहे. २ नीलतमाल, तमालनील.

## ( २०१ ) प्रभु राम

प्रभु राम आराम विराम नसे । सुखरूप दया भजकां विलसे ।
मनतोष भरेल चढोवढसा । रघुराज बऱ्या पुरवी भडसा[1] ॥ १ ॥
जननी जनपाळ कृपाळ[2] भली । अभयंकर निर्भयसें वदली ।
शुभदायक उदित काळ दिसे । सुखचिन्हकळा हृदईं विलसे ॥२॥

## ( २०२ ) प्रपंच

स्वप्न सरे विसरे नर प्राणी । ते लुची लालुची वाटे सिराणी ।
थोर प्रपंच विसंच विसंचे । सीण करूनि कदापि न संचे ॥ १ ॥

## ( २०३ ) गुणी

अमकें चि नको वमकें तमकें । निज सार विचार करी गमकें ।
बहु छेद प्रबंद भलीं येमकें । चटकानट कोन गुणी चमके ॥ १ ॥

## ( २०४ ) रघुनाथकृपा

रघुनाथकृपा जरि होय बरी । तरि काळ कराळ रे काय करी ।
भवदुख नसे सुख सार असे । विलसे विलसे हरिरूप दिसे ॥ १ ॥

## ( २०५ ) दशा

बाळपणीं न कळे मळ खातो । तारुण्य कामभरें भर जातो ।
वृधपणें चि बहु आरडातो । चर्फड चर्फडितो मग जातो ॥ १ ॥

## ( २०६ ) धड कांहीं नाहीं

पोट भरूं तरि पोट भरेना । धीर धरूं तरि धीर धरेना ।
मुक्ति वरूं तरि मुक्ति वरेना । तर्कभरें विवरे विवरेना ॥ १ ॥

## ( २०७ ) दासतारक पात्रिजे

सौख्यदायक देवनायक तो विनायक वंदिला ।
संत सज्जन होति मज्जन काळ दुर्जन कंदिला ॥ १ ॥

---

१ इच्छा. २ ‘ दयाळ ’ चें ‘ कृपाळ ’ केलें आहे.

देव दुल्लभ देव दुल्लभ देव दुल्लभ तो पाहा ।
सर्व सुल्लभ सर्व सुल्लभ सर्व सुल्लभ हे साहा ॥ २ ॥
सद्य राघव गद्य लाघव पद्य वैभव जाणिजे ।
सत्य सांडुनि मिथ्य मांडुनि निंद्य खंडुनि नेणिजे ॥३॥
कृत्य सारुनि मृत्य मारुनि भृत्य[1] हारुनि योगियां ।
तो स्वतंतर येक अंतर देव तत्पर हो तया ॥ ४ ॥
दुष्टगंजन सुष्टरंजन दैत्यभंजन भाविजे ।
दैन्यहारक सूत्रधारक दासतारक पाविजे ॥ ५ ॥

## ( २०८ ) मागणें

आखंडित साहे । प्रभु मज पाहे । वसोनि सबाहे ।
धरी ममता । मज दे समता ॥ १ ॥
भजनास पती । मज दाशरथी । तुजवीण गती ।
न घडे चि कदा । चुकवीं अपदा ॥ २ ॥

## ( २०९ ) महंत उदास

नमूं निज संत मनोजयवंत उदास महंत मुळीं मुळतंत ॥ १ ॥
जनीं जन सार अनंत विचार करूनि अपार तरे परपार ॥ २ ॥
निरंजन योग पळे भवरोग विकार वियोग पळे भवभोग ॥ ३ ॥
जनीं जनवास मनीं मनभास प्रबोध विळास गुणीं गुणदास ॥४॥
कवीत प्रबंद पदीं पदबंद बहुत प्रबंद गुणीं मतिमंद ॥ ५ ॥

## ( २१० ) देव पुरंधर

नव्हे चि सुंदर जन्म दुरंधर देव पुरंधर सोडवितो कवि तो स्तवितो॥१
देव परात्पर विष्णु विधीहर सेवक तत्पर आठविताहे ॥ २ ॥
सुर मुनीवर नारद तुंबर वाउन ब्रह्मविणा गुण गातो ॥ ३ ॥
अपसर किन्नर संगित सुस्वर टाळ मृदांग ध्वनी उठताहे ॥ ४ ॥

१ 'भीत्य' चें 'भृत्य'

देव दुल्लभ देव दुल्लभ देव दुल्लभ तो पाहा ।
सर्व सुल्लभ सर्व सुल्लभ सर्व सुल्लभ हे साहा ॥ २ ॥
सद्य राघव गद्य लाघव पद्य वैभव जाणिजे ।
सत्य सांडुनि मिथ्य मांडुनि निंद्य खंडुनि नेणिजे ॥३॥
कृत्य सारुनि मृत्य मारुनि भृत्य[1] हारुनि योगियां ।
तो स्वतंतर येक अंतर देव तत्पर हो तया ॥ ४ ॥
दुष्टगंजन सुष्टरंजन दैत्यभंजन भाविजे ।
दैन्यहारक सूत्रधारक दासतारक पाविजे ॥ ५ ॥

## ( २०८ ) मागणें

आखंडित साहे । प्रभु मज पाहे । वसोनि सबाहे ।
धरी ममता । मज दे समता ॥ १ ॥
भजनास पती । मज दाशरथी । तुजवीण गती ।
न घडे चि कदा । चुकवीं अपदा ॥ २ ॥

## ( २०९ ) महंत उदास

नमूं निज संत मनोजयवंत उदास महंत मुळीं मुळतंत ॥ १ ॥
जनीं जन सार अनंत विचार करूनि अपार तरे परपार ॥ २ ॥
निरंजन योग पळे भवरोग विकार वियोग पळे भवभोग ॥ ३ ॥
जनीं जनवास मनीं मनभास प्रबोध विळास गुणीं गुणदास ॥४॥
कवीत प्रबंद पदीं पदबंद बहुत प्रबंद गुणीं मतिमंद ॥ ५ ॥

## ( २१० ) देव पुरंधर

नव्हे चि सुंदर जन्म दुरंधर देव पुरंधर सोडवितो कवि तो स्तवितो॥१
देव परात्पर विष्णु विधीहर सेवक तत्पर आठविताहे ॥ २ ॥
सुर मुनीवर नारद तुंबर वाउन ब्रह्मविणा गुण गातो ॥ ३ ॥
अपसर किन्नर संगित सुस्वर टाळ मृदांग ध्वनी उठताहे ॥ ४ ॥

---

१ ‘ भीत्य ’ चें ‘ भृत्य ’

कॅटलॉकें वगैरे.............. वि: ........ १५५
आंक ........................ नों दि ..................

## ( २११ ) पद सुंदर

अंतर सुंदर बाहेर सुंदर तें पद सुंदर पाहे मना सुख होये जना ॥१॥
अंतरिं अर्थ विशेष समर्थ विरंग क्रिमर्थ पडेल जनीं सुख होये मनीं ॥२
बाह्य[1]जवंद विशेष प्रबंद बहुविध छेद करीं कडका उबगों चि नका॥३॥

## ( २१२ ) नश्वर

सर्व सरोवरी[2] वेर्थ भरोवरी[3] काय बरोबरी येइल बापा ।
वेर्थ तडातडी कितेक सांकडी घेउनि माकडी देतोसि धापा ॥१॥

## ( २१३ ) कुड पंथ

कुंड पंथ तजोनि[4] पुढें चि कडा। वरि घालितसा उगलें चि झडा।
बहु शब्द कठीण धडा विधडा। खळ भुंकत जात जसा गधडा॥*

## ( २१४ ) राम राम राम जनसज्जनविश्राम

वांदिला गजवदन सुख सुखाचें सदन
जेणें जाळिला मदन त्याचें अंतर धरा ।
राम राम राम जनसज्जनविश्राम
साधकांचें निजधाम हित आपुलें करा ।
अखंडीत निजध्यास धरा अंतरीं अभ्यास
बोले भागवत व्यास हरिभजनें तरा ।
धीर उदार सुंदर कीर्ती जाणतसे हर
सोडविले सुरवर वरदायक खरा ॥ १ ॥

---

१ 'अंतर' चें 'बाह्यज' केलें आहे. २ सारखें. ३ हव्यास. ४ 'कळोनि' चें 'तजोनि'. * या ठिकाणीं मुळांत पुढील श्लोक कोणी मागाहून लिहिलेला दिसतो.

जनि माय गुरु जनि बाप गुरु जनि बंधुवर तो चि गुरु।
निच याति गुरु भलता चि गुरु वळखितील लोक गुरु चि गुरु ॥ १ ॥

परत परत रत शोधुनी विवेक मत
जत[1] सत विलसत तो चि येक जाणता ।
झगमग झगमग नसतां चि तगबग
माईकांची लगबग करी तो चि नेणता ।
तन मन धन जन यापरी लीन तलीन
मरणावरण रण दारुण कठिणता ।
आदळ घडेल मग विकळ पडेल जग
आधीं च करणें लग निरसेल हीणता ।। २ ।।

लाउनियां तन मन धन करिती जतन
परि पावती पतन बळें काळ खातसे ।
तळतळ तळतळ पळें पळ तळमळ
सदा चिंतेनें विकळ चर्फडीत जातसे ।
लोक बहु अविचार लोभें करितातीं चार
तेथें नाहीं सारासार येरझार होतसे ।
सर्वकाळ पर्वकाळ नाहीं फुटकें कपाळ
येकायेकी काळ वेळ दिसतातीं भूतसे ।। ३ ।।

न कळत होये सीण सीण सीण चि कठीण
बुधीवीण दिसे हीण कोण पुसे तयाला ।
नाहीं विवेकाचा धर मनीं न करी विवर
सर्वकाळ मरमर हेत नाहीं जयाला ।
फुकट चि गेलें वय कांहीं न करी उपाय
नरदेह वांयां जाय काळ घालितो घाला ।
सावधानपणें हीत न घे न करी स्वहित
येकायेकी देहेपात तळमळित चि गेला ।। ४ ।।

---

१ 'जत सत' अशीं च अक्षरें मुळांत आहेत. 'जसें तसें' 'जसें आहे तसें' असें म्हणण्याचा भाव आहे काय ?

नसे अन्न ना वसन जालें भाग्य निरसन
सकळांसी उपोषण आपोशन घडेना ।
मागें केली तरतर पुढें होये मरमर
घरामध्यें करकर येकां मेकां पडेना ।
रुण जाहालें उदंड घडीघडी होते भंड
कितीयेक राजदंड झाडितां हि झडेना ।
मदें मातला तो खळ लोक पीडिले सकळ
अंतीं पडिला विकळ त्यास कोण्ही रडेना ॥ ५ ॥
चटपट चटपट नसे विवेक निपट
जनीं सज्जनीं विपट खटपट सरेना ।
विद्या बुधी नाहीं धट सदा बोलणें उधट
वायकोळ वटवट बरा गुण धरेना ।
खोडी लागलीसे झट जेथें तेथें पाडी तट
नव्हे नव्हे फटफट मोठें पाप हरेना ।
वेर्थ वाहातें कावाड द्वाड बोलतें लावाड
लोकामधें चीरी[1] वाड पापरूपी मरेना ॥ ६ ॥
लोकामधें हरीजन त्यांस मानिती सज्जन
काये करावे दुर्जन देव धर्म नावडे ।
सदा करीतसे काट बोल बोलतो मोकाट
काय करावा तो चाट आंगबळें वावडे ।
मोठें मीपणाचें बंड बंड मुखीं उभंड
करी तंड चि वितंड माहां संकटीं पडे ।
पुढें आवघें चि जाय कांहीं न करी उपाय
खोडीतसे हात पाय देहे त्यागितां रडे ॥ ७ ॥

१. ' चीरी वाड ' अशीं च अक्षरें मुळांत आहेत. ' ची ' ऐवजीं हस्तदोषानें ' री ' तर पडली नाहीं ? ची ची=फजिती. वाड=पुष्कळ.

जाणपणें अनुमान कां रे वेघतोसी रान
वेड्या मागतोसी मान तुज कांहीं कळेना ।
आवघें चि अप्रमाण येक प्रचीत प्रमाण
सत्य वाहातसें आण तुझी वृत्ती वळेना ।
संतसंग नाहीं तुला वेर्थ धांपा देसी मुला
जन्म जातो रे उगला अहंभाव गळेना ।
वेर्थ भरीं भरों नये कांहीं करावा उपाये
ज्ञानेंवीण वांयां जाय जन्ममृत्य टळेना ॥ ८ ॥
चहूंकडे हें गगन तैसा देव हा सघन
भूतीं घालूं नको मन सावधान आलया ।
हरीहर ब्रह्मादिक पाहों जातां तीन्ही लोक
वेर्थ होत असे शोक जालें जातें विलया ।
व्यास कदा नाहीं नास त्याचा धरा निजध्यास
विवरावें सावकास तेणें पावसी तया ।
करा श्रवण मनन मुख्य आत्मनिवेदन ।
करीं अभेद भजन तेणें सुटसी भया ॥ ९ ॥
पंचतत्वें पंचीकर्ण त्याचें पाहें विवरण
सांडीं भ्रांती प्रावरण तेणें सुखी होसील ।
नाना कर्मं आचरसी तेणें कैसा रे सुटसी
निरंजनासीं तुटसी कोणी तरीं कुटील ।
किती सांगों वारंवार लोक नेणती गंव्हार
फिरों नको दारोदार तुला काळ कुटील ।
काये घेऊनी आलासी काय समागमें नेसी
मायाजाळीं गुंतलासी तुला कोण पुसेल ॥ १० ॥
सारासार नीतिन्याय मुख्य भक्तीचा उपाय
संतसंगेंवीण काय वांया जाय सर्व हि ।

आधीं कर्माचा प्रसंग शुध उपासना मार्ग
ज्ञानें उधरती जग येथें संदेह नाहीं ।
देहेनिर्शन करावें माहांवाक्यें विवरावें
तेणें संसारीं तरावें काळ नासतो आही ।
ज्यास नाहीं येणें जाणें नाहीं जन्म ना मरणें
सद्य पाविजे श्रवणें दास म्हणे हें सही ॥ ११ ॥

लागे विषई चटक परी आवघी तुटक
देहे मडकें फुटक काय सत्य मानिलें ।
रे हा देहे चि लटिका याचा तोडावा तटिका
चुके काळाचा फटिका बहु ज्ञान वानिलें ।
तीर्थव्रतें परोपरीं याचे भरों नये भरीं
धन्य साधु जो विवरी आलें गेलें निमालें ।
पंचभूत कैसें होतें कैसें नासतें मागुतें
काय निश्चळ चळतें ज्ञानें दृश्य विझालें ॥ १२ ॥

सर्व शाहाणे मिळाले तऱ्हे भरोनि पळाले
जेथें जेथें मन चाले तेथें तेथें धांवती ।
म्हणे मी मोठा शाहाणा ज्ञानेंवीण दैन्यवाणा
नेणें संतांचिया खुणा काळ दंड हाणती ।
येहलोकींचा समर्थ परलोकीं होये वेर्थ
याकारणें परमार्थ पुण्यवंत साधिती ।
येहलोकीं सावधान परलोकींचें साधन
जेणें होये धन्य धन्य वर्तायाची हे रीती ॥ १३ ॥
जुझीं साहेब[1] येकला स्वयें घरीं च बैसला
नाना सुखें विळासला पुढें कैसें होईल ।

१ धनी. आपला धनी रणांगणीं एकटा असतां आपण स्वतः सुख भोगीत घरीं बसून राहिला तर पुढें कैसें होईल ?

साहेबासी कानकोंडें तें माणुस काळतोंडें
नवाजेल कोणा तोंडें तें लुटालुट होईल ।
भले नेमस्त जाणती दोहींकडे सांभाळिती
भाग्य वैभव भोगिती जन्म धन्य होईल ।
सदा कामास चुकावी सभेमधें गोष्टी लावी
त्यास कैची रे पदवी वेडें केलें[1] पावेल ॥ १४ ॥

चरफड चरफड पोटामधें भडभड
सदा तोंडी तडतड कासावीस होतसे ।
अवचट हें निधान भाग्यें हाता आलें जाण
परी होतें अप्रमाण वय वेर्थ जातसे ।
सुखें संसार करावा परलोक हि साधावा
काळ सार्थक करावा जन्म धन्य होतसे ।
मुख्य करावें भजन[2] परी पाहिजे जीवन
दोहींकडे सावधान तेणें विद्या विलसे ॥ १५ ॥

## ( २१५ ) भजन

ताळ ताळामागें ताळ परी न दिसे विताळ
नसे विरंगाचा काळ ताळ वेळ चुकेना ।
मन लाउनि निकट मिळे दस्तकीं बिकट
तर्क तीक्षण तिखट त्यासी कांहीं चुकेना ।
गटपट गटपट संगीताची लटपट
रंग चुकेना निपट ऐसें कोण्हीं सिकेना ।
थरीकट थरीकट वटामागें चाले वट
अद्य मद्य हो सेवट तेथें कांहीं विटेना ॥ १ ॥

---

१ ' केर्चे ' चें ' केलें ' केलें आहे. २ " भजन " होतें, त्याचें ' भोजन ' केलें आहे.

जालें विताळ लंघन विरंगाचें उलंघन
मानामागें धांवे मन सावधान गावया ।
तान तानामागें चाले तान स्वराचें तुफान
मान संगीत गुमान वेवधान जावया ।
गण येगण मगण धतीगण ततीगण
होये अर्थ विवरण गीत संगीत काया ।
बंध ज्याचा पळें पळ नृत्य कळा ते चपळ
आचपळ हो चपळ मीत्य नाहीं साजाया ॥ २ ॥

वाजविती थोर थोर विणे तार मंद्र घोर
तंत वाजती सुंदर मनोहर पाहातां ।
रंग रस तो सरस सरीगमपदनिस
नाहीं मीपणाचा रीस दिसेंदीस साहातां ।
तान मान विवरण भरे गगनीं भरण
होतें मनाचें हरण घडी येक राहातां ।
जळचर वनचर नभीं नारद तुंबर
सुरवर ते खेचर हरी वेणु वाहातां ॥ ३ ॥

वळें मांडलासे धींग धींग धींगचीततींग
चंग वाजती मृदांग राग रंग होतसे ।
वंद बंद बहु बंद बंद बंद चि प्रबंद
अघटित छेद बंद अर्थ लोट जातसे ।
ताळ मांधळ निकट नाच नाचती बिकट
धीधीकट धीधीकट रंग रस वातसे ।
शुध आगम निगम नाना सुमती सुगम
नाहीं अहंतेचा गम संतमेळ गातसे ॥ ४ ॥

सुरवर मुनीवर गुणी नारद तुंबर

गाती संगीत सुस्वर राग रंग संगीत ।
हरीहर ब्रह्मादीक देव रुषी इंद्रादीक
नित्य कथेचें कौतुक नित्य नेम नेमस्त ।
राग रंग तान मान ताळ संगीत तुफान
अर्थांतरें समाधान सारासारें स्वहित ।
आवध तो अविचार मुख्य सार तो विचार
पाविजेतो पैलपार धन्य संत महंत ॥ ५ ॥

हरीकथा निरूपण सदा श्रवण मनन
जन साधन पावन समाधान खंडेना ।
संतसंगतीचा वास नित्य नूतन अभ्यास
अखंडित निजध्यास कोणी कोणां तंडेना ।
भक्त भावीक प्रेमळ ज्ञाते विवेकी निश्चळ
साधितातीं पळें पळ तेथें कोप दंडेना ।
गुण गुणाहून गुण लोक मिळाले सगुण
संतसज्जनाची खूण रे मीपणें घडेना ॥ ६ ॥

मुळीं गगनीं पवन तेथें वन्हीचें जीवन
जीवनाचें हें भुवन तरुवर तेथुनी ।
तरुपासुनिया अन्न अन्नापासुनी मदन
मदनाचे होती जन जनें जन मैथुनीं ।
जें जें जाहालें जेथून तें तें तेथें होतें लीन
होये विवेकें तल्लीन निरंजन सज्ञनीं ।
सृष्टीमधें बहुजन विद्वज्जन माहाजन
त्यांत मुख्य ते सज्जन ज्ञाते मानव जनीं ॥ ७ ॥

मनें धुंडावे सकळ जड चंचळ निश्चळ
जाणे तो चि तो केवळ ब्रह्मनिष्ठ जाणावा ।

होये चंचळा चळण जड नासीवंत जाण
मुख्य निश्चयाची खूण ज्ञानयोग पाहावा ।
कांहीं थोड्यामधें फार ऐसा पाहावा विचार
अविचाराचा विचार तो हि दृष्टीसी नाणावा ।
अभिमान मोठा लंड बळें धरीतसे बंड
तेणें होत असे भंड तो विवेकें तोडावा ॥ ८ ॥

भेटो कोणी येक नर धेड माहार चांभार
त्याचें राखावें अंतर याचें नांव भजन ।
दुःख नेदावें कोणाला उंच नीच जरी जाला
अंतरात्मा वोळखिला तो चि जाणा सज्जन ।
मिळाला तो भक्त जाला दोष मिळेना तयाला
देव प्रतक्ष कोपला अहंभाव दुर्जन ।
राजी राखावे सकळ बरेंपण सर्व काळ
नित्य आनंदाची वेळ काळ करी वंदन ॥ ९ ॥

## ( २१६ ) द्रोणागिरि उत्पाटिला

हाक फुटली तडक समरंगणीं धडक
भाट बोलती कडक धडाधडी होतसे ।
उठावले भारें भार आरंभला भडमार
थोर मांडला संव्हार वीरें वीर जातसे ।
मस्त हस्त कींकाटती ढाला पताका डोलती
रणीं रथ घडघडिती काळें काळ खातसे ।
बाण सुटती सणाण भाली वाजती खणाण
वीर पडती दणाण रक्तपूर वातसे ॥ १ ॥

निशाचर बळकट दोहीं दळीं केला कट
कट जाहाला निकट येकमेकां झोडिती ।

शस्त्रें वोढिती भरार मिसळले भारें भार
आरंभला भडमार पाद पाणी तोडिती ।
नाना ध्वनी शंकध्वनी नाद भरला गगनीं
येकयेकां हाटकुनी धडें सिरें फोडिती ।
रणीं धरुनियां धीर वाहों लागलें रुधिर
कितीयेक रणधीर हात पाय खोडिती ॥ २ ॥

घोडेस्वारांचे चळाळ नाना शस्त्रांचे झळाळ
येकमेकां जाले काळ परस्परें हाणती ।
वीर तोडिती घसास सिरें फोडिती ठसास
शूळ टोंचिती भसास आपशुधी नेणती ।
येक हाकीत पावले शस्त्रपाणी चौताळले
येक येकांगें भांडले रणभूमी खाणती ।
वीरें वीर तो बुडाला अवघा हलकालोळ जाला
माहां रुद्र खवळला ज्ञाते लोक जाणती ॥ ३ ॥

हरी गीरीपरी ठाण बळें चालिलें फुराण
वरी घेतलें किराण अंतराळ जातसे ।
कपी लागवेगें धावे मागें लांगूळ हेलावे
वैरसमंध आठवे वज्र दाढा खातसे ।
मनोवेगें झेंपावला द्रोणागिरीस पावला
हात घाली औषधीला आटघाट होतसे ।
गिरी उत्पाटिला बळें सळें बांधला लांगुळें
मागें फिरे अंतराळें लंकेवरी येतसे ॥ ४ ॥

निश्चळेना पळें पळ आचपळ हो चपळ
चळवळ चळवळ अंतराळ जातसे ।

झळकत झक झळ झळ दामिणी पटळ
कटकुपीन सरळ भुभुकार देतसे ।
खळबळ खळबळ दैत्य पावले सबळ
युध्य मांडलें तुंबळ काळरूप होतसे ।
कपी निपट चि बाळ पुछीं लागले भंबाळ
उधाळ लोळ चि कलोळ दैत्यकूळ जातसे ॥ ५ ॥

## ( २१७ ) ब्रह्म

ब्रह्म आमळ विमळ ब्रह्म निर्मळ निश्चळ
ब्रह्म आचळ आढळ सर्वकाळ सारिखें ।
चळबळ चळबळ मोठें संकल्पाचें बळ
पुढें विकल्प सबळ हें अवघें पारिखें ।
तळमळ तळमळ पुढें होतसे विकळ
मळमळ मळमळ ते मानिती पारिखें ।
तळमळ तळमळ खळबळ खळबळ
हळहळ हळहळ हें केवळ आरिखें ॥ १ ॥

## ( २१८ ) देवाधिदेव राम आनंदसुखधाम

प्रचंड गजमुख वितंड तनुसुख
उदंड झकझक लखीतसे ।
धगधगीत भान जाणे तुफान
मान गुणी गुमान सान चकीतसे रे ।
हटांग हटवर कटांग कटवर
नटांग नटवर थकीतसे ।
धिलांग धीधीकट थोगांग थरीकट
कडधीकी ध्रीमीकट बीकटसे ॥ १ ॥

नरांग मतमुख परांग सद्य सुख
वरांग वर दुख तुटोनि जातें ।
झणाण झणझण खणाण खणखण
दणाण दणदण घमंड होतें ।
ळळाळ घळघुळ उलाट खळखुळ
विताळ पळें पळ असेचिना तें ।
गमक गम गम धमक धम धम
चमक चम चम चमीतसे तें ॥ २ ॥

लंका कठीण थोर शंका कठोर मार
पंका रुधीर पूर सरार जातो ।
आचाट घनघट कचाट खटपट
उदंड झटपट संव्हार होतो ।
दुधार झळकत जुंझार तळपत
हुंकार विवळत दळांत येतो ।
प्रपंच रिपुदळ वितंड कपीकुळ
उदंड चळवळ तडकसातो ॥ ३ ॥

चळाळ चळचळ खळाळ खळखळ
हळाळ हळहळ कल्लोळ जाला ।
कडक कडकत तडक तडकत
धडक धडकत कुळांत आला ।
करार करकत भरार भरकत
झरार झरकत अभंड भाला ।
उडाण उडगण थकीत कपीगण
चकीत सुरगण मनु निवाला ॥ ४ ॥

त्रिकांड वेदखंड पाषांड थोर बंड
थोतांड धंड मुंड तो वीर पाडिला ।

देवा बंधन थोर हेवा जानकीचोर
सेवा त्रिलोक्य जेर क्रोधें पछ्याडिला ।
देवाधिदेव राम आनंदसुखधाम
दीनवछळ राम भक्तांसी पावला ।
नेणे निगमागम जाणे तो सुगम
नित्य समागम वानरासी फावला ॥ ५ ॥

## ( २१९ ) स्वप्नसुख

स्वप्नसुखें मन तल्लिन जालें
प्रीतिभरें भरलें धरवेना ।
दुल्लभ लाभ आकल्पित जाला
सांडि जिवीं सहसा करवेना ।
बोलत चालतसे विलसे मज
आठव शोक कदापि धरेना ।
दास म्हणे चटका चुटका
लटका चि भ्रमें भुलला विसरेना ॥ १ ॥

## ( २२० ) दैवहत

जन प्रीतिभरें भरलेंसि मना
सुख सार विचार करीं पुरता ।
नर सुंदर चित्रकळा सकळा
सकळा वीकळ वरपंग रिता ।
वर वेष विशेष नटे विनटे नीट
नीकट नीट बुझे ममता ।
दास उदास म्हणोनि सीणे तुज
दैव चि दैवत दैवहता ॥ १ ॥

## ( २२१ ) वेणु

येक जरा भरी टीलक लाउनि वाउनि वेणु करी घमडी ।
संगीत कींन्नर गायन सुस्वर वेणु पुढें न पवे दमडी ।
सुरंग चि रंग विरंग नसे रस तुंबळ होत घडीनघडी ।
खलप[1] ताळ थरक चमकत मीळत जात सुधी धीमडी ॥ १ ॥

## ( २२२ ) आळसु न करावा

जनसंग जनीं मनभंग मनीं सुखसार वनीं वनवास करावा ।
जनसंग नको मनभंग नको वरपंग नको हरिसंग धरावा ।
अनुमान नसे विजयो विलसे निजहीत नसे रिपु काळ हरावा ।
निजदास भले भजनीं मिनले मुनि मानवले आळसु न करावा ॥ १ ॥

## ( २२३ ) निजध्यास

पुर्वील दत प्रतक्ष चि दत स्वयें चि आदत्त तया न दिसे ।
सात्विक सार विचार करी विवरील तयासि बरें विलसे ।
अंत न पार अपार निरंतर उतर हेत असे न वसे ।
दास म्हणे निजध्यास न सो ध न सो न पुढें तरतील कसे ॥ १ ॥

## ( २२४ ) श्रम

योग सदा श्रम आश्रम ही श्रम जन्म बहु श्रम हा निरसावा ।
सार विचार बरा विवरा जन हो मननासि तुम्ही सरसावा ।
सज्जनसंग खरा चि धरा परि प्रत्ययमेघ बरा वरसावा ।
भाव धरूनि स्वभाव तजा मग हासिल लाभ परात्पर सावा[2] ॥१॥

## ( २२५ ) जातक

प्रीतिकळ्हो करितां बरवें परि सख्य कुळाचें पातक रे ।

---

१ ' खलप ' स्पष्ट आहे. असा च शब्द पुढें २२८ त आला आहे. २ बहुधा "ध्यावा" होतें, त्याचें " सावा " केलेलें दिसतें.

सज्जनसंग दुरूनि बरा परि निंदक दुर्जन घातक रे ।
सन्निध काक कलालितसे परि तें सुखदायक चातक रे ।
दास म्हणे रघुनाथ करी तरि बोलतसे हें जातक रे ॥ १ ॥

## ( २२६ ) रावण भीक मागत हिंडतसे

नर सुंदर फार विकार करी वरी बोलतसे मनिचा कपटी ।
परि अंतरचोर निशाचर हा वर वेश धरूनि वळें दपटी ।
जगतीतळ मंडळ धुंडितसे जन पावन भूवन पंचवटीं ।
भीक मागत रावण हिंडतसे खट चावट चाट कुटीळ जटी ॥ १ ॥

## ( २२७ ) उत्तम हें वय नास चि केला

नेणत हीत सदा भयभीत म्हणोनि पतीत चि होउनि ठेला ।
सार विचार नसे अविचार म्हणोनि विकार करीत चि गेला ।
ने घे चि पद माहां मतिमंद उदंड चि फंद करीत चि मेला ।
कोमळ हृदय नाहिं धरी लय उत्तम हें वय नास चि केला ॥ १ ॥

## ( २२८ ) मनास उपदेश

रे मन सामन सुमनके मन योग तनमनसो सब सांहीं ।
सुंदरी सुत सपुत आटक भटकत लटकत सज्जनमाई ।
योवनधाम आराम चि राम गुणी गुणधाम मुजे इतना हीं ।
दास कहे आब देखजेंबतब रामाकि कामबिना कछु नाहीं ॥ १ ॥
रे मन हे जन सज्जन दुर्जन पुज्यक पुज्यन अंतरबासी ।
बेश बिदेश सदेश निरंतर योग संयोग चि भोगबिळासी ।
आटण तें वन भुवन पटण अंतरबेद गदाधर कासी ।
मुलुक माल दुमाल तसाल पखावज्य ताल कलोल सुखासी ॥ २ ॥
अंतर ढाल आढाल चि ढाल सदां खुसीहाल चि तोलमुकासी ।
काचन काट उलाट चि लाट आचाट कचाट निसीम सुखासी ।
भुजाबळ तुंबळ देव हि तुंबळ दैत्य खळबळ मृत्य तयासी ।
देव सुखाळय आळय लीळा विलसत भासत स्वर्ग बिळासी ॥ ३ ॥

सुक्षम धंड उदंड चि बंड वितंड चि तंड प्रचंड उठावी ।
भक्ति चपेटित लाटित थाटित थाट चटाट घटावी ।
भ्रांति विभक्ति आभक्ति निशाचर बंड आखंडित खंड रडावी ।
भक्ति विरक्ति उदासिन दुर्लभ बुधी उदंड आभंड चढावी ॥ ४ ॥
योवन भार भरें गजभार आपार चि पार रघोत्तम ध्यावा ।
विबुधविमोचन मोचन बंधन आवडिनें हरि कीर्तनिं गावा ।
आन्वय बंद प्रबंद बहुविध उत्तम जाड खलप पुरावा ।
धन्य हरीजन प्रेमळ गायन उत्कट रंग तरंग तरावा ॥ ५ ॥
ततेतं[1] स्वतंत चणचण ढाळ सुढाळ सुताळ उमाळें ।
संगीत मान तुफान गुणी जन सज्जन मज्जन नेमक चाले ।
लटलट थरक चमकत खलप ताळ उलाळ उफाळे ।
खटखट लटलट पटपट झटपट झटपट संगीत ताळें ॥ ६ ॥
सुमनगंध सुगंध बहुविध उंच परिमळ गंध उडाला ।
बोलत चालत डोलत हालत आनंद थोर घटाघट जाला ।
मानत मान सुमान गुमान प्रगट चि कीर्ति उदंड चि जाला ।
देव दयाळ हरीजनवछळ देखत देखत भाव गळाला ॥ ७ ॥
सुंदर घोष विशेष घनघन वाद्य कडक उदंड उडाला ।
गर्जत अंबर नारद तुंबर स्वर्ग मुनीजन चकीत जाला ।
बंद प्रबंद बहुविध छेंद चि तुर्त चि तुर्त मनीं मन घाला ।
विरंग विताळ फुटे बहुताळ रिपुवर काळ भयें चि निघाला ॥ ८ ॥
अंतर येक तदंतर येक बाहे अनेक तजूनि भजावें ।
स्छूळ कळीवर तें वर वावर अंतर घेउनि बाह्य तजावें ।
लोक आनेक बहुविध बोलत प्रत्ययवीण कदा नव जावें ।
नीगमगूज आनंत आपार परात्पर सार जीवांतर जावें ॥ ९ ॥
चीत चंचळ चंचळ निश्चळ शोधुनि केवळ सार धरावें ।
मान तुफान तजा अनुमान गुमानभिमान चि हीत करावें ।

१ या ठिकाणीं कागद फाटलेला असल्यामुळें अक्षरें खात्रीपूर्वक लागलेलीं नाहींत.

सार आसार विचार चि सार धरे परपार चि ज्ञान भरावें ।
सज्जनसंग धरूनि उमंग विरंग चि रंग आप्त परावें ॥ १० ॥
दुर्जनगंजन सज्जनरंजन भवभयभंजन आंजन ज्ञानी ।
बाधककंदन साधकबंधन झीजत चंदन पंदनमानी ।
हीत न सीकत भाव न वीकत दंभ चि पीकत गर्व गुमानी ।
बहुत बंद प्रबंद चि बंद विवेक निबंद सुबंद निदानी ॥ ११ ॥

## ( २२९ ) कुटीळ

खासील लेसील देसील घेसील तें चि खरें तितुकें तुज भोगे ।
काळचपेट लपेटित लाटित दाटित ते नव्हती तुजजोगे ।
कर्कश हाकुनि झोंकुनि टाकुनि मारित रे मनुजा तुज घोके ।
दास म्हणे हरिदास्य करीं तरी ध्रुव जसा न चळे वरि तो गे॥१॥
मना आवरोध जनासि विरोध तयासि च क्रोध करी कडका ।
नसे निजबोध विशेष प्रबोध गुणी गुण बोधं उगा तडका ।
कुटीं कुट खात गुणी गुण धात तयासि निघात जिवीं भडका ।
बहु जन लंड वितंड चि बंड भजेल उदंड तरीं फडका ॥ २ ॥
रडे रडवीत पडे पडवीत झडे झडवीत स्वभाव जनाला ।
कुटी कुटवीत लुटी लुटवीत तुटी तुटवीत मनें चि मनाला ।
रुधी रुधवीत सुधी सुधवीत वधे वधवीत धनें सधनाला ।
चुके चुकवीत तुके तुकवीत झके झकवीत तनें चि तनाला ॥ ३ ॥
हटी हटवाद तटीं तटवाद फटीं फटवाद उदंड चि बोले ।
नसे सुखवाद दुखें दुखवाद आखंड वेवाद उदंड चि चाले ।
बळें चि निघात करी घरघात कुटीळ चि धात जनावरि घाले ।
वसे वरबंड उदंड चि भंड वितंड चि लंड गुणेंविण तोले ॥ ४ ॥
जनीं जन काल मनीं बटवाल बहुत चि साल पुरे कटका ।
वदे गुण ढाल आढाल चि ढाल करीत चि गाल सदा लटका ।

---

१ मागील ( १६२ ) पहा. २ 'बोध' चें 'शोध' केलें आहे. ३ भ्रष्ट.

आचाट चि चाट करीत कचाट वदोनि च झाट मुढा चुटका ।
सुरंग विरंग विरंग चि रंग सुधात सुरंग नसे लटिका ॥ ५ ॥

## ( २३० ) गोप गोविंद गोपाळ

गोप गोविंद गोपाळ भूतभुवनभूपाळ
पूतनेसी अंतकाळ कौंसमामा मारितो ।
नंदगौळीयांचें बाळ गाईरंजन वेल्हाळ
वौंश वाजवी सुढाळ गोपीकांसी रंगतु ।
धीर धीट प्रासी ज्वाळ मुनी जनीं जो मृदाळ
वडजें वांकडें विडाळ त्याच्या संगें खेळतु ।
पूर्ण ब्रह्म नामातीत सुर आर्जुन बोधीत
तें चि सुख सदोदीत आत्माराम साधितो ॥ १ ॥ *

वृत्तश्लोक +

## ( २३१ ) गणेशशारदा

शुंडादंड प्रचंड मस्तक माँहां[1] सिंधूरचर्चीत हा ।
भुजा कंकण केयुरें फणिवरें मंडीत शोभे पाहा ।
माळा कुंडल किंकिणी फणि मणी दिव्यांबराची प्रभा ।
वांकी तोडर नेपुरें झणकती साहित्य रंगीं उभा ॥ १ ॥
रंगीं नाटक वर्ण हाँटक[2] उभी हंसासनी शारदा ।
वीणा पुस्तक पद्म हस्तक सदा वाणी वदे सर्वदा ।
विद्यासागर रम्य नागर[3] रुपें लावण्य योगेश्वरी ।
दासां मंडण पाश खंडण करी वागेश्वरी सुंदरी ॥ २ ॥

---

* या ठिकाणीं बाडांत पुढील सवाई मागाहून कोणी तरी लिहिलेली आहे.
सोफी जंगम जटील द्विज संन्यासी सुसीळ नाथ भराडी धडील क्षपणीक बैरागी ।
निराहारी दिगंबर मायाधारी वस्त्रधर भगवे तांबडे फकीर उघडे बोडके अंगीं ।
जिंदा मुल्ला कलंदर बंदे सेख मुसाफर वल्ली काजी पेगंबर बेकैद दुरंगी ।
ऐसे अनंत वेशज पंथ चालती निर्लज्ज रामदासां ते सहज धन्ये जाले स्वरंगीं ॥ १ ॥

+ असा मथळा मुळांत च आहे. १ " मणी " म. पा. २ सोनेरी. ३ मनोहर.

## ( २३२ ) मी मी मी

ये ये ये येक वेळे वसउनि हृदये सांग कांहीं उपाये ।
ये ये ये ये च वेळे जिवलग सदये चूकवावे अपाये ।
ये ये ये बापमाये तुजविण न दिसे सीघ्र येऊनि जाये ।
ये ये ये अंतरंगे भजन भगवती तूजवांचूनि काये ॥ १ ॥

तुं तुं तुं सकळांसि तुं जिवन तुं तुं आदि तुं अंत तुं ।
तुं तुं तुं न कळेसि तुं तुजविणें तुं येकली तुं चि तुं ।
तुं तुं तुं यहलोक तुं परतरीं पावावया मूळ तुं ।
तुं तुं तुं मजमाजि तुं त्रिभुवनीं मी तों नसे सर्व तुं ॥ २ ॥

ना ना ना उमजेचिना बहु जना नानापरी वासना ।
ना ना ना समजेचिना जनमना नानापरी वल्गना ।
ना ना ना मनकामना तनधना लोलंगता या जना ।
ना ना ना परिभावना घडतसे नानापरी यातना ॥ ३ ॥

जा जा जा समजोन जा रिझत जा जा शर्ण मोक्षध्वजा ।
जा जा जा विसरोन जा मम तजा यागादिकां रुद्बिजा[1] ।
जा जा जा उमजोन जा भिजत जा जा जा भजा अग्रजा ।
जा जा जा नवजोन जा मग खिजा चत्वार देहे तजा ॥ ४ ॥

मीं मी मी जिव भाव मी सर्वेळ[2] मी मी दक्ष मी धूर्त मी ।
मी मी मी रुपवंत मी चतुर मी मी बोलका धीट मी ।
मी मी मी बहु नेटका चपळ मी मी थोर मी सूर मी ।
मी मी मी सकळामध्यें वडिल मी मी धूर्त[3] मी वेर्थ मी ॥ ५ ॥

## ( २३३ ) दे दे दे

दे दे दे मज देव दे वरद दे तुं विद्वदे शारदे ।
दे दे दे वर वाग दे विमळ दे उल्हास दे तर्क दे ।

१ " ऋत्विजा " म. पा. २ " सकळ " म. पा. ३ " वृत्थ " म. पा.

दे दे दे शुभयोग दे सरस दे आनंद दे छंद दे।
दे दे दे परलाभ दे विवर दे सद्गूण दे सर्व दे ॥ १ ॥
कां कां कां न वदेसि कां कठिण कां कां चीत उदास कां।
कां कां कां सिणलीस कां विसर कां कां मौन्य कां गोप्य कां।
कां कां कां मज कोप कां उसिर कां कां धीर कां बाळकां।
कां कां कां न पवेसि कां कृपण कां कां छिन्न कां भिन्न कां ॥२॥

## ( २३४ ) रामरूप

माथां मूगुटि कीरटी मणगटीं वीराजती कंकणें।
कर्णीं कुंडल मुक्तमाळ हृदईं दिव्यांबरें भूषणें।
हेमीं रत्नकिळा सुरंग विमळा[1] लावण्य नानापरी।
ऐसी मूर्ति उदार धीर मिरवे सिंह्यासनीं साजिरी ॥ १ ॥
माथां मूगुट पींवळा वरि किळा रत्नाचियां फांकती।
भाळीं केशर पींवळें परिमळें झुंकार झेंपावती।
पुष्पें चंपक पींवळीं बहुविधें जाई जुई सेवंती।
कासे अंबर पींवळा पितमणीमाळा गळां डोलती ॥ २ ॥
कंठीं माळ विशाळ भाळ भृकुटी च्यापाकृती वेंकटा।
घंटा किंकिणि वाजटा कटतटीं धाटा पटें गोमटा।
अंदु तोडर नेपुरें मुरडिवां वांकीं झणत्कारती।
दासा ध्यान पुजाविधान चरणीं आकर्षणीं थारती ॥ ३ ॥
नेत्रीं लाघव रम्य राघव उभा शामांग रंगीं नभा।
रूपें मजन संत सज्जन सभा मुक्तीसुखें सुल्लभा।
सीतानायक सौख्यदायेक कदा ध्यानीं मनीं नातुडे।
तो हा दुल्लभ होत सुल्लभ सदा ध्यानीं मनीं आतुडे ॥ ४ ॥
रामु आठवितां गुणी सगुणता विश्रामता देखतां।
नेत्रीं सुंदरता विशेष पाहातां चापाकृती भृल्लता।

१ "पिवळा" पा. म. २ "ध्यानीं मनीं" ऐवजीं "ब्रह्मादिका" पा. म.

रत्नीं वीमळता किळा झळकतां सामान्य वीदुल्लता ।
दृष्टांतें समता नये[1] विशमता लावण्य ज्याची सत्ता ॥ ५ ॥

( २३५ ) रामगुण

रामु राज्य करी जरा दुरि करी मृत्यूसि नाहीं उरी ।
राजा येकशरी बळें बहु पुरी दूजी नसे अंतुरी ।
रामालागि सरी नसेल दुसरी श्रीराम येकोतरी ।
वैकुंठा नगरी समागम वरी नेली अयोध्यापुरी ॥ १ ॥
ज्याचें रूप अरूप नाम न घडे ध्यानीं मनीं नातुडे ।
ज्याचा पार अपार वृत्ति पाहातां स्वानंदडोहीं बुडे ।
तर्का भूलि पडे समूळ विघडे संसार माया उडे ।
तें हें नाम म्हणा श्रीराम म्हणतां दासांसि प्रेमा चढे ॥ २ ॥
ज्या नामें गणिका विमान चढली मोक्षासनीं बैसली ।
ज्या नामस्मरणें हळाहळकळा क्षीणत्वता पावली ।
ज्या नामें जडमूढ पावन सिवें वाराणसी प्रेरिली ।
तें हें नाम म्हणा श्रीराम वदनीं संजीवनी फावली ॥ ३ ॥
ज्याचें रूप विशाळ ज्वाळ नयनीं जाळूं शके मेदनी ।
ज्याचा दर्प अगाध सर्पभुषणीं कंदर्प कांपे मनीं ।
ज्याचा काम विराम शामवदनी लावण्य पंचाननी ।
ते हे मूर्ति सगूण कीर्ति भजनीं वाखाणिली सज्जनीं ॥ ४ ॥
राजाराम सगूण शाम बळिया घेऊनि आले रुसी ।
येशीं विघ्न करूनि भग्न सकळै आनंदले मानसीं ।
पुढें चंड सिळा प्रचंड पडिली उधार केला तये ।
सीतानाथ समर्थ यासि तुळणा ब्रह्मांड देतां नये ॥ ५ ॥

( २३६ ) राममहिमा

आला राजा महीचा दिनकरकुळिचा ख्यात वौंशावळीचा ।

---

१ "गुणीं रसिकता" पा. म.

आला आत्मा जगाचा मुनिजनरुसिचा प्राण त्या साधकांचा ।
आला दाता दिनाचा जप पशुपतिचा ध्यास त्या वाल्मिकाचा ।
आला सिंधु सुखाचा सुरवर म्हणती काळ हा राक्षसांचा ॥ १ ॥
जो शोभे शरयूतिरीं तदुपरीं वेष्टीत रुसेश्वरीं ।
जो शोभे नृपसैंवरीं तदुपरीं ऊदास गोदातिरीं ।
जो शोभे रिसवानरीं वनचरीं वेष्टीत सिंधुतिरीं ।
जो शोभे रणकेशरी रिपुवरी वेष्टीत लंकापुरी ॥ २ ॥
जो शोभे बहुसाल युध्य करितां राक्षेस वीभांडितां ।
जो शोभे दशमूख शत्रु वधितां बिभीषणा स्छापितां ।
जो शोभे सुर सोडितां सकळिकां देवांसि आळंगितां ।
जो शोभे सुर पुष्पकीं आरुढतां पुष्पें बहु वर्षतां ॥ ३ ॥
जो शोभे पुरि पावतां चि भरथा अत्यादरें भेटतां ।
जो शोभे रिसवानरां निरवितां सर्वांसि संमोखितां ।
जो शोभे रघुनाथ राज्य करितां लोभें प्रजा पाळितां ।
जो शोभे निजदास नाम स्मरतां भक्तांसि सांभाळितां ॥ ४ ॥
ज्याचें नाम विषा विराम सिव तो प्रीतिन कंठीं धरी ।
ज्याचें नाम सुखैकधाम विलसे वाल्मीक अभ्यांतरीं ।
ज्याचें नाम समस्त काम पुरवी विख्यात लोकोत्तरीं ।
ज्याचें नाम समस्त जीव उधरी नामें चि कासीपुरी ॥ ५ ॥

## ( २३७ ) नरजन्मसफलता

चौऱ्यासी लक्ष योनी बहुविध भ्रमणें वेर्थ देह्याभिमानें ।
नाना स्छानें विधानें अगणित जनकें जंन्मनी कोण जाणे ।
जागृती दीर्घस्वप्नें प्रचळित रचना लोभ येणें प्रमाणें ।
वित्पन्नें भक्तिमानें रघुविरस्मरणें मोक्षपंथासि जाणें ॥ १ ॥
लक्षालक्ष दिजेल नरदेह न मिळे हीत याचें करावें ।
संसारीं असिजेल तंवरि स्वहिता दृढ चित्तीं धरावें ।

" वनचरा " म. पा.

निंदा वादवेवाद हरिजन सकळै न्युन्य त्यांचें नसावें ।
अंतीं भ्रांती पडेल म्हणुनि हरिचें नाम वाचे वसावें ॥ २ ॥

रंगा रंगा श्रीरंगा अनुदिन उमगा सर्व संगासि भंगा ।
गा गा गा गा अभंगा भवरिपु विलगा सीघ्र लंघा भुजंगा ।
जागा जागा नि जागा तगवग अवगा[1] संतसंगा प्रसंगा ।
मागा मागा श्री मागा नवविध शुभगा देत भोगा विभोगा ॥३॥

बोधा बोधा प्रबोधा परतर विबुधा सीधं[2] बोधा प्रबोधा ।
शोधा शोधा स्व शोधा निज बिज बहुधा मत वेधा विरोधा ।
रोधा रोधा विरोधा शडरिपु विरुधा कामक्रोधादि बाधा ।
साधा साधा न साधा जिवमुळ वसुधा प्राप्त शुधा न शुधा ॥४॥

भर्ता भर्ता न धर्ता परतर परता रूपवार्ता न कर्ता ।
वर्ता वर्ता प्रवर्ता निजसुख सदनीं देव पर्ता चि आर्ता ।
कर्ता क्षर्ता विकुर्ता बराळित ममता गूणवार्ता[3] चि कर्ता ।
हर्ता सर्ता विकर्ता न मनिल वचनें तो चि तर्ता सपुर्ता ॥ ५ ॥

## ( २३८ ) रामप्रताप

चित्ता चातक होउनी रघुपती ध्यायें सदा सर्वदा ।
दाता येक सितापतीविण मुखीं आणीक नेणें कदा ।
निंदावाद प्रपंचखेद न करीं भेदासि दे आपदा ।
क्षमा शांति धरीं दया भुति करीं तेणे चुके आपदा ॥ १ ॥

देवां मंडण दैत्यखंडण उभा वक्रांग ठाणें रणीं ।
धाकें चकित काळ थकित मनीं वर्षाव तारांगणीं ।
भूमी दंडळ सूर्यमंडळ रजें निशेष झांकोळलें ।
बाणीं जर्जर दैत्य निर्जर बळें कारागृहा फोडिलें ॥ २ ॥

१ समजा, जाणा. २ “ शुध बुद्धा ” म. पा. ३ “ गूण धर्ता चि मर्ता ” म. पा.

## ( २३९ ) रामबाण

कानींडी[1] राम वोढी गगन गडगडी वीज जैसी कडाडी ।
वज्राची शक्ति थोडी रघुविरशर तो मेरुमांदार फोडी ।
रामाज्ञा तो न मोडी शरण म्हणवितां बाण त्यातें चि झोडी ।
नेमाचा[2] बाण काढी दशमुख नृप तो मोक्षपंथासि धाडी ॥ १ ॥

कां बापा सिणसी प्रपंच म्हणसी माझा चि हा आखिला ।
तुझा पाड किती समर्थ नृपती तेहीं असे टाकिला ।
लोभें तुं वदसीं बहु दगदसीं कां रे देहे वीकिला ।
अंतीं भ्रांति पडे स्वहीत न घडे जासील धोकावला ॥ २ ॥

## ( २४० ) अंतीं सोडविता

कांता कांचन पुत्र मित्र दुहिता ज्यामात माता पिता ।
वंधु ईतर पीसुणें[3] बहुजणें संख्या नसे मोवितां[4] ।
देह्यांतीं सकळैक माइक नरा सांडून येती घरा ।
तेथें सोडविता नसे रघुविरा वांचूनियां दूसरा ॥ १ ॥

आशा बुधि हरी भ्रमें तदुपरी पाणी बळें सिंतरी ।
दुःखें शोक करी पदार्थ नसतां वास्तव्य अभ्यांतरीं ।
राया रंक सरी महत्व उतरी आशक्ति नानापरी ।
सांडा रे ममता बहूत असतां ब्रह्मांड दुःखें भरी ॥ २ ॥

## ( २४१ ) देवी

कामाक्षा वनशंकरी कमळजा ज्वाळामुखी चेडिका ।
लक्षुमी हि गुजा उमा भगवती कात्यायणी रेणुका ।

---

१ आकर्ण धनुष्यदोरी. २ नेमलेला, नेमका. ३ उणें पाहणारे. ४ मोजतां.

ब्रह्मी ब्रह्मसुता समस्त करणी जोगेश्वरी अंबिका।
माया मानसमोहनी शुभवती पद्मावती काळिका ॥ १ ॥

संताई तुळजाई जळथळजाखिणी जाखमाता जुगाई।
धानाई पींपळाई उदिगिरि जळिच्या कुंभजाई विठाई।
बीजाई सोमजाई खडतर करणी तांब्रजाई मळाई।
वागजाई खांडजाई बहुविध जननी नादजाई निनाई ॥ २ ॥

वैराग्यें योग साधे सकळ जन बधे देखतां वेश वेधे।
वीवेकें सार शोधे शडरिपु सकळै पाहतां पंथ रोधे।
साधे बोधें विरोधें बहुविध वदतां ऐकतां बाळबोधें।
भेदीते भेदभेदे विवरण करितां वासनाकंठ छेदे ॥ ३ ॥

धोंडे संघटले कितेक फुटले काळे कडे तुटले।
झोतावे सुटले दरे उतटले पाठारसे वाटले।
धारा सेवटले फणी च उठले कर्कोट[1] सेकाटले।
वीवेकी नटले बरे विनटले कीतेक चाकाटले ॥ ४ ॥

## ( २४२ ) आनंत जीवीं धरा

वेदीं भेद अभेद बाद वदती उथापिती थापिती।
शास्त्रें शास्त्र बहूत मत पाहाती आनंदती स्फुंदती।
पुराणें बहुसाल गाल करिती कीर्ती बहू वर्णिती।
नाना ग्रन्थ अनंत पंथ स्तविती मत्तांतरें धांवती ॥ १ ॥

माहात्में बहुतें हरीत दुरितें[2] नाना व्रतांचीं शतें।
गीता भागवतें तथा बहुमतें रामायणें भारतें।
वाचा वाचित चीत दुश्चित कदा निश्चीत कांहीं नसे।
बोले फार विचार सार बहुधा संदेह पोटीं वसे ॥ २ ॥

१ सर्प, २ पाप.

नाना स्तंबन मोहनें जनमनें देह्याश्रया कारणें।
नाना जारण मारणें विवरणें उच्चाटणें खीळणें।
नाना घोर अघोर कर्म करणें उद्घाटणें घाटणें।
नाना दोश विशेष तामसगुणें विध्वंशणें दंशणें ॥ ३ ॥

नाना नाटक चेटकें बहुतकें हिंसादिकें पातकें।
नाना भूत पिशाचे कर्कषरुपें तें सर्व हि घातकें।
नाना मत कुमत सांडुनि सदा आनंत जीवीं धरा।
नाना संत सतंत शोधुनि बरें वास्तव्य तेथें करा ॥ ४ ॥

सत्शास्त्रीं सत्संगती बहु बरी पाहोनियां जो धरी।
सारासार विचार सदृढ करी चित्ता बरें वीवरी।
पंचीकर्णविवर्ण त्यागुनि पुढें नीसंग नीरंजनी।
ब्रह्माकार विकार त्यागुनि असे तो वंदिजे सज्जनीं ॥ ५ ॥

## ( २४३ ) साहित्यसंपादना

नाना बंद प्रबंद छेदरचना साहित्यसंपादना।
नाना लाघव गद्य गौरव जना सद्भाव लागे मना।
नाना नाटक सौम्य त्राटक[1] गुणी सप्रेम सदृढता।
नाना काव्य रसाळ भव्य करणें भक्तीन सायोज्यता ॥ १ ॥

## ( २४४ ) विवेकवैराग्य

नानाकार विकार फार हृदईं होतां विवेका करी।
नित्यानित्यविचारसारश्रवणें वैराग्य चित्तीं धरी।
त्यागात्याग विभोग भोग पाहातां सर्वत्र देह्यांतरीं।
तेणें संगीत संग सकळै आत्मा चि पावे[2] सरी ॥ १ ॥

---

१ योगांतील 'त्राहटकाचा' येथें संबंध दिसत नाहीं, तेव्हां 'त्राटक' म्हणजे वाद्य' कीं काय? २ "नाहीं" म. पा.

नाना स्तंबन मोहनें जनमनें देह्याश्रया कारणें।
नाना जारण मारणें विवरणें उच्चाटणें खीळणें।
नाना घोर अघोर कर्म करणें उद्घाटणें घाटणें।
नाना दोश विशेष तामसगुणें विध्वंशणें दंशणें ॥ ३ ॥

नाना नाटक चेटकें बहुतकें हिंसादिकें पातकें।
नाना भूत पिशाचे कर्कषरुपें तें सर्व हि घातकें।
नाना मत कुमत सांडुनि सदा आनंत जीवीं धरा।
नाना संत सतंत शोधुनि बरें वास्तव्य तेथें करा ॥ ४ ॥

सत्शास्त्रीं सत्संगती बहु बरी पाहोनियां जो धरी।
सारासार विचार सद्दढ करी चित्ता बरें वीवरी।
पंचीकर्णविवर्ण त्यागुनि पुढें नीसंग नीरंजनी।
ब्रह्माकार विकार त्यागुनि असे तो वंदिजे सज्जनीं ॥ ५ ॥

## ( २४३ ) साहित्यसंपादना

नाना बंद प्रबंद छेदरचना साहित्यसंपादना।
नाना लाघव गद्य गौरव जना सद्भाव लागे मना।
नाना नाटक सौम्य त्राटक[1] गुणी सप्रेम सद्दढता।
नाना काव्य रसाळ भव्य करणें भक्तीन सायोज्यता ॥ १ ॥

## ( २४४ ) विवेकवैराग्य

नानाकार विकार फार ह्रदईं होतां विवेका करी।
नित्यानित्यविचारसारश्रवणें वैराग्य चित्तीं धरी।
त्यागात्याग विभोग भोग पाहातां सर्वत्र देह्यांतरीं।
तेणें संगीत संग सकळै आत्मा चि पावे[2] सरी ॥ १ ॥

१ योगांतील 'त्राहटकाचा' येथें संबंध दिसत नाहीं, तेव्हां 'त्राटक' म्हणजे 'वाद्य' कीं काय? २ "नाहीं" म. पा.

तत्वें तत्व तुटे वेवाद प्रगटे साकार प्रेमा विटे ।
वाचाळीं लिगटे सदा झटपटे क्रीयेसि फांटा फुटे ।
मर्यादा वोहटे मनीं भय फिटे दोषांतरीं राहटे ।
बुद्धिभ्रंश सुटे प्रशस्त न वटे धोका सर्वे आदटे ॥ २ ॥

## ( २४५ ) साधव भला

मूर्खी माधव तो च्रि साधव भला सर्वा गुणें आथिला ।
नामीं निश्चय सर्व संशय नसे संसार हा आथिला[1] ।
द्वंदा कंदन भक्तवंदन सदा सर्वत्र भूमंडळीं ।
त्यागा संग जनीं कुसंग नलगे त्या रामनामावळी ॥ १ ॥

## ( २४६ ) जैशासि तैसा बरा

काका काक बरा बका बक बरा ढोंक्यासि ढोंका बरा ।
गृधा[2] गृध बरा गीदा[3] गीद उलूक्यासि[4] उल्का बरा ।
स्वाना स्वान बरा खरा खर बरा हिंश्यासि[5] हिंसा बरा ।
मेषा[6] मेष बरा रिसा रिस बरा नटव्यासि नटवा बरा ॥ १ ॥

मैदा[7] मैद बरा ठका ठक बरा भोंदूसि भोंदु बरा ।
चोरा चोर बरा खटा खट बरा सिंतऱ्यासि सिंतरु बरा ।
लौंदा लौंद[9] बरा धटा धट बरा हुंब्यासि हुंबा बरा ।
मूर्खा मूर्ख बरा खळा खळ बरा पाप्यासि पापी बरा ॥ २ ॥

हंसा हंस बरा शुका शुक बरा भृंग्यासि भृंगा बरा ।
मोरा मोर बरा स्वरा[10] स्वर बरा आर्तासि आर्ता बरा ।
सिंह्या सिंह्य बरा गजा गज बरा राज्यासि राजा बरा ।
सिधा सिध बरा बुधा[11] बुध बरा सद्गुण संता बरा ॥ ३ ॥

---

१ "नाथिला" म. पा. २ गृध्र, गिधाड. ३ गीद=गिधाड किंवा घार. ४ उलूक=घुबड. ५ "म्हैशासी म्हैसा" म. पा. ६ मेष=मेंढा. ७ मैंद=ढोंगी. ८ सिंतरु=फसविणारा. ९ गलेलठ्ठ. १० "खरा खर" होतें. "ख" जोडणारी शाई निराळी दिसत आहे. ११ "वद्धा बद्ध" म. पा.

दक्षा दक्ष बरा गुण्या गुणि बरा ज्ञात्यासि ज्ञाता बरा ।
भक्ता भक्त बरा मूढा मूढ बरा साधूसि साधु बरा ।
श्रेष्ठा श्रेष्ठ बरा शुभा शुभ बरा योग्यासि योगी बरा ।
शुधा शुध बरा सिळा सिळ[1] बरा जैशासि तैसा बरा ॥ ४ ॥

## ( २४७ ) सीतामाईनें केलेलें दिव्य

सीता चातक ते वनीं द्रुमतळीं अत्यंतसी तापली[2] ।
मेघशाम तुशार वक्र (क)[3]मळीं घ्याव्या असे श्रांतली ।
तो सुसीतळ वायुजेहिं जवळीं वार्ता असे आणिली ।
माते चाल तुझी स्वभेटिसोहळी रामें असे वांछिली ॥ १ ॥

रामाज्ञेसि करीं विलंब न करीं शृंघारसोहळा[4] करी ।
जीर्णांबर दूरि टाकि म्हणे हरी स्फुंदोन आर्धोतरीं ।
येरी आंगिकरीत शार्वरिवरी सेवा त्रिजटा करी ।
शर्मा हे दुसरी वदे प्रिति करी संतोष कां उतरीं ॥ २ ॥

सोन्याची शिबिका सुरत्नकणिका त्या शोभती तेजिका ।
मध्यें पद्ममुखापती सकळिका त्याची असे नायका ।
बुंथी[5] रंग निका आश्रित कपीका पुढें करीं काष्टिका ।
वाद्यें मंगळिका सहीत कटका संन्नीध आले सुखा ॥ ३ ॥

वैदेही नयनीं दिसों म्हणउनी धांवे हरीवाहिनी[6] ।
वेष्टीलें दुरुनी मुडूपघसणी[7] जाली अती दाटणी ।
रामु तो ते क्षणीं दुकूळ वरुनी टाका म्हणे काढुनी ।
देखोनी जननी आनंद कपिमनीं वंदीत दंडासनीं ॥ ४ ॥

वेत्रें वारित त्या कपींद्र चळथा[8] संनीध आले सता ।
ऊतरोनि सिता वियोग हरतां वांछीत नेत्रांबूता ।

१ शील, सुशील. २ " श्रांतली " पडलें होतें. ३ " कमळीं " म. पा ४ " सोळा " म. पा. ५ घुंगट, डोक्यावरून घ्यावयाचें वस्त्र, दुकूल. ६ वानरसेना. ७ मुंडपघसणी=पागोट्याला पागोटें किंवा मुकुटाला मुकुट घासणें. ८ रांगा.

करुणाष्टके ... ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत.

आऱ्हेरु दिसतां बहूत दुखिता स्फुंदे असे पाहतां ।
देखोनी जिविता अती विकळता प्राणांत वायोसुता ॥ ५ ॥

आंदोळे जगती समस्त वदती उदास कां श्रीपती ।
सीतेलागि किती सिणे रघुपती तो कां न पाहे प्रीती ।
वानेरें रुदती[1] सितेसभवंती पुढें पुढें रीघती ।
नीघे अग्निप्रती दयदीप्य निरुती रामु म्हणे[2] युवती ॥ ६ ॥

## ( २४८ ) सीतास्वयंवराचा पण

वैदेहीनगरी विशाळ दुसरी जैसी अयोध्यापुरी ।
तेथें राज्य करी विदेह नृप जो विख्यात पृथ्वीवरी ।
त्याचेथें कुमरी सिता बहु बरी लावण्य योगेश्वरी ।
कोदंडास धरी बळें नृप जरी त्यातें वरी सुंदरी ॥ १ ॥

## ( २४९ ) बल्लव

जेणें कींचक मारिला संवंदळीं घालूनि पांयांतळीं ।
सामर्थ्यें करिं आगळा बहु बळी माला[3] सवें रंवंदळीं ।
तो हा बल्लव वृक्षपल्लव करीं झेलीत ऊठावला ।
हस्तें हस्त धरूनि वेस्त चरणीं त्राहाटूं[4] बळें लागला ॥ १ ॥

## ( २५० ) रामदास्य

विघ्नघ्ना रघुनायका गुणनिधी भक्तांसि मानी सदा ।
तुझें दास्य विशेष जाणाति भले त्यां दुख नाहीं कदा ।
विश्वासें निजदास ध्यास धरितां तत्काळ पावे पदा ।
सांडा रे अभिमान माइक सदा श्रीराम ऐसें वदा ॥ १ ॥

---

१ "रुदती" चें "वदती" केलें आहे. 'रुदती' म. पा. २ "बोले" म. पा.
३ माला किंवा माळू=पांढरी तेलकट माती. ४ मारूं.

## ( २५१ ) वाद्यें

भेरी घोळ मृदांग टाळ काहाळा वाजांतरें यंतरें ।
गीडीबीडिं[1] नडेंगें[2] तुडुंब डफडीं ढोले दमामे भरें ।
तुतारे कर्णे बुरंग मोहरी बांके नफेऱ्या तुरें ।
पावें[3] शंख समेळ दुंदुभि क्रुरें शृंगें आनेकें बरी ॥ १ ॥

## ( २५२ ) भोगें रोग जडे

भोगें रोग जडे स्वसुखें[4] विघडे उदेग चिंता पडे ।
गर्वें गर्व झडे महत्त्व न चढे संताप देह्या चढे ।
दारीद्रें चि दडे पिडा चहुंकडे आक्रंद घोषें रडे ।
सख्यत्त्वें न घडे[5] कठीण चि घडे साशंक देवाकडे ॥ १ ॥

## ( २५३ ) जिवलग मरतां

लोकीकीं घात होतां जिवलग मरतां दुखशोकीं पडावें ।
संसारीं चर्फडावें तडफड करितां बों(ब)लावें रडावें ।
हा हा हा हा म्हणावें द्वयकरकमळीं तोंड हाणोनि घ्यावें ।
मेलें तें वेर्थ गेलें तदुपरि पुढती चालवावें चलावें ॥ १ ॥

## ( २५४ ) ज्ञानगंगा

जा जा जा जा आजा जा इजभीण नुमजा फार जा चाल वोंजा ।
जा जा जा जा भजा जा भवहर उमजा सौख्य राजाधिराजा ।
जा जा जा जा तजा जा खळखळ समजा देवपूजा विराजा ।
जा जा जा जा धजा जा समरस[6] नलजा ज्ञानगंगा नवाजा ॥ १ ॥

---

१ डमरु. २ नडघें, नगारा. ३ 'वाद्यें' होतें, हरताळ लावून 'पावें' केलें आहे. ४ "सुखें दुख घडे" म. पा. ५ "पडे" म. पा. ६ 'सरसर' होतें.

## ( २५५ ) त्रिधाता

धाता धाता विधाता अगणित गणिता जाणता वेद्वेत्ता ।
ताता तासा श्री ताता विगळित वसतां होये त्राता समर्था ।
वर्ता वर्ता विवर्ता दुरि हरि दुरिता हंसता होय सर्ता ।
कर्ता भर्ता भुधर्ता बहुगुण स्तवितां तो म्हणे आहे आतां ॥१॥

## ( २५६ ) रामानुज

रामेंवीण विराम भासत सभा कोण्ही न राहे उभा ।
सीता सुंदर कुंजरावरि करीं माळा विराजे शुभा ।
सर्वै राजकुळें उगीं च विकळें निर्वीर जाली धरा ।
ऐसा शब्द न साहवे चि सहसा रामानुजा कर्धरा ॥ १ ॥

## ( २५७ ) प्रत्यावृत्ति

प्रत्यावृती मनासी कृत्य करणें भृत्य ऐसें कथावें ।
नाना नृत्य विवेक धृत्य चुकवी मृत्य ऐसें मथावें ।
सर्वा मान्य नव्हे जघन्य रुप तें धन्य चित्तीं धरावें ।
अन्या अन्य तजूनि पुण्य प्रबळे तें स्वभावें करावें ॥ १ ॥

## ( २५८ ) स्वरूपस्थिति

गेले चक्रवती बहूत नृपती मन्वादि नेणों किती ।
गेले दैत्यमती निशाचरपती दीर्घायुष्यें संपती ।
जाती शूकर शेष कूर्म जगती जाती दिशा दिग्पती ।
जाती पंचभुतें समूळ प्रकुर्ती राहे स्वरूपस्छिती ॥ १ ॥

## ( २५९ ) देह

देहेमूळ विटाळ गाळ रजला कुश्चीत आकारला ।
आस्तीपंजर जीर्ण जर्जर सिरा नाडीन गुंडाळिला ।

१ "कांता" म. पा. २ "वदता" म. पा.

क्रीमी कीटक जंतु वीटक रजें मूत्रें मळें घोळला।
नाना व्याधिउपाधियोगसरिसा मृत्यूसवें लागला॥ १ ॥*

येथें हें श्रीकल्याणांनीं स्वहस्तें लिहिलेलें

श्रीसमर्थकृत

कवितेचें बाड संपलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३३५२३ वि: ...

REFBK-0004716
REFBK-0004716

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

• या ठिकाणीं मुळांत पुढील एक श्लोक व एक सवाई हीं निराळ्या अक्षरांत आहेत.

नाहीं वैराग्य चित्तीं हरिस न भजती ब्रह्म शब्दें चि होती।
मूर्खांतें तें चि युक्ती झकविति कुमती स्त्रीधनातें लुलाती।
गर्वे तीर्था न जाती विबुध न मनिति प्रेमळांतें चिटाती।
निंदाछंदें न धाती अवचट मरती पापलोकास जाती॥ १ ॥

काळ दंडें धडकील कळी मळें सडकील भवरोग थडकील
निदसुरें राहतां।
योग जरेचा घडेल तारुण्ये हें विघडेल तेव्हां दास्ये न घडेल
राघोबाचें पाहतां।
दोष देहीं भिडकेल पुण्येमार्ग फडकेल आयुष्य हें झडकेल
कर्मवोझें वाहतां।
सेखीं सर्व वोसरेल पापें प्राणी घसरेल रामदास्ये विसरेल
श्रीरामासी वाहतां॥ १ ॥